

संपूर्ण

# श्रीसद्गुरुलीलामृत

**श्रीसद्गुरू श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर यांचें ओंवीबद्ध चरित्र**


**लेखक :**

**कै. गोपाळ विष्णू फडके**

© विश्राम प. पाठक
श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज , 'चैतन्योपासना' (संस्थान)
मु.पो. गोंदवले (बु.), ता. माण, जि. सातारा, पिन - ४१५५४० दूरध्वनी - ०२१६५-२५८२९२

**मुद्रक**
के. जोशी आणि कंपनी
भिकारदास मारुतीमंदिराजवळ, सदाशिव पेठ, पुणे -४११०३०
फोन - ०२०-२४४७१४०९
ई-मेल - kjoshipress@gmail.com

**आवृत्ती १९ वी**
बुद्धपोर्णिमा, शनिवार दि. २१ मे २०१६

**संपर्क / पत्रव्यवहार पत्ता**
श्री. रामचंद्र मुरलीधर गोखले
कुलकर्णी कॉम्प्लेक्स, बी. विंग, ब्लॉक नं. ३
कर्वेनगर, पुणे - ४११०५२ मो. ९३७१८२५३४१

**प्राप्तीस्थळ**
**१) श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर समाधि मंदिर,** मु. पो. गोंदवले बु||, ता. माण जि. सातारा
**२) चैतन्यसदन**
४/१०, एरंडवणे, कर्वे रोड, नळस्टॉपजवळ (लागू बंधू मोतीवाले शेजारील गल्ली), पुणे ४११००४
वेळ : संध्याकाळी ६ ते ७ (गुरुवार/रविवार फक्त)

**मूल्य रुपये :- ७५/-**

॥श्रीराम समर्थ ॥

# श्रीसद्गुरुलीलामृत

## या ग्रंथाचे लेखक कै. गोपाळ विष्णू फडके यांचा परिचय



पेशव्यांचे सेनापति सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे आश्रयानें जीं कुटुंबे तासगांवांत सुस्थिर झालीं त्यांपैकीं फडके या घराण्यांत श्री. गोपाळराव यांचा जन्म झाला. लहानपणींच मातापिता निवर्तल्यामुळें त्यांचें संगोपन मातुलगृहीं कुरुंदवाडास झालें. त्यांतच गोपाळरावांना देवी येऊन परिणामीं सांधे विकल झाले व कांहीं काळ परावलंबित्व आलें; पण त्याही अवस्थेंत मामीनें मोठ्या ममतेनें त्यांचा प्रतिपाळ केला.* शिक्षणास सुरुवात उशिरां करावी लागली. पण त्यांची बुद्धि कुशाग्र होती, आणि वागण्यां-बोलण्यांत फार गोडवा असे, यामुळें वर्गबंधूंत ते प्रिय होते. ते थोडें ज्योतिषही शिकले. अशा तऱ्हेनें शिक्षण चालूं असतां, सन १९०८ सालीं लोकमान्य टिळकांवर खटला होऊन त्यांना दीर्घ मुदतीची हद्दपारीची शिक्षा झाली व लोकक्षोभाची लाट जोरानें उसळली, त्यांत गोपाळरावांनीं देशभक्तीनें प्रेरित होऊन शाळेला रामराम ठोकला आणि ते शहापूर (बेळगांव) येथें गेलें.

शहापुरांत गोपाळरावांनीं ज्योतिषाच्या आपल्या ज्ञानावर उपजीविका सुरू केली. वास्तव्य एका धर्मशाळेंत असे. कर्मधर्मसंयोगानें त्याच धर्मशाळेंत बैराग्याच्या वेषांतील एक गृहस्थ उतरले होते. हे सन १८५७ च्या स्वातंत्र्याच्या उठावांत भाग

---

*** याचा उल्लेख मोठ्या कृतज्ञतेनें त्यांनीं अध्याय १, समास १, ओवी ९०, येथें केला आहे.**

घेतलेले होते. त्यांचें आडनांव लेले. त्यांनीं आपल्याजवळची वैद्यकी विद्या गोपाळरावांना शिकवून एक दवाखाना काढून दिला. पुढें एक दिवस लेले एकाएकीं कोणास न सांगतां गांव सोडून निघून गेले. (त्यावर सुमारें वीस वर्षांनीं गोपाळराव बुधगांवास असतां ते एकदां त्यांना भेटून गेले.) लवकरच गोपाळरावांनींही शहापूर सोडलें व कागवाड येथें वैद्यक व्यवसाय सुरू केला. या दरम्यान त्यांचा विवाह झाला होता.

कागवाड येथें गणूबुवा कुलकर्णी नांवाचे गृहस्थाश्रमी रामदासीबुवा राहात असत. हे गणूबुवा श्रीब्रह्मचैतन्य गोदवलेकरमहाराजांचे अनुगृहीत निष्ठावंत भक्त होते. श्रीमहाराजांनीं त्यांना दीक्षानुग्रहाचाही अधिकार दिलेला होता. त्यांची राहणी फार निःस्पृहतेची व वैराग्याची होती. या रामदासीबुवांशीं गोपाळरावांचा परिचय होऊन बराच निकट संबंध आला. बुवांनीं स्थापन केलेल्या श्रीरामासमोरचा मारुति भंगला तेव्हा त्यांनीं अत्याग्रहानें श्रीमहाराजांस बोलावून त्यांच्या हस्तें नव्या मूर्तीची प्रतिष्ठापना बुधवार, आषाढ शुद्ध पंचमी शके १८३१ (इ.स. १९०९) या दिवशीं केली.

गोपाळरावांची मनोवृत्ति धार्मिक व सात्त्विक असली तरी या काळापर्यंत त्यांचा साधुसंतांवर विश्वास नव्हता. तथापि रामदासीबुवांच्या स्नेहाखातर व त्यांनीं दिलेल्या माहितीवरून, श्रीमहाराजांच्या स्वागतार्थ तयार केलेल्या संगीत मेळ्यासाठीं त्यांनीं सुरस पद्यें रचून दिली होतीं. ते श्रीमहाराजांच्या स्वागतासाठीं इतरांबरोबर सामोरे गेले नव्हते, पण मिरवणूक दारावरून जातांना ते दारांत उभे होते. त्या गर्दींतही त्यांची व श्रीमहाराजांची दृष्टादृष्ट झाली, आणि ती होतांच गोपाळरावांचें मन एकदम पालटलें व श्रींचा अनुग्रह घेण्याची त्यांना तीव्र इच्छा झाली. त्याप्रमाणें मारुतिस्थापनेच्या दुसऱ्या दिवशीं, गुरुवारीं, त्यांना अनुग्रह मिळाला. नंतर श्रीमहाराज तेथील आत्मारामपंत कुलकर्णी नांवाचे गृहस्थांचे घरीं गेले असतां तेथें मेळ्यांतील मुलें सुस्वर पद्यें म्हणत होतीं, तीं ऐकून श्रीमहाराजांनीं विचारले, ''ही पदें कोणीं केलीं आहेत?'' आणि गोपाळरावांनीं तीं केल्याचें समजल्यावर ''कवित्वाचा हा महाप्रसाद त्यांना द्यावा,'' असें सांगून त्यांनीं एक श्रीफल* दिले. या घटनेनंतर गोपाळरावांचा गणूबुवांशीं परिचय आणखीच दृढ झाला व परमार्थाचें बीज त्यांचें मनात दृढमूल झालें.

कांहीं दिवसांनीं आपले मामेभाऊ श्री. छत्रे यांचे सांगण्यावरून त्यांनीं कागवाड सोडून सांगलीजवळ बुधगांव येथें छापखान्यांत नोकरी धरली. नोकरीमुळें फक्त रजा मिळेल तेव्हांच (सामान्यतः श्रीगुरुपौर्णिमेसच) त्यांना गोंदवल्यास जाण्यास मिळे. गोंदवल्यास गेले म्हणजे आपलें नित्यकर्म आटोपून श्रीमहाराजांचे मागें हात जोडून उभे राहाण्याचा गोपाळरावांचा

* **ही सर्व हकिकत प्रस्तुत ग्रंथाच्या अकराव्या अध्यायाच्या पहिल्या समासांत साद्यंत आली आहे.**

शिरस्ता असे. श्रीमहाराज त्यांना 'रामदासीबुवा' म्हणून संबोधीत.* पुढें चारच वर्षांनीं श्रीमहाराजांनीं देह ठेवल्यामुळें यांना श्रींचा प्रत्यक्ष सहवास फारसा लाभला नाहीं.

श्रीमहाराजांनीं देह ठेवल्यानंतर गोपाळराव श्रीगुरुपौर्णिमेस गोंदवल्यास न जातां बुधगांवीं आपल्या घरीच तो उत्सव साजरा करूं लागले. त्यांत मुख्यतः अखंड नामसप्ताह व पौर्णिमेस महाप्रसाद असा कार्यक्रम असे. यासाठीं ते कोणाकडेही द्रव्य वा अन्य सामग्रीची याचना करीत नसत, देवापुढें भक्तांच्या स्वयंस्फूर्तीनें काय येईल तेवढेंच. प्रारंभीं साह्यकारी अगदींच मोजके होते. त्यांत एक म्हणजे तेथील एक शेतकरी विठू नाना शिंदे पाटील; त्यांनीं प्रारंभापासून आपल्या हयातभर उत्सवांत नामाचा पहारा करण्यांत व अन्य प्रकारें साह्य दिलें; त्यांचे चिरंजीव बाबूराव यांनींही आपल्या वडिलांची प्रथा चालविली आहे. तसेच दुसरे, लिंगायत कोष्टी समाजांतले, अण्णाप्पा वसवाडे; त्यांच्यामागें त्यांचे चिरंजीव भरमाप्पा, यांनींही सेवा चालूं ठेवली आहे. एके वर्षीं खुद्द श्रीब्रह्मानंदमहाराजही एक रात्र भाग घेऊन गेले. हळूहळू या उत्सवाला सर्वमान्यता प्राप्त होऊन अनेकांचें उत्साहपूर्ण सहकार्य मिळूं लागलें. नामांकित भक्तमंडळी, भजनीमंडळी, कीर्तनकार, प्रवचनकार, वगैरे येऊं लागलें. राजघराण्यांतील मंडळीही येऊन जात. अशा तऱ्हेनें या उत्सवाचें स्वरूप खूपच विस्तारलें.

श्रीमहाराजांनी देह ठेवल्यास तीन वर्षें होऊन गेलीं तरी त्यांचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न कोठेंच दिसेना, तेव्हां महाराजांनीं आपल्याला दिलेला 'कवित्वाचा महाप्रसाद' ध्यानीं आणून गोपाळरावांनीं तो हेतु मनांत धरला, व प्रथम चरित्रसारवजा ''नमस्कारत्रयोदशी'' हे तेरा श्लोक केले.** ते पाहून श्रीब्रह्मानंदमहाराजांनीं त्यांना चरित्र लिहिण्याची अनुज्ञा दिली. त्याप्रमाणें शके १८४० च्या मार्गशीर्षांत (सन १९१८) श्रींच्या पुण्यतिथीचे दिवशीं गोंदवलें येथेंच लेखनास प्रारंभ झाला. ग्रंथरचना प्रासादिक होत आहे असें पाहिल्यावर अनेकांनीं आपणांस असलेली श्रींसंबंधींची माहिती दिली, व ग्रंथलेखनसमाप्ति शके १८४३ मध्ये बुधगांव येथें झाली. ''पूर्वार्ध'' व ''उत्तरार्ध'' असे दोन भागांत विभागलेलें व दोन छापखान्यांत छापलेलें हें ''श्रीसद्गुरुलीलामृत'' सन १९२२-२३ सालीं प्रथम प्रसिद्ध झालें.

पुढें तीस वर्षांनीं गोपाळरावांचे वारसांचे संमतीनें गोंदवलें येथील श्रीसंस्थानचे सरपंच कै. गणेश महादेव दामले यांनीं याची दुसरी आवृत्ति दोन्ही भाग एकत्रित करून छापली. त्यानंतरच्या आवृत्त्या ''श्रीसमर्थ सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर सेवानिधि'' यांचेमार्फत प्रसिद्ध होत आल्या आहेत.

गोपाळराव वैद्यकव्यवसाय करीत असत हें वर दिलेंच आहे. ते वनस्पति औषधें देत असत. त्यांचा हातगुण चांगला होता.

***   या ग्रंथातील प्रत्येक अध्यायाचे अखेरीस 'इतिवाक्या'मध्यें, तसेंच अन्य काव्यरचनेंतही, त्यांनी स्वतःचा उल्लेख असाच केला आहे.**

*** *   या ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं असलेले श्लोक मिळून ही नमस्कारत्रयोदशी होते.**

गरिबांना ते फुकट औषध देत. ज्योतिषाच्या त्यांच्या ज्ञानाचाही लाभ लोकांना होई. ते निरूपण वगैरही करीत. या सर्वांमुळें आणि त्यांच्या मनमिळाऊ व साह्यतत्पर स्वभावामुळें त्यांचा लोकसंग्रह फार मोठा होता. अध्यात्मांत त्यांनीं आपली फार चांगली प्रगति केली. ते प्रतिवर्षीं समाधिउत्सवासाठीं गोंदवल्यास जात तेव्हां सांगली, मिरज, कुरुंदवाड, कोल्हापूर इत्यादि भागांतील पुष्कळ मंडळी त्यांच्या समवेत येत व त्यांच्याबरोबर 'धर्मशाळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीशनिमंदिरालगतच्या इमारतींत माडीवर उतरत.

सुमारें १९४८ सालापासून गोपाळरावांची प्रकृति खालावत चालली. आतां आपलें आयुष्य फार नाहीं हें त्यांनीं जाणलें. शेवटीं पंधरा दिवस त्यांनीं औषध घेण्याचेंही सोडलें. पण रोज स्नान करून तीर्थ मात्र घेत. अखेर फाल्गुन वद्य १२ शके १८७१, दि. २६ मार्च १९४९, या दिवशीं सकाळीं साडेसात वाजतां, वयाच्या ६३ व्या वर्षीं, बुधगांव मुक्कामीं, ते रामरूपीं विलीन झालें.

गोपाळरावांना त्यांच्या प्रपंचांत पत्नी यमूताई यांची जोड फारच चांगली मिळाली. संसारांत अनेक बरेवाईट प्रसंग आले त्यांना उभयतांनीं जोडीनें तोंड दिलेंच, पण पतिनिधनानंतरच्या काळांत तर यमूताईंवर पाठोपाठ अनेक दारुण आघात कोसळले; ते त्यांनीं अत्यंत धीरोदात्त वृत्तीतें सोसले आणि आपलें कर्तव्य चोखपणें बजावलें. आपत्तीनें त्यांच्या वृत्तींत कधीं निराशा किंवा कटुता आली नाहीं; कधी रागावणें-जाजावणें नाहीं, तोंड टाकून बोलणें नाहीं; नेहमीं विनोदी, गोड भाषण आणि सर्वांशीं निर्व्याज प्रेमाचें वर्तन. त्यांनीं व त्यांच्या पुत्रपौत्रांनीं श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव पूर्वींइतक्याच श्रद्धेनें व उत्साहानें बुधगांवीं आपल्या घरीं चालूं ठेवलेला असून सर्व कुटुंबीय मनापासून उपासना करून समाधानानें जीवन व्यतीत करीत आहेत.

श्रीमहाराजांच्या चरित्रपर कांहीं ग्रंथ गेल्या कांहीं वर्षातच उपलब्ध झालेले आहेत; परंतु तत्पूर्वीं जिज्ञासूंना व भक्तमंडळींना माहितीपर व मार्गदर्शनपर असा 'श्रीसद्गुरुलीलामृत' हा एकमेव ग्रंथ उपलब्ध होता, व त्या दृष्टीनें त्याचें महत्त्व आगळें आहे. हा काव्यमय ग्रंथ अतिशय प्रासादिक असून श्रीमहाराजांची भक्तमंडळी नित्यनैमित्तिक पारायणासाठीं या ओवीबद्ध ग्रंथाचाच उपयोग करतात.

श्रीमहाराजांचा कृपाप्रसाद प्राप्त झालेल्या विशेष भक्तमंडळींपैकीं गोपाळराव हे एक होते. ग्रंथाचें वाचन करतांना त्यांची उत्कट सद्गुरुभक्ती, परमेश्वरप्राप्तीची ओढ, श्रद्धा व ज्ञान यांचा जागोजागीं प्रत्यय येतो. श्रीमहाराजांच्या प्रेरणेनेंच रचलेला हा ग्रंथ हें गोपाळरावांचाया जीवनातील महत्कार्य होय!

(श्री. गोपाळराव यांचे एक निकट स्नेही श्री. वामन गणेश जोशी, नान्द्रेकर, यांनीं मार्च १९७० मध्यें लिहिलेल्या विस्तृत माहितीवरून वरील संक्षिप्त चरित्र तयार केलें आहे. या माहितीबद्दल श्री. जोशी यांचे आभारी आहोंत. - प्रकाशक)

## ***श्रीसद्गुरुनमन-स्तवन***

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ।।

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुःसाक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

सकलभुवनमध्ये निर्विशेषं निरीहम् ।
विधिहरिहरवेद्यं योगिभिर्ध्यानगम्यम् ।।
जननमरणभीतिभ्रंशिसच्चित्स्वरूपम् ।
सकलभुवनबीजं ब्रह्मचैतन्यमीडे ।।

# श्रीसद्गुरुलीलामृत

## अध्याय पहिला

### *समास पहिला*

**महारुद्र जे मारुती रामदास । कलीमाजिं ते जाहले रामदास ।।**
**जनां उद्धराया पुन्हां प्राप्त होती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।१।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जयजयाजी एकदंता । विघ्नांतका सिद्धिदाता । नमन करूं तुज आतां । ग्रंथ सिद्धीतें पाववीं ।।१।। सकल गणांचा अधिपति । म्हणूनि नामें गणपति । तव प्रसादें मंदमति । वाचस्पति होय ।।२।। सकल मंगलामाजीं एक । प्रथम पूजावा विनायक । श्रुतिस्मृति बोलती कौतुक । निर्विघ्न करीं कार्यसिद्धि ।।३।। पाशांकुश वरदहस्त । एके करीं मोदक शोभत । मूषकावरी अति प्रीत । सर्वांगीं सिंदूर चर्चिला ।।४।। तुझिये कृपाकटाक्षें । अलक्ष्य वस्तु तेही लक्षे । अज्ञानी पाविजे कक्षे । सिद्धाचिया ।।५।। असतां सुवर्ण हातीं । कांहीं कार्यें साध्य होती । तुझी कृपा जे संपादिती । तयांसी सकल सिद्धि ।।६।। चौदा विद्या चौसष्ट कला । ह्या तंव तुझिया सहजलीला । पदीं नमवी शिरकमला । तया प्राप्ति सहजचि ।।७।। आदिमाया आणि ईश्वर । तयांचा अंकुर सुंदर । रूप तरी लंबोदर । अनंत ब्रह्मांडें सांठवी ।।८।। सिंदुरासुर मातला । त्रैलोक्या अजिंक्य जाहला । ब्रह्मादिकीं तुज स्तविला । नानास्तोत्रीं ।।९।। मर्दोनिया तो असुर । भक्तचिंता केली दूर । शिवलिंग रावण वीर । नेऊं पाहे स्वस्थानीं ।।१०।। त्वां बालरूप घेऊन । घेतलें तें हिरावून । मृत्युलोकीं

स्थापून । गोकर्ण क्षेत्र निर्मिलें ।।११।। आतां हीच विनंति । दीनासी धरूनि हातीं । ग्रंथसिद्धीची आयती[१] । पुरवावी तुवां ।।१२।। जयजय श्रीशारदामाय । सप्रेम वंदोनि तव पाय । तुज तुझें शब्दप्रमेय । समर्पूं आतां ।।१३।। ॐकाराची जननी । ब्रह्मांडाची मुळापासोनी । घडामोडी स्वेच्छेंकरोनी । क्षणामाजीं करितसे ।।१४।। परेहूनि जी पर । तुर्यास्वरूप निरंतर । न कळे जियेचा पार । अगाध लीला ।।१५।। जिचे गायनाचा विलास । मधुरध्वनि नवरस । भुलवी नादें जनांस । जगद्वंद्य ।।१६।। काश्मीरदेशीं अधिष्ठान । सुंदर मयूर वाहन । परेसी जिचेनि स्फुरण । विद्यादेवी ।।१७।। सुंदरांमाजीं सुंदर । चतुरांमाजीं चतुर । भक्तांलागीं अभयकर । ज्ञानज्योति ।।१८।। शुद्ध द्वितीयेचा चंद्रमा । पहावया पल्लवसीमा । करोनि दाविती व्योमा[२] । जन जैसें ।।१९।। तैसें पहावया निजस्थान । शब्द ब्रह्मसीमा जाण । ज्ञानेंकरोनि विज्ञान । दाविती सिद्ध ।।२०।। धनावरी असे बैसला । परि नेणिवेनें वांया गेला । तैसें तव स्वरूपाला । न जाणतां व्यर्थ ।।२१।। जाणीव नेणीव क्रिया दोनी । चिच्छक्ति[३] चारी वाणी । दशेंद्रियां चाळवणी । तुझेनि योगें ।।२२।। मीपणाची जी स्फूर्ति । ती ही तुझीच शक्ति । स्तुति करितां मति । कुंठित होय ।।२३।। परि आम्हां भाविकांसी । सगुणोपासना निश्चयेंसी । म्हणूनि तव चरणांसी । वंदूं आतां ।।२४।। ग्रंथलेखनाची स्फूर्ति । उपजविली जैशी चित्तीं । सांग करीं समाप्ति । चिंता मजसी कासया ।।२५।। आतां वंदूं सद्गुरुमाय । जें देवांचेंही आदिध्येय । सद्भावें वंदितां पाय । द्वैतभाव मावळे ।।२६।। जयाचें करितां स्तवन । ज्ञानियां पडे मौन । मी अज्ञानी मतिहीन । विनवावें कवणेपरी ।।२७।। जयाचें जाणतां स्वरूप । जाणता होय तद्रूप । ध्येय ध्याता ध्यान अल्प । वेगळें उरेना ।।२८।। तुमची करूं जातां स्तुति । न पुरे शब्दव्युत्पत्ति । परि आवडी

१ सामग्री. २ आकाशाला. ३ सजीव क्रिया.

उठली चित्तीं । मानूनि घ्यावी ।।२९।। जैसीं लेकुरें मातेप्रती । लटिकेंचि जेवूं घालिती । उदर न भरे परि तृप्ती । माय दावी ।।३०।। तैसा निर्विकल्प अरूप । भक्तांकारणें धरिलें रूप । म्हणूनि स्तवनाचा संकल्प । कौतुक पुरवी ।।३१।। वत्स देखोनि पान्हा घाली । तैशी सद्गुरु माउली । सच्छिष्यांतें पावली । ज्ञानबोधें ।।३२।। यास्तव श्रीगुरु आधार । साधक पावे पैलपार । दुजें तारूं नसे थोर । भवसिंधु तरावया ।।३३।। गुरुवांचोनि तरला । ऐसा देखिला ना ऐकिला । महिमा न वचे वर्णिला । निरुपमेय ।।३४।। गुरु तोचि सदाशिव । गुरु तोचि ब्रह्मदेव । गुरु नारायण स्वयमेव । चिद्वस्तु ।।३५।। गुरूचे घरीं पाणी भरी । अथवा सडासंमार्जन करी । ऋध्दिसिध्दि तयाचे द्वारीं । सदा तिष्ठती ।।३६।। गुरुकृपेचा महिमा । बोलावया नाहीं सीमा । अनुभवी अनुभवे आरामा । धन्य साधु ।।३७।। परत्यक्तदुरितें मळती । तीं तीर्थें पुनीत व्हाया येती । गुरुसेवापरायण असती । तयांपाशीं ।।३८।। न करितां वेदाध्ययन । षट्शास्त्रादि पठण । सद्भावें सद्गुरुचरण । सेवितां ज्ञान होय ।।३९।। गुरुक्षेत्र काशीपुरी । अथवा जाणावी पंढरी । देवांचा देव वास करी । काय वानूं ।।४०।। सद्गुरूंचे चरणतीर्थ । सकल तीर्थांहूनि पुनीत । स्नानपान घडतां नित्य । अनंतपातकी उद्धरती ।।४१।। सद्गुरूचे सन्निध वास । तोचि केवळ ब्रह्मरस । आर्त पीडित जनांस । धन्य तारूं ।।४२।। सच्छिष्य उत्तम क्षेत्र । अनुतापें खणिलें पवित्र । भक्तिरस भरोनि पात्र । सिंचिलें तयावरी ।।४३।। गुरुवाक्य निर्मळ बीज । पेरिते झाले सहज । अंकुराचें पाहती चोज । कूर्मदृष्टीं ।।४४।। ऐसा तूं सद्गुरुराणा । वर्णूं न शकेंचि निर्गुणा । गुरुभक्तीच्या खुणा । गुरुभक्त जाणती ।।४५।। कल्पतरू म्हणों जातां । न पाही तों अहिता-हिता । इच्छिलें पुरवी तत्त्वतां । आन नेणे ।।४६।। तैशी नव्हे गुरुमूर्ती । हित अनहित पाहती । हितकर वस्तूच हातीं । देती साधकांच्या ।।४७।। जरी म्हणावें परिस । देई केवळ सुवर्णास । सद्गुरु

स्वस्वरूपास । देत असे ।।४८।। सुवर्ण तें नाशवंत । स्वरूप जाणावें शाश्वत । अशाश्वत शाश्वतासी एकमत । होईल कैसें ।।४९।। परिस न देई आपुलेपण । लोहासि करी सुवर्ण । परि सुवर्णाअंगीं परिसपण । येत नसे ।।५०।। तैसा नव्हे कीं गुरुवर । शिष्या दे स्वाधिकार । तयाकरवीं असंख्य नर। तारितसे ।।५१।। कामधेनू म्हणों जातां । काममूळ जी अहंता । खणोनि काढी तत्त्वतां । काय मागावें ।।५२।। गुरूसि म्हणावें मातापिता । तरी न होय साम्यता । मातापित्यांची ममता । एकदेशी[१] ।।५३।। बालक सुखी असावें । ऐसें इच्छिती मनोभावें । केवळ इहलोक साधावें । म्हणोनि एकदेशी ।।५४।। परत्रसुखातें नेणती । जाणतां द्यावया नसे शक्ति । मायामोहें गुंते वृत्ति । बहुतेकांची ।।५५।। तैशी नव्हे तुमची लीला । इहपर स्वानंदसोहळा । भोगवितां शिष्यबाळा । जीवन्मुक्ती ।।५६।। मुक्या मुखें बोलविसी । लुल्याकरवीं काम घेसी । पांगुळ्यासही चालविसी । सहजचि ।।५७।। अंधासि देसी लोचन। भवरोगासी भेषज[२] जाण । मुमुक्षुचातका जीवन । मुक्तिरस वर्षतसे ।।५८।। तूं वैराग्याचें मंदिर। शांतिसुखाचें माहेर । शमदमादि वळण सुंदर । तुझिये ठायीं ।।५९।। साधनचतुष्टयाची वाट। भक्तिज्ञानाची पेठ । मोल शुद्धभाव श्रेष्ठ । असे येथींचा ।।६०।। ऐसा तूं सद्गुरुराव । चरणीं राहो शुद्ध भाव । हृदयस्थ स्वयमेव । बोलवीं बोल ।।६१।। तुझे कृपाप्रसादें चित्तीं । चरित्र वदविण्याची स्फूर्ति । कृपाकटाक्षें करीं तृप्ति । बाळलीला ।।६२।। सद्गुरूची थोर करणी । नवचे वदली वाणी । मी तंव असें अज्ञानी । केवीं बोलूं ।।६३।। माउली सन्निध असतां । तीस बालकाची चिंता । क्रीडेमाजीं पडतां । वेळोवेळां सांवरी ।।६४।। गुरुमाउलीचेनि बळें । बोलूं बोल हे आगळे । भक्तिरसाचे सोहळे । पुरवूं आजीं ।।६५।। चरित्रांमाजीं चरित्र । संतचरित्र परम पवित्र । श्रवणें पाविजे परत्र । सार्थकता ।।६६।।

**१ मर्यादित. २ औषध.**

संतचरित्राचा कित्ता । सतत पुढें ठेवितां । मोक्ष येईल हातां । साधकांच्या ।।६७।। ऐसे हे संतजन । वर्षती स्वानंदजीवन । तयांसि करूं नमन । साष्टांग भावें ।।६८।। तयांचा वाग्विलास । नवविधा भक्तिरस । सेवूनि पावती तृप्तीस । भाविक जन ।।६९।। साधकासी आदर्शभूत । न्यून पूर्ण प्रत्ययें दावित । आपणामाजीं मेळवित ।। परोपकारी ।।७०।। जयांचें घडतां दर्शन । चित्त होय उदासीन[1]। ना तरी उत्तम नरदेह पावून । व्यर्थ आयुष्य दवडिलें ।।७१।। यांचे चालीनें चालावें । यांचे बोलीनें बोलावें । यांच्या सन्निध असावें । सर्वकाळ ।।७२।। यांची स्थिति अनुभवावी । तरीच देहसार्थकता बरवी । आतां हानि न करावी । आयुष्याची ।।७३।। ऐशी उपरति होय मना । क्षणएक घडतां दर्शना। विषयांपासोन वासना । फिरे मागें ।।७४।। मग होय समाधान । आनंदाश्रूंनीं लोचन । भरती, रोमांच परिपूर्ण । सर्वांगीं थरारती ।।७५।। कंठ होय सद्गदित । भक्तिप्रेमें उचंबळत । मुखीं हरिनाम रसभरित। नाचतसे आनंदें ।।७६।। कन्येस माहेरमूळ। येतां आनंदकल्लोळ । तैसा संतभेटीचा काळ । आनंदा आनंदवी ।।७७।। कीं ह्या परमार्थमार्गींच्या ज्योती । लखलखीत तेजोमय दीप्ति । वळसे खळगे दाविती। ज्ञानोदयापर्यंत ।।७८।। ऐसी संतकृपा राणीव । भूतीं भगवंत ही जाणीव । सुष्ट-दुष्ट एकभाव। प्रेमपान्हा पाजविती ।।७९।। संतांमाजीं वरिष्ठ। तिहीं अध्यात्मग्रंथ केले स्पष्ट । भवसिंधूवरूनि वाट। करणी जयांची ।।८०।। प्राचीन अर्वाचीन दोन्ही । भूतभविष्यवर्तमानीं । उपयुक्त ज्यांची करणी। वंदू तयां ।।८१।। आतां नमूं कुलदैवता । विष्णुपंचायतना समस्ता । हरिहर गणेश सविता । जगन्माता जगदंबा ।।८२।। वेळोवेळीं रक्षिलें । हातीं धरोनि सांभाळिलें । नित्य पाहिजेत स्मरण केले। उपकार ज्यांचे ।।८३।। गोत्रदैवत अत्रिऋषि। भार्या पतिव्रता जयासी । लाधली, दत्तरूपें कुशीं ।

[1] आशारहित.

ब्रह्माहरिहर अवतरले ।।८४।। जे सकळांचे गुरुवर । केला बहुत जगदुद्धार, । करिती, पुढें करणार । नमन असो तयांसी ।।८५।। तया[1] कृपेचेनि योगें । सद्गुरुभेटी होय वेगें । नाहींतरी फिरतां भागे । न मिळे मोक्षदाता ।।८६।। वंदूं माता आणि पिता । जयांची देहावरी सत्ता । देहयोगें कर्तव्यता । घडे सर्व ।।८७।। माउलीचा उपकार भला । नवमास भार वाहिला । सेवेचा योग नाहीं घडला । बाळपणीं निवर्तली ।।८८।। दिधली असे कामधेनु[2] । मिळवावया नारायणु । तया उपकारातें वानूं । कोण्या मुखें ।।८९।। परदेशीं पाळिला पोर । निःस्वार्थ केला थोर । तिये[3] वंदितां नीर । नयनीं लोटे ।।९०।। कुलदैवत गोत्रदैवत । जननी जनक पाळितें दैंवत । इतुक्यांचा ऋणाइत । देह थोर वाढविला ।।९१।। याचें सार्थक करितां कांहीं । तरीच ऋण फिटेल लवलाहीं । नाहीं तरी भवडोहीं । बुडावें लागे ।।९२।। असो आतां श्रोतेजन । श्रवणीं बैसले सज्जन । तयांचे वंदोनि चरण । ग्रंथारंभ करितसें ।।९३।। श्रवणीं बैसले सादर । न्यूनाधिकीं ना अनादर । जाणोनि अजाणत्याचें कीर[4] । पुरविती जे ।।९४।। जैसा नाट्यलेखक । नटबोल ऐके सकौतुक । तैसे लिहविले लेख । श्रवण कीजे ।।९५।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते प्रथमाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**१ श्रीदत्तात्रेयाचे कृपेनें. २ नरतनु. ३ मामीस. ४ कौतुक.**

## समास दुसरा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। करावें सावध चित्त । तरी कळे येथींची मात । गुरुलीला अगम्य अद्भुत । जड देहा न कळेचि ।।१।। ब्रह्मीं अष्टधा प्रकृति । तिचे कर्दमें ब्रह्मांड उत्पत्ति । ती मूळमाया निश्चितीं । जाणावी तुवां ।।२।। प्रकृति जड अचेतन । पुरुषसंयोगें सचेतन । पुरुष म्हणजे जाणीव ज्ञान । प्रकृतीमध्यें बिंबलें ।।३।। ऐसा संसार वाढला । उत्पत्ति-स्थिति-प्रळयाला । शास्ता त्रिगुणरूपें झाला । परमात्मा जो ।।४।। ब्रह्मा करी उत्पन्न । विष्णु प्रतिपाळी जाण । रुद्र संहारी आपण । कार्यभाग चालिला ।।५।। चौऱ्यांशी लक्ष जीवयोनि । उभारिले लोक तिन्ही । जाणीव दिधली वांटोनी । सकलां ठायीं ।।६।। विशेष जाणिवेचें स्थान । तो हा नरदेह जाण । येथींचे उत्तम जन । पावती मूळरूपा ।।७।। अखंड प्रकृतीचेनि संगें । जाणीवही भंगों लागे। जाणिवेसी करावया जागे । सिद्ध पुरुष ।।८।। जाणीव स्थिर रहावया । वेदें ज्या दाविल्या क्रिया । आचरितां मार्गें तया । विमल ज्ञान होतसे ।।९।। हरिहर अवतरती । अथवा अंशरूपें अवतार घेती । जाणीवेसी जागविती । वेळोवेळां ।।१०।। तैसे माझे सद्गुरुराव । हनुमदंश स्वयमेव । जगदुद्धाराचें लाघव । करूनि दाविती ।।११।। एकादश रुद्र हनुमंत । सदाशिव अंश निश्चित । वेळोवेळां स्थापित । भक्ति ज्ञान उपासना ।।१२।। ऐसे अवतार किती होती । कोणा न करवे गणती । कथानुरोधें उपपत्ति । करूं कांहीं ।।१३।। त्रेतायुगीं अवनीवरी । दैत्य मातले अहंकारी । विपरीतज्ञानें अघोरी । क्रिया करूं लागले ।।१४।। वर्णाश्रमातें बुडविती । यज्ञसाधनें तुडविती । दीन अनाथां रडविती । छळछळोनी ।।१५।। गाई ब्राह्मण स्त्रियादिकां । छळिती भ्रष्टविती जे कां । आचरिती नित्य पातकां । दुष्टबुद्धी ।।१६।। कृषिकर्में मंदावलीं । यज्ञकृत्यें थांबलीं । रणें माजों लागलीं । नानाप्रकारें ।।१७।।

भूलोकीं केली पीडा । देवलोकाचा चुराडा । मदमत्सर वाढला गाढा । देव बंदीं घातले ।।१८।। रावणकुंभकर्णादि वीर । वरप्रदानें मातले फार । कोणासही सुविचार । सुचों न देती ।।१९।। लेंकुरें दुःखी देखोनि भारी । धरित्री होय घाबरी । गोरूपें सत्यलोकामाझारीं । मुनिगणांसह पातली ।।२०।। करिती बहु स्तुतिस्तोत्रा । विनविती ते चतुर्वक्त्रा । झांकोनि बैसलां नेत्रां । ऐसी करुणा भाकिती ।।२१।। ''सत्क्रिया राहिली । असत्क्रिया बळावली । सैराटवृत्ती[1] चालिली । शास्ता नाहीं ।।२२।। अज्ञान हें पैसावले । विपरीतज्ञानें वेडें केलें । पाप अत्यंत वाढलें । तमोबुद्धी ।।२३।। दुष्कर्मे करिती गहन । सात्त्विकांचें करिती हनन । आतां होईना सहन । अति दुःख होतसे ।।२४।। याचा करावा विचार । भक्तांसि द्यावा आधार । मर्दोनि ते असुर । जग सुस्थिर करावें'' ।।२५।। ब्रह्मा विचारी मानसीं। वरप्रसादें रावणासी । वैभव बल अतिशयेंसी । चढलें असे ।।२६।। याचा प्रतीकार करावया । विनवूं अच्युता लवलाह्यां । क्षीराब्धिनिकटीं जाऊनिया । प्रार्थूनिया करुणस्वरें ।।२७।। ऐसें वदोनि सत्वरीं । सकलांसमवेत क्षीरसागरीं । पातले ते अवसरीं । प्रेमभरें गर्जती ।।२८।। जय जय माधवा मधुसूदना । केशवा गोविंदा नारायणा । महाविष्णु मुरमर्दना । कमलनयना रमापते ।।२९।। श्रीवत्सकौस्तुभधारी । शेषशायी अघहारी । विश्वव्यापका श्रीहरी । जगन्नाथा जनार्दना ।।३०।। भक्तकाजकल्पद्रुमा । भक्ताधीन आत्मारामा । भक्तहृदयीं पुरुषोत्तमा । वास तुझा ।।३१।। गरुडवाहना गरुडध्वजा । असुरांतका अधोक्षजा । पंचानन[2] तूं भवगजा । विदारक ।।३२।। लक्ष्मी तव चरणांची दासी । नारदतुंबर सुस्वरेंसी । गायन करिती अतिहर्षी । सदोदित ।।३३।। कंठीं शोभे वैजयंती ।

**१ बंधरहित. २ सिंह.**

सहस्ररश्मीपरी दीप्ती । नीलवर्ण सुंदर कांती । सदा शांती नांदतसे ।।३४।। पाहोनिया खिन्न वदन । बोलतसे जगज्जीवन । कवण काजा आगमन । सांगावें सविस्तर ।।३५।। कमलोद्भव बोले वचन । त्रैलोक्या गांजितसे रावण । पराभवोनि देवगण । बंदीमाजीं टाकिले ।।३६।। अभय देत वैकुंठवासी । भविष्य जाणोनि मानसीं । सूर्यवंशीं दशरथकुशीं । घेऊं लीला अवतार ।।३७।। नामाभिधान श्रीराम । सकलां होईल आराम । देव पावतील स्वधाम । चिंता कांहीं न करावी ।।३८।। सकल देवीं आपुलिया अंशें । भूमंडळीं कपिवेषें । साह्यार्थ मजसरिसें । अवतरावें ।।३९।। आज्ञा वंदोनि शिरीं । हर्षभरित होती अंतरीं । निघाले देव सत्वरीं । स्वस्थाना पातले ।।४०।। तेव्हां किष्किंधा नगरींत । देव पातले समस्त । महारुद्र हनुमंत । अंजनीउदरीं राहिले ।।४१।। जन्मतांचि बुभुःकार । नादें दुमदुमिलें अंबर । गिळावयासी भास्कर । उडी घेतली ।।४२।। झुंजतां तेथें राहूसवें । हनुमंत ऐसें नाम पावे । बळें आगळा स्वभावें । बलभीम जो ।।४३।। पुच्छें घाली ब्रह्मांडा वेढा । पर्वत उचली धडाडा । राक्षसांचा चुराडा । क्षणामाजीं करितसे ।।४४।। रावणवधार्थ रघुनंदन । अयोध्येहूनि निघोन । मारोनिया खर-दूषण । ऋष्यमूकीं पावले ।।४५।। तंव तेथें अकस्मात् । भेटते झाले वायुसुत । चरणीं लोटांगण घालित । दास्यत्वासी आदरिलें ।।४६।। रामसेवेवांचूनि कांहीं । दुजी आवड जया नाहीं । ऐसा मारुती वज्रदेही । रामनामें गर्जतसे ।।४७।। शतयोजन जलनिधी । उल्लंघोनि, राक्षसमांदी । असंख्य वधोनि दुष्टबुद्धी । सीताशुद्धी केलीसे ।।४८।। रामकार्या अति तत्पर । रामभजनीं अति सादर । भक्तांमाजीं अग्रेसर । वैष्णववीर म्हणवीतसे ।।४९।। समूळ राक्षसां वधोनी । वनवासव्रत सारोनी । राम बैसले सिंहासनीं । जयजयकारें ।।५०।। याचकां दिधलीं दानें । भक्तांलागीं वस्त्रें भूषणें । कामायोग्य गजवाहनें । दिधलीं अनेक ।।५१।। समस्तांसी बोळविलें । वस्त्रालंकारीं सुखी केलें । तंव सीतामाईनें

पाहिलें । हनुमंतासी ।।५२।। विचार करीतसे चित्तीं । परमभक्त हा मारुति । सेवा करितां देहस्मृति । न ठेवी हा ।।५३।। ऐसा हा निष्ठावंत । प्रभूचा प्राणसखा भक्त । पारितोषक[1] या न देत । कवणनिमित्तें कळेना ।।५४।। कंठींचा हार काढिला । कपीचे गळां घातला । वंदन करोनि चढला । वृक्षाग्रभागीं ।।५५।। विचार करित निजमानसीं । रत्नें दिसती तेजोराशी । अंतरीं आहेत कैशीं । फोडोनि पाहूं ।।५६।। वरी सुंदर दिसतें खासें । अंतरीं राम जरी नसे । तरी नाशिवंत ऐसें । ज्ञानी हातीं न धरिती ।।५७।। वरिवरी शृंगारिले । अंतरीं कुबुद्धीनें भरले । ते जन नव्हेत चांगले । दुरी धरावे ।।५८।। अंतर्बाह्य परीक्षी । तोच चतुर अंतरसाक्षी । नातरी उभयपक्षीं । हानीच होय ।।५९।। हातीं धरोनिया रत्न । मुखीं घालोनि केलें चूर्ण । आंत न दिसे ठाण । श्रीरघुपतीचें ।।६०।। राम न दिसे तो दगड । फेंकून देई भक्त जाड । याची आम्हां नसे चाड । व्यर्थ भार कोण वाही ।।६१।। चूर्ण करोनि फेंकित । तंव जानकी दुरोनि देखत । मनीं खेद मानी बहुत । मर्कटा रत्नें व्यर्थ दिलीं ।।६२।। दीर्घस्वरें पाचारिला। वृत्त जाणोनि प्रश्न केला । तुझे देहीं घनसांवळा । न दिसे कीं ।।६३।। परिसोनिया वचनासी। कपि विदारी हृदयासी । तंव तेथें दृष्टीसी । रघुनंदन दिसतसे ।।६४।। वामांकीं जनकदुहिता । दक्षिणभागीं लक्ष्मणभ्राता । भरत शत्रुघ्न हनुमंता- । हृदयामाजीं देखिलें ।।६५।। कंठ सद्गदित झाला । प्रेमपूर नयनीं आला । धन्य भक्त भला भला । शिरोमणि ।।६६।। प्रभूसी कळली मात। पाचारिलें राजसभेंत । धांवोनि मिठी घालीत । सिंहासन सोडोनी ।।६७।। देव-भक्तांचें ऐक्य झालें । देहभान हरपलें । आनंदें डोलों लागले । सभाजन तटस्थ ।।६८।। अंजनीमाय धन्य धन्य । पिता वायु परम धन्य । यासम भक्त नसे अन्य । त्रिभुवनीं ।।६९।। ऐसी बहुतांपरी बहु स्तुती । करूं

१ बक्षीस.

लागले यथामती । नाम आनंदें गर्जती । रघुपतीचें ।।७०।। आनंदकल्होळा परिसोनी । रामरायें मिठी सोडोनी । सभाजनांसी स्थिरावोनी । सिंहासनीं बैंसले ।।७१।। मग बोले सीतापती । यासी द्यावया त्रिजगतीं । वस्तु न मिळे कार्यसम ती । अनन्य भक्त प्राणसखा ।।७२।। आवडी असे तुज भारी । रामकथामृतपान करीं । जंव कथा पृथ्वीवरी । तंव श्रवण करावी ।।७३।। कठिणकाळीं साह्य व्हावें। सद्धर्मासी प्रतिपाळावें । रामभक्तीसी लावावे । असंख्य जन ।।७४।। दुष्ट पातकी दुराचारी । भक्तां छळिती नानापरी । तयांसी तूं निवारीं । तपोबळें ।।७५।। प्रभूनें ठेविला हनुमंत । अंशरूपें तो अवतार घेत । आज्ञा मनीं वागवित । स्थापितसे रामभक्ति ।।७६।। द्वापारयुगामाझारीं । बैसोनि अर्जुनस्यंदनावरी[१]। धर्मरक्षणा साह्य करी । बहु प्रकारीं ।।७७।। गरुडगर्व हरण केला । भीमगर्व परिहारिला । धनंजयासी दाखविला । भक्तिप्रताप ।।७८।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते प्रथमाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास तिसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। कलियुग प्राप्त झालें । जाणिवेसी विसरले । आपत्तीनें व्यापिले । सर्व जन ।।१।। अल्पायुषी झाले प्रथम । तेजोबलहीन परम । बुद्धीस पडला भ्रम । सत्यासत्य कळेना ।।२।। स्वात्मसुखा नेणती । देहसुखा वाढविती । मार्ग चुकला ऐसें चित्तीं ।

---

**१ अर्जुनाचे रथावर.**

नाणिती कदा ।।३।। देहा चाळवी चैतन्य । तया ओळखितां अनन्य । चित्सौख्य लाभे पूर्ण । सर्वभावें ।।४।। आत्मज्ञान विसरले । साधनांसी अव्हेरिलें । बाष्कळपणें बोलूं लागले । अन्योन्यासी ।।५।। बहुतेकीं धर्म सोडिला । भरतभूमीं कांहीं राहिला । सत्पुरुषीं रक्षिला । वेळोवेळां म्हणोनिया ।।६।। कलियुगाचे अंतीं । अधर्मे ग्रासेल जगती । बीज रहावया निश्चितीं । अवतार होय ।।७।। आपत्काळीं कृषीवल । बीजरक्षणीं दक्ष केवळ । तोचि सुज्ञ सुशील । स्थिरबुद्धी ।।८।। भरतभूमी पुण्यदेश । सात्त्विकां सहाय विशेष । आत्मोन्नति व्हावयास । अनुकूल असे ।।९।। अगणित पिकें धरणीं । नाना तीर्थें उत्तम पाणी । म्हणोनिया भगवंतांनीं । धर्म येथेंचि रक्षिला ।।१०।। जैसे जैसे दिवस गेले । तैसें अधर्मे ग्रासिलें । म्लेंच्छ उदंड वाढले । हिंसाधर्मी ।।११।। तीर्थें क्षेत्रें भ्रष्टविलीं । देवालयें उद्ध्वस्त केलीं। गोवधाची झाली । परमसीमा ।।१२।। धार्मिकांसी भ्रष्टविती । सद्धर्मासी निंदिती । बहुत प्रकारें छळिती । भाविकांसी ।।१३।। सत्यधर्म सनातन । याचें करावया रक्षण । गोदातीरीं हनुमान । अंशरूपें अवतरले ।।१४।। रामदास नामें भले । भक्ति-ज्ञानें चकित केलें । रामें स्वयें येवोनि उपदेशिलें । वायुनंदन साह्य करी ।।१५।। विवाहकालीं 'सावधान' । म्हणतां तोडिलें गृहबंधन । केलें बहुत अनुष्ठान । श्रीरामा तोषविलें ।।१६।। कुरवाळोनि भक्तासी । आज्ञा देती 'दक्षिणदेशीं । जावोनि शिवरायासी । साह्य करावें ।।१७।। शिव स्थापील राजसत्ता । त्वां वाढवावें भक्तिपंथा । सद्धर्मा लावावें समस्तां । मलिन झाले' ।।१८।। आज्ञा वंदोनिया शिरीं । पावले स्वामी कृष्णातीरीं । महाराष्ट्रदेशाभीतरीं। वास केला ।।१९।। स्वतेजें प्रकाशती । नाना चमत्कारांतें दाविती । उपासना दुमदुमविती । समुदाय थोर मेळविला ।।२०।। रामनामाच्या घडघडाटें । महाराष्ट्रदेशीं अंबर फाटे । 'रघुवीर समर्थ' म्हणोनि नेटें । भक्तजन गर्जती ।।२१।। शिवरायास कळली मात । सद्गुरु रामदास

समर्थ । पावले अधर्मछेदनार्थ । दक्षिणदेशीं ।।२२।। स्वामीदर्शनाचे आशें । धुंडाळी वनें प्रदेशें । संतभेटी अनायासें । होईल कैसी ।।२३।। तळमळ लागली मोठी । अनुताप उपजला पोटीं । मग समर्थचरणीं मिठी । दृढ केली ।।२४।। उभयतांसि संतोष झाला । शिवाजीरूपें शिव आला । उपदेशवचनें बोधिला । धन्य धन्य म्हणोनि ।।२५।। सेवेच्छा दावी नृपति । स्वामी बोलती तयाप्रती । तुज सेवा ही निश्चितीं । धर्मरक्षणाची ।।२६।। राजधर्म केला कथन । दुर्जनीं गांजिले जन । स्त्रिया गाई ब्राह्मण । रक्षण करीं ।।२७।। श्रीकृपेवांचोनि खटपट । ती पोंचट आणि लटपट । रामउपासनेची लगट । करित असावी ।।२८।। भगवत्कृपा होतां पाहीं । जगीं दुर्मिळ नसे कांहीं । यास्तव रामभक्ति लवलाहीं । केली पाहिजे ।।२९।। विरक्त होऊनि शिवराज । स्वामीचरणीं अर्पितां राज्य । स्वामी म्हणती आम्हां गरज । नसे याची ।।३०।। ‘जोहार’ मोडोनी ‘रामराम’ करवीं । मारुती स्थापीं गांवोगांवीं । भगवा झेंडा जगीं मिरवीं । हिंदुत्वाचा ।।३१।। दासबोध वीस दशक । केला ग्रंथ आध्यात्मिक । विवरतां इहपर सुख । प्राप्त होय ।।३२।। ‘मनाचीं शतें’ आदिकरोनि । कविता लिहिली अमोल वाणी । कीं ही ब्रह्मरसाची खाणी । शद्बरूपें दाविली ।।३३।। काष्ठाच्या खडावा पायांत । कुबडी स्मरणी हातांत । कौपीन मेखला भगवी शोभत । खांद्यावरी ।।३४।। भृकुटीं आवाळूं वागविती। जटाभार दिव्य कांती । द्वादश मुद्रा शोभती । गिरिकंदरीं नित्य वास ।।३५।। शिष्यसंप्रदाय वाढला। शिवबा निजधामा गेला । स्वामींनींही निरोप घेतला । ज्योतीस ज्योत मिळाली ।।३६।। सज्जनगड समाधिस्थान । स्थापिलें श्रीरामाचें ठाण । नित्य पूजन अन्नदान । होत असे ।।३७।। ऐसा काळ बहुत गेला । कांही कार्यभाग चालिला । दिवसेंदिवस कलि वाढला । अधर्में जाळें पसरिलें ।।३८।। जैसा जैसा कलि वाढे । तैंसें धर्मा क्षीणत्व जडे । शहाणेही होती वेडे । कलिप्रतापें ।।३९।।

म्लेंच्छसत्ता उडाली । मराठेशाही कांहीं चालली । पुढें आंग्लसत्ता आली । कालक्रमें ।।४०।। म्लेंच्छीं छळोनि भ्रष्टविलें । मध्यें कांहींसें रक्षिले । परधर्मापाठीं लागले । अजाणपणें ।।४१।। सनातनधर्मी लोकां । अध्यात्मविद्या मुख्य जे कां । तदनुरोधें आचारादिका । नियमन केलें ।।४२।। उत्तम क्वचित् लाभतें । मिळवाया कष्टावें लागतें । तनुमनधन वेंचावें तें । तरीच जोडे श्लाघ्यता ।।४३।। आधीं कष्टानें मिळतें । विषमकाळीं दुर्लभ होतें । चित्ता मलिनता येते । विवेका ठाव नाहीं ।।४४।। वडिलीं शुद्धज्ञानाचा धडा । शिकाया घातला आचार गाढा । परि निष्फळ वाटे मूढां । सांडिलीं साधनें ।।४५।। क्षण एक वाटतें चित्तीं । शुद्ध बीज मिळवावें हातीं । प्रयत्ना सांडिलें वृत्ती । विषयालस्यें ।।४६।। आंबट म्हणूनि फळें टाकिलीं । जंबुकशी वृत्ती झाली । जनता सैराट धांवली । प्रवृत्तिज्ञान शोधाया ।।४७।। ज्ञानामाजीं दोन भेद । प्रवृत्ति निवृत्ति विशद । निवृत्तिज्ञानें सकल साध्य । होत असे ।।४८।। प्रवृत्तिज्ञान भेदयुक्त । देहसुखातें वाढवित । संपत्ति बलातें देत । सुखसोयी ।।४९।। जें नाशिवंत गणलें। वेदासवें गुप्त झालें । सत्य कांहींसें राहिलें । निवृत्तिज्ञान ।।५०।। सत्य राहे शाश्वत । दृश्य तें तें अशाश्वत । चौदा[१]-चौसष्टींची मात । बुडत गेली ।।५१।। कांहींसा वेद राहिला । स्तुति-नीतिरूपें उरला । निवृत्तिमार्ग बुडाला । सर्वस्वेंसी ।।५२।। विप्र केवळ धर्ममूर्ति । क्षत्रिय तयांतें रक्षिती। वैश्य शूद्र संगतीं तरती । ऐशी स्थिती बुडाली ।।५३।। विप्र क्षत्रिय पुढारी । वर्तों लागले अनाचारीं । वैश्यीं शूद्रींही त्यापरी । कृषिसेवा सोडिली ।।५४।। वर्णाश्रमधर्म बुडाला । आत्मोन्नतीचा मार्ग खुंटला । धर्मशास्ता नाहीं उरला । भूमंडळीं ।।५५।। घरची कुलवधू टाकिली । कुलटा हवीशी वाटली । तिचे ठायीं रंगूं लागली । वृत्ती जयांची ।।५६।। अधोमार्गाचे दीपक । म्हणती आम्ही

**१ चौदा विद्या व चौसष्ट कला.**

सुधारक । स्वैर आचाराचें सुख । वाटों लागलें ।।५७।। व्हावया चित्तशुद्धि । वेदप्रणीत क्रियाविधि । आचरितां भवनदी । तरोनि जाय ।।५८।। चित्तशुद्धि होय जैशी । प्राणी पावती जन्मासी । उच्चनीच वर्णांसी । योग्यतेसारिखे ।।५९।। वर्णाश्रमधर्में वर्ततां । चित्ता येतसे शुद्धता । म्हणोनि वेद आंखिता । यथाक्रम जाहला ।।६०।। क्वचित् कोणी भाग्यवंत[१] । भक्तिबळें शिखरा जात । परि क्रमाक्रमानें चालत। बहुतेक जन ।।६१।। कांहीं[२] उफराटे चालती । नीचयोनीप्रति जाती । कलिधर्में बहुतांची वृत्ती। मागें धांवे ।।६२।। कर्महीन झाले सकळ । गेलें आयुष्य आणि बळ । मुमुक्षु पडिले विकळ । अंधत्व आलें ।।६३।। भविष्य जाणोनि भगवंतें । सोपे सुलभ मार्गातें । दाविलें, नाम एकचित्तें । स्मरतां सकलसिद्धी ।।६४।। उच्चनीच सर्व याती । नाम स्मरतां मुक्त होती । चित्तशुद्धि आणि भक्ति । प्राप्त होय ।।६५।। अज्ञ विकल्पी दुराचारी । अशांसही नाम तारी । पातकाची नुरे उरी । ज्ञानबोधें ।।६६।। कलियुगीं नाम साधन श्रेष्ठ । इतर साधनीं बहु कष्ट । अधिकारयुक्त कर्मनिष्ठ । उरला नाहीं ।।६७।। परि मुमुक्षूची तळमळ । न जाय अंतरींचा मळ । संतीं दाखविला सोज्ज्वळ । भजनमार्ग ।।६८।। नेणती स्वधर्मकर्म । करूं जातां चुके वर्म । उभय हानी कष्ट परम । समाधान नाहीं ।।६९।। यास्तव साधुजनीं । बहुतां लाविलें भगवद्भजनीं । ज्ञानेश्वर-आदिकरोनी । सिद्धपुरुषीं ।।७०।। बहुतेकीं आदरिलें । कर्मठांनीं अव्हेरिलें । कर्मही सांग न झालें । कलिप्रतापें ।।७१।। भजनमार्ग आजींचा नव्हे । चहूं युगीं सारखा स्वभावें । स्वयें आचरिला सदाशिवें । समाधान पावावया ।।७२।। आचार भ्रष्ट जाहले । मंत्रसामर्थ्य कांहीं न चाले । समाधान दुरी राहिलें । निश्चयेंसी ।।७३।। वेद गेले भजन गेलें । जन अभिमानडोहीं बुडाले । उभयपक्षीं नागवले । सर्वस्वेंसी ।।७४।। अन्न न मिळे उदरपूर्ती ।

**१ शबरी, रोहिदास, चोखा वगैरेसारखे. २ पापकर्मी.**

अंगीकारिली क्षुद्रवृत्ती । नीचयाती हेवा करिती । समसाम्यें ।।७५।। नास्तिक झाले प्रबळ । गुरुत्व ज्ञान तपोबळ । लया जावोनि केवळ । अभिमानीं राहिले ।।७६।। सामर्थ्य नसतां सत्ता । कोणी न मानी तत्त्वतां । अपमान उपहास्यता । होऊं लागली ।।७७।। ऐशी उभयपक्षीं हानि । स्वधर्म दिधले टाकोनि । उदरपूर्तीवांचोनि । अन्य साधनें राहिलीं ।।७८।। थोर कुळें हीनत्वा आलीं । नाना आपत्तींनीं ग्रासिलीं । आहार-विहारें भ्रष्टलीं । कितीएक ।।७९।। याकारणें जाहला अवतार । अवलोकिती आचार। सुलभसाधनीं नर अपार । रामभजनीं लाविले ।।८०।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते प्रथमाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास चवथा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। भाविक जनां सुविचार । न सुचे इह आणि पर । म्हणोनि सद्गुरुअवतार । ईशेच्छेनें लाधला ।।१।। महाराष्ट्रीं माणदेशीं । परमपवित्र ब्राह्मणवंशीं । अवतरले पुण्यराशी । सद्गुरुराय ।।२।। मातापितया आनंद झाला । अंतर्निष्ठांनीं ओळखिला । कार्यकर्ता पुरुष भला । हनुमदंश ।।३।। बालपणीं क्रीडा ज्याची । देवतार्चनपूजेची । आवडी वृद्धसेवेची । सकलां प्रिय ।।४।। उपजत ज्ञान ज्या लाधलें । त्यासी जनव्यवहारें शिकों घातलें । लोकाचारें वर्तलें । पाहिजेच कीं ।।५।। करिती मौंजी-विवाहादिक । मातापिता पुरविती कौतुक । म्हणती प्रपंचभार चोख । वाहील सुपुत्र आमुचा ।।६।। लोकाचारें वर्तविती । क्षुद्रवृत्तीसी[१] लाविती ।

**१ वंशपरंपरागत उपजीविकेची वृत्ति, जी परमार्थाच्या दृष्टीनें क्षुद्र आहे.**

सांभाळीं आपुली वृत्ती । उपदेशिती पुत्रस्नेहें ।।७।। महत्कार्य आणोनि चित्तीं । जनासारिखे वागती । सूक्ष्मदृष्टीं न्याहाळिती । स्थिति सर्व ।।८।। कळवळा उपजला पोटीं । अज्ञानें जनां हानी मोठी । उत्तम देह पावोनि शेवटीं । अधोगती चालले ।।९।। कर्महीन भक्तिहीन । श्रद्धाहीन विवेकहीन । आर्जवें निर्वाह करोन । राहती निरुपायें ।।१०।। सन्मार्गीं लावावें यांसी । करुणा उपजली मानसीं । कार्यारंभीं भगवंतासी । आपुलेंसें करावें ।।११।। भगवत्कृपेवांचून कांहीं । केवळ प्रयत्नें सिद्धी नाहीं । समर्थें दासबोधीं पाहीं । कथिलें असे ।।१२।। धरिला मनुजावतार । तैसाचि आचारविचार । साधनीं झिजविलें शरीर । साधकवृत्तीं ।।१३।। व्हावया आत्मज्ञान । सद्‌गुरूसी रिघाले शरण । सेवा केली अतिगहन । गुरुकृपा संपादिली ।।१४।। केलीं बहुत साधनें । तोडिलीं सकल बंधनें । श्रीरामाचे दर्शनें । धन्य झाले ।।१५।। सद्‌गुरु[1] बोलती वचन । 'दुर्धर कलि वाढला गहन । जीव अज्ञानी मतिहीन । रामभजनीं लावावे ।।१६।। लोकसंग्रह करावा । प्रपंच थोर वाढवावा । अडला भुलला बोधावा । युक्तिप्रयुक्तीं ।।१७।। नाना प्रापंचिक व्यवसाय । पुरवोनि दावीं भजनसोय । बुडत्यासी तरणोपाय । सुचवीत जावे' ।।१८।। आज्ञा वंदोनि शिरीं । गुरुसेवा केली पुरी । निघाला भक्तकैवारी । जगदुद्धाराकारणें ।।१९।। सिद्धपणें विचरती । भूमंडळीं नाना तीर्थीं । सूक्ष्मदृष्टीं अवलोकिती । स्थिति सर्व ।।२०।। जागोजागीं स्थापिले मठ । भजनीं लाविले भाविक खट । सुलभोपायें दाविली वाट । परमार्थाची ।।२१।। प्रपंच करोनि अलिप्त । अध्यात्मज्ञानें समाधान देत । तापत्रयांतूनि काढित । असंख्य नर ।।२२।। ज्याचा जैसा अधिकार । तैसें साधन लहानथोर । दावूनि भवसिंधु पार । पाववितो ।।२३।। शांति जयांची आगळी। कल्पांतींही न डळमळी । स्वानंदस्थिति जी निराळी । न होई

**१ श्रीमहाराजांचे सद्‌गुरू, श्रीतुकामाई.**

कदापि ।।२४।। भक्तकामना पुरविती । देहदुःखें दूर करिती । भूतपिशाचें नेणों किती । उद्धरिलीं दर्शनमात्रें ।।२५।। असंख्य धेनु पाळिल्या । कसायापासोनि सोडविल्या । तैशा कित्येकांसी त्या दिधल्या । पाळावयाकारणें ।।२६।। नित्य होतसे अन्नदान । तृप्त होती असंख्य जन । अन्नपूर्णा स्वयें येवोन । अन्नपूर्ती करीतसे ।।२७।। नास्तिकांचें समाधान । साक्षात्कारें करिती पूर्ण । भक्तिपंथा लावूनि जाण । दुष्ट पातकी उद्धरिले ।।२८।। सकलांठायीं समदृष्टी । आपपर भाव न ये पोटीं । दर्शनें चरणीं पडे मिठी । पूज्यभाव प्राप्त होय ।।२९।। क्षणएक घडतां संगति । आनंद न समाये चित्तीं । नयनीं अश्रुपूर लोटती । गुरुचरणक्षालना ।।३०।। शिष्यसंप्रदाय वाढला । सच्छिष्यां स्वाधिकार दिला । रामनामाचा गजर केला । भूमंडळीं ।।३१।। नास्तिकां लाविलें सुवाटें । ज्ञानियांचे मोडले ताठे । अज्ञानियां भक्तिपेठे । नेऊनि बैसविले ।।३२।। स्वयें बहुत तारिले । शिष्यांकरवींही उद्धरिले । राममंदिरां स्थापिलें । जागोजागीं ।।३३।। सर्वत्रांसी आज्ञा एक । रामनाम घ्या निःशंक । सुख लाभेल ब्रह्मादिक । वांछिती जें ।।३४।। ऐसें बहुत कार्य केलें । तंव देहा क्षीणत्व आलें । स्वस्वरूपीं मीनले । पंचकोश सांडोनी ।।३५।। वद्य दशमी मार्गशीर्षमास । समाधीचा पुण्य दिवस । येती जे दर्शनास । सद्गुरुधामीं ।।३६।। तयां समाधान होय चित्तीं । सेवा करितां सायुज्यप्राप्ती । वारी करितां कामना पुरती । भाविकांच्या ।।३७।। ऐसें हें अगाध चरित्र । श्रवणें होईजे पवित्र । पूर्वपुण्य असेल सूत्र । तरी आवडी श्रवणाची ।।३८।। श्रवण करावें एकचित्तें । अर्थें विवरावें तयातें । तोडोनिया बंधनातें । सिद्धचालीं चालावें ।।३९।। तंव श्रोतीं केला प्रश्न । स्वल्पसंकेतें दाविली खूण । तेणें तृप्त न होती श्रवण । विशद करावें ।।४०।। कोण देश कोण धाम । कोणे कुळीं घेतला जन्म । गुरुलीला पावन परम। सविस्तर सांगावी ।।४१।। गुरुपरंपराविस्तार । कैसा केला जगदुद्धार । भक्त कोण थोर थोर ।

गुरुकृपा पावले ।।४२।। कैसें साधन कैसें भजन । दुःखमुक्त झाले कोण । कैसें केलें अन्नदान । कथन करावें ।।४३।। मंदिरें स्थापिलीं किती । गोरक्षणाची कैसी स्थिती । कैसी अवतारसमाप्ती । स्पष्टोक्ती सांगावी ।।४४।। वक्ता बोले जी वचन । गुरुलीला परम गहन । मी तंव असें अज्ञान । वर्णूं न शकें ।।४५।। परि कृपा केलिया गुरुनाथें । असाध्य तें साध्य होतें । वंदूं चरण एकचित्तें । श्रीसद्गुरूंचे ।।४६।। कृपाप्रसाद वोळेल जरी । पुढील अध्यायीं सविस्तारीं । अंतरीं राहोनी विवरी । सद्गुरुस्वामी ।।४७।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।४८।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते प्रथमाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति प्रथमोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय दुसरा

## *समास पहिला*

**महाराष्ट्रिं या माणगंगातिरातें । असे पुण्य गोंदावलें क्षेत्र तेथें ।।**
**यजुर्वेदि विप्रगृहीं जन्म घेती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।२।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः।। जयजय श्रीज्ञानसूर्या । सच्चिदानंदा गुरुराया । अवस्था भेदोनि तुर्या। सहजस्थितिनिवासा।।१।। तुझिये कृपाप्रकाशें । वस्तुजात तितुकी दिसे । स्पष्टपणें उमजत असे। नित्यानित्य ।।२।। उदय होतां गभस्ती[1]। डोळस क्रिया चालती। अज्ञानाची निवृत्ति। होत असे ।।३।। तैसा सद्गुरु दिनकर। दवडी अज्ञान अंधकार। भाविकांसी पैलपार । ज्ञानतेजें पाववी ।।४।। जे अज्ञानरजनीं निजेले। स्वस्वरूप विसरले। जन्ममरणस्वप्नीं भ्रमले । सदोदित ।।५।। कोणी अहंकारें उन्मत्त होती। घरघरा घोरों लागती। तस्कर हिरावोनि घेती । अर्थ ज्यांचे ।।६।। कित्येक अंधारीं फिरती। सर्प विंचू दंश करिती। दुःखें तळमळोनि पडती। अधोभागीं ।।७।। लोभमोहाचेनि नेटें । स्वप्नवैभव खरें वाटे । सर्वेचि जातां भ्रष्टे। वृत्ति जयांची ।।८।। कित्येक नृप थोर थोर। स्वप्नीं भिक्षा दारोदार। मागोनि भरती उदर । हरपले स्वसत्ते ।।९।। मुमुक्षु अत्यंत बिहाले । जन्ममृत्युपिशाच देखिलें। चातकापरी पाहों लागले । वाट उदयाची ।।१०।। विषयपरागाचेनि संगें।

१ सूर्य.

कमलसुमनीं गुंतले भुंगे । उदय होतांचि वेगें । मुक्त होती ।।११।। दक्षाचिये[1] पोटीं । उद्यमाची आवडी मोठी । परि अंधाराची मिठी । कांहीं न चाले ।।१२।। तैसे बद्ध मुमुक्षु अंध । झाले असती सखेद । जंव ज्ञानसूर्य गुरुपद। उदय न पावे ।।१३।। तमीं दाटलें चित्त । मोहानें भ्रमोनि बरळत । तयां सद्गुरु अभय देत । ज्ञानज्योती उजळोनि ।।१४।। कैसें नवल उदयाचें । नाशिले विकार त्रिगुणांचे। तुर्यातीत अवस्थेचें । ज्ञान होय ।।१५।। तम म्हणजे अंधकार । दीपतेज रजोविकार । सत्त्व चांदणें निर्धार । लया गेलें ।।१६।। सर्वसाक्षिणी तुर्या अवस्था । येतसे साधकांचे हातां । भवसिंधु तरूनि जातां । सुलभ होय ।।१७।। अरुणोदयाचे संधी । अनुतापें जैं चित्तशुद्धी। तैं ज्ञानोदय कृपानिधी । सद्गुरुनाथ ।।१८।। मग वासना निमाली । मना उन्मनता आली । ज्ञानदृष्टि पैसावली । भूतीं देखे भगवंत ।।१९।। तैसी भक्ति घर रिघे[2] । वैराग्य रोमरंध्रीं जागे । ज्ञानरूप होवोनि अंगें । सहजानंदीं निमग्न ।।२०।। ऐसा ज्ञानसूर्य गुरुवर । मुमुक्षुचातकां आधार । निजसखा हाचि निर्धार । इतर सर्व मायिक ।।२१।। रविहूनि तेजाळ। परि उष्ण ना शीतळ । विकाररहित निर्मळ । सहज समाधी ।।२२।। उदयास्त पावे भास्कर । सद्गुरु नित्य निरंतर । आदिमध्यान्तविकार । नाहीं तेथें ।।२३।। उदय होतां गभस्ती । सत्यासत्य क्रिया चालती । होतां सद्गुरुप्राप्ती । विमलमार्गीं पवाडे ।।२४।। उदय पावले सद्गुरु। लीला तयांची आदरूं। साष्टांगें वंदन करूं । प्रेमळ भावें ।।२५।। मागां श्रोतीं जें पुसिलें । गुरुलीला विशद बोलें । सप्रेम वंदोनि पाउलें। निरूपिजेल ।।२६।। येरवीं सांग गुरुकथा । गुरुवांचोनि दुजा न वक्ता । परि व्हावया समाधान चित्ता । आला प्रसाद अंगीकारूं ।।२७।। अनंतकोटि ब्रह्मांड। माजीं पृथ्वी नवखंड। त्यांतील जें भरतखंड । पुण्यभूमी ।।२८।। जें धनधान्यादिकें समृद्ध । सुवर्णभूमी नामें

१ उद्योगी मनुष्याचे. २ घरीं येई.

प्रसिद्ध । जेथें मूर्तिमंत वेद । नांदतसे ।।२९।। जें विद्येचें माहेर । ज्ञानाचें असे कोठार । सत्त्वगुणें केलें घर । पुण्यक्षेत्र म्हणोनि ।।३०। हरिहरादिक मूर्ति । नित्य नूतन अवतार घेती। दुष्टां छेदोनि सुखी करिती । सर्व जन ।।३१।। कृषीवल[१] नांगरी शेत । हरळी कुंदा काढित । उत्तम पिकें होय युक्त । भूमिका जेवीं ।।३२।। तैसें हरिहरादिक भले । वेळोवेळां काढिती किडाळें । श्रेष्ठ पुरुष सत्त्वागळे । प्राप्त होती ।।३३।। भगीरथें गंगा आणिली । सदाशिवें वसति केली । पुंडलिकें विटे माउली । भक्तजनां आधार ।।३४।। कोणी सूर्यातें झांकिती । देवशत्रु विदारिती । कोणी समुद्र प्राशिती । तपोबळें ।।३५।। कित्येक देवांशीं झुंजती । त्रिलोकीं सत्ता स्थापिती। कोणी धैर्याची मेरुमूर्ति । होऊनि गेले ।।३६।। विश्ववायु निरोधी कोणी । प्रतिसृष्टि निर्मिती ज्ञानी । कित्येक स्वस्वरूपा पावोनि। निश्चल झाले ।।३७।। कोणी निर्जीवा चालवी । पशुमुखें वेद बोलवी । स्वर्गींचे पितर जेववी। प्रत्यक्ष येथें ।।३८।। देहाच्या करी पुष्पें तुलसी । देहासहित वैकुंठवासी । पाषाणमुखीं ग्रासासी । घाली कोणी ।।३९।। ऐसा जो कां पुण्यदेश । भक्तिभावें पावन विशेष । नाना तीर्थांचे प्रदेश । जया ठायीं ।।४०।। तयाचे दक्षिणदिग्भागीं । कृष्णा गोदा चालिल्या वेगीं । पावन करित भेटीलागीं । सरित्पतीच्या[२] ।।४१।। महाराष्ट्र नामें देश । दोन्ही नद्या मध्यप्रदेश । माणगंगातटाक विशेष । माण नामें प्रसिद्ध ।।४२।। ऐशिया माणदेशीं । गोंदावलें नाम ग्रामासी । बुद्रुक संज्ञा जयासी । तें सद्गुरूंचे जन्मस्थान ।।४३।। पूर्वदिशे पंढरपूर । सहा योजनें असे दूर। मार्गीं जो का सिद्धेश्वर । म्हसवडीं नांदे प्रसिद्ध ।।४४।। दक्षिणेसी शुकस्थान । दुजें कुरोली[३] सिद्ध जाण । सिंहनाद होतो गहन । परम पावन क्षेत्र जें ।।४५।। पश्चिमे वेरळातीरासी । नागनाथ क्षेत्र परियेसीं । उत्तरे शिखर शिंगणापुरासी ।

**१ शेतकरी. २ समुद्राच्या. ३ 'सिद्धाची कुरोली' या नांवाचें गांव**

कैलासपती नांदतसे ।।४६।। माणगंगातीरासी । ज्ञानवापी[१] संगमासी । पुण्यक्षेत्रीं गोंदावलीशीं । भीमाशंकर स्थान असे ।।४७।। असो ऐशिया क्षेत्रांत । विप्रकुटुंब नांदत । 'घुगरदरे' उपनाम विख्यात। पूर्वीं होतें प्रसिद्ध ।।४८।। अंगीकरिली जैं वृत्ती । कुलकर्णी ऐसें बाहती । इनाम मिळविली शेती । इनामदार कोणी म्हणे ।।४९।। देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण । शाखा असे माध्यंदिन । वसिष्ठ गोत्र असे जाण। सुप्रसिद्ध तें ।।५०।। उदरनिर्वाहापुरती । लेखनवृत्ती आदरिती । गृहस्थाश्रमीं वर्तती । नीतिन्यायें ।।५१।। जयांचे कुळीं दैवत । मुख्यत्वें असे पंढरीनाथ । शुद्ध एकादशी नेमस्त । वारी जयांची ।।५२।। नित्य होत हरिभजन । आवडी नामसंकीर्तन । मुद्रा माळा हें भूषण। असे जयांचें ।।५३।। वंशवृक्ष विस्तारला । फलपुष्पभारें शोभला । लिंगोपंत नामें भला । पुरुष झाला विख्यात ।।५४।। संपत्ति जयाची आगळी । उत्तरोत्तर वाढली । धान्यादिकें समृद्धी झाली । बहुप्रकारें ।।५५।। सुंदर गाई वांसरें। महिषी वृषभ जनावरें । शेळ्या आणि कोंकरें । कितीएक ।।५६।। दास दासी कुलवाडे । शेती चालली धडाडे । धनधान्याचा ढीग पडे । भाग्यवंत ।।५७।। ग्रामाधिकार यथान्याय। चालवी, न करी अन्याय । अधिकारीवर्ग गुण गाय । बहुप्रकारें ।।५८।। संपत्ति घरीं पाणी भरी । आणि परमार्थीं आवडी भारी । दोन्ही नांदती एकसरी । ऐसें स्थळ दुर्मिळ ।।५९।। लक्ष्मीमदें नर धुंद होती। लक्ष्मीनायका विसरती । न कळे धर्माधर्म नीति । विषयभोगीं अतृप्त ।।६०।। स्वेच्छाचारें वर्तती। सुज्ञासी धर्मवेडा म्हणती । आयुष्य जाईल विलयाप्रती । ऐसें स्वप्नीं न ये कदा ।।६१।। जेथें श्री आणि श्रीधर । उभय कार्य चाललें थोर तो भगवदंश निर्धार । सत्य सत्य जाणावा ।।६२।। लिंगोपंत अत्यंत सात्त्विक। गृहधर्म पाळी अशेख[२]। अतिथिसेवा निःशंक । अत्यादरें करितसे ।।६३।। पंढरीकुलधर्म

**१ श्रीमहाराजांनीं ठेविलेलें ओढ्याचे नांव. २ अशेष, सर्व.**

घरीं । नित्य नेमें वारी करी । भजन कळाकुसरीं । टाळ वीणा मृदंग ।।६४।। प्रातःकाळीं करूनि स्नान। ब्रह्मकर्म देवतार्चन । भगवद्गीता करी पठण । अतिप्रीतीं ।।६५।। नित्य हरिपाठ वाची । आल्या अतिथा अन्न वेंची । आवडी अध्यात्मश्रवणाची । जयालागीं ।।६६।। रात्रौ हरिभजनीं सादर । वाणी जयाची मधुर । प्रेमें वाहे नयनीं नीर । नाचतसे प्रेमभरें ।।६७।। भगवच्चरणीं अढळ लक्ष । प्रपंचीं उद्यमीं अति दक्ष । दीनाचा घेऊनि पक्ष । युक्तिप्रयुक्तीं सांभाळी ।।६८।। भार्या राधा पतिव्रता। पतिवांचूनि देवता । न मानी जी तत्त्वतां । एकनिष्ठ सेवा करी ।।६९।। गृहीं गृहिणी शोभली । बाह्य कीर्ति पैसावली । तया भाग्याची साउली। इच्छिती जन ।।७०।। संसार थोर चालला । संतती-संपत्तीनें भरला । रावजी नामें पुत्र झाला । स्थिरबुद्धी ।।७१।। विद्या वृत्ति-व्यवहार । शिकवोनि केला थोर । मग विवाहाचा विचार । करों लागले ।।७२।। वर पहावया अनेक । गांवोगांवचे येती लोक । विद्या वैभव वागणूक । वररूप पाहती ।।७३।। कोणी वैभव वांछिती । कोणी वयसीमा पाहती । कोणी शरीरसंपत्ति । आणि स्वरूप ।।७४।। कोणी म्हणती पाहिजे वर केवळ । नको सासूसासऱ्यांचा छळ। नणंदा-जावांचा जोंजाळ । असूंच नये ।।७५।। म्हणती वर विद्वान् असावा । कोणी म्हणे उद्यमी हवा। धारिष्टें असावा बरवा । सकलां ठायीं ।।७६।। कोणी म्हणे भलतें झालिया । स्थावर असावें खाया । हिस्सेरशीनें जांवया । काय येईल ।।७७।। कित्येक जे बिडालबुद्धी[१] । विक्रयें खाती द्रव्यनिधी । असेल जें जें प्रारब्धीं । तैसें कन्येचें होईल ।।७८।। न पाहती वयसीमा। कुल विद्या आणि आरामा । कन्याविक्रयी अधमाधमा । अधोगती होतसे ।।७९।। कित्येक धनानें भुलले । अधर्माचे पाये घातले । कुलवंत सात्त्विक भले । विरळा शोधी ।।८०।। असो ऐसी लोकस्थिति । नोवऱ्या सांगोन

१ बोक्याप्रमाणें लबाड किंवा स्वार्थी.

येती।  लिंगोपंत विचारी चित्तीं । वधू कैंसी योजावी ।।८१।। मातुलगृहींचे आचार । संतती करिते अंगीकार । जाणोनि हा आधार । सूक्ष्मदृष्टीं न्याहाळी ।।८२।। कुलवंत बुद्धिवंत । आचारशील दयावंत। विवेकी आणि भगवद्भक्त । असतां भली ।।८३।। अधर्में धन मेळविती । धार्मिकाचा आव घालिती । धना पाहुनी भुलती । कितीएक ।।८४।। अथवा धनाचे मदभारें । वागती नाना कुविचारें । म्हणोनि सूक्ष्मविचारें । निरीक्षण करी ।।८५।। दैवयोगें दारिद्र्य आलें । नीतीनें पाहिजे भोगिलें । कुनीतीकरितां गेलें । श्रेष्ठत्व कुळाचें ।।८६।। पूर्वजांची महाव्याधी । क्वचित् संततीसी बाधी । यास्तव तो सूक्ष्मबुद्धी । शोधीतसे ।।८७।। वाघमारे कलढोणकर । सात्त्विक सज्जन इनामदार । नारायणकन्या उपवर । निश्चित केली ।।८८।। विवाहसमारंभ केला । वधूप्रवेश गृहीं झाला । गीतानामें पाचारिती जिला । उभयकुलोद्धारक ती ।।८९।। लिंगोपंत वृद्ध झाले । प्रपंच करोनि थकले । रावजीहातीं काज दिलें । नीतिन्यायें सांभाळीं ।।९०।। मज आलें वृद्धपण । हरिचिंतनावांचूनि जाण । आतां काज नसे अन्य । उचित बापा ।।९१।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते द्वितीयाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## समास दुसरा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। संसारगाडा चालला नीट । लिंगोपंत झाले जरठ । वारी करितां बहु कष्ट । होऊं लागले ।।१।। परि एकनिष्ठ वैष्णव । विठ्ठलचरणीं दृढभाव । देहाची ज्या नसे कींव[1] । वारीपुढें ।।२।। ऐसा काळ बहुत गेला । विठ्ठला कळवळा आला । भक्तिप्रेमें पाझरला । धांव घेई ।।३।। देव भक्तांची माउली । भक्तचिंता त्यास लागली । वृत्ति पाहिजे विश्वासली । परि तेंचि कठिण ।।४।। स्वप्नीं येवोनि सांगत । तुझी भक्ति दृढ बहुत । देखोनि प्रसन्न मी पंढरीनाथ । झालों आजीं ।।५।। तव देह जीर्ण झाला । परि भक्तिभाव वाढला । वारी करितां भागला । बहु दिससी ।।६।। तरी आतां ऐसें न सोसावें । तूं कष्टतां मी दुखवें । आज्ञापितों तें ऐकावें । एकचित्तें ।।७।। तुझिंये भक्ती भुलोनि । आलों असें तव सदनीं । विठ्ठलरखुमाई मूर्ति दोन्ही । विहिरीमाजीं असती ।।८।। काढोनिया मूर्तीप्रती । स्थापन कराव्या वेदोक्तीं । नित्य पूजा पंचारती । अतिआदरें करावी ।।९।। तयांचें घेतां दर्शन । वारी होईल परिपूर्ण । येविषयीं संशयी मन । करों नये ।।१०।। ऐसा दृष्टान्त होतां पाहीं । मूर्ति काढल्या लवलाहीं । यथाविधि स्थापिल्या गृहीं । अत्यानंदें ।।११।। नित्यपूजा नैवेद्यासी । जमीन दिधली देवासी । सेवा करिती अहर्निशीं । निरालस्यें ।।१२।। कुळीं जयांच्या भगवंत। प्रत्यक्ष असे नांदत । तयांची थोरवी वर्णूं येथ । किती म्हणोनि ।।१३।। सुकृतें जयांचीं आगळीं । ते नर जन्मती या कुळीं । उत्तरोत्तर भक्ति जिव्हाळीं । वाढों लागली।।१४।। नदी उगमीं सूक्ष्म वाहत । पुढतपुढती प्रवाह वाढत । समुद्रमिळणीं न लागे अंत-। पार जियेचा।।१५।।

---

१ करुणा.

संगमीं समरस होये । वेगळेपणें काढितां नये । सागर होवोनि राहे । भेदरहित ।।१६।। सूक्ष्म प्रवाह ओहोळ नाले । सरळी सरोवर निघाले । मिळणी मिळतां एकचि झाले । संगतीं तारिले असंख्य ।।१७।। तैसी ही कुलनदी । ब्रह्मरसीं मीनली अनादि । तारिली असंख्य शिष्यमांदी। बोधामृत पाजूनिया ।।१८।। लिंगोपंतांची भक्ती ऐसी । रावजी स्वयें उदासी । परि पित्राज्ञा मानोनि आदरेंसी। प्रपंचगाडा चालवी ।।१९।। घेतला प्रपंचभार माथां । चालवीतसे कार्यापुरता। येरवीं प्रिय ज्याचे चित्ता। एकांतवास ।।२०।। सदा विठ्ठलचिंतन । परपीडेचें दुःख जाण । शेतीं कष्टोनि आपण । धान्य मेळवी ।।२१।। स्वयें पाणी आणावें । अन्नही स्वतः शिजवावें । खावोनि सुखी असावें । कष्ट न देई कोणासी ।।२२।। जरी गृहीं अर्धांगी । वचनसीमा नुल्लंघी । तरी नियमा न त्यागी । आदरिलें ज्या ।।२३।। येतां नदीस्नान करोनि । स्पर्श करिती उपहासोनि । पुनरपि जाई स्नानालागोनि । परि क्रोध शिवेना ।।२४।। अप्पा पाटील ग्रामस्थ । यांनीं केला बंदोबस्त । परि रावजी भरी न[१] भरित । सात्त्विक धर्ममूर्ती ।।२५।। ऐसी ठेवोनि वृत्ती । स्वधर्मकर्मीं रत होती । प्रपंचीं न जडे आसक्ती । कार्याकरण ।।२६।। गृहीं दुर्लक्ष झालें । वैभवावरोनि मन उडालें । निर्वाहापुरतें राहिलें । स्वल्प कांहीं ।।२७।। जितुका करावा व्याप । तितुका होतसे संताप । साधनीं येई विक्षेप । क्षणोक्षणीं ।।२८।। विषय लोभ नाहीं मनीं । वैराग्य वरिलें जयांनीं । ऐसे रावजी अंतर्ज्ञानी। जरी लोकीं दिसती साधारण ।।२९।। विषयीं मानिला वीट । परमार्थीं लागली चट । उपासना एकनिष्ठ । निरालस्यें चालवी ।।३०।। गीताबाई सगुणखाणी । पतिव्रताशिरोमणि ।सदा तत्पर पतिवचनीं । अत्यादरें ।।३१।। गृहकाजीं दक्ष सदा । वृद्धांसि देई आनंदा । सेवेसी नसे मर्यादा । हास्य मुखीं ।।३२।। अरुणोदयापूर्वीं । उठोनि गृह सारवी।

१ क्रोधवश होत नसत.

रांगोळी घाली बरवी । चित्रविचित्र ।।३३।। वेणीफणी सुंदर । कुंकुमादि अलंकार । लक्ष्मीपरी साचार । दर्शने आनंदवी ।।३४।। देवकाजीं अति सादर। उपकरणीं निर्मळ सुंदर । रंगवल्यादि मनोहर । देवगृहा सुशोभवी ।।३५।। पुष्पमाळा तुळशीमाळा । गुंफोनि देत वेल्हाळा। कामाचा नसे कंटाळा । तियेलागीं ।।३६।। गरजेआधीं साहित्य पुरवी । मधुरवचनीं तोषवी । सत्कार्यालागीं झिजवी । देह आपुला ।।३७।। नव्हे अंगचोर खादाड । झोपाळू कुटिल आणि द्वाड । ओंगळ तोंडाळ तुसड । कुतर्की हटवादी ।।३८।। नव्हे भ्याड ना अति धीट । गृहकार्यें चालवी नीट । सासूनणंदांसी बोभाट। कराया ठाव नाहीं ।।३९।। पति सासू आणि श्वशुर। तुळशी विठ्ठल रखुमाईवर । इतुक्यांची सेवा चतुर। नेमस्तपणें चालवी ।।४०।। वाटे दुजी अनसूया। अथवा सती जनकतनया। पावली भाव पाहूनिया । जगन्माता जगदंबा ।।४१।। देवभक्तांचें दर्शन। घ्यावया उल्हसित मन । उभयतां धरिती चरण । सद्भक्तांचे ।।४२।। संभाजी साधु दर्‍यांत । तेथें उभयतां दर्शना जात । चरणीं मस्तक ठेवित। करद्वय जोडोनि ।।४३।। त्या साधूंची ऐशी स्थिति । कोणासी स्पर्श करूं न देती। लोकीं केली विनंती। यांसीच स्पर्श किंनिमित्त।।४४।। साधु बोलती तयांसी। धन्य असे यांची कुशी । उदरीं अवतार देवासी। येणें असे ।।४५।। यांचें भाग्य असे थोर। पूर्वसंचित अपरंपार । उदरीं होईल अवतार ।सगुण ब्रह्म ।।४६।। परिसोनि विस्मय करिती। धन्यवाद मुखीं गाती।तैसाच रावजीप्रती। दृष्टांत होय एकदिनीं ।।४७।। स्वप्नीं येत पंढरीनाथ । कौस्तुभ - श्रीवत्सांकित । कंठीं वनमाला शोभत। शंखचक्रधारी ।।४८।।कांसे पीतांबर कशिला। मयूरपिच्छें मुगुट शोभला । रावजीसन्मुख उभा ठाकला । हास्यमुखें बोलतसे ।।४९।। तुझी भक्ति फळा आली। सुकृतें असंख्य जोडलीं। भार्या पतिव्रता लाभली । धन्य कुशी तियेची ।।५०।। तुम्हांसि होईल सुत। महावैष्णव भगवद्भक्त । कीर्ति

करील दिगंत । सिद्ध पुरुष ।।५१।। असंख्य तारील नर । होईल कारणिक अवतार । तुमचें भाग्य असे थोर । सद्गतीस पावाल ।।५२।। ऐसा दृष्टांत झाला । भार्येसी निवेदन केला । उभयतां आनंद झाला। पोटीं न समाये ।।५३।। भाग्य आमुचें उदेलें । अहा देवा धन्य केलें । दीनांसी हातीं धरियेलें । काय भक्ति पाहिली ।।५४।। भक्तकाजकल्पद्रुम । म्हणती तुज आत्माराम । भक्तांचे हरिसी श्रम । नमन असो आमुचें ।।५५।। बहुतां परीनें स्तुती । केली उभयतांनीं चित्तीं । कालांतरें गर्भाप्रती । धारण करी गीताई ।।५६।। एक मास होतां पूर्ण । पाळी चुकली बाणली खूण । आनंदी-आनंदलें मन । सर्वत्रांचे ।।५७।। तिजे मासाचे अवसरीं । शिंक्याखालीं बसविती नारी । चोरओटी भरोनि सत्वरीं। वायनें देवविती ।।५८।। हळूंहळूं डोहाळे लागती । शांति आदरिली चित्तीं । प्राकृताऐसे नव्हेती । साधारण वा कष्टमय ।।५९।। जैसे लागती डोहाळे । तैसीं निपजती बाळें । माता करिती चाळे । त्या त्या परी ।।६०।। गीताबाईची स्थिति । पहा झाली कैशा रीती । जेणें श्रवण तृप्त होती । कथन करूं ।।६१।। एकांतीं जावोनि बैसे । रामनाम घेई हर्षे । साात्त्विक आहार करितसे । आवडीनें ।।६२।। पतीनें एकांतीं पुसिलें । काय इच्छा असे बोलें । सती वदे इच्छें भ्रमले । थोर थोर ।।६३।। निर्हेतुक रामभक्ति। करावी वाटते चित्तीं । सहजानंदीं वृत्ति । लय करावी ।।६४।। सद्गुरुचरण सेवावे । ऐसें वाटतें जीवेंभावें । भविष्य जाणोनि बरवें । रावजी राहे तटस्थ ।।६५।। समवयी मैत्रिणी मिळाल्या । कौतुकें भेटों आल्या । उपदेशामृतें बोधिल्या । नानापरि ।।६६।। कैंचा पुत्र कैंचें घर। कैसे डोहाळे संसार । हें सर्वही असार । सार तें वेगळेंचि ।।६७।। भगवद्भजन हेंचि सार । नामाचा करा हो गजर। परिसोनि विस्मय थोर । वाटे उदरीं सिद्धपुरुष ।।६८।। वैभव मानाल सत्य । तरी अंतीं होईल घात। मीन गळातें गिळित । आमिषातें भुलोनि ।।६९।। तरी ऐसें न करावें । सन्मार्ग हृदयीं धरावे ।

सद्गुरूसी शरण जावें । अहंभाव सांडोनि ।।७०।। पतिसेवा निरंतर । करावी निर्मत्सर । जन्मा आलियाचें कीर[1]। सार्थक करावें ।।७१।। मैत्रिणींसी उपदेशी । रामनाम अहर्निशीं । गाई अत्यानंदेंसी । पतिव्रता माउली ।।७२।। ओटीं नारळ घालिती । समारंभ बहु करिती । मनींची हौस पुरविती । अतिकौतुकें ।।७३।। कोवळें उन्ह चांदणें। काळोखे रात्री जेवणें । नानापरींचीं पक्वान्नें । मधुर आणि घमघमित ।।७४।। वनभोजन आंवळीभोजन। तुळशीभोजन केळीभोजन । सुवासिनी कुमारिका जमवून । ओटीभरण करिताती ।।७५।। याचकांसी दिधलें धन । सुवासिनींसी वायन । महाफळें आणि खण । धान्य देऊन बोळविती ।।७६। उत्तरोत्तर वाढे गर्भ । तेज फांकले स्वयंभ । होईल म्हणती पुत्रलाभ। कुलदीप चालवील ।।७७।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते द्वितीयाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास तिसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। श्रीगणाधीशा तुज नमोन । करितों श्रीगुरूंचे जन्मकथन । मज दीनावरी कृपा करून । अवधान दीजे ।।१।। हळूं हळूं दिवस भरले । नवमास पूर्ण झाले । सोहळे सर्वही केले। शास्त्ररूढी ।।२।। प्रसूतीसाहित्य जमा केलें । कुशल सुइणीसी निमंत्रिलें । प्रसूतीगृह रंगविलें । शोभायमान ।।३।। जन्मसमय प्राप्त झाला । कोणी करूं नका गलबला ।मुखानें राम राम

---

**१ कांहीं.**

बोला । सुटका होईल त्वरित ।।४।। शके सतराशें साहसष्टांत । माघ शुद्ध द्वादशीप्रत । बुधे पंचघटी प्रभात । मीन लग्नीं रवि आला ।।५।। शुभदिन शुभमुहूर्त । उच्च ग्रह असती जेथ । तया लग्नीं बाल जन्मत । आनंदा सुकाळ जाहला ।।६।। इकडे भजनाचा गजर । रावजी करितसे मनोहर । पुत्रवार्ता सांगाया चतुर । नारी टपोनि बैसल्या ।।७।। उदरीं प्रसूतिवेदना आली । गीताबाई प्रसूत जाहली । पूर्वपुण्यें सुपुत्र लाधली । सिद्धपुरुष ।।८।। चतुर नारी धांवत गेली । पुत्रवार्ता निवेदिली । द्रव्य देऊनि सुखी केली । लिंगोपंत-रावजींनीं ।।९।। पुत्र होय रावजीप्रती । घरोघरी शर्करा वांटिती । नरनारी पाहों येती । बालकासी कौतुकें ।।१०।। ज्योतिष्यासी बोलाविलें । सूक्ष्मवेळेसी[१] कथिलें । भविष्य पाहिजे वर्तविलें । गणित करोनी ।।११।। वेदमूर्ती पाचारिल्या । दक्षिणा देऊनि सुखी केल्या । याचकमांदी धांविन्नल्या । रावजीगृहीं ।।१२।। कोणा वस्त्र कोणा भूषण । कोणा धान्य कोणा अन्न । देऊनि तोषविती मन । सकळिकांचें ।।१३।। अंधळ्यां पांगळ्या व्यंगांसी । भोजन घालिती हर्षेंसीं । तृप्त होवोनि सुखेंसीं । आशीर्वचनें बोलती ।।१४।। खण नारळ सुवासिनी । हळद कुंकू लेववोनी । ओट्या भरिती धान्यांनीं । बहुतां परींच्या ।।१५।। गांवोगांवीं धाडिलें पत्र । ईशकृपें लाधलों पुत्र । सुखी असती सर्वत्र । चिंता चित्तीं नसावी ।।१६।। तुझे कृपें जाहला पुत्र । म्हणोनि करिती स्तोत्र । पांडुरंगा तूंचि मित्र । पाठीराखा आमुचा ।।१७।। मातुलगृहीं पाठविती । शर्करा दूताहातीं । पत्र देवोनि कथिती। आनंदवार्ता ।।१८।। वेदोक्त कर्में शांत्यादिक । यथाविधि करिती सकौतुक । पुत्रस्नेह उन्नत देख । दिवसेंदिवस होतसे ।।१९।। न्हाणीपूजन पांचवीपूजन । नाना ग्रहांचें पूजन । लोकाचारें करिती जाण। अंतरीं ध्यान पांडुरंग ।।२०।। दश दिन समाप्त झाले । सूतिकागृह शुद्ध केलें । घरोघरीं वाटले ।

१ बरोबर जन्मवेळ.

विडे आणि सुंठवडे ।।२१।। त्रयोदश दिन प्राप्त झाला । समारंभ आरंभिला । करूं म्हणती नामकरणाला। अतिप्रीतीं ।।२२।। पाहुणेमंडळी जमली । गृहीं अत्यंत दाटी झाली । बालकांची गट्टी जमली । करिती सारा गोंगाट ।।२३।। पक्वान्नें केलीं षड्रस । विप्र सुवासिनी विशेष । कुमार कुमारी आणि दास। जेवूं घालिती अनेकां ।।२४। बाळ आणि बाळंतिणी । सुगंधिक तैलें उटणीं । न्हाऊं घालिती मर्दोनी। शीघ्रत्वेंसी ।।२५।। दृष्ट होईल म्हणती । मीठमोहऱ्या ओंवाळिती । मिरच्या पावकीं[1] घालिती। कितीएक ।।२६।। नेत्रीं घालिती काजळा । तीट लाविती कपाळा । वारा लागों न देती बाळा । शीत होईल म्हणोनि ।।२७।। अन्न वांटिती गरिबांसी । लुगडें चोळी सुईणीसी । देती अति हर्षेंसी । कार्यभाग चालिला ।।२८।। रावजी मनीं विचारी । स्वप्नीं बोलिले श्रीहरी । सिद्धपुरुष हा निर्धारीं । धन्य भाग्य आमुचें ।।२९।। अनंत जन्मींचीं सुकृतें । फळलीं आजि आम्हांतें । उद्धार करील कुळातें। निश्चयेंसी ।।३०।। सत्कर्मी पुत्र होय जरी । पितरां नरकापासोनि तारी । आत्मज्ञानी झालियावरी। सुकृतातें न गणवे ।।३१।। कुकर्मी झालिया पुत्र । नरकीं घालील सर्वत्र । म्हणोनि सुज्ञ सुपुत्र । वांछिती सद्गतीसी ।।३२।। कोणी घेतील आशंका । कर्म एकाचें एका । फळतें कैसें सांगाना कां । आह्मांप्रती ।।३३।। वाटसरू वृक्षछायेंसी । क्षण एक आले वस्तीसी । सवेंचि चालिले दशदेशीं। येरयेरां काय प्राप्त ।।३४।। येचि दृष्टांतीं विवेचन । करूं व्हावें सावधान । एकाचें कर्म एकालागून । भोंवतें कीं नाहीं ।।३५।। कोणे एके धर्मशाळे । पांथिक समुदाय जमले । संगतिपरिणाम लाधले । कैसे पहा ।।३६।। कोणाचा कर्ण फुटला। दुर्गंधवायु कोंदला । कोणी करी वमनाला । चिळस आली ।।३७। कोणी ढेंकूण आणिती ।वस्त्रांतून उवा निघती । ढांसढांसोनि जागविती । समस्तांसी कितीएक ।।३८।।

---

[1] अग्नींत.

पीडिती ऐसे अधम। आतां पाहूं ते उत्तम। ज्यांची संगति आराम । इतरांस देई ।।३९।। कोणी हरिभजन करिती। श्रवणीं पीयूष[1] सिंचिती । कोणी मधुर गायन करिती । आनंदविती सकळांसी ।।४०।। अत्तरें माखिती कोणी। दीप ठेविती लावोनी। देशोदेशींचे ज्ञान कथुनी। चित्तरंजन करिताती ।।४१।। असो ऐसे बहुत जन। गुंतले पाहोनि आश्रयस्थान । सुखदुःख भोगिती जाण । संगतीसारिखें ।।४२।। तैसे कुळाभिमानीं गुंतले। पुत्रस्नेहें जे भ्रमले । त्यांसी पाहिजे भोगलें। पुत्रकर्म ।।४३।। पुत्रावांचोनि नाहीं गति। ऐसें सर्वत्र बोलती । स्वर्गद्वारीं न घेती। निपुत्रिकासी ।।४४।। आणि पितृऋणांतुनी। सुत होतां मुक्त प्राणी । पितरोद्देशें देई पाणी । आत्मा मूर्तिमंत दुसरा ।।४५।। करोनि बहु विचार । रावजी आनंदले थोर । आठविती देवाचे उपकार । स्तविती पुन्हा पुन्हा ।।४६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते द्वितीयाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास चवथा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः।। जयजय श्रीबालकृष्णा। तुझिये कृपें निरसे तृष्णा । शरण जाणूनि करिं करुणा। विनंती माझी।।१।। बालरूप गुरुवर दिवेसेंदिवस होती थोर। कराया पतितांचा उद्धार। नररूप धरियेलें।।२।।आला बारशाचा दिवस । आनंदले बहुवस। पाचारिलें सोनारास । कानीं मुद्या घालिती ।।३।। ताशा मरफा आणि सूर । ढोल सनई सुस्वर। शिंगें वाजविती चतुर । वाजंत्री अनेक।।४।।बाळासि भूषणें घालिती । पंचधातूंचे वाळे करिती । वाघनखें सुवर्णीं गुंफिती । गाठलें घालिती पुतळ्यांचें ।।५।। कंठीं सुवर्णसांखळी। बिंदली मनगटी हसोळी । आंगठ्या

---

१ अमृत.

घालिती करांगुलीं। रणजोडवें पायांत ।।६।। ऊर्णावस्त्राचें अंगडें । गजनीचें करिती टोपडें । जरीकुंचीसी गोंडे । कनकपुष्पें लाविती ।।७।। सुवासिनी बहुत जमल्या । खण नारळ कुंच्या आणिल्या । कोणी वाळे कोणीं बिंदल्या। आणिती यथाशक्ती ।।८।। पाळणा सुंदर रंगविला । खेळणीं लाविलीं जयाला । घालिती मऊ शय्येला । दुपटी रंगीत चिटांचीं ।।९।। बाळासी पोटकुळीं धरिती । पाळण्याखालूनि देती । गोविंद गोपाळ घ्याहो म्हणती । हर्षभरें ।।१०।। दर्शन उद्वेग-चिंता हरी । वाटे दुजा सिंदुरारी। गणेश नाम ठेविती नारी । सद्‌गुरूंचें ।।११।। सुंठवडा वांटला सत्वर । घुगऱ्या पेढे साखर । गणेश नामाचा गजर । नरनारी करिताती ।।१२।। हळद कुंकू ओटी । परस्परें करिती दाटी । वायनें दानें दिधलीं मोठीं । अपूर्व सोहळा जाहला ।।१३।। गणपतीचें मुख पाहती । सुहास्यवदन गंभीरवृत्ती । दर्शनें आनंद चित्तीं । न समाये ।।१४।। पहा हो सोज्ज्वळ बाळ । नसे श्लेष्म आणि लाळ । न करी रडोनि गोंधळ । योगियापरी स्थिरदृष्टी ।।१५।। ब्रह्मरंध्रीं वायु खेळे । दशमद्वार[1] तें मोकळें । सहजानंदाचे सोहळे । नित्य भोगी ।।१६।। नवल वाटलें सकळांसी । अवतरले ज्ञानराशी । धन्य धन्य तुमची कुशी । धन्य तुमचें दर्शन ।।१७।। हर्षें कोंदलें गगन । सोहळा झाला पूर्ण । ज्योतिषी तेथें येवोनि । जातकातें वर्तविती ।।१८।। मीनलग्नीं जन्म यासी । कुंडली परिसावी कैसी । स्वगृहीं तनुस्थानासी । बृहस्पति देवगुरु ।।१९।। वृषभे केतु सहजांत[2] । कर्के स्वगृहीं निशिनाथ । वृश्चिके शोभे धरणीसुत[3] । राहु संगें घेवोनी ।।२०।। नक्रे[4] बुध शुक्र शनि । अत्युत्तम एकादशस्थानीं । कुंभे द्वादशीं तरणि[5] । शुभदायक सर्व ग्रह ।।२१।। होईल हा भगवद्‌भक्त । भगवद्‌भजनीं आसक्त । तुम्हांसी न कामा येत । प्रपंचाच्या ।।२२।। घराचें करील देऊळ । मिळवील बालगोपाळ । नांदवील

**१ ब्रह्मरंध्र (श्रीमहाराजांना टाळूचे ठिकाणी लहान छिद्र होतें.) २. तृतीयस्थानीं. ३ मंगळ. ४ मकरेंत. ५ सूर्य.**

सज्जन आणि खळ । एके ठायीं ।।२३।। लक्ष्मी नांदेल याचे घरीं । परि हा नित्य भिकारी । दीनजनांचा कैवारी । होईल सदा ।।२४।। विद्या पाहतां अगणित । गणितें न गणवे नेमस्त । ब्रह्मज्ञानी होईल सत्य । ऐसें आम्हां वाटतें ।।२५।। भार्या पुत्र आणि धन । यांवरी नसे आसक्त मन । स्वस्वरूपीं अनुसंधान । ठेवील निश्चयेंसी ।।२६।। शमवील अंतःशत्रूसी । बाह्य शत्रु नसे यासी । सदा प्रेमळ वाग्विलासी । अनंत शरण येतील ।।२७।। उभय कुळें उद्धरील । अनन्यांसी तारील । कीर्ति डंका वाजवील । त्रिभुवनीं ।।२८।। उपाध्ये जातक वर्तविती । तयां दक्षिणा देऊनि बोळविती । अंगारे धुपारे करिती । दृष्ट होई म्हणोनि ।।२९।। पाळण्या बाळ निजवोनि । पाळणे गाई जो जो म्हणोनि। दोरी हलवी गुरुजननी । मुख चुंबी क्षणाक्षणा ।।३०।। पुत्रप्रेम न वर्णवे । माय होवोनि जाणावें । येरीं शब्दें वर्णावें । स्वल्प कांहीं ।।३१।। पुत्र जरी असला काळा । रोगग्रस्त आंधळा पांगळा । तरी मायेचा जिव्हाळा । वेगळाचि ।।३२।। त्यावरी असला सद्गुणी । सशक्त गोंडस गौरवर्णी ।। मग तें प्रेम कोण वानी । माउलीचें ।।३३।। दिवसेंदिवस बाळलीला । पाहूनि प्रेमाचा उमाळा । आठविती घनसांवळा। तव कृपें लाधलों ।।३४।। आज बाळ उपडें वळलें । मान सावरूं लागलें । माणूस न्याहाळी वहिलें । स्थिरदृष्टी ।।३५।। पाहा हो रांगत गेला । टिकों नेदी वस्तूला । कोणी आवरावें याला । चपळ भारी ।।३६।। आजोबांची अति प्रीति । कडिये घेवोनि फिरती । नाना वस्तूंसी दाविती । हास्य करी विनोदें ।।३७।। प्रसंगें रडों लागला जरी । म्हणतां रामकृष्ण विठ्ठल हरी । उगा राहोनि श्रवण करी । अत्यंत आवडी भजनाची ।।३८।। सर्वांपाशीं जात आहे । म्हणती जगमित्र दिसताहे । तुसडा आपमतलबी नोहे । जनप्रियत्व करील ।।३९।। करांगुली घाली मुखांत । गाई पाळील हा बहुत । देउळीं सदा खेळत। देवभक्त होईल ।।४०।। बालकासन्निध राहती । क्षण एक न विसंबती । संगतीसुखासी मिती।

नाहीं नाहीं ।।४१।। पिता पाहतां विरक्त । परि पुत्रदर्शनीं आसक्त । म्हणे शांत होतें चित्त । दर्शनें याच्या ।।४२।। आधीं बालस्नेह परम । त्याहीवरी सत्समागम । संगतीसुख निरुपम । वाटे सकळांसी ।।४३।। गणपती बोबडें बोले । सकळां कौतुक वाटलें । आपणही तैसे चाळे । करिती त्यासवें ।।४४।। जमले गुरुभक्त गुरुलीलाश्रोते । जे बोधामृताचे भोक्ते । कथन केलें व्यवहारातें । म्हणतील जरी ।।४५।। गुरुलीला बोधयुक्त । कथन करावी त्वरित। जेणें श्रवण होती पुनीत । श्रोतयांचे ।।४६।। वक्ता बोले जी प्रमाण । प्रसंगें वर्तलें जें जाण । केलें पाहिजे कथन। यथारीती ।।४७।। राजभेटीची आवडी । परि दूत आडवी देवडीं । तिष्ठावें लागतें घडिघडी । हां जी हां जी म्हणोनी ।।४८।। मधुर भोजनाचे भोक्ते। परि मिठावांचूनि अडतें । म्हणती असावें रायतें । चवीलागीं ।।४९।। श्रवणी बैसले सज्जन । गुरुलीला परम गहन । यथाशक्ति विवरण । केलेंचि करूं ।।५०।। रंगीबेरंगी खेळणीं देती।टाळी घंटा वाजविती । बागुल आला कोणी म्हणती । भीति दाविती ज्ञानिया ।।५१।। माहेरीं गीताईसी। नेती, पाहती बाळासी। आजा आजी संतुष्ट मानसीं।आत्यंतिक जाहलीं ।।५२।। उष्टावणाचा सोहळा । करी आनंदें मावळा[१] । अलंकार घालिती बाळा । पुरविती हौस ।।५३।। बाळ उभा राहिला । त्यासी पांगुळगाडा केला। अडखळत चालूं लागला । धांवे गुरांसन्निध ।।५४।। इकडे लिंगोपंत-रावजीसी । न गमे अहर्निशीं । दूताहातीं गीताईसी । आणविलें त्वरित ।।५५।। असो ऐसी गुरुमाउली । दीनजनांची साउली । भक्तांलागीं पावली । मनुष्यरूपें ।।५६।। रावजी वैराग्यें उदासी । वाटे शिव श्मशानवासी । गीता ज्ञानी सद्गुणेंसी । उमा प्रत्यक्ष वाटत ।।५७।। कलिमलासुर मातला। बद्धमुमुक्षां अजिंक्य जाहला । म्हणोनि अवतार घेतला । गणपतीनें ।।५८।। भवरोगें जन व्यापिले ।

१ मामा

कृतांतमुखीं चालले । चतुर वैद्य पाठविले । श्रीरामरायें ।।५९।। परमार्थधामीं निघाले । मार्गी चोरटे भेटले । विपरीत कथोनि भ्रमविले । भलतीकडे ।।६०।। तैं आले रामदूत । ठकां पिटाळूनि लावित । शुद्धमार्गें चालवीत मार्गस्थांसी ।।६१।। माणदेशींचे लोक । भोळे वदती बहुतेक । परि सद्‌गुरूंनीं निःशंक । योग्यतेसी दाविलें ।।६२।। धन्य कुळ धन्य ग्राम । धन्य देश पावन परम । धन्य भक्त पुरुषोत्तम । सद्‌गुरुभेटी लाधले ।।६३।। ज्ञानसूर्य उगवला । हळूं हळूं प्रकाश फांकला । साधकां आधार मिळाला । आदर्शभूत ।।६४।। पुढील चरित्राची गोडी । चाखावी अति आवडी । मनाची मोडोनियां उडी । श्रवणीं सादर बैसवावें ।।६५।। इति श्रीसद्‌गुरुलीला। श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।६६।।

**इति श्रीसद्‌गुरुलीलामृते द्वितीयाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति द्वितीयोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय तिसरा

## *समास पहिला*

**न लिंपे कदा बालक्रीडाउपाधी । विवेकें सदा ज्ञान वैराग्य साधी ।।**
**जया सद्गुरूभेटिची होय स्फूर्ति । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।३।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। ॐ नमो जी गुरुमूर्ति । स्वयंसिद्ध ज्ञानज्योति । त्रिभुवनीं चमके दीप्ति । चैतन्यरूप ।।१।। अंतर्बाह्य व्यापूनि असे । परि चर्मचक्षूंतें न दिसे । दिसे म्हणतांचि पिसें । साक्षित्वें होय ।।२।। तुझे प्रकाशाचा विलास । निरसी अष्टधेचा भास । द्रष्टा आणि दृश्य यांस । स्वतेजीं मेळवी ।।३।। प्रकाश आणि दीप । भिन्न ठाव नसे अल्प । करितां ध्यानाचा संकल्प । ध्येय ध्याता नुरेचि ।।४।। स्वयंप्रकाश परंज्योति । तेजीं सहस्र सूर्य लपती । उष्ण-शीत-विकारस्थिति । मुळीं नाहीं ।।५।। परप्रकाशें पाहों जातां । प्रकाश फिरे मागुता । तेथें दुज्याची सत्ता । अल्पही न चले ।।६।। तुझ्या स्वरूपाची कोटी । अनंत ब्रह्मांडें सांठवी पोटीं । परि भक्त हृदयसंपुष्टी । घालोनि पूजिती ।।७।। तव तेजासी आडवी । ऐसा नसे गोसावी । दुजेपणाची यादवी । नाहीं तेथें ।।८।। ज्योत चालली अढळ । नसे मैस[1] ना काजळ । वायूचा आधार जोंजाळ[2] । अणुभरी असेना ।।९।। तूं होवोनि तुज पाहावें । भावभक्तीनें जाणावें । एरवीं ते व्यर्थ गोवे । सद्गुरुपद भेटेना ।।१०।। कोणी पाजळी ना विझवी । आदिमध्यान्त ना बरवी । अखंड चालली सतरावी[3] । स्नेहेंविण[4] ।।११।। मायामोहाचे दर्पणीं । बिंब राहिलें बिंबोनि । सवेंचि वाढलीं दोनी । गंधर्वनगरें ।।१२।। जड

**१ काजळी. २ त्रास. ३ जीवनकळा. ४ तेलाशिवाय.**

चंचल माया । चैतन्य जाणीव बिंबकाया । अधिष्ठानासारिखे जया । विकार दिसती ॥१३॥ परि तें विकारवंत नोहे । मुळीं असिजे तैसेंचि आहे । जरी भिन्न भासताहे । अज्ञानियां ॥१४॥ अज्ञान निरसिल्यावरी । बाह्य आणि अभ्यंतरीं । एकचि रूप निर्धारी । ज्ञानज्योति ॥१५॥ प्रकृतीचा संग घडला । सगुणत्वाचा आळ आला । परि म्हणोनीचि लाधला । स्तुति-सेवा कराया ॥१६॥ विशेष जाणिवेचें स्थान । तेंचि सद्गुरूंचें अधिष्ठान । ऐसें बोलती सज्जन । ठायीं ठायीं ॥१७॥ तीच जाणीव ज्ञानज्योति । सद्गुरु ब्रह्मचैतन्यमूर्ति । गोंदवलेंग्रामीं आम्हांप्रती । भेटली थोरभाग्यें ॥१८॥ निर्गुण सगुणत्वा आलें । आंधळ्यांनींही देखिलें । कांहीं जे डोळस झाले । अंतर्बाह्य पाहती ॥१९॥ पाहतां पाहणें विरालें । गुरुरूप होऊनि ठेलें । जन्ममरण फेरे चुकले । धन्य पुरुष ॥२०॥ गुरुबोधांजन घेतलिया । आंधळेपण जाय विलया । द्रष्टेपणही वांया । होऊनि जाय ॥२१॥ सगुणीं सगुण भजावें । चित्तशुद्धीतें पावावें । ज्ञानदृष्टीनें पाहावें । सद्गुरूसी ॥२२॥ भोळे भाविक आंधळे जन । यांसी उपासनेलागोन । ज्ञानज्योति झाली सगुण । मनुष्यरूपीं ॥२३॥ आमुचे घरा पाहुणी आली । आम्हांसारिखी वागली । वागली परि राहिली । वेगळीच ती ॥२४॥ जैसें सोनपितळ आणि सोनें । सगट दिसती दागिने । शहाणा तो पारखूं जाणे । खरें खोटें कोणतें ॥२५॥ मृत्तिका आणि कस्तुरी । मानूं नये एकसरी । कस्तुरी कोंदे अंबरीं । सुगंधयुक्त ॥२६॥ गृहीं लाविलिया दीप । जीवजंतू धांवती अमूप । फिरफिरोनि घालिती झांप । पोटधंदा सोडोनी ॥२७॥ तैसी ही ज्ञानज्योति । भोंवतीं असंख्य जीव जमती । झडपणीं तदाकार होती । संसृतीतें सोडोनि ॥२८॥ रजनीं दृश्य दीप दावी । अज्ञानिया सद्गुरुगोसावी । ज्ञानतेजें समूळ घालवी । तिमिरराशी ॥२९॥ तिमिर गेलियापाठीं । लोभ-मोहादि चोरटीं । न येती समोर दृष्टी । साधकांतें नाडाया ॥३०॥ निर्गुण गुणत्वा आलें । गुणसाम्यें वर्णन केलें ।

नातरी वर्णितां भागले । थोरथोर ।।३१।। सिद्ध होवोनि सिद्ध पहावे । जाणते होवोनि जाणावें। शब्दज्ञानें पडेना ठावें । सद्गुरुरूप ।।३२।। अनुभवी ना व्युत्पन्न । परि स्तवनीं गुंतलें मन । आवडीसारिखें सजवोन । निववूं चित्त ।।३३।। सूर्या दाविती नीरांजन । ऐसें भक्तीचें लक्षण । तैसेंचि ज्ञाननिधान । वर्णूं आतां ।।३४।। आवडीसारिखें सजवूं । ज्ञानेंद्रियांची साक्ष घेऊं । अंतरीं सद्गुरूंचें पद ध्याऊं । निरंतर प्रेमभरें ।।३५।। चला गोंदवलें ग्रामासी । रावजीगृहीं सत्वरेंसी । बाळलीला आहे कैसी । पाहूं नेत्र भरोनि ।।३६।। एक वर्ष झालें बाळा । वाढदिवसाचा सोहळा । आनंदें यथासांग झाला । रावजीगृहीं ।।३७।। गणपती बोबडें बोले । ऐकतां श्रवण संतोषले । उचलोनि कडिये घेतले। ज्यांनीं त्यांनीं ।।३८।। राहेना माउलीघरीं । घेऊनि जाती शेजारी । खेळूं लागती नाना परी । त्यासवेंचि ।।३९।। जया आपपरभाव नाहीं । जिकडे नेती तिकडे जाई । मुख न्याहाळीना कांहीं । आपुलें कीं परावें ।।४०।। सर्वत्रांसी वाटे घ्यावें । वांटणी येईना स्वभावें । ज्यानें पहावें त्यानें न्यावें । आपुले गृहीं ।।४१।। तेथेंचि जेवूं घालावें । मऊ शय्ये निजवावें । पुन्हा माउलीसी पुसावें । बाळ कोठें म्हणोनि ।।४२।। मूल पहातां पडे भूल । वरी गोजिरें आणि सोज्ज्वळ । हास्यमुख आणि प्रेमळ । मग काय उणें ।।४३।। जरी ओंगळ आणि तुसड । जागचें हलेना जड । रडतमुखी खादाड । अतिशयेंचि ।।४४।। हटवादी आणि त्रागी । पाय शिर आपटी वेगी । जें सदा असे रोगी । कांहीं ना कांहीं ।।४५।। नकटें काळें कुळकुळीत । मधुरसेवनीं अतृप्त । विधि वमन करित । चिळसवाणें ।।४६।। माउलीसी सोडीना। कामकाज करूं देईना । म्हणती फेडोन घेतो नाना । उपकार पूर्वजन्मींचे ।।४७।। तयासी कोणी न घेती । प्रसंग आल्या कंटाळती । वदती ‘ऐसीं कां जन्मतीं । दुःख द्यावयाकारणें ?’ ।।४८।। मस्तकीं उवा आणि खवडे । खरूज नायटे पैण चिपडें । झांपड होऊनि सदा रडे । वैरी म्हणती पूर्वीचें ।।४९।। तैसा नव्हे गणपती । दर्शनें आनंद होय चित्तीं । प्रेमें उचलोनि घेती । करिती हास्यविनोद

।।५०।। रावजीगृहीं प्रतिदिन । होत असे कीर्तन भजन । गणपती चित्त देऊन । श्रवण करी स्थिरत्वें ।।५१।। माउलीसन्निध निजेना । निजवितां रडतां राहेना । भजनाची आवडी मना । तेथें खेळे स्वच्छंदें ।।५२।। म्हणती तुज समजतें काय । बालपणीं प्रिय माय । खेळखेळोनि दिवस जाय । बालकांचा ।।५३।। आजा पोथी वाची नित्य । श्रवणा जावोनि बैसत । म्हणती पहा हो याचें चित्त । श्रवणीं स्थिर होतसे ।।५४।। अशा वयीं क्रीडेची गोडी। गोड खावयाची आवडी । मौज पाहावया घेती उडी । पोरांसवें धांवती ।।५५।। यासी दिधल्या खाईना । क्रीडेचा हट्ट धरीना । श्रवणा बैसतो पहाना । चित्त देऊनी ।।५६।। याची बुद्धि दिसते भारी । सांगितली गोष्ट न विसरी । याचेपाशीं फसवेगिरी । कांहीं चालेना ।।५७।। हळूं हळूं दिवस गेले । तीन संवत्सर पालटले । बुद्धि देखोनि चकित झाले । म्हणती कोणा न बोलावें ।।५८।। कोणी ठेवितील नांवें । कोणी स्तुति करितील भावें । दृष्ट होईल स्वभावें । बालकासी ।।५९।। धुळी अक्षरें घालोन देती । तैसींच काढी शीघ्रगती । लिहिण्या-वाचण्या गणपती। शिकला त्वरित ।।६०।। दंतकथा होते सांगत । एकपाठी दुपाठी पंडित । भोजसभेसीं नांदत । कालिदासादिक ।।६१।। दंतकथा म्हणतां खोटी । करूनि दावितो गोष्टी । नवल पहा एकपाठी। पूर्वार्जित ज्ञान ।।६२।। पूर्वजन्मीं हा साधु । असेल कोणी प्रसिद्धु । वासनाशेषें जन्मसंबंधु । घडला असेल ।।६३।। नानापरीनें कल्पना । करिती तर्क वितर्क नाना । दृष्टांत आणोनि ध्याना । स्वस्थ राहती ।।६४।। चपलत्वें वाटे हूड । परि हूड ना द्वाड । पराव्याची न काढी खोड । मैत्री राखे सर्वदा ।।६५।। नित्य भजनी नाचे । रामनाम घेई वाचे । बालपणी आयुष्य न वेंचे । क्रीडेमाजीं ।।६६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते तृतीयाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।।श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## समास दुसरा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। एकदां वृद्ध लिंगोपंत । नातवासी पाचारित । म्हणती 'ऐक रे मात। विचारितों सांग पां ।।१।। तुजसी एक हंडाभरी । मोहरा दिधल्या जरी । तरी काय करिसी सत्वरीं । सांग मज' ।।२।। 'वांटोन टाकीन समस्त । अंध पंगु रोगग्रस्त । गोरगरीब अनाथ । भिकाऱ्यांसी' ।।३।। ऐसें देतां प्रत्युत्तर । आजा संतोषला थोर । म्हणे करील परोपकार । दुःख भार हरील ।।४।। लिंगोपंत सुसंस्कृत । म्हणोनि ऐसें बोलत । उधळ्या म्हणतील समस्त । प्राकृत जन ।।५।। बहुतेक मुलांची जात । हातींचें कोणा न देत । दुसऱ्यांचें घेऊं पहात । लोभमोहें ।।६।। ऐसी नव्हे सात्त्विक जाति । परदुःखें दुखावती । परसुखें संतोष चित्तीं । होतसे तयासी ।।७।। पुनरपि म्हणे आजा । 'तुज केलिया राजा । काय करिसी कुलध्वजा । सांग बापा' ।।८।। येरू वदे झडकरी । 'न ठेवीन देशीं भिकारी । अन्नछत्र राजद्वारीं । ठेवीन नित्य' ।।९।। सहज विनोदें पुसिलें । मुलानें प्रत्युत्तर दिलें । ऐकोनि अश्रू आले । नयनीं श्रोतयाच्या ।।१०।। पंचवर्षांचें बालक । पाहा हो याचें कौतुक। सात्त्विकज्ञान निःशंक । जाहलें यासी ।।११।। न म्हणे घेईन घोडा । खोपट काढोनि बांधीन वाडा । उंची वस्त्रें रथ गाडा । दासदासी दागिने ।।१२।। विषयभोग वांछीना । भूतदयेहोनि बोलेना । वैराग्य कैसें पाहा ना । विवेकेंसहित ।।१३।। वयें दिसतो सान । परि जोडलें निधान । उपजत लाधलें ज्ञान । सत्य सत्य ।।१४।। तपाच्या करितां कोडी । न सुटे मोह-लोभ-बेडी । भलीं भलीं जाहलीं वेडीं । यांजसाठी ।।१५।। क्रियेवांचून वटवट । घरोघरीं बोलती पोपट । उभयकर्मीं वर्ते नीट । ऐसा विरळा ।।१६।। अनंत जन्मांचिया पोटीं । विषयाची झाली भेटी । सोडितां न सुटे गांठी । देहकाष्ठें केलिया ।।१७।। या कलियुगामाझारीं । वेदान्त भरला घरोघरीं । आचार पाहतां अणुभरी । शुद्ध नाहीं ।।१८।।

आम्हां वृद्धांस लाजवी । ऐसी क्रिया करून दावी । प्रौढपणीं घेईल पदवी । सायुज्याची ।।१९।। देहासी वृद्धपण आलें । लोभ मोह तैसेचि ठेले । चिंतेनें चित्त भ्रमलें । असे नित्य आमुचें ।।२०।। यासी बाळ म्हणों नये । बुद्धीनें हा वडील होये । भक्तियुक्त नाम गाये । राम राम म्हणोनी ।।२१।। आमचे घरीं कुलदैवत । पंढरीनाथ नेमस्त । परि हा दिसे रामभक्त । पूर्वसंस्कारें ।।२२।। जन्मार्जित तप केलें । अथवा रामदूत अवतरले । उपजत ज्ञान कैसें आलें । याजपासी ।।२३।। पहा हो याचा आचार । उषःकालीं उठे सत्वर । चूळ भरावया नीर । त्वरित आणी ।।२४।। म्हणे म्हणा हो श्रीहरी । आरती भूपाळी सत्वरी । श्रवण करोनि चरण चुरी । दक्षता कैसी पाहावी ।।२५।। असो तदनंतर । माउलीसन्निध जाय कुमर । गोड बोलोनि तोष थोर । देतसे तिजलागीं ।।२६।। बोलिलें वचन नुल्लंघी। आळसा न देई अंगी । वाटे हा बालयोगी । पावला गृहीं ।।२७।। तुळशी आणावयास धांवे । म्हणे देवपूजन करावें । धूपदीप लावा बरवे । दाखवा नैवेद्य ।।२८।। गीतेचा नित्य पाठ घरीं । चित्त देवोनि श्रवण करी । अंतरीं अर्थ विवरी । बाह्य धरी मौनत्व ।।२९।। निमूटपणें भोजनीं बैसे । गोड-तिखटाची हांव नसे । घालिती तें खात असे । आसक्तिरहित ।।३०।। खेळावयासी नेमस्त । जाई सवंगड्यांसमवेत। खोडी कुचाळी न काढित । सदा प्रेमळ सकळांसी ।।३१।। सर्वांसी वाटे हा हवा । याचेसंगें खेळ बरवा । नित्य नवा खेळावा । सुखदायक ।।३२।। सायंकाळीं स्तोत्रें बरवीं । मधुरवाणी म्हणोनि दावी। भजनीं आवडी नित्य नवी । असे जया ।।३३।। भजन झालियावांचोनि । न जाई जो शयनीं। सत्कर्मीं निशिदिनीं । काळ करी सार्थक ।।३४।। बाळपणीं साधकवृत्ति । अंगीकारिली ज्यांनीं चित्तीं। तयां वर्णितां मति । कुंठित झाली ।।३५।। सांप्रत असे कलियुग । अधर्मीं प्रवर्तलें जग । न लागे लावितां मार्ग । सद्धर्माचा ।।३६।। पांचवे वर्षीं एके दिनीं । पाचारिलें आजोबांनीं । भगवद्गीता

काढोनि । एक श्लोक सांगितला ।।३७।। पाठ म्हणोनि दाविला । तैसा अर्थही निरूपिला । आजा मनीं संतुष्ट झाला । अतिशयेंसी ।।३८।। पुत्र होईल ब्रह्मज्ञानी । कुळें उद्धरील दोन्ही । ऐसें आणोनिया ध्यानीं । ईशस्तवन करीतसे ।।३९।। असो ऐसी गृहस्थिती । प्रौढ झाला गणपती । मेळवी अनेक सोबती । खेळायासी ।।४०।। दगड मांडोनि देव करिती । फुलें घालोनि पूजिती । आरती धुपारती म्हणती । तयांपुढें ।।४१।। मातापित्यांची सेवा करी। आज्ञा नुल्लंघी क्षणभरी । हूडपणें न भरे भरी । क्रीडाविनोदें ।।४२।। ऐसें असतां एके दिनीं । मध्यसमय झाली रजनी । उठोनि पहातसे जननी । तंव गणपती कोठें दिसेना ।।४३।। शेजेवरी गणपती नाहीं । गृह शोधिलें सर्वही । कथिलें रावजींसी लवलाहीं । गणपती कोठें पाहा हो ।।४४।। उभयतां बहु शोधिती । सर्वत्रांसी जागे करिती । गलबला ऐकोनि रातीं । बहुत लोक मिळाले ।।४५।। म्हणती कोठें गेला हो बाळ । पहा पहा हो सकळ। लागली सर्वांस तळमळ । तर्क करिती आपुलेपरी ।।४६।। कोणी म्हणती तस्करें नेला । अलंकार पाहोनि भुलला । ते घेऊन सोडील तयाला । चिंता कांहीं नसावी ।।४७।। शाकिनी डाकिनी गृहस्कंध। यक्ष पिशाच समंध। रात्रौ विचरती प्रसिद्ध । बालकांसी पछाडिती ।।४८।। कोणी म्हणती झोंपा भारी। कुंभकर्णासारिख्या अघोरी । बाळ नेलें निशाचरीं । ठाउकें नाहीं ।।४९।। द्वार बंद नाहीं केलें। असावधपणें निजले । तस्करें मुलासी नेलें । खचित खचित ।।५०।। भजनाचा छंद बहुत । ध्वनि परिसोनि गेला खचित । प्रातःकालीं गृहाप्रत । येईल, स्वस्थ रहावें ।।५१।। कांहीं मिळाले धीट। म्हणती पुरे पुरे ही वटवट । शोधूं चला हो नीट । चहूं दिशांसी ।।५२।। मध्यरात्र समयासी । पाहती सांदीकोंदीसी । कोणी नेलें बालकासी । कांहीं विचार सुचेना ।।५३।। रात्रौ फिरती निशाचर। सर्प वृश्चिक दुर्धर । श्वापदें आणि तस्कर । निर्भयपणें ।।५४।। शोधितां शोधितां थकले । कांहीं नदीकडे

निघाले । मार्गीं अकस्मात देखिलें । गणपतीसी ।।५५।। समाधीचें केलें आसन । वरी घातलें सिद्धासन। नासिकाग्रीं दृष्टी देऊन । रामनाम घेतसे ।।५६।। पाहूनि मानसीं चकित । योगी असे हा निश्चित । मनीं चरण वंदित । सिद्धपुरुष जाणोनी ।।५७।। हातीं धरोनि आणिला । सकाळांसी आनंद झाला । बहु प्रकारें बोध केला। निबिड अंधारीं नच जावें ।।५८।। कोणी म्हणती उपदेशासी । पात्रता नसे आम्हांसी । कारणिक अवतरले ऋषि। ज्ञानरूप केवळ ।।५९।। सहा वर्षांचा बालक । बैसला सिद्धासनीं एक । अपरात्री नदीतटाक । श्मशानस्थान विशेष ।।६०।। यासी काय म्हणावें । दंडावें की वंदावें । स्तवावें की बोधावें । धाक भीति दावोनी ।।६१।। गणपती बोले वचन । एकांतीं स्थिर होय मन । नामस्मरणीं अनुसंधान । प्रेमपूर वाहतो ।।६२।। चित्त वाहे भलतीकडे । मुखें नाम हें कोरडें । ऐशियानें आयुष्य थोडें । पुरणार नाहीं ।।६३।। तया म्हणती तूं वयें सान । उद्यमीं घालावें मन । वृद्धपणीं अनुसंधान । स्वस्थपणें करावें ।।६४।। बहुत विद्या शिकावी । आणि भाग्यश्री भोगावी । जगीं कीर्ति मिळवावी । मग भजन करावें ।।६५।। इंद्रियीं विषय सेवावे । तृप्त करोनि भजावें । नातरी लागेल मुकावें । दोहींकडे ।।६६।। विषयोर्मि येतां पाहीं । भाव साधनीं न राही । अत्याचारें भवडोहीं । बुडतो नर ।।६७।। प्रपंच करोनि परमार्थ । करावा बोलती संत । वासना झालिया निवृत्त । सुलभ होये ।।६८।। आधीं विद्या शिकावी । इंद्रियें अतृप्त न ठेवावीं । मग ती परमार्थपदवी । साधनानें साधावी ।।६९।। उपदेश नानापरी । करिती ते नरनारी । भूताखेतांची भीती भारी । सांगूं लागले बाळातें ।।७०।। ऐसें आपुल्याला मतीं । अधिकार नेणोनि बोध करिती । अघटित करणी वदती । परिसिली नाहीं ।।७१।। कांहीं दिवस गेल्यावरी । गणपती नसे शय्येवरी । रावजी निर्धारी अंतरीं । एकनिष्ठ वैष्णव हा ।।७२।। पुत्रस्नेहें कळवळला । धुंडधुंडाळोनी आला । म्हणे हा कोठें लपला । न कळेचि

।।७३।। पहांटेच्या समयासी । बाळ आला गृहासी । रावजी पुसे तयासी । कोठें आसन घातलें ।।७४।। येरू वदे नदीथडीं । खडकांच्या पडल्या दरडी । माजीं असती भगदाडीं । उपाधिरहित ।।७५।। अरे सर्प विंचू फिरती । क्रूर श्वापदें नेणों किती । कैसी होईल देहस्थिती । न विचारिसी ।।७६।। देह तों प्रारब्धाधीन । कोण चुकवूं शके मरण। समय प्राप्त झालिया जाण । मांदुसी[1] ही न टिके ।।७७।। नाशिवंत नासणार । जाणोनिया निर्धार । आहे तंव जगदीश्वर । शाश्वत तो ओळखावा ।। ऐकोनि ऐसीं उत्तरें । रावजीनेत्रीं नीर झरे । म्हणे होईल तें तें खरें । स्वस्थ राहोनि पाहावें ।।७९।। अगाध ज्ञान पाहोन । रावजी मानी समाधान । म्हणे धन्य गणपती निधान । ईशकृपें लाधलें ।।८०।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते तृतीयाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**



## ***समास तिसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। श्रीगणेशा तुज नमन । करोनि रघुपतिस्मरण । श्रीगुरुलीला कथन। करितों मी यथामति ।।१।। नित्य शेळ्या चारावयासी । गणपती जातसे वनासी । तेथें क्रीडा करी कैसी। पाहतां असाधारण ।।२।। जमवी दगड बहुत । रचोनि भिंती करित । माजीं तीन खडे बैसवीत । नामें सांगे तयांचीं ।।३।। मध्यें उभा श्रीराम । जो भक्तां देई आराम । सव्यभागीं भक्त परम । लक्ष्मण उभा असे ।।४।। वामभागीं सीताबाई । जगद्वंद्य जगाची आई । पुढें मारुति

**१ लोखंडी पेटी.**

वज्रदेही । एक खडा ठेवित ।।५।। मित्रांची मांदी मेळविली । दगडांचीं देउळें केलीं । मग क्रीडा आरंभिली । कैसी पाहा ।।६।। हातांतील काष्ठासी । वीणा म्हणोनि स्कंधप्रदेशीं । घेवोनि दगड टाळेसी । मेळविती अनेक ।।७।। रामनामाचा गजर करिती । छोट्या पाउलीं नाचती । दगडीं दगड वाजविती । भजन करिती आनंदें ।।८।। मित्रांमाजीं मित्र खरा । नामें बापू फडतरा । गणपतीवांचोनिया जरा । दुरी न राहे ।।९।। गणपती जी जी आज्ञा करी । सुलभ कठिण आदरी । न विसंबती क्षणभरी । एकासी एक ।।१०।। वाटे हा पहिला शिष्य । गुरुवचनीं विश्वास । नामाचा घे बहु ध्यास । सद्गुरुबोधें ।।११।। असो ऐसी भजनस्थिति । नित्य नवी आवडी चित्तीं । गणूबुवा ऐसें म्हणती । बाळमित्र कौतुकें ।।१२।। उपजत ज्ञानज्योती । न झांके झांकितां दीप्ती । गणूबुवा म्हणोनि वंदिती । चरण सद्गुरूचे ।।१३।। जैसा मलयगिरीचंदन । सुवासेंसी पैसावोन । तैसा वेधी पराव्याचें मन। स्वतेजें आपणाकडे ।।१४।। पंचाननाचे[१] छाव्यासी[१] । सलगी न करवे जीवासी । वये अल्प परि सर्वांसी । आकर्षत स्वसत्तें ।।१५।। नागरिकजन आश्चर्य करिती । पोरें यासवेंचि धांवती । रानीं जाऊन भजन करिती । धाक न मानिती आमुचा ।।१६।। रावजीपंत तुमचा पुत्र । मधुरवचनी जगन्मित्र । बालकें जमवी सर्वत्र। नायकती गृहकाजें ।।१७।। घरीं अल्पही न राहती । गणूबुवा म्हणोनि धांवती । मायबापाहूनि चित्तीं। प्रिय वाटतो सकळांसी ।।१८।। यासी बोध करावा कांहीं । अथवा बैसवावें गृहीं । वेड लाविलें सकळांही । स्वच्छंदपणें ।।१९।। तैसा शाळेसी जातां । सकळांसि म्हणे तुम्ही आतां । राम राम लिहोनि कित्ता । मजलागीं दावावा ।।२०।। तेंचि काढोनि दाविती । पंतोजी बहु बोध करिती। कांहीं केल्या गणपती । नायकेचि ।।२१।। पंतोजी बोले तयासी । न यावें तुवां

**१ सिंहाचे पिलाबरोबर**

शाळेसी। सकल बाळें बिघडविसी । आमुचा धंदा बुडेल ।।२२।। पंतोजीनें धाक दाविला । गणपतीसी न मानला। दुजे दिनीं डाव मांडिला । गड्यांसह गोठ्यावरी ।।२३।। लहान थोर सवंगडी । क्रीडा करिती आवडी । रामभजनाची परवडी[1] । मांडिली कौतुकें ।।२४।। पंतोजी शाळेमाजीं पाहती । परि एकही नसे विद्यार्थी । चिंता उपजली चित्तीं । आतां कैसें करावें ।।२५।। गृही वृत्तांत निवेदिला । गणपतीनें पुंडावा केला । समजावूनि पाठवा त्याला । विद्यालयीं ।।२६।। आजा चुलता उपदेशिती । पुन्हां शाळेसी धाडिती । माय उपदेशी 'गणपती । तुवां ऐसें न करावें ।।२७।। वडिलार्जित कुलकरणवृत्ती। चालविली पाहिजे निगुती । विद्या करावी पुरती । न करीं कुचराई' ।।२८।। गणपती बोले 'गे प्रमाण। सर्वही येतें मजलागोन । काळजी न करावी, वतन । सांभाळीन दक्षत्वें ।।२९।। रामनामाची आवडी। काय सांगूं तुज गोडी । श्रवण करीं एक घडी । प्रेम कैसें उफाळे' ।।३०।। ऐसीं वदोनि उत्तरें । रामनाम मंजुळस्वरें । घेऊं लागला प्रेमभरें । माय ऐके तटस्थ ।।३१।। रामनामाची गोडी । चाखितां चालली घडी । वृत्ति गुंतली आवडी । सांज झाली कळेना ।।३२।। सकळांसी लाविली चट । रामनामाचा घडघडाट । दुरितें सोडिली वाट । गोंदावलीची ।।३३।। नऊ वर्षांचे अवसरीं । रावजी मनीं विचार करी । व्रतबंध कराया बरी । वयसीमा ।।३४।। कुलगुरूसी पाचारोनि । उच्चनीच ग्रह बघोनि। मुहूर्त ठरवा उपनयनीं । ऐसें सांगे ।।३५।। मुहूर्त बरवा शोधिला । द्रव्यनिधि मोकळा केला। मातापितयां आनंद झाला । मनींची हौस पुरवूं वदती ।।३६।। सोयरे जमविले सकळ । याज्ञिकी विप्रांचा गोंधळ । मौंजीबंधनाची वेळ । आली म्हणती समीप ।।३७।। वाद्यें वाजती धडधडा । मातृभोजनीं काळ न दवडा । घटिका भरली वेळ थोडा । सावधान म्हणती ।।३८।। पितापुत्र

१ **समृद्धि.**

बोहल्यावरी । मंगलाष्टकें सुस्वरीं । द्विज म्हणती सावध सत्वरी । मंगलमुहूर्तीं असावें ।।३९।। गणपती विचारी मानसीं । हे सावध म्हणती आम्हांसी । असावध कोणेविषीं । राहिलों मी ।।४०।। चित्त देऊनि करी श्रवण । मंत्रार्थ पाहे विवरोन । कोठें असती उपनयन[१] । द्विजत्व[२] तेही दिसेना ।।४१।। गायत्री मंत्र उपदेशिला । एकचित्तें पठण केला । ॐ तत्सत् अनुभवाला । आलें पाहिजे ।।४२।। अनुभवी तोचि ब्राह्मण । येर[३] कुलधर्मपालन । ऐसें करितसे मनन । मनामाजीं ।।४३।। परिधानासी कौपीन । प्रावरणासी कृष्णाजिन । वैराग्यद्योतक चिन्ह । मनीं म्हणे ।।४४।। कंठीं घालिती यज्ञोपवीत। जें ब्रह्मग्रंथीनें ग्रथित । अनुसंधान ठेवावें हा हेत । स्वस्वरूपीं ।।४५।। कर्मफलानें बांधला । मौंजीबंधनें व्यक्त केला । विवेकें पाहिजे सोडविला । जीवात्म्यासी ।।४६।। यमनियम दंड देती । भिक्षाहारें उदरपूर्ती । लोभ न धरावा चित्तीं । कोणाविषयीं ।।४७।। भिक्षा घालोनि म्हणे जननी । चहूं वेद षड्दर्शनीं । निपुण होईं अठरा पुराणीं । गुरुबोधें ।।४८।। आप्तइष्ट कुलगोत । भिक्षा घालोनि निरोप देत । गुरुकृपें ज्ञानोन्नत[४] । व्हावें तुवां ।।४९।। बोलती सकल मंत्र मुखें । परि अर्थातें कोणी न देखे। विरळा सद्गुरुसारिखे । अर्थ विवरिती ।।५०।। बोलणें एक करणें एक । तो न म्हणावा विवेक । परि कालचक्राचें कौतुक । ऐसेंचि आहे ।।५१।। कण जावोनि भूस राहिलें । भूषणावांचूनि[५] छिद्र उरलें । जाणते पुरुषीं जाणिलें । येर अवघे म्हणती सोहळा ।।५२।। कुलगुरु तेंचि सांगती । संध्योपासना शिकविती । अग्निकार्य करावें म्हणती । नित्यनेमें ।।५३।। प्राणायामीं नासिकासी । करविती हस्तस्पर्शासी । न जाणती योगासी । मार्गमळण[६] ।।५४।। जैसा गुरु तैसा चेला। निपट बोध वायां

१. ज्ञानचक्षु. २ विमलज्ञान. ३ येरवी. ४ ज्ञानप्रवीण. ५ दागिने जाऊन. ६ केवळ नक्कल करणें.

गेला । गणपती मनीं खोंचला । समाधान नाहीं ।।५५।। गुरु स्वयें अनधिकारी । शिष्यातें कैसा उद्धरी। सद्गुरुदयाळांची सरी । येणार नाहीं ।।५६।। भिडें भिडें भिडों जातां । न सुटे कर्माकर्मगुंता। सद्गुरुपद तत्त्वतां। शोधिलें पाहिजे ।।५७।। ऐसें बहुतां प्रकारीं । गणपती विवेकें विवरी । चटका लागला अंतरीं । उपदेशाचा ।।५८।। इतर मिष्टान्नें जेविती । किती उठती ब्राह्मणपंक्ती । दक्षिणा देऊन बोळविती । याचकांसी ।।५९।। व्रतबंध सांग झाला । सकलां आनंद वाटला । पाहुणे समुदाय बोळविला । वस्त्रें देऊनी ।।६०।। गणपती बालब्रह्मचारी । संध्यावंदनादि कर्में करी । म्हणे मागावी माधुकरी । आज्ञा असे गुरूची ।।६१।। चारी वेद शिकावे। षड्दर्शना[१] जाणावें । पुराणीं व्युत्पन्न व्हावें । ब्रह्मपद पावावया ।।६२।। चहूं वेद किती असती । शास्त्रें कैशीं शिकों येती । गुरुसेवेची कैसी स्थिती। मज निरूपावी ।।६३।। उपाध्ये बोलती बाळा । वेद अनंत आगळा। एकही न वचे शिकला। आयुष्यवरी ।।६४।। शास्त्रेंही असती अपार । तैसाचि पुराणांचा विचार । कलियुगीं उतरे पार । ऐसा नाहीं ।।६५।। गुरूसी द्यावें धन । मानावें गुरुवचन । कार्याकार्य विद्या पठण । करोनि स्वस्थ असावें ।।६६।। जेणें राहे वतन वृत्ती । ती विद्या करावी पुरती । अधिकारी तोषवावे चित्तीं । मधुरवचनीं ।।६७।। आमुचा तों हाचि धंदा । यजमानमानस राखों सदा । उतरपूर्तीवांचुनि कदा । आन नेणों ।।६८।। येणें नव्हे समाधान । अंतरती श्रीचरण । उत्तम नरदेह पावोन । व्यर्थ होय ।।६९।। वेदें जैसें आज्ञापिलें । तैसें पाहिजे वर्तलें । लौकिकीं नसे बोलिलें । भगवद्वाक्यें प्रत्यक्ष ।।७०।। तरी ऐसा जो कां ज्ञानराशी । तोचि शोधूं अहर्निशीं । हिंडूं आतां दशदिशी । सद्गुरुपद शोधाया ।।७१।।

**१ सहा शास्त्रें.**

सद्गुरुकृपा होतां पाहीं । जगीं दुर्लभ नसे कांहीं । सज्जन कथिती ठायीं ठायीं । भगवद्वाक्यें ।।७२।। जें वेदविद्येचें दैवत । परमगुह्य गुह्यातीत । होतां सद्गुरुपदांकित । ठायीं पडे ।।७३।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते तृतीयाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास चवथा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जयजय श्रीआत्मारामा । भूतां व्यापूनि रिकामा । अखंड आनंदसुखधामा । हृदयनिवासी ।।१।। जवळीं असोनि उमजेना । विषयीं धांवे वासना । विभक्तपणें नमितों चरणा । ध्यान राहो अखंड ।।२।। व्रतबंधनाउपरी । गणपती नाना क्रीडा करी । बटुवेष कौपीनधारी । चित्त वेधी पाहतां ।।३।। गृहीं वृद्ध लिंगोपंत । बाललीलें होती मुदित । पुनरपि गीताई प्रसूत । पुत्र कन्या लाधली ।।४।। अण्णा असे पुत्रनाम । मुक्ताई कन्या सुरूप परम । सकळांचें अति प्रेम । गणपतीवरी ।।५।। तैसे कुलगुरु सखारामभट्ट । पाठक उपनामें कर्मनिष्ठ । पत्रिका वर्तविती नीट । विद्वान होते बहुगुणी ।।६।। यांचे पुत्र वामनबुवा। हेचि कर्ते होते तेव्हां । तयांचे पुत्र चिंतूबुवा । खेळगडी गणपतीचे ।।७।। अप्पा पाटील गांवकर । पुत्र दाजीचा चतुर । बाळा तयाचा कुमर । कुलकर्ण्यावरी अति प्रीति ।।८।। चरित्रामाजीं संबंध । येईल म्हणोनि विशद। नामें केलीं प्रसिद्ध । उभय कुलांचीं ।।९।। पंतोजी अण्णा खर्शीकर । व्यवहारविद्येमाजीं चतुर । परि नेणती अधिकार । गणपतीचा ।।१०।। एके समयीं ऐसें झालें । गुरुजी स्वल्प गृहीं आले । इकडे भजन आरंभिलें। शिष्यवर्गें ।।११।। पंतोजींसीं राग आला । छडी मारिती सर्वांला । मुलें म्हणती गणपतीला ।

कैसा विचार करावा ।।१२।। येरु वदे सर्वांसी । स्वस्थ रहावें मानसीं । रामद्वेषी नरासी । शिक्षा होईल त्वरित ।।१३।। सवंगड्यांतील मुलांनीं । अप्पा पाटिला भेटुनी । वृत्तांत कथिला मृदुवचनीं । पंतोजींचा ।।१४।। तुमचे वेश्येपासी । पंतोजी जाती अहर्निशीं । भलतें भासतें आम्हांसी । तुमचें तुम्हीं पाहावें ।।१५।। पाटील होता विषयग्रस्त । कर्णीं वाक्यें झोंबत । दांतओठ खात खात । निघाला तेथोनी ।।१६।। इकडे गुरुजींची स्वारी । शाळेंतूनि जांता घरीं । बैसले तेथें क्षणभरी । पान खात ।।१७।। बोलाफुला गांठ पडली । पाटलाची स्वारी आली। तळची आग मस्तका गेली । निष्ठुरपणें मारित ।।१८।। मारमारोनि केला विकळ । लोक धांवले सकळ । वृत्तांत परिसोनि नवल । अत्यंत भासलें ।।१९।। ऐसें नव्हे पाटिलबुवा । गणपतीनें केला पुंडावा । पंतोजी तुम्हीं त्याचे नांवा । कदापि काढूं नये ।।२०।। तो असे भगवद्भक्त । श्रीकृष्णासारिखा धूर्त । जाणावें हें सत्य । त्याचे वाटेसी नच जावें ।।२१।। शाळा सोडिली अण्णांनीं । निघाले गाडी भरोनी । मार्गीं तयांसी गांठोनी । उपदेशी ब्रह्मचारी ।।२२।। रामभक्तासी वैर । करितां दुःख होतें फार । आतां तरी रघुवीर । स्मरत जावा ।।२३।। दो दिवसांची चाकरी । रामकृपेची भाकरी । तोचि तारी आणि मारी । शरण जावें तयासी ।।२४।। ऐशी क्रीडा नानापरी । करितसे ब्रह्मचारी । मित्रांचा जो कैवारी । संकटसमयीं ।।२५।। धांवण्यामाजीं चपळ। मुखीं हास्य सोज्ज्वळ । तनु दिसे कोमल । उड्या घेई वृक्षावरी ।।२६।। विनोदी असोनि निश्चल। धीट आणि कोमल । वक्तृत्वें भुलवी सकल। लहानथोर ।।२७।। रामनाम हाचि छंद । हीच क्रीडा विनोद । अंतरी ध्यायी सद्गुरुपद । कैं देखेन डोळां ।।२८।। शाळेसी निमित्तमात्र जाई । विद्या येतसे सर्वही । आश्चर्य मानिती पाहीं । बुद्धिप्रभाव देखोनी ।।२९।। कोळशाची शाई करोनि ।

अर्कपत्रें[१] काढी लिहोनी । रामनामें वृक्ष भरोनी । प्रदक्षिणा करितसे ।।३०।। पाहोनि क्रीडाकौतुक। आश्चर्य करिती लोक । लिंगोपंत धूर्त तार्किक । विचार करी मानसीं ।।३१।। हा होईल भगवद्भक्त। प्रपंचीं राहील विरक्त। उदासीन वागे सतत । वय सान असोनी ।।३२।। तरी हा हातींचा जाईल । रानीं वनीं फिरेल । विरक्तपणें वागेल । जनांमध्यें ।।३३।। यास्तव शीघ्रचि लग्नग्रंथी । घालूं म्हणे रावजीप्रती । मानली सकलांसि युक्ति । गीताआदिकरोनी ।।३४।। शोधूं लागले नोवरी । कुलवंत स्वरूपें बरी । जाणोनिया वतनदारी । पाहों येती अनेक ।।३५।। गोडसे उपनामी संभाजीपंत । कुलकर्णी खातवळीं वसत । तयांची कन्या नेमस्त । केली असे ।।३६।। वय सान गौरवर्ण । कुलशील शुभलक्षण । वर द्वादशी एक न्यून । जोडा शोभतसे साजिरा ।।३७।। वाङ्‌निश्चय सीमांतपूजन । विवाहहोम अन्नदान । सरस्वती ठेविलें नामाभिधान । समारंभ सांग केला ।।३८।। परि गणपती उदासीन । म्हणे कासया हें बंधन । कैं देखेन सद्गुरुचरण । भवसिंधुतारक ।।३९।। विवाह म्हणजे सजीव बेडी। जी थोरथोरांस करी वेडी । सद्वासना धडफुडी । असेल तीही घालवी ।।४०।। नरदेहाचा अधिकार । स्वयें व्हावें विश्वंभर । परि करित किंकर । बहुतांचा बहुपरी ।।४१।। भलतियाचे आर्जव करवी । कोणा दुरुत्तरें बोलवी । नसताचि मोह लावी । पाठीमागें ।।४२।। सुकर्मीं वा दुष्कर्मीं । प्रवृत्त व्हावे धनागमीं । एवं आयुष्य प्रपंचकामीं । अहंकारयुक्त लाववी ।।४३।। ऐसा हा मोहपाश । बहुत झाले कासाविस । तरला ऐसा पुरुष । भाग्यवंत विरळाचि ।।४४।। जैसा वाईट तैसा चांगला । परि लाभे क्वचिताला । सोमल औषधी असे भला । जाणत्यासी ।।४५।। गृहस्थाश्रमाची महती । बहुत गाइली धर्मग्रंथीं । परि विषयीं लंपट होती । बहुतेक जन ।।४६।। अतिथिसेवा अन्नदान । तिन्ही

१. रुइचीं पानें.

आश्रमां विश्रांतिस्थान । पितरदेवतांसी हवन । गृहस्थाश्रमीं मिळतसे ।।४७।। पितृऋण मातृऋण । फिटे होतांचि संतान । विद्याकलांचें पालन । गृहस्थाश्रमाकारणें ।।४८।। एवं चतुर्विध पुरुषार्थ । ज्ञानिया लाभती येथ । अज्ञानें होतां आसक्त । अधोगती निश्चयें ।।४९।। जरी असेल विवेक वैराग्य । तरीच हें लाधेल भाग्य । परि कलियुगीं ऐसा योग । घडणें कठीण ।।५०।। ज्ञानें व्हावें विरक्त । तरी संसारी अलिप्त । सद्गुरुविना ज्ञान प्राप्त । होणार नाहीं ।।५१।। या गृहस्थाश्रमाकारणें । देवादिकां जन्म घेणें । विद्या कलादि आयतनें । याजसाठीं ।।५२।। हें सृष्टीचें उगमस्थान । याचेनि सृष्टीचें पालन। नीति न्याय दंडण । याचेकरितां ।।५३।। ऐसा विवेक उदेला । हळूं हळूं वाढो लागला । सचिंत दिसे बैसला । ठायीं ठायीं ।।५४।। जें देवाचें दैवत । ऐसे संत महंत । तेचि अधिकारी येथ । वेदनिधि दावाया ।।५५।। वेद अनंत अपार । शब्दज्ञानें न पडे पार । कलियुगीं अल्पायुषी नर । धृतीही[१] अल्प जहाली ।।५६।। तैसा आहार विहार । दुर्जनसंगति अनिवार । बुद्धी सुचे तदनुसार । देहसुखाची ।।५७।। वेदशास्त्रपठण केलें । परि देहसुखानें नाडले । कामधेनूपाशीं घेतलें । तक्र जैसें ।।५८।। ऐसा कालाचा महिमा । ध्यानीं न ये परमात्मा । सुखासक्तीची सीमा । जाहली असे ।।५९।। देहसुखाची साधनें । शोधिती ते शहाणे । बहु द्रव्य मिळवूं जाणे । तो पुरुष उत्तम ।।६०।। पंचभूतांचे मिळवणी। सुखसोयी साधिती झणीं । तीचि म्हणती ज्ञानी । जनरूढी ।।६१।। जो भूतांचा जनिता । त्रिभुवनीं जयाची सत्ता । तयासी न पाहतां । प्रकृतिसुखें धुंडाळिती ।।६२।। प्रकृतिमाजीं सुख इच्छिलें । ते पुरुष अज्ञानी गणले । रावणादिक भले भले । सत्यलोकीं सत्ता ज्यांची ।।६३।। वशिष्ठ-विश्वामित्रांची कथा । पाहतां कळे ज्ञानसत्ता । सद्गुरुकृपें येई हातां । विमल ज्ञान ।।६४।। मुळीं प्रकृति नाशिवंत।

१ धारणा.

तिचीं कर्मेंही अशाश्वत । ठायीं पाडावें शाश्वत । तरीच ज्ञानी म्हणवावें ।।६५।। वेद अनंत बोलिले । प्रवृत्तिज्ञान विशद केलें । निवृत्ति संकेतें दाविले । अगोचर जया ।।६६।। वेदां जें अगोचर । तें संतांसी गोचर । मूळ सांपडतां तरुवर । हातीं येई ।।६७।। गुरुकृपेवांचूनि कांहीं । सर्वथा सार्थक होणें नाहीं। खूणगांठ बांधोनि हृदयीं । न्याहाळितसे सूक्ष्मदृष्टीं ।।६८।। कोणी येतां साधुसंत । म्हणे दाखवा भगवंत। वेदशास्त्रांचा मथितार्थ । उकलोनि दावा ।।६९।। चार वेद सहा शास्त्रें । अठरा पुराणें उपसूत्रें । शिकवा समग्र मंत्र तंत्रें । येके दिनीं ।।७०।। ऐसा करितां प्रश्न । म्हणती आम्हां नसे ज्ञान। गुरुचरणीं व्हावें लीन । ज्ञान येईल तुजलागीं ।।७१।। येरु वदे ऐसे संत। कोणे ठायी नांदत । ठाउके तरी पुरवा हेत । कृपा करोनी ।।७२।। भवतारक सद्गुरु संत । गृहीं गुंततां नोहे प्राप्त। लोभ सांडोनि गिरिगव्हरांत। तीर्थीं क्षेत्रीं शोधावे ।।७३।। जयांची होतां कृपादृष्टि । अज्ञान ज्ञानासह उठी। जन्ममृत्यु आटाआटी । भवग्रंथी तुटेल ।।७४।। गुरुशोधाचा निश्चय केला । सोबत्यांसी निवेदिला । जे न वदती कवणाला । विश्वासू परम ।।७५।। चुलत बंधु दामोदर । दुजा वामन म्हासुर्णेकर । दोघां मानवला विचार । सांगातें येऊं म्हणती ।।७६।। तंव गृहीं लिंगोपंत । जरेनें जाहले ग्रस्त । मृत्युचिन्हें उमटलीं जेथ । ते गेले निजस्थाना ।।७७।। कोणी हळहळूं लागले । कोणी म्हणती भलें झालें । पुत्रपौत्रांदेखत गेले । कलियुगीं अलभ्य ।।७८।। लिंगोपंत पुरुष भला । कार्यकर्ता होऊनि गेला । ईश्वर तयाचे आत्म्याला । शांति देवो ।।७९।। लिंगोपंत निघोन गेले । रावजी कर्ते झाले । गणपती वरी खेळ खेळे । मनीं ध्यायी श्रीगुरु ।।८०।। गुरु शोधायाकारणें । शीघ्रचि गृह त्यागणें । सार्थक अन्य साधनें। होणार नाहीं ।।८१।। व्रतबंधशुभवेळीं । मातापित्यांची आज्ञा झाली। करोनि गुरुसेवा वहिली । विद्या तुवां शिकावी।।८२।। भिक्षा मागोनि उदरपूर्ति।अखंड धरावी शांति। ब्रह्मचर्य पाळोनि क्षितीं।

विचरावें सकळ ।।८३।। ऐशा आज्ञेची पूर्तता । झाली नसे तत्त्वतां । तीच मानोनि आतां । सांग करावी ।।८४।। आधीं उपजत ज्ञान । वेदशास्त्र निमित्त जाण । पुढील कार्याअनुलक्षून । निश्चय केला जाण्याचा ।।८५।। द्वादश वर्षांचें वय । क्रीडासक्तीचा समय । परि वैराग्यउदय । दृढ झाला ।।८६।। तिथि वार निश्चित केला । प्रातःकालीं उठोनि गेला । सोबती धांवले साह्याला । मागील दोघे ।।८७।। गुरुभेटीची आर्त । धरूनि चालिले वनांत । तोडिली मायेची मात । दुर्जय दुर्निवार ।।८८।। सरिता-सागर संगम । समरसें पावेल विश्राम । श्रवण केलिया हरती श्रम । भाविकांचे ।।८९।। पुढील अध्यायीं ऐसी कथा । सद्गुरु होईल बोलविता । वत्स धेनूसी पितां। गळती सेवूं ।।९०। इति श्रीसद्गुरुलीला। श्रवणी स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।९१।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते तृतीयाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति तृतीयोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय चवथा

## *समास पहिला*

**समर्थानुयायी तुकाराम सिद्ध । जया पूर्ण वैराग्य अध्यात्मबोध ।।**
**तया प्रार्थुनी राममंत्रासि घेती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।४।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। नमो सद्गुरु योगेश्वरा । करुणाकरा परमोदारा । भवभीतासी थारा। आत्मरूपा ।।१।। बहुत जन्मीं जाहलों कष्टी । कामक्रोधें घातली मिठी । दुष्ट वासना पाठींपोटीं । लुबाडीतसे ।।२।। तेणें जाहलों भिकारी । चौऱ्यांशी लक्ष गेलों घरीं । परि शांति नसे अणुभरी । कासावीस झालों ।।३।। तंव अवचटे इये सदनीं । पावलों, तेथे श्रीमंत धनी । भेटला, करितों विनवणी । तळमळ निववा दातारा ।।४।। वेदशास्त्रें वर्णिली कीर्ति । दया क्षमा बोध शांति । अनन्यभक्तीची संपत्ति । वसते येथ ।।५।। कर्ण नाशिवंतदाता । सद्गुरु देई शाश्वता । पुनरपि मागण्याची आस्था । अल्पही उरेना ।।६।। ऐसी कीर्ती परिसिली । तेव्हां धांव घेतली । परि द्वारीं आड पडलीं । थोर थोर ।।७।। अविश्वासें ढकलोनि दिलें । देहलोभ पडळ[१] आलें । अहंतेनें पांगुळें केलें । मजलागीं दयाळा ।।८।। निद्रा आळस चंचल मन । आड कांटेरी कुंपण । अज्ञानतिमिर फिरफिरोन । अभक्तिकूपीं लोटतसे ।।९।। पापपुण्यांच्या भगदाडी मतांमतांच्या दरडी । ढकलोनि देवविती बुडी । स्वर्गनरकीं ।।१०।। बहुत केल्या येरझारा । अद्यापि न ये शिसारा । दयासिंधो सद्गुरुवरा । दीनाकडे पाहावें ।।११।। दीपाजवळील पांखरें । तैसें मज जाहलें खरें । भाजतें परि तें बरें । मोहयोगें भासतसे

**१ पटल, पडदा**

।।१२।। ऐसें मोहाचें पडळ[1] । विवेक वैराग्य नसे बळ । तेणें जाहलों विकळ । दीर्घस्वरें बाहतों ।।१३।। तूं बा दीनांचा कनवाळू । धांव घेईं न करीं वेळु । विझवी हा मायाजाळू । कृपामृत वर्षोनी ।।१४।। काकुळती वाट पाहे। काळ पाठीसी उभा आहे । क्षण न लागतां घालील घाये । उपेक्षा कासया मांडिली ।।१५।। भक्त थोर तेजोराशि । मी दीन म्हणोनि अव्हेरिसी । तरी दीनदास[2] कां म्हणविसी । दीनानाथा गुरुराया ।।१६।। श्रवणीं मम स्वर न पडे । ऐसें म्हणतां सर्वज्ञता मोडे । तुम्हांसी अज्ञेय मागें पुढें । कोठेंही असेना ।।१७।। जरी म्हणाल साधनबळें । दवडावीं सर्व किडाळें । तरी मायामोहें मज आंधळें । केलें असे जी दयाळा ।।१८।। आंधळ्या-पांगळ्यांचा । आधार तूं एक साचा । यास्तव दीनवाचा । तुजसी आम्हीं बाहतों ।।१९।। धांव धांव गुरुराया । मायेनें आणिलें[3] आया[3] । आठविलें तव पाया । आतां उपेक्षा न करावी ।।२०।। स्वामी जरी उपेक्षिती । मग आधार नसे त्रिजगतीं । म्हणोनि येतों काकुळती । कृपादृष्टीं विलोकावें ।।२१।। जरी म्हणाल पोपट । मुमुक्षुत्व नसेल धीट । तरी हा दारींचा भाट । ब्रीद राखा आपुलें ।।२२।। मायेनें त्यजिलें बाळासी । कोणी भेटेल मावशी। रायें त्यजितां प्रजेसी । दैव साह्य करील ।।२३।। परि तुम्ही टाकिल्यावरी । थारा न मिळे अवनीवरी । म्हणोनि विनवणी आदरीं । मायबापा गुरुराया ।।२४।। आठवावे तुझे पाय । अन्य न जाणें उपाय । जाणोनि देईं सोय । चरणांजवळी ।।२५।। मागील अध्यायीं कथा । सद्गुरु निघाले सांडोनि ममता । दामू वामन संगतीं असतां । पावले करवीरनगरीं ।।२६।। अयाचित भोजन करिती । परस्परें साह्य होती । सतेज दिसे गणपती । मोहवी मन जनाचें ।।२७।। कोणी पक्वान्नें ओपिती । कोणी येऊन दर्शन

**१ पटल, पडदा. २ श्रीमहाराज आपले अभंगाचे शेवटी स्वतःस ''दीनदास'' म्हणत; तेव्हां मज दीनास साह्य व्हावें, असा भावार्थ. ३ जेरीस आणले.**

घेती । कोणी पाहोन आश्चर्य करिती । तपस्तेज म्हणती हें ।।२८।। देखोनि गणपतीचे गुण । दत्तक घेऊं आपण । म्हणोनि गुरुजी कोणी भावसंपन्न । अत्याग्रह मांडिला ।।२९।। सद्गुरु सत्वर निघाले तेथुनी । इकडे जगदंबाभेट घेउनी । दामू आला परतोनि । गृहीं वृत्तांत निवेदिला ।।३०।। वामनबुवा म्हासुर्णेकर । पुढें कांहीं दिवस बरोबर । होते तेही माघार । घेऊन आले गृहासी ।।३१।। इकडे काय झालें गोंदावलीं । दोन प्रहर वाट पाहिली । मग माउली सचिंत झाली । बाळ कोठें दिसेना ।।३२।। रावजी झाले चिंताक्रांत । ग्राम समस्त धुंडाळित । नदीतीरीं जावोनि पाहात । बैसला असेल एकांतीं ।।३३।। रानोमाळीं शोधिती । गांवोगांवीं दूत प्रेषिती । परि कोठें न दिसे गणपती । दुःख करिती अनिवार ।।३४।। अज्ञान सान बालक । सोडोनि गेला गृहसुख। कोण करील त्याचें कौतुक । खाऊं जेवूं घालील ।।३५।। ऊन पाऊस थंडी वारा । कोण देईल निवारा। नयनीं लोटती अश्रुधारां । पुत्रस्नेहें ।।३६।। कोणी नाहीं मारिलें । अथवा रागे भरिलें । कोण्याकारणें रुसोनि गेलें। सोडोनि आम्हां पाडस ।।३७।। आमुचे जीवींचें जीवन । सद्गुणी चातुर्याची खाण । भगवद्भजनीं अनन्य । कोठें गेला कळेना ।।३८।। देवानें दृष्टांत दिला । सिद्धपुरुष होईल भला । साधन साधावया गेला । गृहत्याग करूनी ।।३९।। कांहीं तर्क चालेना । गुण आठविती नाना । कोणी शोधूनि सांगा ना। पुत्रवार्ता ।।४०।। ऐसें दुःख बहुपरी। करूं लागले ते अवसरीं । जमोनि बोधिती शेजारी । भेटी येईल मागुता ।।४१।। तो सद्वर्तनी चतुर । कदा न करी अविचार । भेटेल तुम्हांसी सत्वर । चिंता न करावी ।।४२।। माता पिता मित्रगण । समस्त होती उद्विग्न। पाडस चुकतां जैसी जाण । धेनू फोडी हंबरडा ।।४३।। तव दामू परतोनि आला। गृहीं वृत्तांत निवेदिला । सद्गुरुशोधासी गेला । तुमचा सुत ।।४४।। परिसोनि ऐसी वार्ता । शोधूं धांवले सद्गुणी सुता । मार्गीं अवचित भेटतां । घेवोनि आले गृहासी

।।४५।। कांहीं दिवस राहोनि । पुनरपि गेला निघोनी । शोक करिती जनक जननी । हातीं न लागे पुत्र हा ।।४६।। दामू वामन शांतविती । त्यासी कोठेंही नसे कमती । बहुत जन दर्शन घेतीं । आयती[१] पुरविती अनेक ।।४७।। तो ज्ञानी वैराग्ययुत । श्रीगुरूसी शोधित । येईल पुरल्यावरी हेत । चिंता तुम्ही न करावी ।।४८।। सद्गुरुभेटीवांचून । गणपति न ये परतोन । निश्चय मनीं धरून । समाधान मानिती ।।४९।। इकडे गणपति बाळ। फिरतसे रानोमाळ । कोठें सद्गुरु दयाळ । भेटतील कीं ।।५०।। नाना तीर्थें नाना देश । गिरिगव्हरें विशेष । नदीतटाकीं बहुवस । शोधित फिरे ।।५१।। शास्त्री पंडित वैदिक। अध्यात्मवादी पुराणिक । भजनी गोसावी भाविक । योगी आणि हठयोगी ।।५२।। मठपती फडपती हरिदास । संन्यासी आणि परमहंस । गृहधर्मी परि उदास[२] । संतचरणीं सादर जे ।।५३।। तैसे गुरुपरंपरागत । गुरुभक्त हरिहरभक्त । ब्रह्मचारी कर्मठ शाक्त । शुद्धज्ञानी वैरागी ।।५४।। बाह्य वेडे अंतरी शहाणे । राजयोगी अलिप्तपणें । करिती जे तीर्थाटनें । सिद्धि चमत्कार दाविते ।।५५।। ऐसियांच्या घेती भेटी । करिती तयांसवें गोष्टी । न्याहाळिती सूक्ष्मदृष्टी । सत्यासत्य ।।५६।। कोणी मानाचे भुकेले । कोणा धनानें भुलविलें । किती स्त्रीसंगें भ्रष्टले । सोंग राहिलें केवळ ।।५७।। कित्येक बोलती जैसे भाट । अनुभवहीन धीट पाठ । मधुरगायनीं लाविती चट । भाविकांसी ।।५८।। कित्येक सिद्धी उपभोगिती । तेणेंचि समाधान मानिती । कित्येक धर्म उच्छेदिती। म्हणती आम्ही अद्वैती ।।५९।। साधुत्वाचे नांवाखालीं । दुष्कर्में कोणी झांकिलीं । वरी दिसलीं भलींभलीं । कवंडळासारिखी[३] ।।६०।। योगभ्रष्ट कोणी झाले। उपासनेविण ज्ञान बोले । वैराग्य नाहीं देखिलें । देहासक्त ।।६१।। कांहीं ते उदरदास । म्हणती आम्ही हरिदास। मोलें ज्ञान विक्रयास ।

१. सामग्री. २ आशारहित. ३ एक प्रकारचें फळ; हे पिकल्यावर दिसण्यांत सुंदर असतें, पण आंत काळें व कडू असतें.

मांडिती बाजारीं ।।६२।। जें मोलें विकतां न ये । कोणी कोणा देतां न ये । वासना जिंकोन जो जाये। तयासीच प्राप्त ।।६३।। कित्येक वडिलोपार्जित साधु । वैराग्योपासना ना बोधु । अहंकारी स्वयंसिद्धु। म्हणती आम्ही ।।६४।। गायनाचे भोक्ते कोणी । लक्ष वेधिलें सुरांनीं । दुरी राहिला चक्रपाणी । नाठवे जयां ।।६५।। कित्येक अत्यंत कर्मठ । संशयें ग्रासिले सगट । दयेची झाली ताटातूट । कर्महि सांग घडेना ।।६६।। कोणी संपत्तीचे बळें। साधुत्वाचे करिती चाळे । अंतरी भाव ते वेगळे । बाजारी दिसती ।।६७।। असो ऐसे बहुत प्रकार । सांगता न ये अनिवार । भोळ्या भाबड्यां चमत्कार । दावोनि नादीं लाविती ।।६८।। बाह्य सोंग संपादिती । अंतरें मलिन राखिती । पुढें आतां ऐसीचि स्थिती । होणार आहे ।।६९।। क्वचित् स्थळीं भगवद्भक्त । हरि जयांचा अंकित । भक्तिज्ञानवैराग्ययुक्त। त्यांचीं लक्षणें अवधारा ।।७०।। नित्यतृप्त ज्यांचें चित्त । जे पूर्ण ज्ञानी विरक्त । निःसंदेही गुणातीत । ब्रह्मानंदीं अनन्य ।।७१।। आशासूत्र जळोनि गेलें । चित्त चैतन्यचि झालें । लोकेषणेसी न वंचले । निरहंकृती ।।७२।। देहीं असोनि विदेही । द्वेष मत्सर मुळीं नाहीं । भूतीं भगवद्रूप पाही । सहजसमाधि भोगिती ।।७३।। जाणोनि निर्गुणाची खूण । सगुणभक्ति करी गहन । निरालस्य निर्विकार मन । स्थिरबुद्धी जयाची ।।७४।। दया-शांतीचा पुतळा । चौदा विद्या चौसष्ट कळा । जाणोनि राहे वेगळा। प्राकृताऐसा ।।७५।। चौदेहाचा केला अंत । प्रारब्धें देह वर्तत । ऊर्मि निमाल्या समस्त । हर्ष ना विषाद ।।७६।। ताप न होई इतरांसी । इतरांपासोन जयासी । शांति नांदे अहर्निशीं । अंतर्बाह्य ।।७७।। ऐसेहि भेटती कोणी । तेथें तेथें जावोनि । हस्तद्वय जोडोनि । म्हणे विद्या शिकवा हो ।।७८।। चौवेद षड्दर्शनें । चौसष्ट कला पुराणें । एके दिनीं शिकवा म्हणे । विवेकी बाळ ।।७९।। प्रश्न पाहोनि चकित होती । कांहीं वर्म जाणती । कांहीं उगेच उपहासिती । बालबुद्धि म्हणोनी ।।८०।। जे कां

ज्ञानी भगवद्भक्त । ते म्हणती सद्गुरुपदांकित । होतां येतील समस्त । विद्या तुज ।।८१।। पहा हो याची विरक्ती । शमदमादि संपत्ती । ज्ञान पाहतां वेडावती । थोर थोर ।।८२।। कामक्रोधादि जिंकिले। गृहपाशही तोडिले । देहदंडण बहु केलें । अल्पवयीं ।।८३।। दिसतो तरी वज्रदेही । उन्मत्तपणा मुळीं नाहीं । बाल फिरे सकल मही । सद्गुरुपद शोधित ।।८४।। काशीपासोन रामेश्वर । बहुत केली येरझार । तीर्थें क्षेत्रें समग्र । शोधिलीं गुरुकारणें ।।८५।। रामेश्वरा अर्पिली गंगा । सेतु नेला प्रयागा । सप्तपुऱ्या ज्योतिर्लिंगा । चहूं धाम शोधिले ।।८६।। मार्गीं फलाहार करावा । सिद्ध साधक धुंडावा । मुखीं रघुवीर गावा । ऐसा क्रम चालिला ।।८७।। मार्गीं भेटले बहुत । मुमुक्षु साधक संत । कांहीं भेटींचें वर्णन येथ करूं विशद ।।८८।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते चतुर्थाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास दुसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः । ॐ नमो जी गुरुराया । अर्पितों तुझे चरणीं काया । निरसावें या भवभया । ठाव देईं चरणांचा ।।१।। हृदयस्था आत्मयारामा । वर्णावयाची झाली सीमा । शेष थकला गातां महिमा। एक मुखें काय वर्णूं ।।२।। असो कृष्णा-वारणा संगमासी । हरिपूर क्षेत्र परियेसीं । तेथें राधाबाई नाम जिसी । भोळी भाविक सत्त्वस्थ ।।३।। भजन जियेचें प्रेमळ । अन्नदानाचा सुकाळ । भक्तिभाव तो निर्मळ । संतसेवनीं सादर ।।४।। मिरजग्रामीं अण्णाबुवा । लोकीं

वेडा म्हणावा । अंतर्निष्ठांनीं ओळखावा । सिद्धपुरुष ।।५।। अनेक चमत्कारांसी दाखवी । लोककार्यें करावीं । पिशाचवृत्ती धरावी । वरिवरी ।।६।। नाशिकप्रांतीं सटाणें गांव । तेथें मामलेदार देव । गृहस्थाश्रमी शुद्ध भाव । ज्ञानी असोनि विरक्त ।।७।। भार्या जयाची सती । पतिव्रता गुणवती । उभयतां बहु प्रेम करिती । गणपतीवरी ।।८।। जातां येतां काशीहोनि । सद्गुरु जाती नेमेंकरोनि । थोडे दिवस राहोनि । पुढें होती मार्गस्थ ।।९।। जाणोनि हनुमदंश । मानिती भजती विशेष । प्रश्नोत्तरें दिवस दिवस । संवाद होत स्वानंदें ।।१०।। जातीसीं मिळतां जात । प्रेमें प्रेम दुणावत । सहजसमाधि येत । अनुभवासी ।।११।। माणिकप्रभू हुमणाबादकर । ज्ञानी विरक्त योगेश्वर । शिष्यसमुदाय थोर । असे जयांचा ।।१२।। कांहीं दिवस केली वसति । प्रेमसंवाद चालती । रामभक्त जाणोनि चित्तीं । वंदन करिती समसाम्यें ।।१३।। सद्गुरु अक्कलकोटनिवासी । दत्तमहाराज म्हणती जयांसी । तेथें जाती दर्शनासी । दत्तअवतार मूर्तिमंत ।।१४।। कथिती ते रामोपासना । सद्गुरु भेटतील जाणा । अंतर्भाव जाणोनि खुणा । येरयेरां भेटले ।।१५।। आणिक बहु असती । जे गिरिगुहेमाजीं बसती । मनुष्यवाराही न घेती । ऐसे राहती अलिप्त ।।१६।। प्रसंगें श्रीगुरूंनीं कथिलें । तें येथें विशद केलें । मार्गीं बहुत भेटले । सिद्ध आणि साधक ।।१७।। बहुत केल्या येरझारा । काशीहूनि रामेश्वरा । भरतखंड शोधिला सारा । सद्गुरुकारणें ।।१८।। कोणी म्हणती आम्हांसी । अधिकार नसे निश्चयेंसी । तुम्ही ज्ञानी गुणराशी । आम्हां गुरूसारिखे ।।१९।। कोणी ज्ञानी तपोबल । भूत भविष्य जाणोनि सकळ । अवतारिक पुरुष हा केवळ । गुरु व्हावा कासया ।।२०।। कोठें कांहीं कोठें कांहीं । मिळोनि समाधान नाहीं । तळमळ वाटे अंतर्बाहीं । विचरती भूमंडळीं ।।२१।। सद्गुरुपद तें दुर्लभ । सहसा नव्हे प्राप्य लाभ । सुटतां संसृतीचा लोभ । ठायीं पडे ।।२२।। रुका अडका खर्चिला। सद्गुरु खरेदी घेतला ।

तरी बोध तैसाचि झाला । इह ना परत्र ।।२३।। धूर्त तार्किक विचक्षण । युक्तिप्रयुक्ती वेधिती मन । भोळे भाविक सज्जन । भुलविती अनेक ।।२४।। कामक्रोधा बळी पडले । अहंकारीं वैभवीं गुंतले । सिद्धिसाह्यें सुख मानिलें । तेही सद्गुरु म्हणविती ।।२५।। शाक्तमार्गें भरी भरती । भूतदयेतें नेणती। कोणी भूतपिशाच भजती । भुलविती शब्दज्ञानें ।।२६।। वैभव पाहोनि भुलले । शब्दज्ञानें चकित झाले। आडमार्गीं जावोनि पडले । असंख्य नर ।।२७।। देवाहोनि आम्ही श्रेष्ठ । सेवा करा एकनिष्ठ। व्यसनी विषयी झाले भ्रष्ट । भोंदिती जगा ।।२८।। नाहीं भक्ति नाहीं ज्ञान । नाहीं उपासना अनुसंधान। वैराग्य क्षमा समाधान । नाहीं भूतदया ।।२९।। समबुद्धि ना स्थिरत्व । नैष्कर्म्य ना जनप्रियत्व । निरहंकृति ना निस्पृहत्व । वंचकवृत्ती ।।३०।। नाहीं संदेह गेला । भूतीं भगवंत न देखिला । आशातंतु नसे तुटला। महंती प्रिय ।।३१।। अंगीं भरला ज्ञानताठा । यमनियमा दिधला फांटा। स्तुतिप्रिय झाला मोठा । अनुभवहीन ।।३२।। ऐसे गुरु बहुत असती । बिकट प्रश्नें चडफडती । महंती जाईल म्हणोनि भिती। शिष्यगुंती काढिती ना ।।३३।। ऐशियांचेनि सार्थक । होणार नाही निःशंक । स्वयें बुडोनि लोक । बुडविती निश्चयेंसी ।।३४।। ऐसे बहुत शोधिले । फिरत वाराणसीं आले। देखोनि तेथें शास्त्री भले। प्रश्न करिती नेमस्त ।।३५।। शास्त्री वदती बाळा । गुरुविणें ज्ञानजिव्हाळा । न ये विद्या आणि कळा । यथासांग ।।३६।। दक्षिणेसी मोगलाई । तेथे सद्गुरु तुकाई । शरण जाईं लवलाहीं । अनन्यभावें ।।३७।। परिसोनि वचनासी। संतुष्ट झाले मानसीं । फिरले त्वरित दक्षिणेसी । विचार मानसीं दृढ केला ।।३८।। तुकाराम साधु भले। येहळेगांवी ऐसें कथिलें । परिसतांचि समाधान झालें। गणपतीचें ।।३९।। बहुत पुरुष आजवरी । पाहतां फिरले पादचारी । परि समाधान ऐसेपरी । कधीं न झालें ।।४०।। आत्मा आत्मपणें एक । उपाधीनें दिसे अनेक । परि अनेक नव्हे एक । सर्वां भूतीं

।।४१।। तोचि देतसे साक्ष । सूक्ष्मपणें देतां लक्ष । सत्यासत्य दावी पक्ष । विवेकी जना ।।४२।। या अनुभवाच्या गोष्टी । विवेकी पाहती दृष्टीं । इतर करितील चावटी । वितंडवादें ।।४३।। असो झालें समाधान । चित्तासी बाणली खूण । त्वरित निघाले तेथोन । गुरुपदीं लीन व्हावया ।।४४।। उतावीळ झालें चित्त । सद्गुरुभेटीची आर्त । वाटे वाट दुणावत । सत्वरीं ओसरेना ।।४५।। धेनू आली वनांतोनि। धारेसी निघाला घरधनी । वत्सें धांव धरिली मनीं । परि बिरडें सुटेना ।।४६।। ग्रामाहून आला पती । सासुरवासी भार्या सती । भेटी उतावीळ चित्तीं । वाटे गभस्ति मंद चाले ।।४७।। तैसें श्रीसद्गुरुदर्शन । घ्यावया उतावीळ मन । जान्हवीचें स्नान करून । विश्वेश्वरदर्शन घेतलें ।।४८।। तेथूनि निघे गुरुमाउली । सद्गुरुभेटीसी चालिली । वय लहान असोन केली । करणी हे अघटित ।।४९।। सद्गुरुभेटीची आयती[1] । केली कैशी पाहावी ती । चित्तशुद्धि अनुतापस्थिति। वैराग्ययुक्त ।।५०।। मायमोह पितृमोह । खेळगडी यांचा मोह । आप्तइष्ट-गृह-मोह । शरीरमोह सांडिला ।।५१।। अयाचित उदरभरण । फलाहार उपोषण । रसनेंद्रिय जिंकलें संपूर्ण । अजिंक्य जें ।।५२।। कोठेंही करावी वसति। ग्रामीं अथवा वनाप्रति । प्रावरणाविण वागविती । देह आपुला ।।५३।। शीतोष्ण वारा पाऊस । सोसतां न मानी त्रास । वैराग्यस्थिति जयास । पूर्णत्वें बाणली ।।५४।। आशा ममता देहबेडी। लोभ मोह वासना कुडी । भय अहंकार वऱ्हाडी । घालविले सकळ ।।५५।। मुखीं अखंड रामनाम । तेणें चित्तशुद्धि होय परम । ध्यानीं एक श्रीराम । भोग्य वस्तू टाकिल्या ।।५६।। माझें घर माझा संसार । माझीं मायबापें चतुर । माझी जन्मभूमि थोर । शहाणा एक मीच मी ।।५७।। माझें धन माझें शेत । माझे खेळगडी बहुत । आप्तइष्ट गणगोत। सर्वही माझें ।।५८।। माझें हें ओझें समस्त।

**१ सिद्धता, सामग्री.**

विवेकें विवरी सतत । असत्य मानोनि शोधी सत्य । सद्गुरुपाशीं ।।५९।। न इच्छी विषयभोगांसी । विषसम जाणोनि त्यांसी । अलिप्त राहे उदासी । आवडी एक नामाची ।।६०।। परि रामदर्शन करवी । ऐसा न मिळे गोसावी । अखंड तळमळ लागली जीवीं । वैराग्ययुक्त ।।६१।। अनुतापें होवोनि विरक्त । विवेक जागविला सतत। नामस्मरणानें होत । चित्तशुद्धि ।।६२।। मुमुक्षुस्थिति अनुभविली । साधकवृत्ति अंगीकारिली । सद्गुरुभेटीसी चालली । माय माझी ।।६३।। जे उपजत ज्ञानघन । आधिमध्यान्त अविच्छिन्न । जनांसी लावावया वळण । जनरुढी चालती ।।६४।। असो गणपति बाळ । ओलांडोनि रानोमाळ । पाहावया सद्गुरु दयाळ । सत्वर चालिले ।।६५।। पावले मोगलाईंत । येहळेगांव कोठें पुसत । संकेतें पावले जेथ । तुकाराम नांदत ।।६६।। बाळ चातक ज्ञानाधिकारी । स्वानंदमेघ वरुषेल वरी । सद्गुरुकृपेचिया सरी । तन्निमित्तें सेवन करूं ।।६७।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते चतुर्थाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास तिसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। येहळेगांवीं पावले । ग्रामस्थांसी पुसिलें । तुकाराम साधु भले । कोठें भेटतील मजलागीं ।।१।। कोणी म्हणती नसे ठावा । कोणी म्हणती रानीं पहावा । वेडा तुका कासया हवा। म्हणती कोणी ।।२।। कोणी म्हणती साधु भले । तुमचें भाग्य उदेलें । दर्शना चित्त वेधलें । वय दिसतसे कोमल ।।३।। कोठें तरी आडरानीं । अथवा ओढ्याचे ठिकाणीं । बैसले

असतील, शोधोनि । काढीं बापा ।।४।। असतील कंकणें हातांत । श्वान बालकांसवें खेळत । चिलीम करीं वागवीत । असतील पहा ।।५।। भूमीची शेज तयांसी । आकाश प्रावरण परिधानासी । मस्तकीं टोपडें घालिती हर्षीं । बालकाऐसें ।।६।। सर्वज्ञ परि बाह्य वेडा । दिसेल तुम्हांसी तुसडा । देह मलिन उघडा । वागवित नित्य ।।७।। खूणगांठ बांधोनि । बाळ निघाला तेथोनि । सत्वर काढिले शोधोनि । परमहंस ।।८।। दुरूनि ध्यान पाहिलें। तंव अष्टभाव दाटले । मग देहासी लोटिलें । सद्गुरुचरणीं ।।९।। कंठ सद्गदित झाला । प्रेमपान्हा नयनीं आला । सर्वांगीं रोम थरारला । कृपाकटाक्षें ।।१०।। सहस्रबाण सोडिले जरी । न मरे वासना आसुरी । कृपाकटाक्षें एके शरीं । सकुटुंबें निमाली ।।११।। दशेंद्रियांसहित मन । सोडोनि बाह्यविषयस्फुरण । सद्गुरुपदांसी आकलन । कराया धांवले ।।१२।। परि झालें विपरीत । गुरुपदींच लीन होत । आपलेपण विसरोनि जात । ऊर्मीची धांव खुंटली ।।१३।। जैसे मीन चहूं दिशीं । ग्रासूं धांवती गळासी । तंव ते गळचि गुंतविती तयांसी । बाह्यगति रोधोनि ।।१४।। तैशीं इंद्रियें लीन झालीं । गुरुपदीं गुंतोनि गेलीं । विषयग्रहणीं खुंटली । गति ज्यांची ।।१५।। चंचलत्व मनाचें गेलें । अनन्यत्वें चरण वंदिले । हस्त जोडोनि उभे ठेले । दृष्टि नम्र जाहली ।।१६।। तुकाराम आनंदमूर्ति। ज्ञानदृष्टीनें पाहती । जाणोनि अंतर्बाह्यस्थिति । कार्यकर्ता सिद्धपुरुष ।।१७।। लोकव्यवहार कारण । ध्यानीं आणोनिया जाण । मौन धरिलें आपण । तुकाईनें ।।१८।। बाळ बोले जी महाराज । शिकावें वेदशास्त्राचें बीज । ऐसें कथिलें मज । कुलगुरूंनीं ।।१९।। वेदशास्त्रें तीं अपार । अल्पायुषीं न पडे पार । भवसिंधु दुर्गम थोर । उतरावा कैसा ।।२०।। सप्रेम बोले तुकाई । गुरुकृपा होतां पाहीं । अज्ञेय नुरे स्वल्पही । ज्ञानरूप होशील ।।२१।। सहज बोलोनि उत्तरा । चटका लाविला अंतरा । सिद्धांच्या लीला अवधारा । कैशा असती ।।२२।। गणपति करी विनवणी ।

अनुग्रहप्रसाद द्यावा झणीं । जेणें भेटेल चक्रपाणी । भवगजपंचानन[१] ।।२३।। अधिकारी ऐसे जाणोनि । राममंत्र दिधला त्यांनीं । गुरुपरंपरा कथोनि । समाधान केलें ।।२४।। ती परंपरा ऐसी । आदिनारायण मूळाशीं । तो उपदेशी श्रीविष्णूसी । विष्णु उपदेशी हंसातें ।।२५।। हंसाचा शिष्य ब्रह्मदेव । वसिष्ठ ब्रह्मापासाव । ते उपदेशिती रामराव । एकपत्नी एकबाणी ।।२६।। रामें उपदेशिले रामदास । रामदास उपदेशिती कल्याणास । कल्याणें बाळकृष्णास । कृपाप्रसाद अर्पिला ।।२७।। चिंतामणि जाहले तेथूनि । रामकृष्णही वदती कोणी । तुकारामा भगवद्भजनी । रामकृष्णें लाविलें ।।२८।। तयापासोनि ब्रह्मचैतन्य । सद्गुरु बोधिले आनंदघन । परंपरा करितां श्रवण । रामभक्ति जडतसे ।।२९।। रामदास सामर्थ्यें समर्थ । होवोनि ठेले विख्यात । समर्थसंप्रदाय ऐसें वदत । तैंपासोनी ।।३०।। त्रयोदशाक्षरी रामनाम । वेदशास्त्राहूनि परम । जेणें पावती विश्राम । साधकजन ।।३१।। जें वंदिलें शिवांनीं । तेथें मानवा कोण गणी । सद्भावें ठेवितां ध्यानीं । रामभेटी होतसे ।।३२।। साह्य करी हनुमंत। दुष्टांनिंदकां निवारित । भजनीं सदा प्रेम देत । आशीर्वाद संतांचा ।।३३।। अनंतजन्मींचें भाग्य । असेल तरीच घडे हा योग । ना तरी संसृतीचा भोग । सुटेना कीं ।।३४।। असो ऐसा अनुग्रह झाला । गणपतिहृदयीं बिंबला । बहुतांचे उपयोगा आला । भवसिंधु तराया ।।३५।। पुन्हां धरिले मौन । रानींवनीं करिती भ्रमण । गणपति सोडीना चरण । सदा सन्निध वास करी ।।३६।। देहाची कींव सांडिली । गुरुसेवा आदरिली । चरणीं वृत्ति लिगडली । लोहचुंबकासारखी ।।३७।। गुरुसेवा अति गहन । गहन तितुकी सघन । देहाचें करोनि उपकरण । मन मुरडिलें सेवेकडे ।।३८।। एके दिनीं मिळे अन्न । एके दिनीं

१. भवरूपी हत्तीला मारणारा सिंह.

उपोषण । तृष्णा क्षुधा हें बंधन । तोडिलें मर्त्यलोकींचें ।।३९।। वस्त्रप्रावरण आकाश । तृण भूमि शय्येस । ज्ञानज्योतीचा प्रकाश । तेणें कष्ट न वाटे ।।४०।। जिकडे गुरु धांवती । तिकडे धांवावें शीघ्रगती । झाडोनि ठेविती क्षिती । बैसावयाकारणें ।।४१।। गुरु बैसलियावरी । प्रेमभरें चरण चुरी । मौन धरिलें बाहेरीं । अंतरीं ध्यान श्रीगुरूंचें ।।४२।। श्रीगुरु हेचि पंचप्राण । गुरुआज्ञा वेदवचन । तयावांचोन आन स्थान । न देखे तिळभरी ।।४३।। गुरुहूनि आन दैवत । न देखे त्रिभुवनांत । धन्य धन्य गुरुपूत । देव धांवती दर्शना ।।४४।। सोडोनिया विषयगुंती। इंद्रियें गुरुसेवेकडे धांवती । सेवेवांचोनि अन्यप्रवृत्ति । गोड न वाटे ।।४५।। कमल एक भृंगे अनेक । सर्वत्र धांवती तात्कालिक । इंद्रियभ्रमर वेगें अधिक । धांवती गुरुपदाब्जीं ।।४६।। मन चंचल अनिवार । परि रिघालें सद्गुरुघर। चंचलस्थिति गेली दूर । ठायींच उन्मन झालें ।।४७।। चित्त चिंती गुरुवर । बुद्धि स्थिर झाली चतुर । गेला समूळ अहंकार । परम लीनता बाणली ।।४८।। वासना इच्छी चरणरज । तृष्णा धरी सद्गुरुकाज। अनन्यपण सहजीं सहज । गुरुपदीं जाहलें ।।४९।। क्वचित्काळी सेवा घेती । क्वचित् झिडकारोनि देती। दुरुत्तरें बोलोनि पाहती । निष्ठा सच्छिष्याची ।।५०।। क्वचित् गुणां वानावें । क्वचित् तृणतुल्य करावें । हर्षविषादाचे गोवे । घालिती अनेक ।।५१।। परि मान ना अपमान । लोभग्रस्त नोहे मन । गुरुपदीं गेलें रंगोन । रिघाया दुजा ठाव नाहीं ।।५२।। धक्के चपेटे मारिती । अहंभूता निवारिती । सद्गुरु सच्छिष्याप्रति । स्थापिती निजपदावरी ।।५३।। अनंत सुकृतांची ठेव। असतांचि गुरुपदीं भाव। दुर्लभ दुर्लभ, आड माव । ठायीं ठायीं पडतसे ।।५४।। सद्गुरुवचनीं अढळ विश्वास । तोचि साक्षात् ब्रह्मरस। गुरुपूत म्हणावें तयास । त्रैलोक्यवंद्य ।।५५।। गुरुवचनीं विकल्प धरी । तो जाण

अनधिकारी । चौऱ्यांशी लक्ष फेरी । चुकणार नाहीं ।।५६।। असो सद्गुरुसेवा गहन । गणपति करी रात्रंदिन। देवादिकां दुर्लभस्थान । उपभोगी जो ।।५७।। तुकाराम परमहंस । दुर्गमस्थळीं वनीं वास। सेवा कठिण बहुवस । विचारा मनीं ।।५८।। ऐसे तुकाराम संत । परमहंस विरक्त । अनन्यपणें भगवद्भक्त । निःसंदेही ।।५९।। लोकीं वागती वेड्यापरी । 'वेडा तुका' म्हणती सारीं । भाविकां नवसा सत्वरी । पावती नित्य ।।६०।। बहुत लोक दर्शना येती । कोणासवें न बोलती । बोलिल्या अर्थव्युत्पत्ति । प्राकृता न कळेचि ।।६१।। कोठेंही फिरत असावें। श्वान-बालकासींच खेळावें । कोठेंही खावें जेवावें । बंधन नाहीं ।।६२।। नानापरींचे नवस । नागरिक बोलती तुकयास । शीघ्र पावे तयांस । संकटकाळीं ।।६३।। पुत्रप्राप्तीची हांव जयां । त्या नवस करिती बाया । म्हणती मजला पुत्र झालिया । तुक्याकरवीं कान टोंचूं ।।६४।। कोणाची मुलें न वांचती । ते नाककान टोंचविती । काकुळतीनें शरण येती । पुत्र वाचूं दे आमुचा ।।६५।। व्याधिग्रस्त कितीएक । मानसिक कामना अनेक । पुरवोनि दाविती कौतुक । चमत्कृति जगामाजीं ।।६६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते चतुर्थाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास चवथा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः । सद्गुरु श्रीतुकाराम । उपदेशिती भक्त परम । अनंत पावती विश्राम। तुकाईपाशीं ।।१।। शाहण्यासी अंतर न देत । भाविकांसी सफल होत । अनन्यासी तारित । भवसिंधुपासोनि ।।२।। विकल्पी विकल्प करिती । मूर्ख लोक वेड्या भजती । मत्सर निंदा

आपुले मतीं । करिति कितीएक ।।३।। एकदां एक चमत्कार । झाला तो करूं विस्तार । गोचरस्वामी उंबरखेडकर । गुरुबंधु तुकाईचे ।।४।। गोचर म्हणाया कारण । धेनूपरि अन्नग्रहण । हस्तस्पर्श न करिती जाण । मुखानें आहार करिती ते ।।५।। परम विरक्त संन्यासी । परि सगुणोपासना आनंदेंसी । मठीं राहती सुखेंसी । मुमुक्षुजनां बोधाया ।।६।। एके समयीं ऐसें झालें । मठीं ब्राह्मण भोजना बैसले । कर्मठपणें भरीं भरले । अंतरस्थिति नेणती ।।७।। गोचरस्वामी भक्त परम । प्रसाद देवादिकां दुर्गम । तंव पावले तुकाराम । अकस्मात त्या ठायीं ।।८।। स्वामींस झाला आनंद । धांवोनि धरिले पद । विनविती सेवावा प्रसाद । परमानंदें ।।९।। उभयतांही गुरुभक्त । विवेकी ज्ञानी विरक्त । भेटीचा आनंद येथ । वर्णितांही पुरेना ।।१०।। एखादा विदेशी नर। पाहे भिन्न आचार । देशबंधु मिळतां निर्धार । औदासिन्य मावळे ।।११।। तैसे जगीं संत वर्तती । परि अंतर कोणी नोळखती । ओळखीऐसी भेटतां जाति । सहज प्रेम उफाळे ।।१२।। बैसविले अत्याग्रहें । वाढायाची चालली घाई । विप्र म्हणती हें काई । स्वामी आरंभिलें ।।१३।। येर येरांकडे पाहती । हळूंच नेत्रें खुणाविती । भ्रष्ट तुका आला विप्र म्हणती । नाकें मोडूं लागले ।।१४।। स्वामींचे भिडें बोलवेना । आणि धीरही धरवेना । द्विज तामसी जाणा । मनीं जाहले संतप्त ।।१५।। म्हणती हा वेडा तुका । आचारभ्रष्ट असे निका । भटकतो रानीं वनीं देखा। कर्महीन ।।१६।। केवळ जातीचा ब्राह्मण । न करी संध्यावंदन । स्वामी जाणते ज्ञानघन । परि आजीं वेडावले ।।१७।। ऐसा मनीं विकल्प आला । नोळखिती ब्रह्मपदाला । श्रींनीं भाव जाणिला। उठोनि गेले ।।१८।। तुका गेला बरें झालें । औषधाविना नायटे गेले । आतां सुग्रास अन्न वहिलें । जेवूं आकंठपर्यंत ।।१९।। आनंद मनीं मानिती । स्वामी सकळही जाणती । अनुभव येईल तयांप्रति । साधुनिंदेचा ।।२०।। तंव झाला चमत्कार । पक्वान्नासी सुटलें नीर । किडे बुजबुजले फार । पात्रांमाजीं

।।२१।। आश्चर्य करिती सारे । आजि आमुचें दैव न बरें। स्वामींसी कथिती ते त्वरें । अशुभवार्ता ।।२२।। स्वामी वदती तयांप्रती । तुम्ही विकल्प आणिला चित्तीं । तोचि फळा आला निश्चितीं । करावें तैसें भरावें ।।२३।। तुकाराम साधु भला । परमहंसपद पावला । त्याचा तुम्हां वीट आला । म्हणोनि ऐसें जाहलें ।।२४।। ज्यानें स्वधर्म जाणला । जाणोनि स्वस्वरूपाला । तदाकार होवोनि ठेला । त्यासी म्हणतां अपवित्र ।।२५।। ब्रह्म जाणे तो ब्राह्मण । ऐसें वेदश्रुतीचें वचन । तुम्ही सांगा कांहीं खूण । अल्पस्वल्प ।।२६।। जो ब्रह्मानंदीं निमग्न । भूतीं भाव नसे भिन्न । तयासि लावितां दूषण । विरक्त निःसंदेही ।।२७।। जें अगोचर वेदांसी । तेंचि गोचर जयासी । कर्मबंधन नसे त्यासी । सत्य सत्य ।।२८।। जो ब्रह्मानंदी तल्लीन । त्याचीं कर्में करायालागोन । ऋषि ठेविलें स्थापोन । भगवंतांनीं ।।२९।। जो श्रेष्ठ समबुद्धि । आपपर भाव नसे कधीं । देह चाले सहजसमाधी । मध्यें जयाचा ।।३०।। ऐसा जो कां भगवद्भक्त । परमहंस परम विरक्त । तुमचे मनीं विकल्प प्राप्त । अज्ञानें जाहला ।।३१।। जया अज्ञेय नसे कांहीं । अंतर्भाव जाणोनि जिहीं । चमत्कृति दावाया पाहीं । उठोनि गेले ।।३२।। तुम्ही जावोनि सत्वरी । विनवोनि आणा पात्रावरी । मग सुखें भोजनें बरीं । सुग्रासेंसी करावीं ।।३३।। विकल्प आणिला मनांत । म्हणोनि मानूं नका किंत । साधु क्षमा मूर्तिमिंत । जगाची माय ।।३४।। स्वामींचे वचन प्रमाण । मानोनिया विप्रगण । धुंडिती सकळही वन । सत्वरेंसी ।।३५।। तंव पाहिलें अकस्मात । धांवोनि चरण धरित । अन्याय झाला बहुत । क्षमा करीं महाराजा ।।३६।। अल्पबुद्धि जन आम्ही । विकल्प आला जी स्वामी । क्षमा करोनि चला धामीं । भोजन आम्हां घालावें ।।३७।। उठते झाले हास्यवदनीं । तुकाराम सिद्ध ज्ञानी । बैसले मठीं जाऊनि । आनंदी-आनंद बहु केला ।।३८।। गोचरस्वामी आणि शेवाळकर । दोघे गुरुबंधु साचार । भक्त अनेक किंकर । लागती श्रीचरणीं

।।३९।। दत्त उपास्य दैवत । संप्रदाय श्रीएकनाथ । ऐक्यरूप होवोनि वर्तत । असती जगामाजीं ।।४०।। आशंका घेतील कोणी । नाथसंप्रदाय म्हणोनि । तरी परिसावी कहाणी । झाली कैसी ।।४१।। चिंतामणिबुवा संत। होते पूर्वी दत्तभक्त । विठ्ठलचैतन्य तयां वदत । होते पूर्वीं गृहस्थाश्रमीं ।।४२।। संन्यासग्रहणाचे वेळीं । भेटली बाळकृष्ण माउली । रामउपासना । तेव्हा दिली । चिंतामणि गुरुनाम ।।४३।। तैंपासोनि उपासना । दोनी चालवल्या जाणा । तुकारामें दत्तउपासना । बहुतांस दिली ।।४४।। सद्गुरुकारणें केवळ । ठेव होती जी जवळ । रामभक्त जाणूनि निश्चळ । हातीं दिली ।।४५।। तिघे गुरुबंधु जे कां । वडील मानिती त्यांतील तुका । गोचरस्वामी दुजे देखा । तिजे रावसाहेब शेवाळकर ।।४६।। तिघांसी मानिती देवांश । ब्रह्मा विष्णु महेश । तुकाराम वैराग्यें उदास । श्मशानवासी म्हणती तया ।।४७।। तुकाराम परमहंस विरक्त । गोचरस्वामी संन्यासव्रत । रावसाहेब शेवाळकरपंत। गृहस्थाश्रमी ।।४८।। तयांची ऐसी साधनपद्धती । विप्रगृहीं पाणी भरिती । भगवद्रूप मानोनि अतिथी। भोजन देती अत्यादरें ।।४९।। गोचरस्वामी संन्यासी । मठीं राहती नेमेंसी । तुकाराम अरण्यवासी । परमहंस म्हणती तयां ।।५०।। ऐसे तुकाराम संत । गणपति पदीं लागत । रात्रंदिन सेवा करित । देहासक्ति सांडोनी ।।५१।। जें देतील तें खावें । सांगतील तें ऐकावें । सदा सन्निध असावें । अनन्यरूप ।।५२।। गुरुसेवेचा महिमा । वर्णूं न शकेचि ब्रह्मा । आड येती अणिमा गरिमा । अष्ट महासिद्धी ।।५३।। कामना वासना कल्पना । लोभ मोह लोकेषणा । चंचल मन कामेषणा । वित्तेषणा आडवी ।।५४।। कुलअहंता ज्ञानअहंता । साधकां नाडिती क्षण न लागतां । इतुकियांसी मारोनि लाथा । गुरुपदीं रमतसे ।।५५।। सालंकार बालकासी । तस्कर देती खावयासी । भुलोनि जातां तयांसरसी । सर्वस्व हरतील ।।५६।। पारधी आमिषा दाखवित । फसतां पाशीं गोंवित।

सच्छिष्य गुरुपदांकित । आन नेणे ।।५७।। इंद्रराज्य आलें हातां । अथवा हरि होय प्रार्थिता ।तरी सद्गुरुवांचोनि तत्त्वतां । आवड नसे लोकत्रयीं ।।५८।। हीनाहून हीन व्हावें । तैं गुरुभक्ति दुणावे। मग चित्सुख भोगावें । सर्वकाळ ।।५९।। नीच सेवा गुरुगृहीं । निरहंकार करितां पाहीं । जगीं दुर्लभ नसे कांहीं । जगद्वंद्य ।।६०।। पूर्वपुण्याची असे ग्रंथी । तरीच घडे गुरुभक्ती । गुरुभक्तीची महती । वर्णिली न वचे ।।६१।। गुरुवचन तो वेदांत । गुरुसेवा हा धादांत । गुरुकृपा तोचि सिद्धांत। गुरुपुत्रासी ।।६२।। प्रस्तुत गुरुशिष्यांचें बंड । वाढलें बहुत पाखांड । ज्ञान नीति श्रद्धा जाड । एक उणें एक पुरें ।।६३।। संदेहरहित सद्गुरु । निरहंकारी शिष्यवरु । वेदप्रणीत साधनाचारु । त्रिवेणीसंगम अपूर्व हा ।।६४।। समुद्रामाजीं लवणोदक । धात्रीफळ[1] पर्वतीं देख । चतुरें करितां एक। गोडी होत अपूर्व ।।६५।। परि सद्गुरु भेटे विरळा । मिळतां शिष्य गोंवळा । मग सर्वही घोंटाळा। अनेक जन भांबावती ।।६६।। अर्धहळकुंडें पिवळे झाले । साधन सांडून गुरु बनले । मग आल्या संचितासी मुकले। महंतीमुळें ।।६७।। अज्ञानी जीव स्तुति करिती । साधकां त्वरें नाडिती । जोंवरी नसे आत्मप्रचीति । तोंवरी महंती न धरावी ।।६८।। महंतीनें सुख वाटे । वर्म काढितां दुःख मोठें । अंतरीं असमाधान कांटे । अहंतेचे टोंचती ।।६९ ।। ऐसी महंतांची दशा । पाहतां येतसे हंशा। प्रेमतंतूचा वळसा । तुटोनि गेला ।।७०।। याकारणें निःसंदेह स्थिति । जोंवरी न ये आत्मप्रचीति । तों न धरावी महंती । वाटमारू ।।७१।। सिद्धी महंती अहंता । साधकां नाडिती जातां येतां । अधोगतीस तत्त्वतां। नेऊनि घालिती ।।७२।। याकारणें अंतरी । सावध असावें चतुरीं । स्वयें चुकवावी फेरी । जन्ममृत्यूची ।।७३।।

१ आंवळा.

अज्ञजनीं स्तोत्र केलें । तेथें काय हातां आलें । तेचि निंदतील भले । सावध असावें ।।७४।। असो गणपति अति दक्ष । गुरुपदी सदा लक्ष । गुरुकृपेवांचून पक्ष । दुजा नाहीं ।।७५।। इति श्री सद्गुरुलीला। श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।७६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते चतुर्थाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति चतुर्थोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय पांचवा

## *समास पहिला*

**तपें तोषला सद्गुरु ज्ञानियांचा । वदे वाढवीं पंथ या राघवाचा ।।**
**कलीमाजिं मंदावली धर्मभक्ती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।५।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जयजय सद्गुरुपरंपरा । वंदन करूं जोडोनि करां । मुमुक्षुजनां आसरा । उपकार किती वानावे ।।१।। भूमिस्थित गुप्त ठेवा । वरी बैसोन नसे ठावा । आयता काढोनि हातीं द्यावा । ऐसें केलें ।।२।। अज्ञान भरलें शीत । अंग थरथरां कांपत । कटकटा वाजती दंत । मायामोहें ।।३।। ज्ञानाग्निस्फुलिंग चेतविलें । प्रगट करोनि दाविलें । शीत वारोनि सुखी केलें । बहुतांसी ।।४।। पूर्वप्राप्त निधान । जवळी असोनि चुकलें जाण । आड पडिलें झांकण । सगुणत्वाचें ।।५।। सगुणींच दाविलें निर्गुण । भ्रमाचें फेकोनि झांकण । साक्षात्कारें समाधान । दिधलें तुम्हीं ।।६।। दया उपजोनि पोटीं । ईश्वरें मानवहितासाठीं । दिधली जी निधानपेटी । तुमचे हातीं ।।७।। जतन करोनि ठेविली । प्राणापरिस सांभाळिली । बहुतांचे उपयोगा आली । भवदारिद्र्य हरावया ।।८।। जें शिवें आदरिलें । जहर विष शमविलें । नित्य समाधान लाभलें । चिंतनें जयाच्या ।।९।। कितीएक जीवन्मुक्त झाले । देहीं असोनि विदेही बनले । कोणी राम होवोनी गेले । सायुज्यासी ।।१०।। भक्तपणें विभक्त कोणी । राहिले सुखें सुखावोनि । कोणी नामरूप विसरोनि । चैतन्यचि जाहले ।।११।। कित्येक ते विरक्त । जगीं वर्तती पिशाचवत् । कदापि न लागों देती अंत । कोणासही ।।१२।। कोणी झाले ब्रह्मवेत्ते । देव वंदिती जयांतें । अभिमानरहित क्रोधापरते । दयाशांतीचे पुतळे

।।१३।। कोणी झाले सत्ताधारी । दुर्जन पळविले दुरी । सज्जनांचे साह्यकारी । होवोनि गेले ।।१४।। कोणी रामभक्तीची गुढी । उभारिली दोहीं थडी । इहपर स्वानंदगोडी । चाखिली सहज ।।१५।। कोणी लिहिलें अध्यात्म। गुह्यातीत गुह्य परम । तरोनि गेले बहु दुर्गम । भवसिंधु श्रवणमननें ।।१६।। कोणी ब्रह्मानंदीं निमग्न झालें । ब्रह्मचर्य आदरें पाळिलें । षडूर्मींचें हवन केलें । शांतिकुंडीं ।।१७।। ऐसे तरले कितीएक, । तरती, तरतील अनेक । जें चिंतनीय वासनाछेदक । परमसार ।।१८।। तेंचि दिधलें दीनाहातीं । जेणें घडे अनन्यभक्ती । तन्मयता चित्तशांती। प्राप्त होय ।।१९।। कैसें करणीचें लाघव। मावळविती समूळ माव । मीपणासी नुरे ठाव । द्वैतभाव हरोनी ।।२०।। जेथें वेद मंदावले । शास्त्रांचे विचार थकले । उपनिषदें घुसळोनि पाहिलें । तरी वेगळें दिसेना ।।२१।। ऐसा तो स्वानंदघन। सच्छिष्या दिधला जाण । पतित केले पावन । दयादृष्टी ।।२२।। तयासी करोनि वंदन । पंचमाध्यायाचें विवरण । जें असे अत्यंत गहन । तें बोलूं गुरुकृपें ।।२३।। चतुर्थाध्यायाचे अंतीं । गुरुसेवा केली जी ती। परिसतां वाढे गुरुभक्ती । भाविकांची ।।२४।। पंचमीं सहजानंद । गुरुशिष्या ऐक्यपद । जगदुद्धाराचा अनुवाद । पडेल श्रवणीं ।।२५।। असो चालली अखंड सेवा । सत्संगतीचा सेविती मेवा। विषयोर्मींचा सुटला गोवा । सहजसमाधि बाणली ।।२६।। पाहुनियां साधनस्थिति । सद्गुरु संतुष्ट होती । मग जीवींचें गुह्य कथिती । ज्ञानदृष्टि देवोनि ।।२७।। मस्तकींची ऊ कोढोनि । हातीं दिधली तयांनीं। श्रीरामा वसिष्ठांनीं । दिधलें तेंचि तुज देतों।।२८।। पुनरपि आणिक एक । काढोनि हातीं देती देख। सांदीपनें यदुनायक । बोधिले तेंचि घेईं बा ।।२९।। विकल्प विचार न करितां । गुरुप्रसाद वंदिला माथां। संतुष्ट झाला गुरु दाता । अनन्यभाव पाहोनी ।।३०।। विवेकयुक्त वैराग्य । साधन साधी अव्यंग। ऐसा सच्छिष्य सभाग्य । मिळतां गुरु संतोषे ।।३१।। जो आळसा न देई अंग ।

गुरुवचनीं श्रद्धा चांग । गुरुकृपा व्हावया मग । उशीर नाहीं ।।३२।। गुरुवचनीं विकल्प धरी । तो शिष्य नव्हे, आपुला वैरी। क्षीर टाकूनि करी । मदिरापान जैसा ।।३३।। गुरूचें जाणे अंतर । ऐसा दुर्लभ नर। जो पावे पैलपार। ऐसा विरळा ।।३४।। बहुतेकीं गुरु केले । म्हणती गुरुमुख पाहिजे झालें। ऐसें वेदशास्त्र बोलिलें । ठायीं ठायीं ।।३५।। जन्मा आलियाचें सार्थक । एकदां करावें गुरुमुख। लौकिक व्यवहार मानिती देख । तेही गुरुभक्त म्हणविती ।।३६।। कोणी म्हणती गुरु करावा । म्हणजे प्रपंच चाले बरवा । संकटकालीं आठवावा । म्हणजे बरें ।।३७।। कित्येकीं गुरु केला । अनन्य शरण नाहीं गेला । सेवा करितां लाजला । तोही शिष्य म्हणवीतसे ।।३८।। कित्येक गुरूसी वंचिती । प्रसंगें सेवा न करिती । प्राणासवें रक्षिती । आपुलें धन ।।३९।। कोणी म्हणती हा गोसावी । कारणिक संगति करावी। नाहीं तरी कुळाची थोरवी । जाईल आमुची ।।४०।। कोणी म्हणती हा भाग्यवंत । याचे संगें राहतां नित्य । मिष्टान्नें सेवितां तृप्त । होऊं आम्ही ।।४१।। कित्येक म्हणवाया संत । गुरु करिती त्वरित। झालों आतां पुनीत । पूर्ण ज्ञानी ।।४२।। गुरुभक्तीचे नांवाखालीं । कित्येकीं दुष्कर्में झाकिलीं। अद्वैताची बोलती बोली । म्हणती आम्ही परमहंस ।।४३।। स्वानुमतें मुक्त झाले । आणि संदेहचक्रीं भ्रमले । भ्रष्टाकारें कुडे झाले । कितीएक ।।४४।। निर्हेतुक गुरुभक्ति । निर्विकल्प ज्यांची वृत्ति। आवडी सतीसी पती । जेवीं तैसी ।।४५।। सर्वस्व अर्पिलें गुरूसी । तोचि अधिकारी मोक्षासी। लाजवी महासिद्धीसी । सिद्धपुरुष ।।४६।। गुरूचें करितां गुणश्रवण। सर्वेंद्रियांचे करी कान। जैसा चातक घे झेलोन । मेघोदक ।।४७।। काळवेळ जाणवेना । श्रवणीं आवडी लागली मना । अखंड चालवी भजना। गुरुगुणासी ।।४८।। तैसे गुण वर्णितां । न पुरे शब्दव्युत्पन्नता । वाक्इंद्रिय श्रमतां । नेत्रेंद्रिय पाझरे ।।४९।। गुरूचें घेतां नाम। अंतरीं पावे विश्राम । म्हणे धन्य कुळ धन्य जन्म । ऐसें पद

पावलों ।।५०।। देहाचें करोनि पोतेरें । सारवी स्वामीचीं मंदिरें । इंद्रियें उपकरणीं सुंदरें। पीक धरी हस्तकीं ।।५१।। गुरुसेवेवांचूनि नसे काज । न धरी लोकलाज । अधिक सेवा मागें व्याज । सद्गुरुपासीं ।।५२।। गुरु जेथोनि चालले । तया धुळीसही वंदिलें । धन्य इचें भाग्य उदेलें । चरण वाहिले मस्तकीं ।।५३।। सकलां गुरुरूप पाहे । आणि नम्र होत आहे । जैसा धनलोभी चिंतित राहे। धनागार ।।५४।। गुरुसेवेसी तत्पर । आळस ओळखी सांडिली दूर । क्षुत्पिपासेचा विसर । चरणीं देह अर्पिला ।।५५।। जैसा रवि अहोरात्र । निरालस्य चालवी सूत्र । न मागे अन्नवस्त्र । अथवा स्तुतीही वांछीना ।।५६।। तैसा सतत सेवा करी । न म्हणे उणी पुरी । तनु झिजवी चंदनापरी । अहंता नसे अंतरीं ।।५७।। सेवेची तन्मयता ऐसी । जें जें लागेल गुरूसी । आधींच समजे सच्छिष्यासी। तैसी सामग्री करितसे ।।५८।। गुरूसी तृषा लागेल पुढें । पूर्वीच जाणे शिष्य रोकडें । पात्र भरोनि करी पुढें। ऐसीं एकाग्रलक्षणें ।।५९।। गुरुहूनि निजसखा । दुजा न देखे जो कां । गुरुभक्त एकमेकां । भेटतां द्वैत न वाटे ।।६०।। माय एक गुरुमाय । पिता गुरुचि होय । गणगोत गुरुराय । सोय जाणते हिताची ।।६१।। चित्त चिंतनीं झिजे । देहासक्ति सेवें बुझे । वंदनें अहंकार लाजे । गुरुपुत्रासन्निध जावया ।।६२।। अर्चनें घडे विषयत्याग। आज्ञा प्रमाण लय अभंग । ऐसिया भक्तीनें आत्मयोग । सहजासहजीं घडतसे ।।६३।। करितां सप्रेम गुरुभक्ति । सहजीं प्रकाशे ज्योति । गुरुभक्त ते जाणती । इतर करिती कुतर्क ।।६४।। मातीचा केला द्रोण । निर्विकल्प सेविला गहन । न शिकवितां झालें ज्ञान । भिल्लासी[१] पहा प्रत्यक्ष ।।६५।। सेवा चालली अढळ । संतोषले दीनदयाळ । कृपामृताचा खळाळ । लोटला पूर ।।६६।। शिष्य वैराग्यें उदास । आणि गुरुवचनीं विश्वास। अनन्य शरण आलियास । सद्गुरुकृपा

१ एकलव्याला.

वोळतसे ।।६७।। गणपति कृपापात्र जाहला । परि पाहिजे परीक्षिला । कसवटी पूर्ण उतरला । तरीच श्लाघ्य ।।६८।। म्हणोनि एके दिनीं । बैसले सहज सिद्धासनीं । बोलती शिष्यालागोनि । पानें तोडीं वडाचीं ।।६९।। गुरुआज्ञा मानोनि शिरीं । शिष्य चढे वृक्षावरी । पर्णें तोडोनिया करीं । भूमीवरी टाकितसे ।।७०।। ऐसा चालिला क्रम । चीक वाहे तळीं परम । तंव बोलती तुकाराम । वृक्षा दुःख देऊं नको ।।७१।। अरे हें रुधिर स्रवतें । तरी पर्णें लावीं जेथींचीं तेथें । ऐकोनियां वचनातें । पर्णें सर्व जमविलीं ।।७२।। जेथून तोडिलें पान । तेथें लावी नेवोन। तत्काळ जाय मिळोन । पूर्वीं होतें तैसेंचि ।।७३।। न धरी मनीं विकल्प । न करी 'हो, ना' जल्प । वचन प्रमाण हा संकल्प । बाणोनि गेला ।।७४।। वृक्ष पूर्ववत् झाला । सद्गुरु मनीं संतोषला । म्हणे शिष्य भला भला । चैतन्याचा अधिकारी ।।७५।। ऐसी कठिण आज्ञा करिती । कैं दुरुत्तरेंही बोलती । कैं धन्य धन्य म्हणोनि गाती। विषाद अहंकार उठेना ।।७६।। एकदां मोळी ऊंसाची । दोघां चौघां न हालेचि । मस्तकीं देवोनि त्वरेंचि । चालविती निजपंथें ।।७७।। धांवती योजन-योजनपर्यंत । मागुतीं शिष्य धांवत । मग ऊंस समस्त । फेंकून देती चहूं दिशां ।।७८।। परि निष्कारण देती त्रास । ऐसा न ये किंतु जयास । सेवा घेती हेंचि विशेष । म्हणोनि हर्ष मानी ।।७९।। गुरुसेवा सतत घडो । चित्त सेवेमाजीं जडो । आळस गिरिकंदरीं दडो । ऐसें भावी ।।८०।। कैं अंधारीं फिरविती । सर्पविंचूसी धरविती । अंतःस्थिति पाहती । नाना प्रकारें ।।८१।। ऐसाचि एक प्रसंग । पुढें वर्णूं यथासांग । श्रवण करितां अव्यंग । गुरुसेवा कळों ये ।।८२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते पंचमाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## समास दुसरा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। एकदां ओहोळ तटाकांत । बैसले तुकाराम संत । सन्निध उभा रावजीसुत । करद्वय जोडोनिया ।।१।। तंव तेथें लहान बालकें । क्रीडा करिती कौतुकें । तुकाराम वदती इतुकें । खड्डा एक काढीं बा ।।२।। परिसोनियां वचनाप्रति । खड्डा काढिला शीघ्रगति। तुकाईनें बालकें हातीं । धरूनि आणिलीं त्या ठायीं ।।३।। तीन्ही पोरें खड्ड्यांत । घालोनि वरि वाळू दडपित । लीलानाटकी हे संत । काय करिती न कळेचि ।।४।। जयांची कर्तुमकर्तुम् शक्ति। ते अन्यथाही करूं शकती । शिष्या वरी बैसविती । सिद्धासन घालोनि ।।५।। म्हणती कोणासवें न बोलावें । आणि आसनही न त्यागावें । ऐसें सांगोन सहजभावें । दूर जावोन बैसले ।।६।। सजीव बालकें गोमटीं । पुरविलीं धरणीचे पोटीं । तरी विकल्पकुतर्कगोष्टी । नाठवे सच्छिष्यासी ।।७।। सद्गुरु त्रिभुवननायक । दयासागर भरले एक । मनीं ठसलें ज्या निःशंक । तया विकल्प नाठवे ।।८।। देह चरणी अर्पिला । तेचि वेळीं अभिमान सांडिला । सुखदुःख नाठवे चित्ताला । देहजनित विकार ।।९।। असो तेथें त्या वेळीं । घरची मंडळी शोधूं आलीं । म्हणती पोरें कोठें गेलीं । खेळत होतीं आतांचि ।।१०।। शोधशोधूनि थकले । गणपतीसी पुसूं लागले । कोठें चुकलीं आमुचीं मुलें । तुम्ही देखिलीं कीं नाहीं ।।११।। तो न बोलेचि कांहीं । गुरुआज्ञा मानूनि हृदयीं । तंव पाहिली तुकाई । धांवून चरण वंदिले ।।१२।। मग तुकाईस विनवीत । बालकें चुकलीं निभ्रांत । तेणें उद्विग्न झालें चित्त। कांहीं समाचार सांगावा ।।१३।। ते वदती तेथे बैसला बुवा । त्यासी समाचार पुसावा । न बोले तरी झोडावा। निष्ठुरपणें ।।१४।। मज वाटतें खचित । यानें केला बाळघात । याची करणी अघटित । कोणासही न कळे ।।१५।। ऐकतांचि ऐसें वचन । धांवले ते क्रोधायमान । दांभिका धरिलेंसि मौन ।

बाळघातक्या निष्ठुरा ।।१६।। तरी तो कांहींच न बोले । तेणें ते अधिक संतापले । लाथा बुक्क्या दंड मारिले । कितीयेक ।।१७।। मारोनियां थकले बहुत । परि प्रत्युत्तर न मिळत । बोलती तुकाराम संत । यासी दूर ढकलावें ।।१८।। करणी करितो निशाचरी । पोरें पुरोनि बैसला वरी । वाळू काढावी सत्वरी। म्हणजे प्रत्यक्ष कळेल ।।१९।। वाळू काढिली सत्वरेंसी । पाहाते झाले बाळकांसी । शोक करिती अतिशयेंसी । पुन्हा मारूं धांवले ।।२०।। मारिती झोडिती पाडिती । नाना दुरुत्तरे बोलती । सद्गुरु दुरोनि पाहती । अंतरीं आनंद उमाळे ।।२१।। धन्य शिष्यशिरोमणि । सत्त्वाची ही केवळ खाणी । देहभाव सांडोनि । चैतन्यरूपीं निमाला ।।२२।। समस्त जनां निवारिलें । तुमचे बालकां काय झालें। अमृतदृष्टीनें पाहिलें । तंव उठोन बैसलीं ।।२३।। शय्येवरोनि निजोन उठती । तैसीं उठलीं शीघ्रगती। पाहोनि विस्मय चित्तीं । न समाये जनांच्या ।।२४।। तंव तुकाराम सद्गुरुमाउली। शिष्यासमीप धांवली। कवटाळी हृदयकमळीं । मस्तकीं ठेवी वरदहस्त ।।२५।। सद्गुरुकृपामृत स्रवलें। ज्ञानाज्ञान विरालें । अमृतमय होऊन राहिलें । अंतर्बाह्य ।।२६।। आधीं इंद्रियें अंतर्मुख झालीं। स्थूललिंगाची वृत्ति उडाली । त्रिगुणेंसीं आटली । भूतांसहित ।।२७।। महाकारण तुर्या अवस्था । शब्दब्रह्मीं रिघाली तत्त्वतां। अहंब्रह्माची स्फुरणता । सोऽहंसह मावळली ।।२८।। उरला आदिचिदानंद। मावळलें मायाभासद्वंद्व। जें नोहेचि प्रतिपाद्य । वेदश्रुतींसी ।।२९।। चौदेहातीत झाला । मरणा मारोनि उरला । आदिमध्यान्त संचला । एक आत्मा ।।३०।। महामाया गुणमाया । मूळमाया जाय विलया । असोनि नुरली काया । ब्रह्मचैतन्यता बाणली ।।३१।। अलंकार अनेक भासले । सुवर्णत्वें एकचि झाले । तैसें जग अनंत नटलें । विमलज्ञानें ब्रह्म एक ।।३२।। लेखना वाचना अवकाश । तेथें नलगे निमिष । द्वैतभावना निःशेष । उडोनि होय तादात्म्य ।।३३।। ऐशिया आनंदसागरांत । सद्गुरु सच्छिष्य

नांदत। तेथील एक बिंदु प्राप्त । अनंत सुकृतें होईल ।।३४।। गुरुशिष्याची भावना । समूळ उडाली कामना । स्वस्वरूपीं लीन जाणा । एकरूप जाहलें ।।३५।। जैसें काष्ठ अग्नीप्रति । भेटतां होतसे अग्निमूर्ति । तैसा शिष्य गुरूप्रति । भेटतां झाला गुरुरूप ।।३६।। सरिता सागरा मिळाली । सागररूपें पैसावली । अथवा लवण-उदक भेट झाली । संचलें एकरूप ।।३७।। तैसें द्वैताद्वैतातीत ब्रह्म । चैतन्य प्रकाशलें परम । यास्तव ब्रह्मचैतन्य हें नाम । तुकाईनें संबोधिलें ।।३८।। ऐसी झाली स्थिति । शब्दीं न वर्णवे निगुती । निःशब्दीं शब्दव्युत्पत्ति । चालेल कैसी ।।३९।। स्तवनाची आर्त उपजली मोठी । परि मंद बुद्धि मराठी । न सुचे तेव्हां दिठी । सद्गुरुपदीं ठेविली ।।४०।। ब्रह्मचैतन्य गुरुमाय । जी दीन अनाथांची सोय । जैसी वत्सालागीं गाय । तैसी आम्हां पान्हवली ।।४१।। उभयतां आनंदें भेटती । जन समस्त पाहती । म्हणती साधूची कृति । ब्रह्मादिकां नेणवे ।।४२।। व्यर्थ साधूसी छळिलें । धाय मोकलोन रडूं लागलें । तुकाईनें समाधान केलें । सकळिकांचें ।।४३।। तुकाराम ब्रह्मचैतन्य । उभयतां झाले अनन्य । संवाद झाला गहन । स्थिरचित्तें परिसावा ।।४४।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते पंचमाध्यायांतर्गतः । द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास तिसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। श्रीगुरु वदती शिष्यासी । धन्य धन्य तेजोराशी । सांग सेवा झाली तुजसी । आज्ञापितों तें ऐकावें ।।१।। कलि जाहला उन्मत्त । अधर्म माजला समस्त । न सुचे हिताहित । जीवमात्रांसीं ।।२।। खऱ्याचें खोटें भासतें । खोटे सत्यत्वें उठतें । कल्पनातरंग नाना

मतें । भूमंडळीं पैसावलीं ।।३।। कर्माधिकारी ब्राह्मण । कर्महीन झाले दीन । विपरीत संगती गहन । बुद्धि विपरीत जाहली ।।४।। आचारभ्रष्ट स्थानभ्रष्ट । अधिकारभ्रष्ट बुद्धिभ्रष्ट । देहसुखाची हांव नष्ट । लागली मागें ।।५।। जितुकी देहाची हांव धरिली । तितुकी क्षीणता आली । शतकाची पन्नाशी झाली। वयसीमा ।।६।। देहधर्त्यासि ओळखितां । देहाची कायसी चिंता । शीर सलामत असतां । पगड्या बहुत जमतील ।।७।। एवं देहसुखावांचून कांहीं । सर्वथा कार्य उरलें नाहीं । नाशिवंत सुखें समाधान कांहीं । चित्ताचें होईना ।।८।। जैसी रोहिणीमाव[१] । तैसी धरिली हांव । घटोत्कच-दुकानींचा भाव । पाहून हर्ष वाटतो ।।९।। देहसुखासी भुलले । शाश्वत टाकोनि धांवले । नाशिवंतानेंही पोळले । मग धांवाधांव आरंभिली ।।१०।। न पाहती कुलगोत । आचार विचार वेदप्रणीत । वेदांसीच मूर्ख म्हणत । जुनें टाकून नवें घ्यावें ।।११।। धर्माधर्म निति न्याय । उपाय करितां अपाय । देह हेंचि मानूनि ध्येय। आत्मज्ञान विसरले ।।१२।। तेणे अत्यंत दीन झाले । स्वसत्तेतें मुकले । वंचनेअधीन झाले । धर्म सांडिला अनेकीं ।।१३।। सुख राहिलें एकीकडे । धुंडाळिती भलतीकडे । मृग जैसा वावडे । कस्तुरीकारणें ।।१४।। सर्व सुखाचें आगर । सोडोनि धांवती दूरदूर । तेणें उपाय तो अपाय थोर । होऊं लागला ।।१५।। आत्मानुसंधानावांचोनि । नैष्कर्म्य बोधी शब्दज्ञानी । आचार्य समर्थांची करणी। ध्यानीं न ये ।।१६।। कालचक्राचें कौतुक । भजन वाटे निरर्थक । तेणें व्याकुळ होती लोक । दिवसेंदिवस ।।१७।। अहो या भजनानें काय होतें । ऐसें पुसती जाणते । परि चित्तशुद्धीसी भजनापरतें। साधन नाहीं ।।१८।। शब्दज्ञानें वेडावले। अनुभवाविण कुडे झाले । प्रवृत्तिज्ञान म्हणती भलें ।

**१ मृगजळाची माया.**

विषयसुख वांछिती ।।१९।। नरदेहाचा मुख्य धर्म। आत्मोन्नतीचें जाणावे वर्म । तदनुरोधें क्रियाकर्म । करीत असावें ।।२०।। ती दृष्टी विसरली । देहबुद्धि दृढ झाली । तेणें अधर्मीं प्रवर्तली । दृष्टी सर्व ।।२१।। वेद शास्त्रें पुराणें । उपनिषदें संतवचनें । उपहासिती, आणि शहाणे । म्हणती आम्ही ।।२२।। पुराणांतरींच्या कथा । असत्य काल्पनिक सर्वथा । वाटों लागल्या चित्ता । कलिधर्में ।।२३।। ऐसा हा फिरला काळ । तेणें संतांचा पडला दुष्काळ। नास्तिकां झाला सुकाळ । अवनीवरी ।।२४।। तयांमाजीं जे भाविक । त्यांसी नसे मार्गदर्शक । तेणें सत्यासत्यविवेक । न सुचे अल्पही ।।२५।। तयां तुवां बोधावें । नास्तिकां सुपंथा लावावें । रामनाम वाढवावें । भूमंडळीं ।।२६।। कामिकांचे पुरवोनि काम। त्यांसी लावावें भजनीं प्रेम । कालानुरूप साधन सुगम । उरलें नाहीं आणिक ।।२७।। आतां जगदुद्धाराकारणें । तुवां जनीं कार्य करणें । हे गुरुआज्ञा मानणें । वाढवीं भक्ति ।।२८।। आज्ञा वंदिली मस्तकीं । मूर्ति ठेविली हृदयमंचकीं । गुरुशिष्यां झाली एकी । विरला द्वैतभाव ।।२९।। वंदोनि श्रीगुरूचीं पाउलें । ब्रह्मचैतन्य सद्गुरु निघाले । प्रथम नैमिष्यारण्यीं गेले । एकांतवास कराया ।।३०।। वेदवर्म हातीं आलें । अज्ञेय कांहीं न उरलें । योगाभ्यासें दंडण केलें । सगुणदेहाचें ।।३१।। देह अत्यंत हलका झाला । आणि तेजें ओथंबला । वाटे दुजा कपि आला । उड्डाण करी वृक्षाग्रीं ।।३२।। गुरुसेवा झाली नवमास । पुढें गेले कांहीं दिवस । तोंवरी नऊ संवत्सरांस । गृहत्यागासी जाहले ।।३३।। गीता रावजी वृद्ध झाले । शोधशोधूनि थकले । साधुबैरागी जे भेटले । पुसती त्यांसी पुत्रवार्ता ।।३४।। चातक करी मेघआशा । तैसी झाली त्यांची दशा। करुणा भाकिती जगदीशा । पुत्र भेटवीं आम्हांतें ।।३५।। स्नेही सोबती विसरोन जाती । परि मायबाप सर्वदा चिंतिती । भार्या पतिव्रता सती । तीहि

सदा ध्यातसे ।।३६।। ऐसी असतां इकडील स्थिति । तिकडे सद्‌गुरु मनीं ध्याती । आतां जावें गृहाप्रति । मायदर्शनाकराणें ।।३७।। गुरुप्राप्तीकारणें । जन्मदात्यां दुःख देणें । घडलें या मायागुणें । निरुपाय तेथ ।।३८।। गृहीं जाण्याचा धरिला हेत । श्रीगुरु बैरागीवेष घेत । जटा वळल्या समस्त । अंगीं विभूती चर्चिली ।।३९।। कटीं बांधला कसोटा । हातीं घेतीं चिलीम चिमटा । बैरागी शोभला गोमटा। तेजःपुंज ।।४०।। तीर्थें क्षेत्रें करीत । स्वामी निघाले गृहाप्रत । मार्गीं घेतले सांगात । बैरागी चार ।।४१।। पाहतां गुरूंचे मुखाकडे । तत्काळ लीनता जोडे । दिसती हे साधु गाढे । पोटभरू नव्हेती ।।४२।। मार्गीं अनंत शरण येती । शिधा सामग्री अर्पिती । मुक्काम करित गुरुमूर्ति । गोंदावलीस पावली ।।४३।। कोणा न देती ओळख । दुरून पाहती कौतुक । टकमका पाहती लोक। बैराग्यासी ।।४४।। मारुतीचे मंदिरांत । ठाण मांडिती गुरुनाथ । समीप अगटी धगधगीत । केली असे ।।४५।। दुरोनि देखती मायचरण । आणि पाहती पितृवदन । मनींच करोनि वंदन । देवालयीं बैसले ।।४६।। दर्शन घेतां प्रेम उठे । परि ओळख कोणा न पटे । सद्‌गुरु जाणती गोमटे । समस्तांसी ।।४७।। असो जेव्हां झाली निशा । ग्रामीं होता तमाशा । जो प्रत्यक्ष यमफांसा । पडला सर्वांवरी ।।४८।। जमले सकळ गांववेडे । खदखदां वासती दंताडें । श्वान जैसा चघळी हांडें । गोडी ना रस ।।४९।। दाजी पाटील गांवकर । आणि आण्णा बारसवडेकर । उभयतां देखोनि गुरुवर । म्हणती कोठील बैरागी ।।५०।। हिरवा तमाखू मिळेल । म्हणोनि गेले ते जवळ । गोष्टी करिती प्रांजळ । कोण कोठील म्हणोनि ।।५१।। बोलतां उभयतां संबंध आला । गणूबुवा खचित गमला । खूण पाहती कान जो तुटला । बाळपणीं ।।५२।। परि ओळखी न देती । मनीं हर्ष मानिती । रजनी सरलिया प्रभातीं ।

म्हणती समस्तां कळवूं हें ।।५३।। त्यांनीं ऐसा बेत केला । श्रींनीं अंतर्ज्ञानें जाणला । उठोन पहांटसमयाला । गेले निघोनि श्वशुरग्रामीं ।।५४।। तेथेंही हनुमानमंदिरांत । बुवा जावोनि तळ देत । दर्शना अनेक जन येत । सिद्ध पुरुष जाणोनी ।।५५।। पाहूनिया तेज शांति । पूज्यभाव उपजे चित्तीं। संसारी अनेक प्रश्न करिती । कायाव्याधी पीडितसे ।।५६।। कोणा सांगती रामनाम । कोणा प्रदक्षिणेचा नियम । कोणा औषधी सुगम । सांगते झाले तेधवा ।।५७।। खातवळीं पसरली मात । मारुतीचे मंदिरांत । कोणी आले महंत । त्रिकालज्ञानी ।।५८।। श्रीगुरूंचे श्वशुरगृहीं । चिंता करिती प्रत्यहीं । कधीं येईल जांवई । परतोनि गृहातें ।।५९।। सासूसी कानगी कळली । कन्येसह दर्शना गेली। गर्दी जाईतों उभी ठेली । मग करी वंदन ।।६०।। स्वामी एक विनवणी । कन्येचा गेला घरधनी। कोठें गृह त्यागोनि । मागुता केव्हां येईल ।।६१।। रात्रंदिन वाटे चिंता । कन्या प्रौढ झाली आतां । पति केव्हां येईल मागुता । सांगा स्वामी ।।६२।। श्रीगुरु बोलती वचन । अखंड केलिया नामस्मरण। त्वरित येईल परतोन । चित्तीं चिंता न करावी ।।६३।। बोलोनि ऐसीं उत्तरें । निरिक्षिती ते अंतरें । आचारनीति शोधिती सारें । ओळख न देती आपुली ।।६४।। पाहिली गोंदावलीची स्थिति । तैसीच येथीलही पाहती । पुढें गेले डांबेवाडीप्रति। चुलत भगिनीसी भेटाया ।।६५।। दारीं जाऊनि ‘रघुवीर’। ऐसा केला उच्च गजर । ‘भीमाताई भिक्षा सत्वर। आणुनिया घालावी’।।६६।। ऐसा शब्द पडतां कानीं। भीमा दचकली मनीं । गोसावी कोण मजलागोनि । नामे हांका मारित ।।६७।। बाहेर येवोनि पहा। ओळखी कांहीं न लागत । परि आनंदलें चित्त। उगाच पाहे मुखाकडे ।।६८।। दिव्य रूप भव्य मूर्ति । मस्तकीं जटा शोभती । कौपीनधारी आणि विभूति । सर्वांगासी चर्चिलीसे ।।६९।। सद्गुरु वदती

‘भीमाताई । सासरीं तल्लीन झालीस बाई । ओळखी सांडिली सर्वही । माहेरघरची’ ।।७०।। इतुकें परिसतां सत्वरीं। गणू म्हणूनि हांक मारी । आनंदें नयनीं नीर धरी । गुण आठवी बाळपणींचे ।।७१।। ‘कासया झालासि निष्ठुर । सोडून गेलास घरदार । दुखविलें सर्वांचें अंतर । काय साधिलें सांग बा’ ।।७२।। येरु वदे ‘साधिलें नाहीं। ऐसी वस्तूच नसे कांहीं । असो, आज्ञा देई लवलाहीं । मज जाणें असे बहु दूर ।।७३।। कोणा सांगूं नये वार्ता । गणपति येथें आला होता । सत्वरीं येईन मागुता । सत्य सत्य जाणावे’ ।।७४।। ऐसें बोलोनि सत्वर । निघाला तो योगेश्वर । भगिनी हांक मारी करुणस्वर । ‘सत्वर येईं परतोनि’ ।।७५।। श्रीगुरु निघाले तेथून । तीर्थें क्षेत्रें करिती भ्रमण । सूक्ष्मपणें अवलोकून। जनस्थिति जाणती ।।७६।। बहुतेक असती कामासक्त । आश्रमधर्मासि विरक्त । धनें विंधिलें चित्त । सर्वत्रांचें सारिखें ।।७७।। वेद अतिथि साधुसंत । असत्य मानिती पौराणमत । हिंसाकर्मीं प्रवर्तत । वाग्जल्प वाढला ।।७८।। राजसत्ता विधर्मी झाली । धर्मश्रद्धा उडाली । समाधानापासोनि ढळली । जनता सर्व ।।७९।। नाना प्रापंचिक आपत्ती । अपार विघ्नें आदळती । बुद्धि आयुष्य शरीरसंपत्ती । विलया जात चालली ।।८०।। जितुक्या सुखसोयी केल्या । तितुक्या गरजा वाढल्या । देह पराधीन झाला । व्यसनीं अत्यंत नागवले ।।८१।। जगच्चालक आत्माराम । विसरतां वृथाचि श्रम । कोठें न मिळें आराम । त्रिखंडही शोधिल्यां ।।८२।। काम्यकर्में काहीं राहिलीं । नैष्कर्म्यभावना उडाली । पातकांची सीमा झाली । व्यभिचारकर्म वाढलें ।।८३।। सकळांसी भ्रष्टता आली । दैवी शक्ती अदृश्य झाली । तेणें श्रद्धा उडोनि गेली । देववेदसंतांवरची ।।८४।। नास्तिक बनोनि सकळ । अनुभवहीन वाग्जाळ । घरोघरीं ब्रह्मसुकाळ। वैखरीवरी राहिला ।।८५।। अनुभवाविण निर्गुण । श्रद्धेविना सगुण

भजन । करितां नव्हे समाधान । कोणा एकाचें ।।८६।। सगुणीं सायुज्यता घडे । तरीच निर्गुणज्ञान जोडे । श्रद्धा सगुणीं पवाडे । नवविधाभक्तिमार्गें ।।८७।। कुलशील चित्तशुद्धि । परंपरागत धर्मबुद्धि । लया जातां वेदविधि । यथासांग घडेना ।।८८।। दुर्धर कलि माजला । अधर्म बहु पैसावला । तरणोपाय न उरला । प्राणियांसी ।।८९।। यास्तव सुलभ रामभजनीं । लावावें श्रीगुरुवचनीं । ऐसें आणोनि ध्यानीं । विचरती महीवरी ।।९०।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।९१।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते पंचमाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति पंचमोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय सहावा

## *समास पहिला*

**विदेहापरी चालवोनी प्रपंचा । मुमुक्षूजनांलागिं अध्यात्मचर्चा ।।**
**करोनी बहू लोक जे मेळवीती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।६।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जय जय सद्गुरु स्वानंदा । भक्ति कमलमकरंदा । मुमुक्षुभृंग घेती स्वादा । नाठवे देहभाव ।।१।। तुझिये आनंदाची गोडी । चाखिती जे जे वऱ्हाडी । तितुके गेले देशोधडी । अहंता निःशेष सोडोनी ।।२।। कोणा न देती ओळख । वरिवरी दिसती स्वाभाविक । परि परिपूर्ण निजसुख । स्वानंदरस सेविला ।।३।। आकंठ अमर्याद भरले । तेणें ते उन्मत्त झाले । घरच्या घरीं बावरले । नवल वाटे ।।४।। मायेची ममता सांडिली । पितयाची आज्ञा मोडिली । आशा मावशी ती वधिली । देखतदेखतां ।।५।। कामक्रोध बंधूंवरी । जो कां सदा गुरगुरी । कल्पना ईषणा भगिनी सुंदरी । समोर येऊं देईना ।।६।। प्रारब्धठेवा लुटविला । घराचा देव्हारा केला । मरणा मारोन उरला । आनंदरस चाखित ।।७।। शब्दस्पर्शरूपरस- । गंधभूषणें वेशीस । बांधोनि राही उदास । सर्वकाळ आनंदी ।।८।। जगावेगळा बडबडे । जगीं असोनिया दडे । प्रपंच व्यवसाय नावडे । परि करणें सोडीना ।।९।। दया क्षमा शांती त्यापासीं । आत्मतत्त्वीं रमे अहर्निशीं । सांडोनि लोकलज्जेसी । आनंदमदें धुंद झाला ।।१०।। न मानी आपपर । विधिनिषेधादि आचार । बुडविलें सकळ घरदार । आनंदोर्मीमाझारीं ।।११।। आनंदें उन्मत्त झाला । न मानी कळिकाळाला । पुण्यपाप

तुडवूं लागला । सकळ उपाधी ।।१२।। ऐसा तूं आनंदघन । सेवितां तें सेवकपण । समूळ जाय विरोन। सेव्यसेवाआनंद ।।१३।। जया घडेल हा योग । तेणेंचि साधिला लाग । इतरें राखिली तगमग। नरदेहा येवोनि ।।१४।। सबल सुकृतांच्या राशी । सत्संग नम्रता जयासी । तोचि जाणे स्वानंदासी । ज्ञानाज्ञान गिळोनी ।।१५।। अथवा श्रद्धेचा ओलावा । धरोनि करितां गुरुसेवा । स्वानंदसोहळा भोगावा। नित्य सत्य निर्विकार ।।१६।। ऐसी सेवा साधोनि । सद्गुरु गेले नैमिषवनीं । एकांतवास साधोनि । पुनरपि गृहीं निघाले ।।१७।। मार्गीं बहुतां बोधिलें। अनुग्रहें सुखी केलें । रामभक्तीसी लाविले। अज्ञ विकल्पी भाविक ।।१८।। अनेक कामना पुरवोनि । जन लाविती रामभजनीं । जेवीं औषध न सेवी म्हणोनि । बाळा साखरखडा दाखविती ।।१९।। ऐसा करित जगदुद्धार । पावले गोंदावलें नगर । गृहीं जावोनि 'रघुवीर' । पुकारीतसे गोसावी ।।२०।। माय येवोनि जंव पाहे । तंव गोसावी उभा आहे । अंगी तेज न समाये । प्रेमजिव्हाळा उफाळे ।।२१।। मागें गणू येवोनि गेला । तोही गोसावीच झाला । वर्तमान ठाउकें असेल याला । म्हणोनि करी प्रश्नातें ।।२२।। 'अहो साधु महाज्ञानी । तुम्ही फिरतां रानींवनीं । कोठें दिसला कीं नयनीं । पुत्र आमुचा सांगावा ।।२३।। सदा रामनाम घेत । तुम्हांसारिखा वेष धरित । सद्गुरुकारणें फिरत । देशीं विदेशीं ।।२४।। सद्गुणी चातुर्याची खाण । वय सान वैराग्य पूर्ण । मध्यमसा गौरवर्ण। अंगठेव सुदृढ ।।२५।। आम्हां दुःखीं टाकोनि । गेला गृह सोडोनि । कोठें देखिला कीं नयनीं । कृपा करूनि सांगावें' ।।२६।। सद्गुरु बोलती मातेप्रति । 'माउली चिंता नसावी चित्तीं । उदयीक भेटेल निश्चितीं । तुमचा सुत तुम्हांसी' ।।२७।। ऐसें वदोन सत्वर । पावले हनुमंतमंदिर । दुरोनि पाहती चमत्कार । बाळपणाचा ।।२८।। नानापरी क्रीडा केली । सोबत्यांची मांदी मेळविली । आजीं सर्व पारखीं झालीं । जवळी असोनि

।।२९।। एक रात्र केली वसति । ओळखी कोणा न देती । दुजे दिनीं पाचारिती । चिंतूबुवासी ।।३०।। उपाध्याय चिंतूबुवा। संबोधिती घेऊन नांवा । बालपणाच्या गोष्टी तेव्हां । खुणेलागीं सांगितल्या ।।३१।। खूण पटतां हर्ष झाला । धांवला रावजीगृहाला । 'गीताई तुमचा सुत आला । मंदिरामाजीं' ।।३२।। शब्द पडतांचि श्रवणीं । गीता निघे झडकरोनि । गणपति तैं धांवोनि । चरण धरी जननीचे ।।३३।। उभयतां संतोष झाला । गणपति सर्वां भेटला। हरपला ठेवा गवसला । गोंदावलीसी ।।३४।। बालपणचे मित्र सारे । करिती नाना प्रश्नोत्तरें । निववितो सकलांचीं अंतरें । प्रवासकथा सांगोनि ।।३५।। कथिती अध्यात्मज्ञान । रामभक्ति सगुणभजन । सर्वांचें वेधिती मन । आपणाकडे ।।३६।। शरण येती तयांसी । निववूनि रामभक्तीसी । लाविती तत्क्षणेंसी । युक्तिप्रयुक्ति ।।३७।। प्रापंचिकां युक्तिवाद । मुमुक्षूंसी भक्तिबोध । नास्तिकांसी प्रेमसंवाद । करोनि भजनीं लाविती ।।३८।। मुखोमुखीं पसरली मात । गोंदावलीसी आले संत । साक्षात्कारें समाधान देत । प्राणिमात्रासीं ।।३९।। शर्करा पाहूनि मुंग्या धांवती । तैसें झालें गोंदवलीप्रति । बहुत ग्रामींचे जन येती । साधुदर्शनाकारणें ।।४०।। बद्ध मुमुक्षु साधक सिद्ध । करिती प्रेमसंवाद । समाधान पावोनि धरिती पद । सद्गुरूंचे ते काळीं ।।४१।। कोणी म्हणती सिद्धपुरुष । कोणी मानिती देवांश । पावले देव प्रत्यक्ष । गोंदावलेंग्रामासीं ।।४२।। सकलां दर्शनें आनंदवी । ऐसा पावला गोसावी । सर्वांगीं विभूति लावी । कौपीन परिधान करीतसे ।।४३।। जटा दाढी शोभा देती । पायीं खडावा गर्जती । गणेशटोपी कफनी घालिती । हातीं स्मरणी शोभतसे ।।४४।। मुद्रा रामनामांकित । कुबडी करीं वागवित। सदा आनंदे भजन करित । संगें भक्तजन घेवोनि ।।४५।। गृहीं वास न करिती । विठ्ठलमंदिरासमीप वसति । कट्टा करोनि बैसती । समुदायासमवेत ।।४६।। कीर्ति पसरली चहूंदेशीं। मत्सर वाटे स्वकीयांसी । न साहवे परोत्कर्षासी।

हा स्वभावधर्म ।।४७।। स्तोम माजविलें फार । सर्व यासी पुसती विचार । आमचा अपमान होतो फार । अधिकारी यासी वंदिती ।।४८।। तरी आतां ऐसें करावें । यासी मुंडण करवावें । गृहस्थाश्रमीं लावावें । म्हणजे महती जाईल ।।४९।। करोनि ऐसा विचार । म्हणती हा उतरावा केशभार । सद्गुरु वदती अनिवार । खर्च असे तयासी ।।५०।। होम हवन ब्राह्मणभोजन । सांगता असे गहन । येरू वदती तयांलागून । सर्व करूं यथासांग ।।५१।। त्यांचे मनींचा भाव जाणती । परि गुरुआज्ञा झाली होती । प्रपंच करोनि रामभक्ति । वाढवावी सतत ।।५२।। स्वार्थ तीर्थ साध्य होतें । म्हणोनि करविलें मुंडणातें। अन्नदान हवनातें । यथासांग करविलें ।।५३।। रावजी गीता आनंदले । म्हणती बाळ शुद्धीस आलें । आतां प्रपंच करील वहिलें । चिंता सर्व उडाली ।।५४।। कांता सरस्वती खातवळीं । चिंता वाहोन कृश झाली । तिजला सत्वर आणिली । कृपासागरें गुरुरायें ।।५५।। प्रपंच चालिला अव्यंग । सदा भजती श्रीरंग । दर्शना येतसे जग । पूर्वींहूनि अधिकचि ।।५६।। प्रपंच करोनि परमार्थ । कैसा साधावा स्वार्थ। दाविती राहोनि विरक्त । समस्तांसी ।।५७।। प्रातःकालीं देवतार्चन । अखंड करिती नामस्मरण । अध्यात्मचर्चा विवरण । श्रोतृसमुदाय निववितो ।।५८।। नाना शंका उपशंका । प्रत्ययें फेडिती देखा। ग्रंथार्थ बोधिती लोकां । विशद करोनि ।।५९।। दासबोध नाथभागवत । भगवद्गीता अध्यात्मग्रंथ। अभंगादि गाथा समस्त । तुलसीकृत रामायण ।।६०।। ग्रंथाग्रंथांची एकवाक्यता । विवरोनि दाविती समस्तां । श्रवण करितां श्रोता वक्ता । तादात्म्यता पावती ।।६१।। चालतां अध्यात्मनिरूपण । उपासना बोधिती सगुण । भक्ति प्रेम उचंबळोन । येतसे श्रोतयांसी ।।६२।। ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगती । आणि सगुणातें न भजती । तेणें इहपर नाडती । ऐसे वक्ते बहुतेक ।।६३।। शब्दज्ञानें भरीं भरिती । आणि उपासना सोडिती । तैसी नव्हे गुरुमूर्ति। बोधिती

सगुणभजन ।।६४।। स्वयें आचरोनि दाविलें । आणि जनां शिकविलें । तेणें समाधान पावले । कितीयेक ।।६५।। सायंकाळीं प्रेमळ भजन । करुणारस रूपध्यान । नानापरीनें स्तवन । रामरायाचें होतसे ।।६६।। बहुत संतांचीं वचनें । अभंगपदादि कवनें । जेणें साधका उपदेश बाणे । भजन अति रसाळ ।।६७।। अष्टकें श्लोक आरती । ऐसें भजन नित्य करिती । स्वयें करोनि करविती । जनांकरवीं ।।६८।। चालविती ऐसी उपासना । प्रपंचकार्यें करिती नाना । गोसावी झाला शहाणा । म्हणती सर्व ।।६९।। माय बोले गणपतीप्रति । 'एक इच्छा असे निगुती । वडिलार्जित वतनवृत्ती । अंगीकारावी तुवां ।।७०। पाळी असे आपुली आली । ती पाहिजे तुवां केली । मान्य करीं आमुची बोली । पुत्रधर्म जाणोनि' ।।७१।। श्रीगुरु वदती 'माय । रामसेवे अर्पिला देह । गरज नसे नोकरी गेह । आम्हां गोसावियासी ।।७२।। परि मातृआज्ञा म्हणोनि । होईन मी कुलकर्णी । कांहीं काल क्रमोनि । पुनरपि जाईन वनातें' ।।७३।। पुरविण्या वडिलांची हौस । हातीं घेतलें वतनास । नीतिन्यायमर्यादेस । सीमा नाहीं ।।७४।। भूतीं भाविती भगवंत । न करिती अन्याय घात । पंचतत्त्वविवरण जेथ । हिशेबाची काय कथा ।।७५।। कळिकाळा ज्याची सत्ता । तया गांवची कायसी वार्ता । आश्चर्य वाटे समस्तां । कोठें शिकला ज्ञान हें ।।७६।। रयत म्हणती भलें झालें । सुज्ञ कुलकर्णी लाभले । अधिकारी संतोषले । कामकाज देखुनी ।।७७।। मायबापां संतोष झाला । तीन मास काळ गेला । सद्गुरूंनीं बदली दिला । पुरे म्हणती व्याप हा ।।७८।। रामसेवा करावी। व्यक्ति भक्तीसी लावावी । याहोन अन्य पदवी । नको आम्हां ।।७९।। जाणें असे नैमिषारण्यीं । मग सद्गुरुभेटीलागोनि। तुम्ही रामनाम वदनीं । घेत असावें सर्वकाळ ।।८०।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते षष्ठाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास दुसरा*

श्रीसद्‌गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। ब्रह्मचैतन्य गुरुवर । म्हणती करूं देशांतर । भार्या सद्‌गुणी चतुर। समागमें येऊं म्हणे ।।१।। अखंड करी नामस्मरण । पतिवचनीं विश्वास पूर्ण । सदा ध्याई पतिचरण । पतिव्रता गुरुभार्या ।।२।। धन्य पतिव्रता माउली । जी ऐसें पद पावली । वरी सत्त्वगुणें शोभली । चंद्रकांति जैशी ।।३।। सद्‌गुरु सतेज दिनकर । सरस्वती प्रभा सुंदर । दर्शनें श्रमपरिहार । सांसारिकांचा होतसे ।।४।। पाळिलें मायबापबोला । प्रपंच सर्व नेटका केला । मग त्वरित निघाले देशाला । जगदुद्धार करावया ।।५।। शके सत्राशें शहाण्णवीं । बाहेर निघे गोसावी । सवें भार्या शुद्धभावी । गुरुदर्शना घेतली ।।६।। दोन प्रहर रजनीसी । निघाले भार्येसरसीं । शरण रिघाले तुकाईसी । उभयतां चरणीं लोळती ।।७।। पाहोनि शुद्धभाव परम । संतोषले तुकाराम। जोडी शोभे सीताराम । दुजी मर्त्यलोकीं ।।८।। तुकाराम वदती 'सती । काय इच्छा तुजप्रति । माग माग शीघ्रगति। पूर्ण होय निश्चयें' ।।९।। सती वदे 'पुत्ररत्न । व्हावें पतीसमान । हेंचि द्यावें वरदान । महाराजा समर्था ।।१०।। देहवृक्ष सफलित । होतां होईन पुनींत । वांझपणे वृथा जात । लोकनिंदाकारण' ।।११।। ऐकोनि ऐसें वचन । गुरुशिष्य करिती हास्यवदन । मायेनें मोहिलें म्हणोन । पुत्ररत्न इच्छिलें ।।१२।। तुकाराम 'तथास्तु' म्हणती । उभयतांसी निरोप देती । मग पावले नाशिकप्रांतीं । पंचवटीसमीप ।।१३।। सद्‌गुरु वदती भार्येसी । 'काय आठवली विवसी । मागितलें पुत्रवरासी । मोक्षदात्यासन्निध ।।१४।। कामधेनू गृहीं आली । क्षीर सेवून सोडिली । ऐसी तुवां करणी केली । मायामोहित होवोनि ।।१५।। अवचटें परिस गवसला । तो भिंतीमाजीं चिणिला । तेणें सुवर्णलाभा मुकला । अभागी जैसा ।।१६।। अथवा कल्पतरूतळीं बैसुनी । अभागी कल्पना करी मनीं । भूत झडपील मजलागोनि । या

निर्जन अरण्यांत ।।१७।। राजा बहु संतुष्ट झाला । म्हणे इच्छिलें देईन तुजला । अभागी वदे देईं मजला। जीर्ण वस्त्र एखादें ।।१८।। अत्तरें माखलीं पादत्राणीं । हिरा बैसविला अंगणीं । घरीं धान्य नसे गोणी । ऐसें आजि तुवां केलें ।।१९।। कण फेंकून भूस भरिलें । अथवा चंदनकाष्ठें पाणी तापविलें । तैसें आजि तुवां केलें । पुत्रस्नेहा भुलोनि ।।२०।। जो मोक्षश्रियेचा दाता । जन्ममरणातें चुकविता । चिदानंदासी भोगविता । कृपासागर सद्‌गुरु ।।२१।। तो झालिया प्रसन्न । इच्छिसी पुत्रसंतान । न वांछिसि भक्ति अनन्य । रामसेवा घडावी ।।२२।। चौऱ्यांशी लक्ष योनी फिरतां । किती पुत्रांची झालीस माता । जन्ममरणीं सोडविता । एकही कोठें दिसेना ।।२३।। नरदेह दो दिवसांची वसति । कोण कोणाचा सांगाती । कन्या पुत्र आणि पति । देहसंबंधी सकळही ।।२४।। तो देह नाशिवंत । तत्संबंधीही अशाश्वत । ज्याचें त्यानें करावें हित । सद्‌गुरुकृपें ।।२५।। पुन्नाम नरकापासोनि । म्हणती पुत्र तारील झणीं । परि नरकीं जावेंचि कोणी । वासनाक्षय झालिया ।।२६।। वासना निमालिया पाठीं। स्वर्गनरकाची आटाआटी । पापपुण्य उठाउठी । लया जाय मिथ्यत्वें ।।२७।। उद्धरील बेचाळीस कुळांतें । ऐसें बोलती जाणते । उद्धरणें तें स्वर्गापरतें । आन नाहीं ।।२८।। स्वर्ग क्षीणतेतें पावे । त्यासि हित कैसें म्हणावें । तोडिले संसृतीचे गोवे । तरीच हित साधिलें ।।२९।। जन्मा आलियाचें सार्थक । कांहीं करावा विवेक । जेणें फिटेल हें दुःख । संसृतिजन्य ।।३०।। असो गुरुकृपें होईल सुत। परि अल्पायुषी अशाश्वत । तेणें तुज काय प्राप्त। होईल सांग निश्चयें ।।३१।। प्रकृतीपासोनि सुख। इच्छिती ते परम मूर्ख । दुःखमूळ हा निःशंक । मायाजनित पसारा' ।।३२।। माय सरस्वती खोंचली। म्हणे 'मज भुली पडली । आतां जेणें होय सार्थकता भली । ती सोय सांगावी ।।३३।। सुख एक रामचरणीं । सुखदाता तोचि धनी । इतर ते निर्वाणीं । दूर होती पारिखे ।।३४।। तुम्ही साधु

महाज्ञानी । मज ठाव द्यावा चरणीं । लीन दीन उत्सुक म्हणोनि । उपेक्षा करूं नये ।।३५।। जेणें मायामोह सुटेल। अनन्यभक्ती पाविजेल । मन रामीं रत होईल । ऐसें करावें ।।३६।। आपण या देहाचे धनी । देह सार्थकीं लावावा झणीं । वरी करितें विनवणी । कृपाळुवा दीनानाथा' ।।३७।। परिसोनि कांतेचें वचन । संतोषले दयाघन। योगदीक्षा तिजलागोन । दिधली तेव्हां गुरुरायें ।।३८।। वटदुग्धें जटा वळिल्या । कांचबांगड्या काढिल्या । तुळसीमाळा करीं बांधिल्या । कंठी सूत्र तुळशीचें ।।३९।। श्वेत वस्त्र परिधान । भू शय्या व्योम प्रावरण । अखंड करविती नामस्मरण । योग मुद्रा सांगितल्या ।।४०।। प्राणायाम करविती । समाधिही लाविती । उपदेशवचनें बोधिती । नित्यकाळीं ।।४१।। नदीतटाक गुहावास । वाटे रामाचा वनवास । सीमा नसे आनंदास । तया स्थानीं ।।४२।। वाटे ऋषीचा आश्रम। उपासना चालिली दुर्गम । नित्य ध्याती आत्माराम । सद्गुरु आणि माउली ।।४३।। कमलसुमन शोधीत भुंगे । धांवती जैसे मनोवेगें । मुमुक्षुजन तैसा रिघे । बोधामृत सेवाया ।।४४।। अयाचित भिक्षा घेती । कित्येक उपोषणें घडती । तेंही समाधान मानिती । नामामृत सेवूनि ।।४५।। ऐसा काळ गेला कांहीं । माउली झाली विदेही । न गुंते मायामोहीं । ऐसें जाणिलें गुरुदेवें ।।४६।। रामनामीं तल्लीन झाली । निःसंदेह वृत्ति बनली । सद्गुरु निघाले ते काळीं । सोडूनिया कांतेसी ।।४७।। नाना तीर्थें नाना देश । वनोपवन भाषाविशेष । उत्तर दक्षिण भागास । फिरत फिरत चालिले ।।४८।। इकडे सरस्वतीमाउली । म्हणे स्वारी कोठें गेली । गृहीं जाण्याची आज्ञा झाली । असे पूर्वीं मजलागीं ।।४९।। नाशिकग्रामीं गुरुभक्त । कृष्णभट त्रिंबकसुत। तेथें जावोनि वदत । 'मज गृहीं पोंचवावें' ।।५०।। गुरुपत्नी गृहा आली । तिसी देखतांचि नमस्कार घाली । वदे 'आमची झोंपडी पावन केली । हें महद्भाग्य ।।५१।। दोन दिवस हेंचि माहेर । करावा दीक्षेचा उपसंहार । मग जाऊं

सत्वर । आपले ग्रामी' ।।५२।। न्हाउं माखूं घातलें । चोळी कंकण लुगडें दिलें । सुग्रास जेवूं घातलें। अत्यानंद मानिला ।।५३।। दोन दिवस ठेवोनि । निघाले संगें घेवोनि । नातेंपुतेंमाजीं भगिनी । होती तेथें पोंचविलें ।।५४।। इकडे सकल चिंता करित । होते तयां कळली मात । ते आनंदें भेटों येत । विचार पुसती मार्गींचा ।।५५।। कैसें साधन कैसें भजन । कैसें करविलें अनुष्ठान । योगदीक्षा किती गहन । सांगतसे सकळांतें ।।५६।। भेटले तुकाराम सद्गुरु । मागितला म्या पुत्रवरु । तेणें कैसा झाला विचारु । आल्हादकारी ।।५७।। कैसें घडे अन्नग्रहण । कैं होई उपोषण । परि न डळमळे समाधान। सदा आनंदीआनंद ।।५८।। माय कुरवाळोन बोले । 'कष्टलीस नाजुक बाळे। दैवीं असे जें लिहिलें । उपाय नसे तयासी' ।।५९।। कन्या वदे 'गे आई । कष्टावांचोनि सुख नाहीं । तुम्हीं ऐसा जोडिला जांवई । धन्य भाग्य तुमचें ।।६०।। तेणें मज समाधान दिलें । पूर्वसुकृत फळा आलें । धन्य वंदावीं पाउलें । थोरथोंरा दुर्लभ' ।।६१।। ऐसें बहुत बोलोन । करी सकळांचें समाधान । सदा ध्याई पतिचरण । रामनाम घेतसे ।।६२।। गीता-रावजींस कळली मात । सून सांगे वृत्तांत । त्वरित येतील निश्चित । चिंता कांहीं न करावी ।।६३।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते षष्ठाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास तिसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। इकडे सद्गुरुनिधान । पुनरपि घेती गुरुदर्शन । मग करिती तीर्थाटण । नाना देशीं ।।१।। अयोध्या मथुरा हरिद्वार । हिमाचलीं बदरीकेदार । जाती काशी

विश्वेश्वर । क्षेत्रें पुनीत करावया ।।२।। उत्तरतीर्थें सर्व करोनि । कांहीं वास इंदोर भुवनीं । शरणागतांसी तारोनी। संप्रदाय वाढविती ।।३।। इंदोर येथें शिष्य फार । सद्गुरूंचे झाले किंकर । त्यांतील जे सत्त्वागर । नामें सांगूं तयांचीं ।।४।। भैयासाहेब मोडक म्हणोनि । अखंड होते नामस्मरणी । सद्गुरु राहती त्यांचे सदनीं । शुद्धभाव पाहोनियां ।।५।। जिजीबाई नामेंकरोनि । विप्रस्त्री सुज्ञ सद्गुणी । लागली श्रीसमर्थचरणीं । देह सार्थक करावया ।।६।। जिजीबाईस तुकारामदर्शन । तैसें भैयांसही जाण। करविलें स्वयें नेऊन । परमभाविक जाणूनिया ।।७।। रावसाहेब पळशीकर । दिवाण सद्गुणी चतुर । आणिकही शिष्य असती फार । इंदोरग्रामीं ।।८।। इंदोर हर्दा गोंदावली । सद्गुरूंची स्थानें भलीं । बहुत दिवस वस्ती केली । परमक्षेत्रें पुण्यभूमी ।।९।। इंदुरीं विशेष प्रसिद्ध। आनंदसागर ब्रह्मानंद। गुरुकृपें झाले सिद्ध । सर्वाधिकारी ।।१०।। तयां उपदेश त्या ग्रामीं । म्हणोनि विशेष पुण्यभूमी । वरचेवरी सद्गुरुस्वामी वास करिती त्या ठायीं ।।११।। कांहीं काळ करोनि वास । सद्गुरु निघाले दक्षिणेस । मार्गीं देती बहुतांस । उपदेश परमपावन ।।१२।। बहुत लोक दर्शना येती । बहुतांच्या कामना पुरविती। नाना चमत्कार घडती । आश्चर्य वाटे सकळांसी ।।१३।। कोणी दोघे कालिकाउपासक । होते परममांत्रिक । जारणमारण-उच्चाटणादिक । विद्येमाजीं अति कुशल ।।१४।। त्यांनीं श्रीगुरु देखिले । नाना चमत्कार करिती भले । म्हणती आपणांहून आगळें । सामर्थ्य दिसतें यांजपाशीं ।।१५।। तरी एवढी विद्या शिकावी । म्हणजे वाढेल पदवी । काय युक्ति योजावी । विद्याधन मिळवाया ।।१६।। आसुरी विद्येमाजीं प्रवीण। लेखिती आपणासारिखे जन । बहुत प्रकारें विनवोन । म्हणती मंत्र सांगावा ।।१७।। सद्गुरु वदती तयांसी। भक्ताभिमानी वैकुंठवासी । तोचि घडविता कार्यासी । आम्ही असों निमित्तमात्र ।।१८।। नाहीं पंचाक्षरीमंत्र। वेताळ-नवचंडी-यंत्र । सर्व

हालविता सूत्र । प्रभु एक रामराय ।।१९।। आम्ही तयांचे किंकर । सदा गातों रघुवीर। न जाणों मंत्रशाबर। सत्य सत्य जाणावें ।।२०।। तें न मानवे तयांसी । म्हणती हा चोरितसे आम्हांपाशीं । बंधन करूं नागपाशीं । म्हणजे वळती येईल ।।२१।। ऐसें चिंतिती अंतरीं । फिरती सद्गुरुबरोबरी । गांठोनि एका डोंगरीं । नागपाश टाकिला ।।२२।। तात्काळ नाग निर्माण झाले । सर्वांगासी बंधन केलें । सद्गुरु हांसती तये वेळे । कैसी तृष्णा विद्येची ।।२३।। उभयतां वदती तयांसी । आम्हां मंत्र सांगावा निश्चयेंसी । तरीच सोडूं या पाशीं । ना तरी घात घडेल ।।२४।। गुरु म्हणती आम्ही रामभक्त । आमचा न होय घात । तुमचा मंत्र जाईल व्यर्थ । सर्प मृत झालिया ।।२५।। तामसीविद्येपासोनि । तुम्ही करितसां नरकाची जोडणी । यमयातनेची जाचणी । भोगितां सर्व आठवेल ।।२६।। दो दिवसांचे सुखासाठीं । पापें सांठवितां कोटी । अजुनी अनुताप घ्या पोटीं । म्हणजे सुख पावाल ।।२७।। सुख व्हावें शाश्वत । ऐसें करा कांहीं हित । ना तरी बुडाल समस्त । नरककुंडामाझारीं ।।२८।। साधका सिद्धी नाडती । तुम्हांसी चेटकें बुडविती । न जाणतां आपुली गति । दुजियासी काय देतां ।।२९।। बोध करिती बहुतांपरी । न मानिती ते आसुरी । म्हणती करितो फसवेगिरी । पाश सोडायाकारणें ।।३०।। तीन दिवस वाट पाहिली । मग 'रघुवीर समर्थ' गर्जना केली । डोंगराखालीं उडी घेतली । नाग झाले छिन्नभिन्न ।।३१।। देखोनि ऐसा चमत्कार । उभयतां वाटला विस्मय थोर । सामर्थ्य असतांही धुरंधर । तीन रात्री साहिल्या ।।३२।। जाईल आमुचें मंत्रबल । म्हणोनि सोशित हाल। तोडिले दुर्भेद्य व्याल[१] । मानवी बल नव्हे हें ।।३३।। आधीं बहुत बोध झाला । बरी साक्षात्कार घडला । उभयतां अनुताप उपजला । धांवोनि चरण धरियेले ।।३४।। अनंत अपराधी मंदमती । बहुत

१ सर्प.

भोगिल्या आपत्ती । कृपासागर गुरुमूर्ति । क्षमा दीनांसी करावी ।।३५।। म्हणोनि लागती चरणीं। कृपा भाकित करुणावाणी । सोडवा या भवांतुनी । परमपावन गुरुराया ।।३६।। सद्गुरु दयाघन वर्षले । मुमक्षुचातकां शांतविलें। अनुग्रह देवोन लाविले । रामभक्तीसी ।।३७।। दोघे सेवा करिती गहन । एका निरोप देती जाण । सच्चिदानंद नामेंकरून । फिरती गुरुसन्निध ।।३८।। अतिकठिण सेवा करी । नामें झिजवी वैखरी । तुर्याअवस्थेतें वरी । सच्चिदानंद ।।३९।। येथेंचि सिद्धी नाडिती । साधका फशीं पाडिती । याची अपूर्व कथा धरावी चित्तीं । श्रोते साधक सुज्ञ हो ।।४०।। सद्गुरु रामेश्वरा चालिले । आगगाडीस्थानासमीप आले । अवकाश जाणोन बैसले । धर्मशाळेमाझारीं ।।४१।। कांहीं काळ लोटल्यावरी । गाडी आली अड्ड्यावरी । श्रीगुरु पोंचती तंववरी । गाडी चालूं जाहली ।।४२।। सच्चिदानंद हें अवलोकून । म्हणे श्रीगुरुवांचोन । कोठें धांवतेस 'कूं' करोन । स्थिर रहा ।।४३।। त्याचे तपःसिद्धीचेनि बळें । गाडी पुढें न चाले । उपाय करोनि थकले । गाडीचालक ।।४४।। सद्गुरु मनीं जाणती । बळेंचि विलंब लाविती । पाहोन शिष्याची कृति । बोलते झाले ।।४५।। 'साधोनिया साधनासी । सिद्धिउपभोग इच्छिसी । ही काय आठवली तुजसी । तमोबुद्धि पूर्वीची ।।४६।। आम्हां गोसावियांप्रति । जाण्याची काय गडबड होती । उदयीक जाऊं पुढती । तुवां हें काय केलें ।।४७।। कलि वाढला दुर्धर । काम्यकर्मी सकल नर । भलताच होईल जोजार । साधनीं व्यत्यय येईल ।।४८।। आम्हां सत्वर जाणें असे । तरी काय विलंब असे । नेत्र मिटावे स्वल्पसे । मग पहा चमत्कृति' ।।४९।। क्षण एक नेत्र मिटले । शिष्यासह गुप्त झाले। 'उघडोनि बा पाहीं डोळे । रामेश्वरा नमन करीं ।।५०।। सिद्धीची तों ऐसी स्थिति । परि साधकां ने अधोगती । अद्याप न जाय आसक्ती । मुख न दावीं द्वादशाब्दे' ।।५१।। बोलोनि ऐसें तयासी । गुप्त झाले सत्वरेंसी। प्रकटले इंदुरीं

ज्ञानराशी । सद्गुरुनाथ एकलें ।।५२।। कांहीं काल इंदुरीं राहिले । इकडे रावजी निवर्तले। श्रीगुरूंनीं मुंडन केलें। लोक आश्चर्य करिताती ।।५३।। सांगते झाले लोकांसी । आज वडील वैकुंठवासी । तिकडे गोंदावलीची स्थिति कैसी । झाली पहा ।।५४।। गीताईस दुःख झालें । सत्त्वगुणी रावजी गेले। अण्णा बाळ उघडे पडले । कनिष्ठबंधु सद्गुरूंचे ।।५५।। ज्येष्ठ सुतावांचोनि कांहीं । उत्तरक्रिया होणें नाहीं। ऐसा अभिप्राय सर्वही । विप्रीं काढिला मंथुनी ।।५६।। सद्गुरूंचा शोध करिती । आल्यागेल्या विचार पुसती । कांही कळेना निश्चितीं । चिंता करिती अनिवार ।।५७।। तंव अकस्मात् दशमदिनीं । तेथें आली गुरुजननी । मुंडन केलें पाहोनि । आश्चर्य करिती लोक सर्व ।।५८।। यथासांग क्रिया केली। सवेंचि स्वारी निघोनि गेली । सकळां हळहळ वाटली । धांवा करिती गुरूंचा ।।५९।। पुनः प्रकटती इंदुरांत । सद्गुरु गोसावीवेष सोडित । राजयोग धरिती परिधान करित । कौपीन कफनी फरगूल ।।६०।। गणेशटोपी शिरीं घालिती । पायीं खडावा वागविती । कुबडी स्मरणी झोळी घेती । कार्याकारण ।।६१।। उंची वस्त्रें जरतारी । द्वादश मुद्रा शरीरीं । केशर अक्षंत[१] शोभे शिरीं । वैष्णवी त्रिपुंड्र ।।६२।। एकांतवास सोडिला । शिष्यसमुदाय असंख्य झाला । घेती घेवविती नामाला । श्रीरामप्रभूच्या ।।६३।। बहुत जन दर्शना येती । अनुग्रह घेता सुखी होती । नित्य उठती भोजनपंक्ती । समाराधना गुरुगृहीं ।।६४।। दर्शनमात्रें आनंदवी । नानासंकटीं सोडवी । भाविक नास्तिक कामिक लावी । रामभजनीं सकळांसी ।।६५।। शास्त्री वैदिक वेदांती । कर्मठ शाक्त सिद्धांती । सकलांचें समाधान करिती । श्रेष्ठत्व दाविती नामाचें ।।६६।। नाम सकळाचें सार । नाम सकला आधार । कलियुगीं भवपार । एक नामचि पाववी ।।६७।। ऐसा करूनि उपदेश । प्रचीत दाविती जनांस ।

१. कपाळी गंधांतील काळ्या रंगाचा टिकला किंवा रेघ.

हरिहाट[१] केला कालिकतास[२] । संत समुदाय मेळवुनी ।।६८।। सकलां रामरूप पाहती । नरनारी सेवा करिती । मायबापाहूनि प्रीति । सद्गुरुवरी सकलांची ।।६९।। सद्गुरु आमुचा आप्त सखा । सद्गुरु आमुचा पाठीराखा । सद्गुरु चैतन्यचि देखा । सूत्रें हालवी सकलांचीं ।।७०।। सद्गुरु सन्निध असतां । कळिकाळा हाणूं लाथा । ऐसें सकलांचे चित्ता । वाटतसे भावबळें ।।७१।। वैभव नृपाहून थोर । 'महाराज' ऐसें वदती नर । गोंदावलें गांवकामगार । गोंदावलेकर कोणी म्हणे ।। ७२ ।। सामर्थ्य पाहतां अद्भुत । यास्तव म्हणती समर्थ । भक्ति-ज्ञान वैराग्ययुक्त । सत्पुरुष कोणी म्हणे ।।७३।। सद्वस्तु सच्छिष्या दाविती । तेणें सद्गुरु कोणी म्हणती । गणूबुवा गोंदावलीप्रति । बोलती बालमित्र ।।७४।। गुरुदत्त ब्रह्मचैतन्य । नाम असे परम मान्य । चैतन्यब्रह्मीं अनन्य । एकरूप जाहले ।।७५।। गोंदावलेकर महाराज ऐसें । नाम प्रसिद्ध विशेषें । सकल सिद्धांमाजीं विलसे । सद्गुरु शिरोमणी ।।७६।। चहूं देशीं ख्याती झाली । महान् साधु गुरुमाउली । नाना संकटीं पावली । बहुतांसी ।।७७।। शिष्यशाखा बहु झाली । अनेक साधनीं लाविलीं । उपदेशवचनीं निवविलीं । अंतरें कित्येकांचीं ।।७८।। कोणी वाद करावया येती । कोणी छिद्रेंचि शोधिती । कोणी परीक्षा करूं धांवती । सत्य कीं मिथ्या ।।७९।। ज्ञान पाहोन धरिती मौन । वृत्ति पाहोन होती लीन । तेज पाहून जाती शरण । नास्तिक आणि विकल्पी ।।८०।। नित्य भजन अन्नदान । नित्य अध्यात्मविवरण । नित्य उत्साह आनंदघन । सद्गुरुसन्निध ।।८१।। सकलां मुखीं रामनाम । हातीं स्मरणी संख्या नेम । सकलांचें सारिखें प्रेम । श्रीचरणीं ।।८२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते षष्ठाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**१. संतपूजा, अन्नदान, वेदपठण, इत्यादि अंतर्भूत असलेला एक धार्मिक उत्सव; यास खर्च फार येतो. २. कलकत्ता शहरांत.**

## समास चवथा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। इंदूरीं महत्त्व वाढलें । गोंदवल्यासी वर्तमान कळलें । दादोबा आणि गोपाळ निघाले । स्नेहसंबंधी श्रींचे ।।१।। समजुतीनें आणायाकारणें । दोघांसी केलें पाठवणें । इंदूरीं दोघे पाहुणे । आले शोध करित ।।२।। चरणीं लोटांगण घालिती । गोंदवलीची वार्ता सांगती । बहुत दिवस आपणाप्रति। जावोनियां जाहले ।।३।। काकू शोक करिते फार । उघडें पडलें घरदार। तुम्हांसी आणाया सत्वर। आम्हां उभयतांसी धाडिलें ।।४।। सकलही चिंता करिती । तुम्ही चला शीघ्रगती । नानापरीनें सांगती । ज्ञानियासी उभयतां ।।५।। बरें म्हणोनि कुरवाळिलें । जाऊं म्हणोनि राहविलें । स्थिति पाहून चकित झाले । राजयोग साजिरा ।।६।। उषःकालीं भूपाळ्या म्हणती । मंजुळस्वरें काकड आरती । प्रभात होतां पूजा करिती । चरणतीर्थप्राशन ।।७।। भाळीं शोभे केशरी टिळा । कंठीं घालिती पुष्पमाळा । मस्तकीं वाहती तुळसीदळा । भक्त अनेक ।।८।। नानापरींचे नैवेद्य । देवोनि धरिती श्रीगुरुपद । सर्वांस वांटिती प्रसाद । सद्गुरु स्वहस्तें ।।९।। नित्य समाराधना होती । बहुपरींचीं पक्वान्नें करिती । किती खाती जेवती । गणती नाहीं ।।१०।। रोगग्रस्त पिशाचग्रस्त। आपत्तीनें जाहले व्यस्त । विनवणी करिती समस्त । उद्धरीं आम्हां दयाळा ।।११।। कोणी दारिद्र्यें त्रस्त झाले । कोणी व्यंगत्व पावले । निपुत्रकही तेथें आले । पुत्रवांछा धरोनि ।।१२।। आशा मूळ प्रकृती । कामना अनंत उठती । कोणी करावी गणती । आर्त तितुके धांवले ।।१३।। तैसेचि बद्ध मुमुक्षु । साधक आणि जिज्ञासु । धांवती सेवाया रसु । गुरुवाक्यबोध ।।१४।। ऐसिया गर्दींत गवसले । कार्या आलेले विसरले । बहुतां दिवशीं स्मरण झालें। उभयतांसी गोंदवलीचें ।।१५।। पुनः प्रार्थना करिती । सत्वर चला हो म्हणती । महाराज अनुमोदन देती। कठिण वाटे सकळांसी

।।१६।। बेत ठरविला जाण्याचा । निरोप घेती सकळांचा । नयनीं पूर अश्रूंचा । लोटतसे भक्तांचिया ।।१७।। पुनरपि येऊं परतोन । ऐसें देती आश्वासन । निघते झाले तेथून । गोंदावलीसी पातले ।।१८।। आनंद झाला सर्वांसी । भेटलें लहानथोरांसी । महाराज आले ग्रामासी । गांवोगांवीं वार्ता गेली ।।१९।। भक्तमंडळी धांवली । यात्रा भरली गोंदावलीं । नामनौबत दुमदुमली । भक्तिप्रेम स्फुरतसे ।।२०।। खातवळीं पाठविला दूत । भार्या आणविली त्वरित । संसारीं राहोनि वर्तत । अलिप्तपणें विदेही ।।२१।। घरची व्यवस्था लागली । माता बोधें शांतविली । अण्णांनीं देहयात्रा संपविली । सद्गुरुसन्निध ।।२२।। मुक्ताबाई बहीण सती । खातवळीं दिली होती। तीही गेली स्वर्गाप्रति । अल्पवयामाझारीं ।।२३।। सरस्वती माय गरोदर राहिली । ओट्या भोजनें चाललीं। सद्गुरु म्हणती काय भुली । पडली या लोकांसी ।।२४।। नऊ मास पूर्ण झाले । पुत्ररत्न जन्मास आलें । परि बारसें नाहीं करूं दिलें । अल्पायुषी जाणोनि ।।२५।। एक संवत्सराआंत । पुत्र झाला असे मृत । तदुपरि मायही जात । पुत्रासी भेटाया ।।२६।। असो स्नुषा निवर्तली । गीता माउली दुःखित झाली । सद्गुरूंनीं माया त्यजिली। वृत्तिशून्य होवोनि ।।२७।। ऐसा कांहीं काळ निघोन गेला । गीताबाईनें आग्रह धरिला । दुजा विवाह पाहिजे केला। पुरवीं आस येवढी ।।२८।। हो ना करितां रुकार । देते झाले गुरुवर । स्वयें शोधून सुंदर। आणीन मी नोवरी ।।२९।। आश्वासुनी मातेसी । गेले आटपाडी महालासी । वधू शोधिली सुंदरसी । दोनीं नेत्रीं आंधळी ।।३०।। बहुत कन्या दाविती । परि सर्वही नाकारिती । सखारामपंतांची करिती। सुलक्षणी कन्या पसंत ।।३१।। देशपांडे उपनामें ब्राह्मण । चिंता करी रात्रंदिन । कन्या असे नेत्रहीन। वर कैंचा मिळेल ।।३२।। तंव महाराज अवचित । आळशावरी गंगा लोटत । तैसे पावले तेथ । पूर्वपुण्य वधूचें ।।३३।। पाहोनि हस्तरेषा । जोडा जमला म्हणती खासा । परि मी गोसावी ऐसा ।

विचार करूनि पाहावें ।।३४।। शिळें खावोनि उदर भरणें । त्यांसी वाढिलीं पक्वान्नें । तैसें जाणोनि पितयानें । तिथिनिश्चय ठरविला ।।३५।। आटपाडीस जाहलें लग्न । भार्येसह गोंदवलीस जाण। येवोनि वंदिले चरण । माउलीचे उभयतां ।।३६।। मायगृहीं यमुना म्हणती । सासरीं जाहली सरस्वती । आईसाहेब सकळ वदती । शिष्यवर्ग ।।३७।। पुनरपि गृहस्थाश्रम । धरिला जो दे आराम । तिन्ही आश्रमां परम । साह्यकारी ।।३८।। ऐसे गेले कांहीं दिवस । उपासना वाढली विशेष । गृहीं बांधावें मंदिरास । योजिलें मनीं ।।३९।। तडवळें येथील कुळकर्णी। त्यांनीं राममूर्ति कोदंडपाणी । लक्ष्मण सीता ऐशा तिन्ही । आणविल्या होत्या ।।४०।। राममंदिर बांधावयाला । पैसा बहुत जमविला । परि सर्वही खर्चिला । वाडा बांधिला सुरेख ।।४१।। तेणें ईश्वरी क्षोभ होय । गृह दग्ध होवोनि जाय । परि मूर्तीसी न घडे अपाय । अघटित करणी देवाची ।।४२।। ठेविल्या होत्या गृहांत । तयासी कळली मात। गोंदवलेकर भगवद्भक्त । गृहीं मंदिर योजिताती ।।४३।। तयानें आणोन दिधल्या । म्हणे या सार्थकीं लागल्या । गुरुगृहीं कैशा शोभल्या । मूर्ती नव्हे प्रत्यक्ष रूप ।।४४।। भक्ताधीन पुरुषोत्तम । भक्तहृदयीं आत्माराम । भक्तगृहीं शोभतो परम । दर्शनें श्रमपरिहार ।।४५।। कुंभार सरवीर कामगार। परम कुशल चतुर । तयाकरवीं श्रींचें मंदिर । शके अठराशें तेरांत बांधिलें ।।४६।। म्हसवडकर बापूसाहेब माने । श्रीमंत असोन सत्त्वगुणें । युक्त होते तयांनीं । केली मेघडंबरी ।।४७।। तैसेंचि बांधिलें सिंहासन । कुसरी आणि शोभायमान । वरी बैसविले ठाण । रामसीतालक्ष्मण ।।४८।। स्थापनोत्साह अपूर्व झाला । वैदिकसमुदाय जमविला । रामचरणां भेटी आला । महानद्यांसह सागर ।।४९।। अन्नपूर्णा जाहली उदार । केला गांवभंडार । भक्ताधीन परमेश्वर । मग काय उणें ।।५०।। प्रत्यक्ष ठाकला श्रीराम । जेथें अनंत पावले विश्राम । पावती, पावतील, परम- । भाग्यें घडे दर्शन

।।५१।। जेथें वसे नाम सतत । वाटे सजीव बोलत । समोर उभा हनुमंत । हस्तद्वय जोडोनी ।।५२।। देव भक्त आणि नाम । अपूर्व त्रिवेणीसंगम । पीडित पावती आराम । ध्यान दर्शन केलिया ।।५३।। ध्यान सतेज गंभीर । हास्यमुद्रा, चापशर । शोभतसे हस्तकीं, साक्षात्कार । नित्य घडती ।।५४।। एकदा ऐसा प्रकार घडला । महाराज करितां भजनाला । करीं रामप्रसाद आला । गुलाबकुसुमें ।।५५।। पुढें महाराज काशीस निघाले । तेव्हां रामनयनीं अश्रु आले । सत्वर येऊं म्हणतां राहिले । जन समस्त पाहती ।।५६।। साक्षात् उभे अयोध्यावासी । निश्चयें वाटे सर्वांसी । ऐसेपरी मंदिरासी । स्थापना केली गृहामाजीं ।।५७।। एके दिवशीं गीता माउली । गणपतीसी बोलूं लागली । एक इच्छा असे राहिली । महायात्रेची ।।५८।। स्नान घडावें भागीरथीचें । दर्शन श्रीविश्वेश्वराचें । सार्थक होईल देहाचें । ऐसें करीं सत्वर ।।५९।। पुरविण्या मातेची आस । निघाले काशीयात्रेस । भार्या धाडिली माहेरास। पुढें जाऊं म्हणोनिया ।।६०।। सदनावरी तुळसीपत्र ठेविलें । विप्रांकरवीं लुटविलें । लोभमूळ संसारजाळें । तोडिलें मायेचें ।।६१।। दहा वेळां काशी केली । म्हणती पायवाट पडली । संगें मंडळी निघाली । शेंपन्नास ।।६२।। काशीस गेले आजवरी । परि एकले पादचारी । तैसे नव्हे या अवसरीं । विश्वकुटुंबी जाहले ।।६३।। प्रयागीं गंगाभेट केली । वेणीमाधवाचरणीं घातली । तीर्थश्राद्धें सकल केलीं। अक्षयवट दाविला ।।६४।। दाविला त्रिवेणीसंगम । दुर्ग त्रिकोनी दुर्गम । करविला दानधर्म । माउलीहस्तें ।।६५।। त्रिरात्र करोनि वसति । निघाले श्री काशीप्रति । जेथें नांदे उमापति । भूकैलास प्रत्यक्ष ।।६६।। लिंगमय दिसे काशी । दर्शनें जी अघ नाशी । ती दाविली मातेसी । गंगा आणि मनकर्णिका ।।६७।। धुंडिराज दंडपाणी । अष्टभैरव दावोनी । मग विश्वेश्वर भवानी। करविलें दर्शन ।।६८।। दानधर्म बहुत केला । करिती तीर्थश्राद्धाला । विप्रसमुदाय तोषविला । षड्रस अन्नें

अर्पोनि ।।६९।। पंचक्रोशी अरुणा अशी[1] । दाविली श्रीव्यासकाशी । मनीषा पुरवोनि ऐशी । गयाक्षेत्रीं निघाले ।।७०।। विष्णुपदीं अर्पिला पिंड । जो चुकवी यमदंड । धर्म करूनि उदंड । पंड्यांची हांव शमविली ।।७१।। बेचाळीस कुळें उद्धरिलीं । अन्य अनंत तारिलीं । परि लौकिक करणी केली । गुरुमाउलीनें ।।७२।। मार्गीं बहु जन अनुग्रह घेती । दर्शनें समाधान पावती । बोलका देव प्रत्यक्ष म्हणती । पावला आम्हां ।।७३।। धर्मकेंद्र काशीपुर। तेथें नामाचा केला गजर । शास्त्री पंडित विद्वान थोर । रामभजनीं लाविले ।।७४।। जेथें कर्मठ ब्राह्मण । भक्तिपंथा करिती छळण । तयांसी प्राकृत नामस्मरण । करावया लाविलें ।।७५।। काशीनिवासी विद्वान थोर । बाबूभट नामें द्विजवर । सद्गुरूंचे झाले किंकर । वास करिती श्रीजवळी ।।७६।। कलियुगीं नामचि सार । दावोनि तारिले अपार। धन्य कुळ धन्य संसार । जे गुरुवचनीं विश्वासले ।।७७।। असो करोनि त्रिस्थळी । अयोध्ये आले भक्तबळी। मातृआज्ञा प्रतिपाळी । ऐसा विरळा ।।७८।। अयोध्यें गीता माउली । अकस्मात् विकृति पावली । देहयात्रा संपविली । पुण्यक्षेत्रीं ।।७९।। दशदानें सुवर्णदानें । सवत्स दुभतीं गोप्रदानें । विहित तितुकीं दिधलीं दानें। सच्छील द्विजांसी ।।८०।। नामोत्साह करविला । अन्न वांटलें गरिबांला । अंतकाळ सांग केला । माउलीचा ।।८१।। समुदाय पाठविला ग्रामाप्रति । नैमिषारण्यीं स्वयें जाती । पुनरपि एकदां अयोध्येप्रति । स्वारी आली यात्रेसी ।।८२।। दहिवडीकर जानकीबाई । विनोदें वदती तिजसी पाहीं। सोबतीस तुम्ही राहतां काई । माउलीचे आमुच्या ।।८३।। पुण्यक्षेत्र शरयूतीर । वरी सन्निध सद्गुरुवर । जाणोन देत प्रत्युत्तर । हो जी, हो जी, म्हणोनि ।।८४।। निमित्तमात्र आला ज्वर । ठेविलें तिनें

१ अशी या नांवें नदी आहे.

कलेवर । मुक्तिदाता सद्गुरुवर । सुसंधि साधिली ।।८५।। तिजसीही तिलांजली । सद्गुरूंनीं स्वयें दिली । अनंत सुकृतें फळा आलीं । धन्य जाहली उभयलोकीं ।।८६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते षष्ठाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास पांचवा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। नमन करूं सीतापती । कोदंडधारी श्याममूर्ती । कमलनयन दिव्यकांती । महामेरू सत्त्वाचा ।।१।। विश्वामित्रा साह्य केलें । असुर सर्व संहारिले । चरणस्पर्शें पावन केलें । अहिल्यासतीसी ।।२।। साष्टांगेंसी प्रणिपात । करूं सद्भावनायुक्त । गुरुलीला अगम्य बहुत । दासामुखीं वदवावी ।।३।। सद्गुरु गेले नैमिषवनीं । राहिले एकांत साधूनि । उद्धरावया अज्ञानी । पुन्हां इंदुरीं पावले ।।४।। सकळांसी श्रुत झालें । गुरुमहाराज येथें आले । आनंदोर्मीनें धांवले। गुरुदर्शनाकारणें ।।५।। पंचक्रोशी दशक्रोशी। लोक येती दर्शनासी । आनंदीआनंद सर्वांसी। होता झाला ।।६।। तेथोन आले हर्द्याप्रति । जेथें सुज्ञ विप्र वसती। तेथेंही उपासना वाढविती । अनुग्रहप्रसाद देवोनि ।।७।। काशिनाथभैया सावकार । तयांकरवीं बांधिलें मंदिर । पट्टाभिषिक्त राम सुंदर । स्थापना केली श्रीगुरूंनीं ।।८।। पूजा नैवेद्य दीप जाण । आल्या अतिथा अन्नदान । व्हावया शेती करोन । दिधली असे समर्थें ।।९।। महादेवभट्ट इंदोरकर । पुजारी नेमिला सत्त्वस्थ फार । बहुत दिवस गुरुवर । सकुटुंब तेथें राहती ।।१०।। उपरि गोंदवलीस आले । अपरिमित भक्त झाले । रामनाम जप चाले। चहूंकडे सारिखा ।।११।। एक कोट तीन कोट । कोणी करिती तेरा कोट । पापाची

बुडविली मोट । पापकर्मी कलियुगीं ।।१२।। कोणी बद्धाचे साधक झाले । कोणी सिद्धपदवी पावले । कोणी वैराग्यातें धरिलें । शाळेमाजीं सद्‌गुरूंचे ।।१३।। चित्तशुद्धि पावले झणीं । झाले दीक्षेचे अधिकारी कोणी । कोणी सद्‌गुरुरूप होवोनि । सर्वाधिकारी जाहले ।।१४।। कोणा चिंतामणि गवसोन। आळसें दारिद्र्य भोगिती जाण । ऐसे अभागी किती जन । होवोनि गेले ।।१५।। नित्य उत्साह गुरुगृहीं । आनंदासी सीमा नाहीं । धनिक गरीब सर्वही । नांदती एके ठायीं ।।१६।। विद्वान् आणि अज्ञानी । पुरुष आणि मायबहिणी । नांदती सद्‌गुरुसदनीं । मत्सररहित नीतीनें ।।१७।। सुधारणा-पुराणमतवादी । सात्त्विक राजस तमोबुद्धि । आळशी दक्ष वाग्भेदी । एके छत्रीं वावरती ।।१८।। व्याघ्रा आणि अजापुत्रा । दरवेशी बांधी एकसूत्रा । तेवीं सद्‌गुरुतपस्तेजछत्रा- । खालीं निर्वैर नांदती ।।१९।। सकळांचें ध्येय एक । सकळां साधनही एक । गुरुकृपा मजवरी अधिक । वाटतसे प्रत्येका ।।२०।। बाल तरुण आणि वृद्ध । सकलां सारिखा संवाद । रोगासारिखें औषध । वैद्य जैसा देतसे ।।२१।। शक्ति पाहोन सेवा सांगती । कामिकांच्या कामना पुरविती । आशासूत्रासी वळविती। भक्तिमार्गें हळूं हळूं ।।२२।। जाणोनि सकळांचें अंतर । तेचि देती प्रत्युत्तर । खूण पटतां साक्षात्कार । समाधान होतसे ।।२३।। कोट्यवधि शिष्य झाले । संकलांतरीं गुरु खेळे । साधनीं अडले भुलले । त्यांसी लाविती मार्गासी ।।२४।। कोणा प्रत्यक्ष सांगत । कोणा होय दृष्टांत । दुजें रूप धरोनि हेत । पुरविती कोणाचा ।।२५।। ज्यानें संकटीं करुणा भाकिली । तेथें सत्वर धांव घाली । ऐसी सद्‌गुरुमाउली । संकटकालीं पावतसे ।।२६।। उदय होतां गभस्ती । अनेक बिंबें प्रकाशती । तैसी ही गुरुमूर्ती । सर्वां घटीं वास करी ।।२७।। सद्‌गुरुकृपाप्रकाशें । साधन होई उल्हासें । न पडती संसृतीचे फांसे । तयावरी ।।२८।। शुद्ध भाव जयापाशीं । तया अनुभवाच्या राशी । देशीं असो वा विदेशीं । सदा सन्निध

महाराज ।।२९।। शिष्य जरी झोंपी जाये । तरी सद्गुरु उभा आहे । जाणोनि अपाय उपाय । साह्य करी सर्वदा ।।३०।। जैसी होय चित्तशुद्धी । तैसी क्रिया साधनविधी । लावोनिया भवनदी । तारोनि नेती गुरुराव ।।३१।। कोणा घालिती कौपीन । कोणा कफनी टोपी पूर्ण । कोणा धरविती मौन । कांहीं कालपर्यंत ।।३२।। कोणा सांगती गुरुसेवा । कोणा म्हणती देव पुजावा । कोणी एकांत सेवावा । ऐसी आज्ञा होतसे ।।३३।। ब्रह्मचर्य कोणा सांगती । कित्येकांचीं लग्ने करिती । कोणाच्या जटा वाढविती। कोणाचें करविती मुंडण ।।३४।। कोणा करविती सन्निध वास । कित्येकांसी दूर देश। गृहीं बैसोन जपास । कित्येकांस करविती ।।३५।। कोणा देउनिया दीक्षा । मागविती नित्य भिक्षा । 'ॐ भवति' या पक्षा । रक्षण करविती ।।३६।। कोणाकरवीं देवालय। बांधविती सद्गुरुराय। 'आल्या अतिथा द्या आश्रय' । ऐशी आज्ञा होतसे ।।३७।। सिद्ध झाले शिष्य थोर । तयां देती अधिकार । करावा आतां जगदुद्धार । भक्तिपंथ वाढवावा ।।३८।। जाणोन अंतरस्थिति । वर्तमान-भूत-भविष्यगति । कठिण सुलभ आज्ञा करिती । भक्तांलागीं दयासिंधु ।।३९।। पाहतां सद्गुरुदरबार। वाटे हें कैलास शिखर । भूतगण दिसती फार । चित्रविचित्र ।।४०।। वरि सांगितले वेष । आणिक प्रकार बहुवस । माला मुद्रा मणी विशेष । असती तयांमाझारीं ।।४१।। यावरी हें सुधारणायुग । अनंत वेषें नटलें जग । वर्णन करितां दिसेल व्यंग । महाराष्ट्रबोलीं ।।४२।। चिंधी बांधिती गळ्यांत । हाडकें हातीं कंठांत । निर्जीव चर्म वागवित । मस्तकावरी कित्येक ।।४३।। निष्कारण आंधळे किती । नेत्रां उपनेत्र लाविती । रोगग्रस्तासारिखे किती । झांकिती हातपाय ।।४४।। जैसा देश तैसा वेष । धरितां लाहिजे सुखास । ना तरी हा हव्यास । काचोळा करील त्वचेचा ।।४५।। ऐसें दिसती बहु प्रकार । सांगतां होय ग्रंथविस्तार । नाना देशींचे नर । रीतिरिवाज वेगळे ।।४६।। एकाचें एका कळेना । ऐसे

भाषाप्रकार नाना । हिंदुस्थानी कानडी जाणा । तेलुगु-गीर्वाणादिक ।।४७।। कोणी पिशाचें झाले ग्रस्त । कोणा रोगें केलें त्रस्त । कोणी भ्रमानें बरळत । भूतगण समर्थांचे ।।४८।। सकल चरणसेवा करिती । पाहतां चित्रविचित्र दिसती । वाटे दुजे भूतपति । महाराज आमुचे ।।४९।। वैदिक शास्त्री विद्वान । गरीब आणि धनवान । संगतिसुखालागोन । सकुटुंब राहती ।।५०।। ऐशा कुटुंबीयांचा संसार । चालविती गुरुवर । विश्वकुटुंबी म्हणती नर । याचसाठीं ।।५१।। आणिकही श्रेष्ठ भक्त । ऐसे होते बहुत । नित्य येती जाती तयांस । सीमा नाहीं ।।५२।। भाऊसाहेब केतकर । बापूसाहेब पाटखळकर । जतकर आणि फारिष्टर । शाळिग्राम व गुरुजी ।।५३।। दादोबा अंताजीपंत । व्यंकण्णभट गोडसे वदत । रामशास्त्री व पिटके वंदित । वाईक्षेत्रनिवासी ।।५४।। गोविंद नामें आळतेकर । पोतनीस जाहगीर । सखारामपंत देशपांडे श्वशुर । रामपूजे लाविले ।।५५।। मुक्ताबाई परम भक्त । श्रीचरणीं देह ठेवित । मथूबाई विख्यात । सेवा करी गुरूची ।।५६।। अम्मानामें मद्रासी । देहकष्ट बहु सोसी । द्वादश वर्षे मौनासी । धरिती झाली गुरुआज्ञें ।।५७।। जर लोकर रेशीम । सुबक करी विणकाम । शोभवी सद्‌गुरु श्रीराम । भक्तिभावेंकरोनि ।।५८।। चंद्राबाई परमभक्त । मंदिरीं वाची भागवत । ताई सुस्वर गाणीं गात । बेळगांवची रहिवाशी ।।५९।। आणिकही भक्त बहु असती । नित्य गुरुसेवा करिती । भाग्य आलें उदयाप्रति । ते हा भोगिती आनंद ।।६०।। बुवा शास्त्री रामदासी । साहेब पंत संन्यासी । राव भट्ट ब्रह्मचाऱ्यांसी । सीमा नाहीं ।।६१।। मामलेदार न्यायाधीश । सरवीर[१] आणि फडणवीस । वैद्य जाती विशेष । तात्या नामें संबोधिती ।।६२।। अठरापगड याती जमती ।

**१ सर्व्हेअर, ओव्हरसीअर** (Surveyor, Overseer).

सकलां एकरूप पाहती । सांभाळोनि धर्मनीति । नाम घेवविती मुखानें ।।६३।। सेवाप्रकार बहु असती । अल्प बोलूं संकेतीं । जेणें श्रवण पावन होती । भाविकांचे ।।६४।। अखंड मुखीं रामनाम । हा एक मुख्य नेम । ध्यान पूजा अध्यात्म । अवतारलीला वर्णावी ।।६५।। याहीवरी सद्गुरुसेवा । सेविती सुखाचा ओलावा । तोही प्रकार परिसावा । श्रोतेजनीं ।।६६।। कोणी खडावा धरिती । कोणी छत्र वागविती । पीकपात्र धरोनि हातीं । कोणी उभे सर्वदा ।।६७।। कफनी फरगुल[१] कौपीन । पात्रें पडशी भरोन । उभे नित्य सन्निधान । सद्गुरुपाशीं ।।६८।। ऐसें करावया कारण । शेती पाहावया फिरतां जाण । तैसेचि जाती ग्रामालागून । क्वचित्काळीं बहु दूर ।।६९।। कोणी पाय चेपती । कोणी अंग रगडती । ऊष्णकाळीं पंखा वारिती । कितीएक ।।७०।। कोणी आणिती पाणी । सडासंमार्जन कोणी । देह अर्पिती सद्गुरुचरणीं । अनन्य भक्त नरनारी ।।७१।। सेवा सुलभ वा कठिण । घेवोन करिती समाधान । येरवीं विदेहालागून । चाड नसे किमपिही ।।७२।। कोणा मनीं विकल्प येतां । तात्काळ दाविती विदेहता । भक्तालागीं झाली माता । गरजवंत ।।७३।। कोणी गाडी ओढती । कोणी उचलोन नेती । कोणी संगें धांवती । घोड्यावरी बैसतां ।।७४।। फौजदार भिकाजी श्रीपत । बताशा घोडा अर्पित । वाण सुंदर परि मस्त । कोणासही नावरे ।।७५।। परि वरी बैसतां गुरुमाउली । निमुट चाले सरळ चालीं । क्वचित् स्वारी नाहीं झाली । तरी घाली धिंगाणा ।।७६।। गुरुसेवेची आवड भारी। मूक म्हणोनि दंगा करी । महाराज बसतां वरी । वाऱ्यासारिखा धांवतसे ।।७७।। शाहूराव चिवटे यांसी। घोडा दिधला पाळावयासी । तेथें तीन दिवस उपवासी । नेत्रीं येती अश्रुधारा ।।७८।। परत दिधला आणोन । अश्व नव्हे सामान्य । हा भक्त दिसे अनन्य । वाहन एक श्रीगुरूंचें ।।७९।। गंगी नामें

**१ कापसाच्या दुलईचा बनविलेला पायघोळ कोट.**

गाय लंगडी । सद्गुरुरूपीं झाली वेडी । कुरवाळितां राहे उगडी । तोंवरी मागें हिंडतसे ।।८०।। वासना भूतें झडपिती । तींही सेवा करिती । संगतीनें उपरम पावती । तामसी बुद्धि सोडोनि ।।८१।। आम्हां पिशाच्चयोनींतून। सोडवा, सेवा करूं गहन । तुमचे घडलें दर्शन । मुक्त करा दयाळुवा ।।८२।। दुष्टबुद्धि पिशाचगण । त्यांचेंही पालटे मन । कैसें आमुचें अज्ञान । प्रपंचमोह सुटेना ।।८३।। मानव भूतें मूक प्राणी । सेवा करिती अखंड चरणीं। सद्गुरु समस्तांलागोनि । रामरूप पाहती ।।८४।। अनंत येती आणि जातीं । सकळांवरी सारखी प्रीति । आलियां जेवूं घालिती । निघतां बांधिती शिदोरी ।।८५।। दर्शना येती सुवासिनी । खणनारळें ओटी भरोनी । लेकुरां अंगीटोपी करोनी। आनंदें बोळविती ।।८६।। नाना सांसारिक संकटें । निवारिती युक्तिवाटें । घरच्याहून प्रिय मोठे । वाटती लहानथोरां ।।८७।। नाना हितगुजें सांगती । कन्या जशी माउलीप्रति । तैसी सकलां गुरुमूर्ति। संकटकालीं तारितसे ।।८८।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते षष्ठाध्यायांतर्गतः पंचमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास सहावा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। नमो प्रचंडकोदंडविहारी । जनकदुहिताचित्तहारी । दशमुखदर्पविदारी। अयोध्याधीशा ।।१।। भार्गवरामा लाजविलें । क्षत्रियतेज ऊर्जित केलें । दशरथात्मजा चरणयुगुलें । कृपा करोनि दाखवीं ।।२।। श्रीसद्गुरूंचा संसार । नित्य चाले जगदुद्धार । वर्णितां शिणले अपार । म्यां पामरें काय बोलावें ।।३।। परि मनें धरिली हांव । कौतुक पुरवी गुरुराव ।

आवडीचा नसे ठाव । त्रिभुवनीं दुजा ।।४।। नित्य नवी आवडी उठो । मन ये चरणी लिगटो । वासनासंसार फाटो । ही विनंती माझी ।।५।। बहुतांचे संसार शिरीं । घ्यावयाची हौस भारी । तेवीं माझा म्हणतों तोहि करीं। धरोनि घालवी मोहातें ।।६।। असो गुरुगृहींची स्थिति । दृढ करा एकचित्तीं । जेथे नांदे रमापति । सकलां घटीं दृग्गोचर ।।७।। आईसाहेब सत्त्वशील । प्रसूत झाल्या तीन वेळ । दोन कन्या एक बाळ । यथाकाल क्रमानें ।।८।। परि तीं नाहीं जगलीं । बाळपणीं स्वर्गी गेलीं । शांतिनामें होती राहिली । तीन वर्षांपर्यंत ।।९।। सिद्धांचिया पोटीं। यावया पुण्यकोटी । आत्मा प्रत्यक्षपणें उठी । अधिकार नव्हे सामान्य ।।१०।। जे मोक्षाचे अधिकारी । परि राहिली कांहीं कसुरी। तेचि जन्मती या घरीं । प्रारब्धशेष भोगाया ।।११।। मातुःश्रींसी लोभ फार । भक्त येती अनिवार । वस्त्रेंभूषणें धन अलंकार । अर्पिती गुरुमायेसी ।।१२।। त्या आदरें संरक्षिती । कधीं कोणाही न देती। लोभ विघातक परमार्थीं । जाणिलें गुरुदेवें ।।१३।। तेव्हां ऐसा प्रकार घडला । आईसाहेबां ज्वर भरला। वाढतां वाढतां वाढला । सर्व झाले भयभीत ।।१४।। सद्गुरु वदती ते समयीं । 'आतां तुझा नेम नाहीं। सर्वस्व अर्पीं द्विजपायीं । भक्तिभावेंकरोनिया' ।।१५।। संकल्पें उदक सोडविलें । झांकलें तें बाहेर काढलें । द्विजस्त्रियांसी अर्पिलें । स्वहस्तें श्रीगुरूंनीं ।।१६।। उंची वस्त्रे भरजरी । अलंकार रत्नें गोजिरीं। विप्रां भासे शनि उदरीं । आजिं आला आम्हांसी ।।१७।। अंगावरील वस्त्राविण । सर्वही लुटवितां जाण । प्रकृतीस आला गुण । अघटित करणी सद्गुरूंची ।।१८।। याउपरि कन्या एक। श्रीगुरु घेती दत्तक । वर पाहोन सुरेख । दान करिती सालंकृत ।।१९।। तिचें विठाबाई नांव । मार्डीकर वासुदेवराव । चतुर सुगुणी सवैभव । जामात केला तयासी ।।२०।। लग्नसोहळा चालूं असतां। अद्भुत घडली वार्ता । श्रवण करितां सद्गुरुसत्ता । कळों येईल ।।२१।।

गांवोगांवींचे पाहुणे । आले घेवोनि वाहनें । त्यांतील एक घोडें तरणें । बांधिलें होतें मांडवीं ।।२२।। तों काय झाली मात । अश्व अकस्मात झाला मृत । विप्र जमोनि विचार करीत । आतां कैसें करावें ।।२३।। अंत्यज आणितां मांडवांत । शुभकार्या अशुभ होत । आम्हीं नेतांही अनुचित । दिसेल कीं निश्चयें ।।२४।। बहुत चिंतेमाजीं पडले । महाराजांसी श्रुत केलें । काय उचित ये वेळे । सांगा तुम्ही सर्वज्ञ ।।२५।। महाराज म्हणती द्विजांसी । पाहूं चला अश्वासी । निजलें असेल समयासी । तुम्हां वाटे मृत झालें ।।२६।। अश्वासमीप जावोनि । कृपादृष्टीं पाहती झणीं । वरदहस्तें कुरवाळोनि । म्हणती चैतन्य संचलें ।।२७।। तंव काय नवल झालें । घोडें झडकरी उठलें । चारा खावों लागलें । देखत-देखतां ।।२८।। आश्चर्य वाटलें सकळांसी । अघटित घटना केली कैसी । साक्षात् ईश्वर निश्चयेंसी । लोकोद्धारा अवतरले ।।२९।। नयनीं आनंदाश्रु आले । सर्वांगी रोम थरारले । क्षणक्षणा नमवूं लागले। चरणांवरी मस्तक ।।३०।। असो विवाह सांग झाला । सकलां आनंद वाटला । संतति-संपत्तीनें भरला। संसार विठाईचा ।।३१।। यापरी आणिक किती । गरिबांचे विवाह करिती । जांवयांस नाहीं मिती । त्यांत मुख्य सप्तक ।।३२।। सुखवस्तु श्रीमान । सात साहेब मुख्य जाण । संगतीसुखालागोन । नित्यवास गुरुगृहीं ।।३३।। बहुत सिद्ध होवोनि गेले । त्यांत चौदा मुख्य गणिले । साधनीं अनंत लागले। सीमा नाहीं ।।३४।। कोणी बद्धचि राहिले । कोणी मुमुक्षु झाले । कनिष्ठ उत्तम आणि भले । शिष्य झाले अपार ।।३५।। मायबाप सासू श्वशुर । कांता पति कन्या कुमर । इष्टमित्रांहून गुरुवर । प्रिय वाटती सकळांसी ।।३६।। हितगुज गोष्टी सांगती । युक्तिप्रयुक्ती बोध घेतीं । जेणें होय दुःखमुक्ती । विनविती ते गुरुराया ।।३७।। कोणा साधन नामस्मरण । कोणाकरवीं अनुष्ठान । करवोन दुःखें हरण । करिती ते सकळांचीं ।।३८।। शिष्यसमुदाय रामभक्त । त्यां देवाहून प्रिय संत । परि श्री वदती हें

उचित । नोहे बापा ।।३९।। आधीं देवा नमावें । मग गुरूसी वंदावें । परि तें कोणी आयकावें । बोलका देव आमुचा ।।४०।। जनीं जनार्दन ओळखिला । तो स्वयेंचि देव झाला । प्रत्यक्ष सांडोन प्रतिमेला । पुसे कोण ।।४१।। अनंत अन्याय क्षमा करिती । परि अहंकार नावडे गुरुमूर्ती । साक्षात्कारें छेदन करिती । क्षण एक न लागतां ।।४२।। जाणोन परांचें अंतर । नेमकें देती प्रत्युत्तर। ऐसा घडतां साक्षात्कार । समाधान पावती ।।४३।। कोणी कांहीं करिती प्रश्न । तात्काळ बोलती जें वचन । तेंचि सत्य होय जाण । कालत्रयीं पालटेना ।।४४।। आशा धरोनि पुनरावृत्ति । पुन्हां मांडितां प्रश्नोक्ति । मनाजोगें बोलोन शांतविती । परि पहिलें तें ढळेना ।।४५।। दक्ष तो लक्ष देई । इतरां न कळे कांहीं। आशेनें आंधळें लवलाहीं । करोनि सोडिलें ।।४६।। प्रकृति तितुक्या विकृति । अनेक जातींचे जन येती । चहाडखोर व्यसनी अतिथी । कर्मठ आणि तामसी ।।४७।। अंतरी ओळखुनी अवगुण। तयांसी करिती सावधान । न दुखवितां अंतःकरण । बोध करिती ।।४८।। जरी कोणाची वस्तु गेली । महाराजां श्रुत झाली । सर्वज्ञ म्हणोनि ओळखिली । दुर्बुद्धि कोणाची ।।४९।। एकांतीं जावोनि भेट घेती । वस्तु काढोनि आणिती । म्हणती सांपडली आम्हांप्रति । मार्गावरी ।।५०।। दुर्बुद्धी मनीं खोंचले । म्हणती येथें काहीं न चले । सद्गुरुबोधें त्यागिले । दुर्गुण कित्येकीं ।।५१।। श्रीगुरुतपस्तेजाखालीं । दुर्गुणांची होळी झाली । नरनारी एकत्र नांदलीं । चोर आणि धनिक ।।५२।। कित्येकांसी साधनबळें । दुर्गुण त्यजाया लाविले । स्वर्गाहून अधिक शोभलें। सद्गुरुधाम ।।५३।। स्वर्गीं कामक्रोधांच्या राशी । ईषणा मत्सर भूतांसी । क्षय होय सुकृतासी । नित्यकाळीं ।।५४।। तैसें नव्हे गुरुधाम । सकाम होती निष्काम। जोडती सुकृतें अनुपम । देवादिकां दुर्लभ ।।५५।। कित्येक ते आपत्काळीं । धांवती सद्गुरुपदकमळीं । विनविती जीं तापलीं । दारिद्र्यदुःखें ।।५६।। तयांसी

साह्य करिती । व्रतबंधां नाहीं मिति । विवाह करूनिया देती । गरिबागुरिबांचे ।।५७।। नामस्मरण अन्नदान । यांची गणती करील कोण । दुष्काळीं करिती अन्नदान । कित्येकांलागून । साह्य केलें ।।५८।। जेथें नांदे लक्ष्मीपति । तेथें सहजचि लक्ष्मीची वसति । दानधर्मासी नाहीं मिति । सद्गुरुघरीं ।।५९।। चिंतुबुवा कुलगुरूंसी । आणविलें गोंदावलीसी । क्षेत्र देऊनि तयांसी । राहविलें तेथेंचि ।।६०।। घरची शेती वाढविली । विहीर जमीन सोज्ज्वळ केली । रामसंस्थानाकडे दिली । नूतनही मोलें घेऊनी ।।६१।। रुद्रस्वाहाकार केला । तैसेंचि गायत्रीपुरश्चरणाला । द्रव्य देवोनि तृप्त केला । अनेक वेळां विप्रगण ।।६२।। दुष्काळीं आटपाडीसी । दारिद्र्ये पीडित विप्रांसी । बैसविलें नामजपासी। अन्नवस्त्र देउनी ।।६३।। अठरा कारखाने चालती । प्रतिवर्षीं नूतन इमारती । करोनि बहु शोभविती । गोंदावलीसी ।।६४।। पहिलें मंदिर लहान होतें । यास्तव दुजें बांधिलें तेथें। दिवसेंदिवस दाटी होते । ऐसें मनीं आणोनी ।।६५।। धर्मशाळा बांधिली मोठी । दत्तमंदिर ज्ञानवापीतटीं । भोजनशाळा बांधली गोमटी । तैसेंचि मंदिर शनीचें ।।६६।। भक्तजन उतरायासी । जागा होईना पुरेसी । जाणोनि नूतन गृहांसी । बांधविती ।।६७।। गोठणीं केली गोशाळा । ओढ्यासी घाट बांधिला । दुरुस्त झाली पाकशाळा। पार आणि वृंदावनें । ।।६८।। भाऊसाहेब केतकर । सद्भक्त चतुर कामगार । तयांकरवीं गुरुवर । देखरेख ठेविती ।।६९।। उभय मंदिरापाशीं । शिवालयें बांधिलीं खाशीं । ऐक्य दाखविलें हरिहरांसी । येणें प्रकारें ।।७०।। श्रीगुरूंची सेवा करोनि । देह झिजविला जयांनीं । त्यांचीं नांवें श्रोतेजनीं । अल्पस्वल्प परिसावीं ।।७१।। महाभागवत कुर्तकोटीकर । छत्र धरिती गुरूंवर । पादुका वागविती निरंतर । समागमें राहोनी ।।७२।। भागवतां निरोप झाला जेव्हां । तदनंतर गोविंदबुवा । तैसीच करिती भावें सेवा । मानवां जी दुर्लभ ।।७३।। पंतोजी कोल्हापुरकर । गोरक्षणीं दक्ष फार ।

वस्त्रें धुताती सुंदर । वामनराव ज्ञानेश्वरी ।।७४।। दाढे जे अंताजीपंत । दामोदर दुजे भक्त । श्रीधरभट्ट स्वदेह झिजवित । खजिनदार गुरुघरचे ।।७५।। द्रोण पत्रावळी लक्ष्मण । पुरवी एकनिष्ठेंकरून । भवानराव निळकंठबुवा जाण । इंधनासी पुरविती ।।७६।। हरभट चिंचणीकर जोशी । प्रेमें भजन करिती हर्षीं । मर्ढेकरशास्त्री पुराणासी। नित्य वाचिती मंदिरीं ।।७७।। भाऊसाहेब वनाधिकारी । वाईकर रामशास्त्री । हेही वाचिती मंदिरीं । धर्मग्रंथ ।।७८।। विश्वनाथ अश्व पाळी । मुक्ताबाई पाकशाळीं । आणिकही भक्त मंडळी । देह झिजविती गुरुगृहीं ।।७९।। ज्यांचीं भाग्यें उदया येती । तेचि गुरुगृहीं राबती । अभागी आम्ही मंदमति । चरणधूळ वंदू तयांची ।।८०।। कोणी रांगोळ्या घालिती । गुरुचरण प्रक्षाळिती । उष्टावळी कोणी काढिती । दळण दळती गुरुभगिनी ।।८१।। दामूबुवा कुरवलीकर । सेवें झिजविलें शरीर । सिद्धपणें महीवर । विचरती आतां ।।८२।। गुरुगृहीं काढून केर । नाशिला सर्व संसार । ऐसे असती अनेक नर । वंदू तयां साष्टांगें ।।८३।। ही गोंदावलीची स्थिति । इतरत्रही बहु असती। ग्रंथ वाढेल या भीती । स्वल्प संकेत दाखविला ।।८४।। असो ऐसा संसार । कुटुंबीं जन अपार । अखंड चाले कारभार । उसंत नाहीं ।।८५।। इतुकीही करूनि व्याप्ती। तेथें सदैव नांदे शांती । वृत्तिशून्य योगेश्वर असती । अनुभवा येई प्रत्यक्ष ।।८६।। ज्ञानी स्वप्नींचें वैभव। खोटें पाहे सावयव । असत्य जाणूनि लाघव । सत्यपणें पाहे जैसा ।।८७।। नित्य जलामाजीं वसति। परि जलबिंदूही न धरिती । कमलपर्णें जैशा रीती । तैसे वागती गुरुराव ।।८८।। अथवा आकाश जगव्यापक । माजीं कार्यें होतीं अनेक । चहूंभूतांचें कौतुक । किती म्हणोनि सांगावें ।।८९।। सों सों वारा वाही । धुरळा उठवी ठायीं ठायीं । वाटे आकाश भेदोनि जाई । दिव्यलोकीं ।।९०।। धूमाचे चालिले लोट । विजांचा उठे कडकडाट । मेघ फिरती घनदाट । ठायींठायीं अंबरीं ।।९१।। परि

तें कांहीं मळेना। भिजेना हलेना उडेना । व्यापकता शांति सोडीना । जैसें तैसें ।।९२।। अखंड व्यापार होती जाती । वरिवरी विकारले दिसती । परि डळमळेना शांति । अलिप्त स्वरूपानुसंधानें ।।९३।। जनकराजा कलियुगींचा । वाटे सद्गुरु आमुचा । करोनि व्यापक प्रपंचा । विदेहता नित्य भोगी ।।९४।। असो जनसमुदाय वाढला । वेळोवेळीं बोध केला । जिहीं भावें हृदयीं धरिला । भोगिती ते जीवन्मुक्ति ।।९५।। त्यांतील कांहींसा भाग । त्यांचेचि शब्दें बोलूं मग । श्रवणें निवेल तगमग । मनन क्रिया केलिया ।।९६।। पुढील अध्यायीं निरूपण। सद्गुरुवचनें होईल पूर्ण । चित्तीं धरितां अनुसंधान । समाधान पावेल ।।९७।। प्रपंच आणि परमार्थ । तरोनि साधेल स्वार्थ । सद्गुरुवचन सिद्धांत । येईल हाता ।।९८।। सप्तमाध्याय महौषधि । सेवितां शमे भवव्याधि । स्थिर करोनिया बुद्धि। श्रवणमनन करावें ।।९९।। कामधेनू गृहीं आली । पूजनें अर्चनें तोषविली । सहज होईल पान्हावली । मनोप्सित पुरवील ।।१००।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।१०१।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते षष्ठाध्यायांतर्गतः षष्ठः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**इति षष्ठोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय सातवा

## *समास पहिला*

**जशी माउली ग्रास देते मुलाला । तसें बोधुनी ज्ञान पाजी जनांला ।।**
**धरेसारिखी ज्या वसे नित्य शांति । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।७।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जयजयाजी एकदंता । विघ्नहारी सुखदाता । वंदूं श्रीशारदामाता । जगज्जननी मति देईं ।।१।। साधका साह्य हनुमंत । वंदन करूं तया सतत । भुभुःकारें दुमदुमवित । लोकत्रय ।।२।। तेहतीस कोटी देवमाव । एकचि नटला रामराव । वंदूं दुजा धरूनि भाव। भक्तिसोहळा भोगावया ।।३।। जय जय श्रीगुरुमाय । आम्हां अर्भकांची सोय । अपाय छेदूनि उपाय। करीतसे ।।४।। आमुचें हित आम्हांसी । ठाऊक नसे निश्चयेंसी । परि माय जाणे मानसीं । वेळोवेळां सांवरीतसे ।।५।। लोभछंदें क्रीडा करितां । दुःखगर्तीं पडेल आतां । जाणोन सद्गुरुमाता । निवारीतसे तेथुनी ।।६।। अहंता अज्ञान भरलें । वासनातस्करीं मोहिलें । विषयआमिषा दावोनि नेलें । आडमार्गीं जीवासी ।।७।। विवेकइंद्रियें तोडिलीं । सुकृतभूषणें लुबाडिलीं । जन्ममृत्युदरीं लोटिलीं । अज्ञान बालकें निर्दयीं ।।८।। तेव्हां माय आठवली । दीर्घस्वरें करुणा भाकिली । तंव ती धांवोनि कुरवाळी। त्रिविध ताप हराया ।।९।। माय ममतें कुरवाळी । सद्गुरु माया निर्दाळी । हेतुरहित प्रेमजिव्हाळी । गुरुमायेची ।।१०।। माय एक जन्मींची । गुरुमाय जन्मोजन्मींची । सत्ता त्रिभुवनीं जिची । चाले अखंड ।।११।। माय संसृतींत गोवी । सद्गुरु करीत गोसावी । दुजेपणाची यादवी । उठोंचि नेदी ।।१२।। ऐसी गुरुमाय धन्य । भक्तिरस पाजवी स्तन्य । धरितां आश्रय भिवोन ।

यमकिंकर न शिवती ।।१३।। धरितां सद्गुरुकांस । सीमा नाहीं आनंदास । बेगुमानी कळिकाळास । मानेना अल्पही ।।१४।। माय पर गुरु माय । जी दीन अर्भकांची सोय । चुकवीतसे जन्ममरणघाय । बोधामृत पाजोनी ।।१५।। गुरुमायवचनीं विश्वासले । ते कृतकृत्य होवोनि गेले । नित्य पाहिजेत वंदिले । चरण तयांचे ।।१६।। असो ऐसी गुरुमाउली । आम्हां लाभली गोंदावलीं । बोधकवळ मुखीं घाली । चमत्कृति दावोनी ।।१७।। आम्ही अर्भकें अज्ञान । बसतों हट्ट धरोन । वैभवछंदा दावोन । बोधग्रास घालितसे ।।१८।। ऐसे जे वरचेवरी । ग्रास माय मुखीं भरी । तेचि बोलूं ये अवसरीं । सात्त्विक परम ।।१९।। पादपूरणार्थ[1] कांहीं । क्वचित् येईल नवाई । परि जाणा साक्षात् सर्वही । सद्गुरुवचनें ।।२०।। ऐसा हा विवेकसिंधु । गुरुमुखींचा अनुवादु । सेवितां तो परमानंदु । अनुभवा येईल ।।२१।। गुरुवचनीं अविश्वासे । ऐसा कोण पतित असे । दासबोधीं समर्थें ऐसें । पाहा प्रत्यक्ष कथियेलें ।।२२।। चित्त दुश्चित न करावें । बोल हृदयीं धरावे । म्हणजे संसृतीचे गोवे । तुटोनि जाती ।।२३।। असो गुरुबोधामृत । कवळकवळीं मुखीं घेत । बैसावें जी गुरुभक्त । विनंति माझी ।।२४।। येथें काय निरोपिलें। श्रवणें काय हातीं आलें । तें तें संकलित कथिलें । अवधान द्यावें ।।२५।।

**गुरुबोधो महामंत्रो ब्रह्मचैतन्यधी ऋषिः । देवता रामचंद्रश्च ओवीच्छंदस्तु प्राकृतः ।।१।।**

**धर्महानिः कलौ बीजं श्रद्धा शक्तिस्तु सात्त्विकी । रामनाम जपेन्नित्यं सद्धर्म इति कीलकम् ।।२।।**

नरदेहाचें सार । कांहीं करावा विचार । ना तरी श्वानसूकर । पशु जैसे ।।२६।। स्त्री-पुत्र-देह-रक्षण । हें जीवमात्राचें लक्षण । असेल भगवंताचें अनुसंधान । तरीच मनुष्य म्हणवावें ।।२७।। एवं संसृतिजन्य विकार । तितुके दुःखाचे डोंगर । त्यांतून जावया पार । साधन नरदेह एकला ।।२८।। येथें ज्यानें

**१ ओव्यांचे चरण पूर्ण करण्यासाठीं.**

आळस केला । तो पशूंमाजीं गणला । याकारणें विवेक भला । केला पाहिजे ।।२९।। येथें जें वाटे सुख। तें परिणामीं देई दुःख । याकारणें साधकें विवेक । केलाचि करावा ।।३०।। कलि झाला प्रबळ। विवेकाचें न चले बळ । चित्त झालें विकळ । सुख कोठें दिसेना ।।३१।। अतृप्त वासना दुःख । माया उपजवी शोक । वासना माया दोष अनेक । करविती स्वसत्तें ।।३२।। तेणें चित्त होय आंधळें । विश्रांती कोठें नाढळे । समाधान दुरी राहिलें । वृत्ति स्थिर होईना ।।३३।। परमार्थाचा नाहीं लेश । मायाभ्रमें कासावीस । तेणें गुणें आला त्रास । श्वासोच्छ्वासीं दुःख भोगी ।।३४।। इच्छेचा पाहतां व्यापार । विषयावरी प्रेम फार । कीर्ति असावी महीवर । अभिमान वाहे मस्तकीं ।।३५।। ऐसा संसार दुर्धर । केवळ दुःखाचे डोंगर । यांतचि सुख इच्छी नर । जेवीं दीप्तीं पतंग ।।३६।। ऐसीं दुःखें भोगावयासी । मूळ वासना विवसी । अज्ञानें योजी घातासी । बहुतांच्या ।।३७।। ती वासना कैसी परी । तुज सांगतों निर्धारीं । बाळ खेळोन आलें घरीं । वणवा लावोनी वनासी ।।३८।। तेथें वृक्ष व्याघ्र जळती। वनचर प्राणी नेणों किती । बाळ गृहीं असोन मिति । नाहीं प्राणीवधासी ।।३९।। ऐसी वासना वृथा अज्ञान । नसतेंचि उठवी विघ्न । अलिप्त जीवा जन्ममरण । अज्ञानें घात करितसे ।।४०।। आत्म्यास नाहीं जन्ममरण । हें सत्य आहे जाण । देहाचेनि दीर्घ स्वप्न । पडलें वासनेचेनि योगें ।।४१।। उदकीं उठे बुद्बुदाकार । आत्मत्वीं देहादि विकार । उदक बुद्बुद प्रकार । भिन्न नाहीं ।।४२।। तैसे देह अनंत दिसती । द्वैतभावें जाजावती । परि आत्माराम सर्वांभूतीं । एकला एक ।।४३।। वासनायोगें भेद पडला । तेणें सुखदुःखाचा गलबला । स्वप्नीं राजपद पावला । पदच्युत झाला क्षणामाजीं ।।४४।। सुख वाटलें तेंही मिथ्या । दुःखाचीही तीच वार्ता । परि लोभ शोक अहंता । जाच करिती ।।४५।। सुखालागीं करी तळमळ । आंत वासना मळमळ । देह पद्मपत्रींचे जळ । क्षणएक

स्थिरावेना ।।४६।। जेथें सुखाचें अधिष्ठान । तें नाथिलें अशाश्वत जाण । मृगजळीं शमवावी तहान । म्हणोनि प्राणी धांवतसे ।।४७।। येथें कोणी भेटेल ज्ञानी । तरी सांगेल मृगजळकहाणी । तंववरी हा लक्षयोनि । फिरतचि राही ।।४८।। असो ऐसी ही वासना । प्रपंचीं गोवित जनां । असतीं दुःखें नाना । गणती नाहीं ।।४९।। दारिद्र्य लोभ आधिव्याधि । मन अहंकार माया बुद्धि । दुष्ट वासना भय शोक उपाधि। कामेषणा पीडीतसे ।।५०।। संसारीं सुख इच्छिणें । इंगळावरी झोंप घेणें । दोन्हीं सारखीं प्रमाणें। पहावें सूक्ष्मदृष्टीं ।।५१।। परि तो संसार सोडवेना। सोडूं जातां सुटेना । याकारणें मूळ वासना। नाशिली पाहिजे ।।५२।। वासनाक्षय कैसा करावा । संसार कैसा जिंकावा । तो मार्ग गुरूसी पुसावा। दीन लीन होवोनी ।।५३।। गुरुवाक्य विवरोनि । शरीर झिजवावें साधनीं । मुख्य नेम अनुसंधानीं । वासनाबीज भाजावें ।।५४।। अखंड करावें नामस्मरण अलक्ष्यीं लावावें मन । भक्तिभावें जगज्जीवन । आपुलासा करावा ।।५५।। तरी आधीं करावें काय । केव्हां धरावे सद्गुरुपाय । जेणें चुकती हे अपाय। तेंही आतां परिसावें ।।५६।। स्वधर्म करोनि जतन । कामक्रोधवर्जित मन। शांति क्षमा परिपूर्ण । निर्लोभ निर्ममत्व ।।५७।। निरामय अंतःकरण। भूतीं दया परिपूर्ण। सम दृष्टी ठेवोन। गुणदोष न काढावे ।।५८।। परपीडा परनिंदा। परद्रव्यापहार कदा । परस्त्रीअभिलाषप्रमादा । स्वप्नींही येऊं न द्यावें ।।५९।। पाप भय अनुताप विराग। करोनि अवगुणांचा त्याग । आदरें धरावा सत्संग । सद्गतीकारणें ।।६०।।सद्गुरूसी जावें शरण।चरणीं वहावें तन मन धन। स्वस्वरूप घ्यावें ओळखून। समाधानाकारणें ।।६१।। तरी सद्गुरु कैसा ओळखावा। काय पदार्थ त्यांना द्यावा। कोण अनुभव स्वयें घ्यावा । सद्गुरुपासोनी ।।६२।। या प्रश्नाचें निरूपण । पुढील समासीं होईल जाण । स्थिर ठेवोनि मन। श्रवण करावें ।।६३।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते सप्तमाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणस्तु ।।**

## समास दुसरा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। सद्गुरु बहुत म्हणविती । नाना सोंगें दाविती । भोळ्याभाविकां फसविती । गल्लोगल्लीं कित्येक ।।१।। शब्दज्ञानामाजीं चतुर । वेदान्त बोलती घरोघर । म्हणती उपदेश घ्या माझा थोर । ब्रह्म दावितों तुम्हांसी ।।२।। सद्गुरुहून देव न श्रेष्ठ । ऐसे सद्गुरु आम्ही वरिष्ठ । विपरीत आधार दावून स्पष्ट । भोळ्याभाबड्यां दगा देती ।।३।। कपटबुद्धीनें भोंदुनी । आयाबाया तुच्छ करोनी । गरीब सत्पात्र स्वल्पज्ञानी । यांची करिती हेळणा ।।४।। सत्ताधीश राजे श्रीमान । यांचे होती रजःकण । ऐसें जया विपरीत ज्ञान। त्यास गुरु म्हणों नये ।।५।। जे अधर्मकर्मे सांगती । मजला द्रव्य द्या म्हणती । तयांचा अनुग्रह कल्पांतीं । घेऊं नये कदा ।।६।। द्वेष मत्सर कपट । लोभ तृष्णा वासना खट । भक्तीवांचूनि पोंचट । बोधिती त्यांस मानूं नये ।।७।। ज्ञान गर्व आणि ताठा । म्हणे माझा उपदेश मोठा । तरी तो जाण खोटा । कदापिही घेऊं नये ।।८।। देहबुद्धि नाहीं गेली । परि ब्रह्मविद्या हातीं आली । म्हणती, तयांची साउली । पडों देऊं नये ।।९।। अहं ब्रह्मास्मि निर्मळ । आम्हां नाहीं पापाचा मळ । ऐसें बोलती दुर्जन खळ । ती सत्य कलिमूर्ति ।।१०।। आम्ही ब्रह्म ऐसें बोलतां । ब्रह्म न होय सर्वथा । सोडून द्यावी देहममता । तरीच तो ज्ञानसिंधु ।।११।। मार्ग चालत असतां कांहीं। पाहणेंचें कारण नाहीं । सहज नेत्रीं दिसून येई । जेथींचें तेथें ।।१२।। आम्हीं जाणतों ब्रह्म । हाच दुजेपणाचा भ्रम। अहंता दिसे परम । देहबुद्धीची ।।१३।। ऐसें गुरु बहुत असती। यांचेनि नव्हे वासनानिवृत्ति । जेथें मिळे अखंड शांति । त्यांचीं लक्षणें अवधारा ।।१४।। सद्गुरुस्वरूपाची ओळखण । त्याचें करील वर्णन । ऐसा कोण जगीं निर्माण । मी तों अल्पज्ञ काय

बोलूं ।।१५।। परि थोडें बाह्यलक्षण । त्याचें करूं विवरण । जेणें घडेल समाधान। साधकांसी ।।१६।। दयाशांतीचा पुतळा । जाणे चौदा विद्या चौसष्ट कळा । परि आपण वेगळा । प्राकृताऐसा राहोनि ।।१७।। कामक्रोधा नसे ठाव । नव्हे देहबुद्धीची धांव । एक जाणे रामराव । जनप्रियत्व सर्वदा ।।१८।। जाणोनि निर्गुणाची खूण । सगुण भक्ति परिपूर्ण । सदा बोले सत्यवचन । पुण्यपावन तपोराशी ।।१९।। सकळ तीर्थें येवोनि। घालिती स्नान जयालागोनि । मी मोठा ऐसा मनीं । न धरी अभिमान ।।२०।। जो भवसागरीं बुडत । तया हात देऊनि काढित । शिष्यासी पसरीना हात । कांहीं द्यावें म्हणोनी ।।२१।। क्वचित् शिष्य आपुला । दुसऱ्यासी शरण गेला । क्रोध न येई जयाला । तोचि एक सद्गुरु ।।२२।। जागृति स्वप्न सुषुप्तीसी । तिन्ही अवस्थां एक साक्षी । चौदेह वेगळे लक्षी । ऐसा पाहिजे सद्गुरु ।।२३।। तयासी जावें शरण । तोचि चुकवील जन्ममरण । याव्यतिरिक्त असतां लक्षण। शिष्यसमाधान करीना ।।२४।। कांहींच नसतां ज्ञान । कोरडा धरी अभिमान । हाच अधर्म सत्य जाण। तुवां तेथें नवजावें ।।२५।। गुरुओळख न सांपडे तरी । वरील लक्षणें बाह्यात्कारीं । असलीं तरी चरणावरी । मस्तक ठेविजे ।।२६।। दुजेपणाची मात । विसरोनि जाय तेथ । विनवावे सद्गुरु समर्थ। मोक्षेच्छा धरूनी ।।२७।। बहुत केल्या येरझारा । वासना घेऊं नेदी थारा । मी अज्ञान दुबळा दातारा। शरण आलों तुम्हांसी ।।२८।। मन वैखरी एक करी । अज्ञान दीनत्वातें धरी । अहंता सांडोन दुरी । विनवावें श्रीगुरूंसी ।।२९।। गुरुवचन हाचि स्वार्थ । गुरुवचन हाचि परमार्थ । गुरुवचनावीण व्यर्थ । सकल कांहीं ।।३०।। घेवोनि अनुग्रहप्रसाद। सेवावें सद्गुरुपद । कृपाकटाक्षें जाईल खेद । वासना वृत्ती ।।३१।। सद्गुरुकृपा व्हावयासी । कारण विश्वास निश्चयेंसी । गुरुआज्ञा प्राणासरिसी । मानितां वृत्ति वळतसे ।।३२।। शरण जावोनि गुरूसी । साधनीं झिजवा शरीरासी । साधनस्थिति आहे कैशी।

सांगूं परमार्थी जनहो ।।३३।। शुद्ध साधकाची खूण । मी आणि माझेपण । मिथ्या आळ हा टाकून। शुद्धज्ञानीं रहावें ।।३४।। निरिच्छ सदा असावें । मन जाळून स्वस्थ बसावें । आपले स्वरूपीं मिळून जावें । कल्पनातीत ।।३५।। वासनाबीज जाळूनि । आत्मज्ञान पाहावें झणीं । मग पुनर्जन्मास त्यांनीं । यावें न लागे ।।३६।। सामर्थ्यें मिळवूनि सिद्धी । जगीं मिरविती प्रसिद्धि । उठवोनि जे प्रेतादि । दिवसां मशाली लाविती ।।३७।। पुढें कोणी न बोलत । समस्त राजे पादाक्रांत । आत्मस्तुतीं सदा डुल्लत । आनंदित होवोनि ।।३८।। परि वासनाबीज न मोडे। आणि सिद्ध म्हणविती गाढे । आत्मज्ञानी म्हणती वेडे । तयांलागीं ।।३९।। वासनाबीज गेलें मुरोन । तीच ब्रह्मज्ञानाची खूण । दुधासी घातलें मुरवण । तया दूध कोण म्हणे ।।४०।। वृक्ष पाहतां आहे एक । पल्लव दिसती हजारों लाख । तैसा विश्वीं विश्वंभर एक । भूतें पाहतां अनंतचि ।।४१।। वासना निमालिया पाठीं । आत्मरूप एक दृष्टि । ना तरी भूतसृष्टि। विविध प्रकार ।।४२।। वासना निमालिया पाहीं । देहीं असतांच विदेही। सुखदुःखादि सर्वही । देहाकरितां ।।४३।। धान्य भाजोन काढिलें । परि तें दिसेनासें नाहीं झालें । तैसें दृश्य जरी भासलें । तरी ते निरुपद्रवी ।।४४।। कोणासी न वाटती वांकडे । ऐसे शब्द बोलावे रोकडे । साधन करावें गाढें। जनांसीहि रिझवावें ।।४५।। वृत्ति असावी कल्पनारहित । सदा रहावें ध्यानस्थ । देहभाव त्यजोनि सतत । मन रामीं रंगवावें ।।४६।। मन बुद्धि दुराचारी । देहीं गुंतती बहुपरी । कैंचा पावेल पैलतीरीं। आत्मज्ञान शब्दमात्रें बोलतां ।।४७।। साधनाविणें आत्मज्ञान । अंगीं न बाणे म्हणोन । वृथा बोलूंच नये जाण । अंतरीं मात्र विवरावें ।।४८।। स्वप्नीं बैसला नृपासनीं । जागृतीं भिक्षा दुजे दिनीं । कां नाट्यसदनीं राजपत्नी । झालिया काय प्राप्त ।।४९।। पाळण्या बाशिंग बांधलें । वरात मिरवोनि घरीं आले । तत्क्षणीं तया मूल झालें । ऐसी वार्ता न घडेचि ।।५०।। तदुपरि

साधनाविण । बोलूं नये आत्मज्ञान । साधनीं असावें परिपूर्ण । परि सिद्ध म्हणवूं नये ।।५१।। शंकर करितसे साधन । योगी वैराग्यशील जाण । ऐसा दुजा आहे कोण । त्रैलोक्य धुंडितां ।।५२।। शतकोटीचें काढोनि सार । उमेसह स्मरे शंकर । तेथें मानव बापुडें किंकर । पाड काय तयाचा ।।५३।। पाकनिष्पत्ति न होतां । क्षुधा न निवारे सर्वथा । तेवीं साधनाविणें ज्ञान हातां । येईना निश्चयें ।।५४।। स्वस्वरूपीं व्हावें लीन । ऐसें करावें साधन। परि वृत्ती सांवरोन । साधन दृढ धरावें ।।५५।। साधकस्थिति बाणोनि गेली । ज्ञानदशा प्राप्त झाली । परि वृत्ति पाहिजे सांभाळिली । वाटमारू जाणोनि ।।५६।। जाणावें सर्व वेदसार । सकळ तीर्थांचें माहेर । साधकांचें निजघर । परि नेणतेंसें वागावें ।।५७।। अर्ध हळकुंडें पिवळे झाले । ऐसे बहुत बुडाले । यास्तव साधकें वायचाळे। करूं नये सर्वथा ।।५८।। आणिक एक साधकखूण । मुमुक्षु असावें पूर्ण । तरीच साधनीं गहन । विश्वास राही ।।५९।। मुमुक्षु नसतां चावटी । साधनीं कपाळीं आंठी । त्रासेल आपुले पोटीं । त्याचें काम नव्हे हें ।।६०।। कसाबास नाहीं गाईची दया । जारिणीसी नसे बालकाची माया । तैसें मुमुक्षु नसतां वांया । तो कुतर्की होय बाधक ।।६१।। आतां ऐका श्रोतेजन । गुरुपुत्राचें लक्षण । कोठें चुकलों असेन मी दीन । तरी मज सावध करावें ।।६२।। नव्हे हें माझ्या पदरींचें । जाणा स्वयें गुरुगृहींचें । लक्षण कथिलें निर्गुणाचें । खूण समजा गुरुघरची ।।६३।। निर्गुणाची जाणून खूण । सगुणाचें करावें ध्यान । नित्य नेम जप अनुष्ठान । मानसपूजा करावी ।।६४।। आधीं करून अध्यात्मश्रवण । विवरविवरों निरूपण । तीर्थ व्रत होम दान । साधुब्राह्मणीं आदर ।।६५।। प्रेमें करावें भजन पुराण । वेदशास्त्रीं आस्था पूर्ण । भूतदया समसमान । शांति अतिगहन असावी ।।६६।। लीन असावें प्राणीमात्रासी । मत्सर नसावा मानसीं । ऐसें जाणोन राहसी । तरी श्लाघ्यवाणें ।।६७।। रामचिंतन करीत जावें । वैखरी क्षणही न

विसंबावें । कामक्रोधाचे प्राण घ्यावे । विवेकें सतत ।।६८।। जें वाल्मीकीचें सार । प्रह्लादाचा भाव थोर । मारुति जपे निरंतर । शिव ध्यायी सर्वदा ।।६९।। पार्वती जी विश्वजननी । नित्यनेम जपे स्मरणी । तेंच रामनाम ध्यानीं। आणि मुखींहि असावें ।।७०।। ऐशा नेमाच्या हातवटी । प्राणी कधीं न होय कष्टी । भवबंधन आटाआटी । विरोन होय समाधान ।।७१।। अभ्यास लावितां मना । अंतकाळीं दुजी नुठे वासना । मग जीवा भवबंधना- । पासोनि सोडवितसे ।।७२।। नित्यनेम दृढ करीं । नेम दृढ झालियावरी । देहात्मबुद्धि सत्वरीं । लया जाय ।।७३।। ऐसें हें न होय जरी । दुःख भोगावें लागे जन्मवरी । यमयातना क्लेश भारी । न चुकेचि निर्धार हा ।।७४।। क्लेशें फिरावें देह नाना । चारी खाणी ध्यानीं आणा । यांत संदेह नसे जाणा । दुःख शोक अनिवार ।।७५।। हे मागील होतसे उगवण । आतां राखावें सावधपण । स्वाधीन करावें आपुले मन । भलते भ्रांतीं पडूं नये ।।७६।। देह जातां कष्ट भारी । जरी मनाचे पडशील भरीं । तरी सत्यज्ञान न ये पदरीं । उन्मत्तपणाचेनि गुणें ।।७७।। ब्रह्मज्ञान फार कठिण । राघवाचे भक्तीवीण, । म्हणे मज झालें आत्मज्ञान । तो दैवहीन पापी जाणावा ।।७८।। एकवीस सहस्र सहाशें जप । हें असे शिवाचें माप । यासीच म्हणती अजपाजप । शिव योगी जपतसे ।।७९।। सर्व देवांमाजीं शिरोमणि । अयोनिसंभव लावण्यखाणी । पूर्णब्रह्म जो निर्गुणी । त्या शिवें सृष्टीकारणें देह धरिला ।।८०।। ब्रह्मरंध्रीं कुंडलिनी लाहे । तयानें विषबाधा न जाये। जोंवरी सगुण देह आहे । तोंवरी भजन सोडावें ना ।।८१।। समाधी लावोन बैसती देख । न तुटती देहाचे कलंक । देहसंबंधीं विष निःशंक । नामावांचोन शमेना ।।८२।। देहस्मरण राहे कुडीं । तोंवरी रामनाम न सोडीं । शिव चाखित निजगोडी । मानवाचा पाड काय ।।८३।। म्हणोन सांगितलें साधन। अंतर्निष्ठेची ही खूण । सोडून षड्रिपूंचें बंधन । अखंड चिंतन असावें ।।८४।। रामरूप होऊन

चिंतन करावें । देहाहून वेगळें वागावें । अंतरीं जग पाहावें । कैसें आहे ।।८५।। एका देहाचेचि अवयव। नामकरणीं भिन्न भाव । चैतन्य भरलें स्वयमेव । दृश्यीं राहोन जाणिजे ।।८६।। आपण एक स्मरण एक । हा जाणावा हीन विवेक । चित्त देवोनि थोडें ऐक । आपुलें आपण स्मरण करीं ।।८७।। कागद शाई भिन्न असतां । एक करी लेखक मिळतां । सुवर्णरज आणि सरी पाहतां । एकचि करणी ।।८८।। तैसें अभ्यासावें साधन । मग प्रकृति पुरुष एक जाण । निष्काम करूनियां मन । रामरूप पाहावें ।।८९।। परेपासोन वैखरीपर्यंत । रामनाम घ्यावें सतत । हेंच सार साधका सत्य । मुख्यत्वें जाणावें ।।९०।। वैखरीस रामनाम । न पडावें कधीं खंडण । कोठेंहि न फिरावें मन । तेंचि अधिष्ठान परेचें ।।९१।। वासनाक्षय साधनसार । राम राम दों अक्षर । गुरुमुखीं ओळख सत्वर । कृपेंकरोनि घ्यावी ।।९२।। आतां याहून आणिक । संशय घेसी तरी देख । न दांवीं आपुलें मुख। आम्हांप्रती ।।९३।। ऐसा हा अमृतघुटका । सेवितां दवडील धोका । साधकहो नित्य घोका । मननक्रियेसहित ।।९४।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते सप्तमाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास तिसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः । महान् साधु तत्त्वज्ञानी । माता पिता श्रेष्ठ दोनी । वंदोनि श्रीचापपाणी । बोलूं श्रीसद्गुरुकृपें ।।१।। ब्रह्मज्ञान योगियांचें गुज । जें असे त्रिभुवनीं पूज्य । तेंचि प्रांजल करूं आज । निजनिधरिं ।।२।। मायाब्रह्माचा निवाडा । शुद्ध परमार्थाचा धडा । मुख्य अभिमान सोडा । मुमुक्षु जनहो ।।३।। अभिमान तो म्हणाल कैसा । मी देही म्हणतो ऐसा । या

देहाचा नाहीं भरंवसा । उदकीं जैसें प्रतिबिंब ।।४।। देही म्हणतां अवघें बंधन । देहातीत आत्मज्ञान । ऐसा आधार जाणून । भुलले जन पुन्हां किती ।।५।। देहाभिमान विलक्षण । कामक्रोधाचें बंधन । म्हणती झालें ब्रह्मज्ञान । हा प्रभाव कलीचा ।।६।। क्रियेविण ब्रह्मज्ञान । म्हणे सद्गुरु झाले प्रसन्न । हर हर तो जीव जाण । नाडला विपरीतज्ञानें ।।७।। अर्थ गहन वेदमथित । ऐसें बोलती पंडित । धन्य म्हणविती जगांत । संमत घेवोनि भागवत गीता ।।८।। पुस्तकज्ञानी मिथ्या म्हणों तरी । अवघ्या बुडती नरनारी । परि भाविकां नाडिती भारी । शब्दज्ञान पांडित्य ।।९।। पुस्तकज्ञान सत्य कैसें । असत्य म्हणतां लागेल पिसें । सत्यासत्य जाणोन विलसे । अनुभवी ज्ञानराशी ।।१०।। चारी अवस्थांबाहेर ब्रह्मज्ञान । उन्मनीपलीकडे जाण । तरी हा बोलतो कोण । त्याची शुद्ध तया नाहीं ।।११।। तो जीव होवोनि राही । तेथें ज्ञान नाहीं नाहीं । शब्दब्रह्मीं भ्रमला पाहीं । अनुभव तो वेगळा ।।१२।। चित्राचा वाघ केला । तो काय मारील मेंढ्याला । प्रेताचा गौरव केला । तरी काय सुख तयासी ।।१३।। तैसें शब्दलाघव विचार । कैसा तरेल भवसागर । दृश्य-द्रष्टा-दर्शन प्रकार । त्यावेगळें स्थान माझें ।।१४।। अहंसोऽहं याहून आगळा । माझा मी असें भला । त्रिगुणरहित असे संचला । निवांतपणें ।।१५।। ऐसा वदसी सिद्धांत खरा । तूं निर्गुण म्हणतोस पामरा । विश्व जगाचा थारा। परमात्मा म्हणतोसी ।।१६।। त्या परमात्म्याची चिच्छक्ति । नाहीं बा तुज कल्पांतीं । देहप्रारब्धगती। चुकणार नाहीं ।।१७।। ती असेल तैसी घडो। परि आत्मानुसंधान न मोडो । व्यर्थ नको बडबडों । अवघड असे तुजला हें ।।१८।। पहा रे भ्रांती बसली जडोन। कोणी केला तुझा अपमान । तेणें तुझें दुखलें मन। होय कीं नव्हे ।।१९।। एकं ब्रह्म द्वितीयं नास्ति । ऐसें कथिती वेद श्रुती । तरी मना दुःखितस्थिति । कोठून आली ।।२०।। ‘मी ब्रह्म’ म्हणविसी । आकाररहित अससी। तरी कैसारे उरशी । जगामाजीं ।।२१।।

जगीं भरोन उरला । तोचि म्हणविसी भला । ऐसा तुज भ्रम झाला । शास्त्रग्रंथ पढोनिया ।।२२।। तरी ऐसा पडूं नको भ्रमांत । स्वानुभवें बोलती संत । तेचि शब्द मात्र बोलोनि घात । करिसी तूं आपुला ।।२३।। जगीं म्हणवोनि महंत । बुडविसी जीव अनंत । आतां शुद्ध करोन चित्त । आदि अंत पहावा ।।२४।। परमात्मा निर्गुण निराकार। असोन झाला साकार । तैसाच साधूचा प्रकार । करिती सर्वही कर्में ।।२५।। परि ते कर्में करोनि अलिप्त । तूंही मानिसी तैसेंचि सत्य । या अहंकारें होसी उन्मत्त । येणेंचि जीव नरकीं बुडती ।।२६।। अरे ऐसा अधिकार आला। तो कोणी सांग पाहिला । जोंवरी स्वतःसी ज्ञाता मानला । तोंवरी अल्पज्ञान ।।२७।। चौदेह वाचा चारी । चार वेद अवस्था चारी । चार मात्रा पंचतत्त्वेंवरी । पंचविषयी पंचकोश ।।२८।। पिंड ब्रह्मांड बाह्य सोहळा अघटित । सच्चिदानंद रसभरित । उपनिषदांचा मथितार्थ । तें तूं स्वरूप ।।२९।। ऐशा शब्दे अनुभव येता । तरी सृष्टिक्रम झाला नसता । तें गुरुगम्य न ये हातां । ती शब्दातीत ओळखण ।।३०।। ऐसी परात्पराची खूण । तेथे काय शब्दज्ञान । गुरुपुत्र तें जाणून । भ्रांत म्हणती तुजलागीं ।।३१।। दरवेशानें मर्कट पाळिला । शब्दज्ञानें तया पढविला । घरोघरी संसार मांडिला । पोटास्तव ।।३२।। म्हणे तुझा पति आला । तो लाजून बसे कोंपऱ्याला । सासूची घागर म्हणून दिला । दगड एक मस्तकीं ।।३३।। तत्क्षणीं क्रोधें भारी। फेंकून देत दगड दूरी । पतीचा म्हणतां सत्वरीं । प्रेमें घेत मस्तकीं ।।३४।। काय लाज मर्कटाची। क्रोध येवोन करी ची ची । शिकवण दरवेशाची। मर्कट तो केवळ पशु ।।३५।। तैसें तुझें गुरूचें ज्ञान । हे दृष्टांतें ये दिसोन । पोटासाठीं पराधीन । मर्कट क्रिया करितोसी ।।३६।। राघवाचे भक्तीविण । सत्य सत्य हें अज्ञान । तुझे गुरुही भ्रमिष्ट जाण । जरी शब्दज्ञान बडबडसी ।।३७।। अज्ञान गुरु अडक्यास तीन । मिळाले तरी त्यजावे जाण । लावणी लाविती ब्रह्मज्ञान। गुरुगम्य तें

वेगळें ।।३८।। कर्म उपासना तुच्छ मानिती । सत्कर्म कर्तव्य ज्ञान नीति । परि जें प्रथमांग वेद बोलती । तें साधकासी अवश्य पाहिजे ।।३९।। दुसरें अंग उपासना । तिसरें आत्मज्ञान जाणा । ऐशा सत्पुरुषांच्या खुणा । तुज कैशा न मानवती ।।४०।। तयांसी तूं दूषण दिलें । कर्मउपासनेविण ज्ञान स्थापिलें । हें उचित कैसें गमलें । विवरोन पाहा ।।४१।। वेदान्त म्हणजे क्रियेसहित । आणि पाहिजे अनुभवयुक्त । क्रियेवीण जो वेदांत । तोचि घात जीवाचा ।।४२।। पुत्र प्रसवली स्त्री कोणी । तो थोर झाला तत्क्षणीं । क्षुधा लागली म्हणोनी । अन्न मागे हंडाभरी ।।४३।। तो पुत्र नव्हे ऐसें म्हणती । तैसें कर्म उपासना नीति । सत्क्रिया वैराग्य विवेकज्योति । अणुभरी नाहीं ।।४४।। कामक्रोध असतां । आत्मज्ञान नव्हे सर्वथा । भासलें तें मिथ्या । निश्चितत्वें जाणावें ।।४५।। आत्मज्ञानाचें मुख्य कारण । सगुण पाहिजे सुप्रसन्न । म्हणोनिया भावें भजन । केलेंचि पाहिजे ।।४६।। सगुण साक्षात् नाहीं झालें । नित्यानित्य नाहीं ओळखिलें । आणि म्हणती आत्मज्ञान झालें । तरी हें विपरीत ।।४७।। वेदशास्त्रबाह्य वर्तन । दुराचरण रात्रंदिन । काम-क्रोधीं अंतःकरण । गर्व ताठा भरलासे ।।४८।। जाणे मानापमान। मना आलें तैसें वर्तन । करी सत्याचें खंडण । समाधान नाहीं अंतरीं ।।४९।। परपीडा निंदा करीत । साधु देव ब्राह्मण संत । वेदशास्त्र पुराणमत । यांचा करी अव्हेर ।।५०।। तीर्थ व्रत नित्यनेम । सगुणोपासना भजन सुगम। जप तप साधन परम । दूषण देती यां सर्वांसी ।।५१।। भेदिती दुज्याचें अंतःकरण । भरीं भरोन आपण । ऐसे कलियुगींचे जन । त्यांचें वदन न पाहावें ।।५२।। त्यांसी दूषणही न द्यावें । त्यांचें शहाणपण न ऐकावें । त्यांचे गुण न सेवावे । वाद त्यांसी करूं नये ।।५३।। केव्हांच देतील दगा । अभिमान लावितील अंगा । उपासना पावेल भंगा । हातोहातीं ।।५४।। इतुके प्रकार सांगाया कारण । कलीं दुर्जन वाढला गहन । बहुत पावती पतन । साधनातें सोडोनी ।।५५।।

वरील बोध घेऊन ध्यानीं । आतां कांहीं करा करणी । तेणें व्हाल समाधानी । हे सत्य वेदाज्ञा ।।५६।। सहज सद्गुरुकृपा वोळे । वेदशास्त्र ज्ञान कळे । साधनीं चित्त असतां भलें । सहज होय जीवन्मुक्त ।।५७।। प्रथम आवडे परमार्थ । त्यानें हस्तगत होय चित्त । तैसेंचि साधन करितां सतत । समाधान प्राप्त होय ।।५८।। ज्यासी पाहिजे शुद्धज्ञान । त्याचें सुप्रसन्न असावें मन । वेदशास्त्र पुराण श्रवण । रात्रंदिन करावें ।।५९।। सतत मनन असावें । मनीं अनुसंधान ठेवावें । स्वधर्मरक्षण करावें । उपासनीं प्रेम ।।६०।। दया लीनता आणि शांति । आश्रमधर्म न्याय नीति । असोनि मुका निंदास्तुतीं । साधु-ब्राह्मणीं पूर्ण आस्था ।।६१।। विश्व अवघें परब्रह्मसमान। आपण व्हावें अणुहून लहान । टाकून गर्व दंभ मान । आदर राखावा गुरुवचनीं ।।६२।। घेवोनि सद्गुरुवचन । श्रीरामरूप करीं मन । अखंड करीं रामचिंतन । सुखदुःख सम मानावें ।।६३।। टाकून निद्रा दुर्गुण आळस । गुरुआज्ञे विश्वास । विवेक वैराग्य भाग्यास । उणें नसावें ।।६४।। प्रपंचव्यापारीं खबरदार । संचित-प्रारब्धावरी शरीर । प्रवृत्तिमार्ग साचार । आपण वेगळें असावें ।।६५।। जोंवरी देहाची संगति । तोंवरी पापें पदरीं असती । त्यांची व्हावया निवृत्ति । अनुताप पूर्ण पाहिजे ।।६६।। तरी तो कोणता अनुताप । जन्मजन्मांतरींचें पाप । जीवासी लागलें माप । दारिद्र्य दुःख अपजय ।।६७।। आपणा वाटें मी शहाणा । परि लोक निंदिती आपणां । जीव बहु श्रमला जाणा । क्लेश भोगी अनिवार ।।६८।। पूर्वपापाची संचिति । न चाले उपाय युक्ति । कामक्रोधांची संगति । भ्रांति पडे ममत्वें ।।६९।। सूक्ष्म अहंकार जाईना । वैभवेच्छा सुटेना। वृत्ति आवरितां आवरेना । म्हणोन तळमळ असावी ।।७०।। संसारगिरी कैसा उल्लंघावा । काय भोग भोगावा । काय करूं देवाधिदेवा । ऐसी करुणा भाकावी ।।७१।। तैसेंचि गुरूंसी पुसावें । नित्यनेमें अंतर शोधावें । सुगुण दुर्गुण पाहावे । कैसे उठती ।।७२।। तरूसी लागलें भिरड । कांहीं दिसां नासेल

झाड । तैसें विवेकें विवरोनि जाड । दुर्गुणासी त्यागावें ।।७३।। तो विवेक कैसा करावा । साधनीं देह कैसा असावा । जेणें तुटेल हा गोवा । पुढील समासीं निरूपण ।।७४।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते सप्तमाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास चवथा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। मागां जो प्रश्न झाला । तोचि येथें अनुवादला । संसारगिरि उल्लंघिला । जाईल कैसा ।।१।। सुखें उतरवेल संसार । मातापित्यांसह उद्धार । तें तुज सांगेन सार । वेदशास्त्रगुज ।।२।। योग तपानुष्ठान तीर्थ । धर्म व्रत नेम वेदान्त । सिद्धांत मथितार्थी निभ्रांत । आत्मदर्शी होइजे ।।३।। गुरुकृपेचें अंजन । सहज होय आत्मज्ञान । असत्य मानी तो जाण । गुरुसहित लटिका ।।४।। त्याचें न ऐकावें भाषण । मोठें चातुर्य शहाणपण । मिथ्या पोंचट शब्दज्ञान। संगति पीडा करील ।।५।। हें एक मुख्य लक्षण । आतां सांगतों साधन । ब्रह्मकर्माची खूण । तुम्हांप्रति ।।६।। संध्या स्नान प्राणायाम । अखंड जपा रामनाम । आतां ज्ञानयज्ञ सांगतों सुगम। विवेक अग्नि पेटवावा ।।७।। कामक्रोध जाळावे दोनी । निष्काम वृत्ति ठेवोनि । नामरूपीं चित्त जडवोनि । असावें सर्वकाळ ।।८।। दया शांति करीं जतन । अक्रोध सर्वांभूतीं लीन । जितेंद्रियत्व श्रवण मनन । जनप्रियत्व असावें ।।९।। समसमान सुखदुःख । मान अपमान नसावा देख । शत्रुमित्रा मान एक। भगवद्भाव सर्वांठायीं ।।१०।। आळस निद्रा आणि तृष्णा । लोभ दंभ आणि वासना । यांचें बीज भाजूनि म्हणा। अखंड मुखीं राम राम ।।११।। देह ठेवोनि प्रारब्धावरी । उद्योगधंदा सर्व करीं । परि आपण राहे दूरी । श्रीरामचिंतनीं ।।१२।। हृदयांत स्मरण श्रीराम । म्हणजे वैखरी जपे

नाम । ऐसा ज्याचा नित्य नेम । न विसंबे एकही पळ ।।१३।। विश्वासपूर्वक वचन प्रमाण । तेथें सत्य आत्मज्ञान। या व्यतिरिक्त पाखंड जाण । कलीमाजीं उदंड ।।१४।। जीवन्मुक्ताचें लक्षण । देहदुःखीं नसे मन । अखंड ज्याचें समाधान । स्वानंदभरित ।।१५।। नामरूपीं जडलें चित्त । चारी वाचा नाम गर्जत । धन्य तो एक जगांत । धन्य कुळ धन्य देश ।।१६।। सर्व दुःखांचा परिहार । करी नामाचा गजर । कामक्रोध आवर आवर । आतां तरी ।।१७।। नामस्मरणाविण कांहीं । दुजी वार्ता तूं न घेईं। अखंड जप वैखरी पाहीं । तेंचि परेचें अधिष्ठान ।।१८।। तेणें होईल सर्व काम । हातां येईल पुरुषोत्तम। तोचि आत्मज्ञानी परम । तोचि खरा गुरुपुत्र ।।१९।। नामीं रंगलें अंतर । तोचि ब्रह्मज्ञानी नर । तेथें कोण वैभव काय थोर । हें एक तो जाणे ।।२०।। तोचि गुरुपुत्र गहन । एरवीं जे पुस्तकज्ञान । बहु जल्पती अज्ञान । तेथें अति सावध राहे ।।२१।। आपलें निजनिष्ठेचें साधन । तेथून न ढळावें मन । ही तुज सांगितली खूण । साधकाची ।।२२।। त्यानेंच पावसी आत्मज्ञान । बहुतेक करिती श्रवण । परि निभ्रांत न होती जाण । नामानुसंधानाविरहित ।।२३।। पक्षी बोले 'गंगाराम' । पोपटपंची चतुर परम। परि त्याचें तो न जाणे नाम । अजाणबुद्धि म्हणोनी ।।२४।। तैसा देहाभिमानीं गुंतला । तो काय जाणें भगवंताला । कपटी ताठा गर्वी भरला । धन्य म्हणे मी एक ।।२५।। मज झालें आत्मज्ञान । जग अवघें अज्ञान । हा बुद्धिभेद विलक्षण। निर्गुण ठाव न लागे ।।२६।। सगुणासी देव न म्हणत । अर्थाचा करी अनर्थ । कर्म उपासना म्हणे व्यर्थ। मीच म्हणे झालों देव ।।२७।। काय पराक्रम केला । वेदशास्त्र धुंडाळोनि आला । परि अहंभाव नाहीं गेला। तो सत्य बद्ध जीव ।।२८।। कैसा ज्ञानी म्हणतोसी । मी ब्रह्म जाहलों म्हणविसी । तरी दीनरूप कां होसी । उत्तर काहीं सुचेना ।।२९।। असो ऐसें मानूं नये । भलते भ्रमीं पडूं नये । साधन आपुलें सोडूं नये । महंतीसी फसोनी ।।३०।। सकल देवांचा जो

देव । साक्षात् परमेश्वर गिरिजाधव । तोहि स्मरे रामराव । सिद्धपणा न भोगी ।।३१।। एवं देह जंव सगुण । तोंवरी न सोडावें साधन । जरी आलें सिद्धपण । तरी भजन सोडूं नये ।।३२।। मी ज्ञानी ऐसें मानूं नये । ज्ञानी ऐसें सांगूं नये । सिद्धपणें वागूं नये । जनांमध्यें ।।३३।। येथें एक संशय आला । सिद्ध होवोन मौनी झाला । तरी बोध कैसा होईल जनांला । भवसिंधु तराया ।।३४।। त्यासी एक प्रमाण । गुरुआज्ञा मुख्य जाण । तेणें उद्धरती जन । भवार्णवापासोनी ।।३५।। गुरुआज्ञेवांचून कांहीं । बोध निश्चयें रुजणार नाहीं । यास्तव जंव आज्ञा नाहीं । तंव बोध करूं नये ।।३६।। स्वयें करितां विवरण । आर्त सहज शिकती जाण । यास्तव अधिक उपाधीपासोन । अलिप्त असावें ।।३७।। गुरु अंतरसाक्षी ज्ञाता । शिष्याअंगी पात्रता येतां । आज्ञा करिती क्षण न लागतां । जगा बोध कराया ।।३८।। दुसरें सगुण उपासना । अखंड करितां चालना । सहज पावती समाधाना । संगतीं होय फलप्राप्ती ।।३९।। आणि या राघवाची भक्ति । वाढवावी यथाशक्ति । परि न वाढवावी महंती । सिद्धपणाची ।।४०।। महंती वाढवितां वाढेना । सहज धांवती जीव नाना । कस्तुरीसी शोधिती पहा ना । घोर अरण्यांत ।।४१।। निर्जन वनी मैलागिरी । तो चंदन घरोघरीं । तैसे लोक बोधिले जरी । ज्ञानी ऐसें म्हणों नये ।।४२।। पुनरपि ज्ञानाचें लक्षण । ऐक गुरुकृपेची खूण । दया शांति अति गहन । समदृष्टि असावी ।।४३।। इंद्रियें जिंकावीं समस्त । मन होऊं न द्यावें व्यस्त । अक्रोधवृत्ति भाषण सत्य । भूतीं नम्रता असावी ।।४४।। व्यवहार असावा युक्त । रजतमोगुणविरहित । सगुणोपासना नेमस्त । प्रपंचीं परमार्थ साधावा ।।४५।। अखंड पांचवी अवस्था । सदैव समाधान चित्ता । वेळ व्यर्थ न दवडितां । लय साक्षित्व ठेवावें ।।४६।। सदोदित रामचिंतन । कामक्रोधीं लोभीं मन । कधींही नसावें जाण । अहंकार संपूर्ण छेदावा ।।४७।। मोहमायेसी दूर करावें । जनप्रियत्वही ठेवावें । दुर्बुद्धीसी फिरकों न द्यावें ।

घरांत शांति असावी ।।४८।। बायकामुळें आप्तगोत । सखे सज्जन अभ्यागत । यांचें रक्षण नेमस्त । साधन साधोनि करावें ।।४९।। विवेकयुक्त अंतःकरण । चित्त प्रसन्न करून । निरंतर रामचिंतन । भक्तियुक्त करावें ।।५०।। आतां ऐका वागणूक । नित्य नेम निःशंक । जेणें घडेल सार्थक । नरजन्माचें ।।५१।। प्रातःकाळीं प्रातःस्मरण । प्रथम नमावा गजवदन । जानकीजीवन उमारमण । साधु सज्जन ऋषिमुनी ।।५२।। जनक जननी नद्या सागर । यांसी करूनि नमस्कार । शुद्ध करोनि अंतर । मानसपूजा करावी ।।५३।। घालोनिया सिद्धासन । श्वासोच्छ्वासीं नामस्मरण । अंतरीं ध्यावा सीतारमण । सायुध सालंकार ।।५४।। तैसेंचि ध्यावें गुरूसी । पूजा करावी षोडशी[१] । साधोनिया एकांतासी । नेत्रोन्मीलन करावें ।।५५।। वृत्ति असावी स्वानंदस्मरणीं । चहूंकडील परतवोनी । बळेंचि लावा भगवच्चरणीं । विवेकें सतत ।।५६।। विवेक वैराग्य नाम ही त्रिपुटी । असावी सदा गांठी। काम क्रोध मोह ही त्रिपुटी । दृष्टीसमोर आणूं नये ।।५७।। मान अपमान समसमान । सुखदुःख एक जाण। चिंता नसावी तिळप्रमाण । रामस्मरणीं वैखरी ।।५८।। बहुत विचारें वागावें । सदा संतोषी रहावें । देहा प्रारब्धीं टाकावें । संसारीं प्रयत्न करावा ।।५९।। वृद्धाचार कुलाचार लौकिक । कधीं सोडूं नये देख। शास्त्रविरुद्ध निंदिती लोक । ऐसें वर्तन असूं नये ।।६०।। अन्यायें धन जोडूं नये । परपीडा करूं नये। वादें भरीं भरों नये । भांडूं नये नास्तिकासी ।।६१।। मन वृत्ति कोठें राहते । चित्त काय चिंतीत असतें। हें शोधावें विवेकपंथें । दुर्गुणातें त्यजावया ।।६२।। अहंभाव-वासनारहित । वागावया प्रयत्न सतत । करावा जाणोनि प्राप्त । कलियुग दुर्बुद्धीचें ।।६३।। काळ जन आणि मन । हे ह्या कलीचे स्वाधीन । सद्धर्म सत्कर्म अनुष्ठान । करणें बहु कठिण असे ।।६४।। कलीचा तो ऐसा नेम । कोणी न भजावा

१ षोडपचारसहित.

राम । योग जप तप होम । सत्क्रिया न करावी ।।६५।। म्हणोन बहु सावधान । स्वधर्माचें करावें रक्षण । युक्त व्यवहार करोनि धन । प्रपंच करा दक्षत्वें ।।६६।। करोनिया स्नानसंध्या। श्राद्धपक्ष प्रपंच धंदा । वैखरीसी विसर कदा । नामाचा पडों देवों नये ।।६७।। मन चंचल फिरणार । परि वैखरीं नसावा विसर । वेद शास्त्र गुरुवर । येथें आदर असावा ।।६८।। देव साधु ब्राह्मण । यांचें करावें पूजन। आदिकरोनि दुर्जन । भूतीं दया असावी ।।६९।। सदा शांत असावें । मन निर्लोभी ठेवावें । विषयचिंतन नसावें । सतत करा अभ्यास हा ।।७०।। कोणास तुच्छ करूं नये । गर्वें कधी वागूं नये । असत्य भाषण बोलूं नये । ऊर्मि सतत आवरावी ।।७१।। प्राणान्त बेतला तरी। स्वप्नी न चिंतावी परनारी। तेणें आकळिला श्रीहरी । सत्य सत्य त्रिवाचा ।।७२।। काय देहाचा भरंवसा । कोण दिवस येईल कैसा । काळ संगतीसरसा । हें लहान थोर जाणती ।।७३।। काम क्रोध गर्व वासना । शोक चिंता वैभव जाणा । सुखदुःखादि कल्पना । हेंचि देहाचें देहपण ।।७४।। चित्त शुद्ध नाहीं झालें । तरी जन्मा येवोनि काय केलें । नाहीं देवा ओळखिलें । स्वधर्म तो कोण जाणे ।।७५।। सन्मार्ग तो नाहीं ठावा । संतसंग कोणी करावा । आयता सद्गुरु भेटावा । ऐसें म्हणती वाचाळ ।।७६।। तरी ऐसें करूं नये । प्रयत्नें संतां शरण जाये । नातरी वासना विये । चौऱ्यांशी लक्ष योनी ।।७७।। संतसंगाचीं लक्षणें । सांगतों तीं परिसणें । साधन करा प्रयत्नें। निजहितासी ।।७८।। मनोवृत्तीस आवरावें । देहदुःख विसरावें । धैर्य बल सांभाळावें । विषयवासना आवरावी ।।७९।। छळ कपट शब्दबाण । द्रव्य-दारा-वर्जित मन । जाणोन संताची खूण । सर्वत्रीं लीन असावें ।।८०।। श्रीरामीं प्रेम फार । अभिमान नसे तिळभर । सगुणोपासना निरंतर । हर्ष ना विषाद ।।८१।। भय चिंता भेदाभेद। नसे लोभ ममता मद । उद्विग्न चित्त आणि क्रोध । निंदा न करी कोणाची ।।८२।। न सेवी कोणाचें वित्त । न करी कोणाचा

घात । परदारावर्जित चित्त । आवडी संतसंगाची ।।८३।। असत्य न बोले वाणी । जनप्रिय मधुरवचनी । दया शांति अंतःकरणीं । परदुःखें दुखे मन ।।८४।। परोपकारीं शूर । अंगीं वैराग्याचा भर । विवेक जागृत बरोबर । तोचि संतकदर[१] जाणे ।।८५।। ऐसीं लक्षणें धरावीं। संतसंगगोडी घ्यावी । नित्य जीवीं धरावीं । सद्‌गुरुवचनें ।।८६।।

**इति श्रीसद्‌गुरुलीलामृते सप्तमाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास पांचवा*

श्रीसद्‌गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। आतां ऐका शिकवण । युक्ति बुद्धि शहाणपण । जेणें घडे समाधान । प्रपंचीं आणि परमार्थीं ।।१।। कोणास आशा दाखवूं नये । स्वयेंही कोणाची धरूं नये । कोणास उत्तर देऊं नये । हेतु जाणल्यावांचोनी ।।२।। सुखदुःखाची येतां वेळ । आपलें समाधान न ढळेल । ऐशी वृत्ति सखोल। स्थिर राखावी ।।३।। साधनासी जी सबब । ती नुकसान स्वयंभ । याकारणें साधन दुर्लभ । तेंचि आधीं साधावें ।।४।। जपासी बैसल्यावरी । कोणी द्रव्य घालील पदरीं। अथवा पितामह जरी । आला तरी बोलूं नये ।।५।। नाम जपा श्वासोच्छ्वासीं । भजा श्रीरामरायासी । याचनावृत्तीनें कोणासी । कांहींही मागूं नये ।।६।। जो हिशोबी पैशाचा। तोचि दरिद्री साचा । जेथें आयात-निर्गतीचा । हिशेब नसे तो धन्य ।।७।। याकारणें द्रव्यचिंतन । कदा करूं नये जाण । आशाळभूत आपुलें मन । कदापि असूं नये ।।८।। या मृत्युलोकामाझारीं । रोग नाश शरीरीं ।

**१ संताचा प्रभाव, थोरवी.**

होणार हें निर्धारीं । त्यांचें दुःख मानूं नये ।।९।। देहममता सांडावी । आशा तृष्णा सोडावी । रामभक्ति करावी। म्हणजे रामचि होय ।।१०।। ज्यांची जयावरी प्रीति । तेंचि रूप ते होती । अंतकाळीं उपजे सन्मति । तोचि अभ्यास करावा ।।११।। स्त्रियांचें रूप आणि भाषण । शब्द स्पर्श ममता जाण । कधींही प्रिय न मान । जरी परमार्थ तुज व्हावा ।।१२।। प्रेम क्वचितचि साच असतें । बहुतेक साधकां नाडितें । यास्तव वारेंहि अंगावरुतें । पडों देऊं नये ।।१३।। ध्यानीं धरावे पुढील नेम। धरितां होईल आराम । तोचि परमार्थ परम । अन्यथा अवघी मळमळ ।।१४।। अजिंक्य मन जिंकीं सदा । परपीडा परनिंदा । परदारा परापवादा । परदोषा न पहावें ।।१५।। सुख दुःख मानापमान । हर्ष विषाद समसमान । दंभ गर्व त्यागोन । सत्य शांति धरावी ।।१६।। अक्रोध जनप्रियता । निर्लोभता विवेक समता । भूतीं दया विरक्तता । लय साक्षिता असावी ।।१७।। भगवद्भक्ति प्रेमरस। आत्मज्ञानाचा हव्यास । स्वानंद स्मरण श्वासोच्छ्वास । चित्त निर्विषयक असावें ।।१८।। दुर्जन छळावया येती । तरी राखें समाधान नीति । साह्य होईल श्रीपति । प्रयत्नें निवारितां ।।१९।। धर्मसंकट महान आलें । तेथें नीतीनें वागले । धनाशें अधर्मीं न गुंतले । तेचि धन्य सत्पुरुष ।।२०।। उदरभरण लागे करावें । म्हणोनि उद्योगी असावें। नीतिन्यायें जोडावें । अल्प धन ।।२१।। परमार्थ निका साधीत जावा । अल्पकाळ धंदा करावा । देह सेवेसी न विकावा । धनिका वा नृपासी ।।२२।। प्रारब्धें घडेल ताबेदारी । तेथें राखा खबरदारी । भाकरी दे त्याची चाकरी। कुचराईविण करावी ।।२३।। जो असे निरपेक्षा । त्यानें वरावीं दीक्षा । उदरापुरती भिक्षा । मागोन साधनीं रमावें ।।२४।। आतां सांगूं स्त्रीधर्म । पति हें दैवत परम। अंतरीं ध्यावा श्रीराम । शुद्ध भाव ठेवोनी ।।२५।। जरी पति रागीट तामसी । तरी सोसावें बोलासी । अथवा ग्रासला रोगें बहुवसीं । तरी वीट मानूं नये ।।२६।। पतिसेवा

मुख्य साधन । पतिवचन मुख्य प्रमाण । सदा संतोषी ठेवी मन । सत्कार्यें पतीचें ।।२७।। पतीवांचोन इतर पुरुष । बाप बंधु मानून त्यांस । अखंड नामस्मरणास । जपत जावें ।।२८।। काम क्रोध लोभ वर्जून । सदा करा सत्य भाषण । पतीने आज्ञा दिल्याविण । इतर साधन न करावें ।।२९।। पति असतां दरिद्री । संतोषी असावें घरीं। परवैभव परोपरी । वांछोनि न हिणवावें ।।३०।। पतिआज्ञा पंचप्राण । अंतरीं अखंड नामस्मरण । ऐशिया माउलीचे चरण । वंदूं आम्ही ।।३१।। आमुची कथा कायसी । देव साधु वंदिती तिसी । उद्धरील उभय कुळांसी। पतिव्रता माउली ।।३२।। स्त्रियेसी पति दैवत । पतीचा स्त्री डावा हात । त्यानेंही निववावें तिचें चित्त । सद्धर्मा अनुलक्षोनी ।।३३।। असो पातिव्रत्या जपावें। धैर्य बळें सांभाळावें । संकटकाळीं आळवावें । भगवंतासी ।।३४।। ऐसा असे स्त्रीधर्म । सद्गुरुवचनामृत सुगम । सेवितां हरतील श्रम । जे मायामोहें भासले ।।३५।। वडिलांची आज्ञा पाळिती। तीच जाणा गुरुभक्ती । येणेंचि घडे सायुज्यमुक्ति । देव साधु मानिती ।।३६।। अखंड नामस्मरण करणें। सोपें आहे कठिणपणें । चित्त मलिन असे याकारणें । फुकाचें नाम घेववेना ।।३७।। अनंतजन्मींची विषयासक्ति। तेणें चित्तें मलिन होती । याकारणें बळें वृत्ति । नामस्मरणीं लावावी ।।३८।। अभ्यासें जरी नाम वाढे। तरीच चित्तशुद्धि घडे । संकल्प-विकल्प भगदाडें । भरोन येती ।।३९।। मग नामीं लागेल गोडी । वासना जाय देशोधडी । सद्गुरु होवोनि नावाडी । रामभेटी करील ।।४०।। नामीं जितुकी गोडी कमी। तितुके दोष अंतर्यामीं । चित्त मलिन विषयधामीं । गेलें ऐसें जाणावें ।।४१।। मीठ कडू लागेल जरी । तरी ज्वर असे शरीरीं । जाणोन उपाय सत्वरीं । करावा लागे ।।४२।। अमृताहून नाम गोड । साधु बहु करिती कोड । परि आपणा वाटे अवघड । आपुल्या पूर्वपापें जाणावें ।।४३।। यास्तव धरोनि नेट । बळेंचि करी नामपाठ । तरीच भवसागर हा अफाट । तरशील तूं

।।४४।। या कलियुगाचे राहाटीं । नामावांचोन होसी कष्टी । नामें प्राप्त पुढील गोष्टी । अन्य साधनें होती ना ।।४५।। साधनीं उपजेल गोडी । गुरुकृपा होईल गाढी । विमलज्ञानाची परवडी । बाणेल सत्य अंतरीं ।।४६।। शांति भक्ति आणि मुक्ती । प्रपंचीं आणिक परमार्थीं । विघ्नें बाधा न करिती । समाधान अक्षय ।।४७।। नामें विमल ज्ञानोदय । स्वयंसिद्ध अप्रमेय । जें पाठका दुर्लभ होय । नामधारका सुखसाध्य ।।४८।। प्रपंचपरमार्थ-संकटीं । नाम पावे उठाउठी । नामावांचोन जगजेठी । धांव न घेई ।।४९।। अहो जे शिष्य सज्जन । करिती गुरुभक्ति नामस्मरण । तयां मी सदा सन्निधान। पाठींपोटीं रक्षितसें ।।५०।। विषयी पोसी जैसा काम । अथवा कृपण रक्षी जैसा दाम । तैसा जोडावा श्रीराम। साधकानें ।।५१।। त्रैलोक्य व्यापून उरला । दशांगुल परमात्मा भरला । तोचि पूजीत जा भला । हृदयमंदिरीं ।।५२।। आधीं चित्त शुद्ध व्हावें । तरीच तें ध्यान ठसावे । चित्तशुद्धीकारणें घ्यावें । रामनाम अखंड ।।५३।। अखंड व्हावया नामस्मरण । मुख्य उपाय सतत प्रयत्न । नित्यप्रयत्नें उल्लंघोन । महागिरि मुंगी जाय ।।५४।। रुक्मांगदादि स्वयें तरले । तीहीं इतरांही तारिलें । खरें पाहतां तेही जन्मले । आम्हांसारिखे मानवचि ।।५५।। याकारणें देहबुद्धि । सोडोनी जोडा ज्ञाननिधि । देहबुद्धीची उपाधि। मनाहोनि कठिण आहे ।।५६।। सर्प मरोन गेला । परि सांगाडा असे पडला । तया हात लागतां दचकला। प्राणी जैसा ।।५७।। प्रेत म्हणजे केवळ माती । परि त्यातेंचि लोक भिती। देहवासना धरोनि राहती । कित्येक जीव स्मशानीं ।।५८।। देहीं नव्हे जो आसक्त । तोचि एक जीवन्मुक्त । देहबंधनें हीं सतत । तोडीत जावीं ।।५९।। मरणाची तयारी असावी । वासना कोठें न गुंतावी । गुंततां यातना भोगावी । लागेल पुढें ।।६०।। मुलांनीं खेळ मांडिला । बाहुलाबाहुली संसार केला । मातेनें संबोधितांचि टाकिला । जेथील तेथें ।।६१।। क्षणामाजीं विसरोनि जाई । तैसें उदास

सर्वां ठायीं । चित्त एक रामापायीं । रामीं ज्योत मिळवावी ।।६२।। हें परिसतां सुलभ वाटे । आचरूं जातां हृदय फांटे। दक्ष तोचि काढी नेटें । मोहळासारिखें ।।६३।। निद्रा आळस चित्त मलिन । अश्रद्धा थोरवी विषयध्यान। टाकोन हें पापलक्षण । देहबंधन तोडावें ।।६४।। मरोन जांता आपुली गोष्टी । कांहीं मागें रहावी सृष्टीं । ऐसें वर्तन जीवनराहाटी- । माजीं कांहीं असावें ।।६५।। जगाचें हित करूं इच्छिती । सामर्थ्य पाहिजे तयांप्रति । म्हणोनि आधीं भगवत्प्रीति । संपादिली पाहिजे ।।६६।। शब्दज्ञान बडबडे । प्रसंग येतां दरडीं दडे । तोहि संतां नावडे । शब्दज्ञानी आळशी ।।६७।। धरितां कांहीं साधन नीति । सद्गुरु तया तारिती । सद्गुरु तारतील म्हणती । आळशी वा वितंडवादी ।।६८।। बुडतिया नरासी । दोरी देती धरावयासी । न धरी अविवेकी आळशी । तरी दोष कोणाचा ।।६९।। येथें दुज्या बोल नाहीं । आपुलीचि करणी सर्व ही । यास्तव अभ्यास प्रत्यहीं । केलाचि करावा ।।७०।। असो ऐसी गुरुमाउली । बोधपान्हा पान्हवली । सुवत्सें सेवितां धालीं । कितीयेक ।।७१।। सकलांअध्यायीं मेरुमणि । हा सप्तमाध्याय गुरुवाणी । ठेवितां सदा स्मरणीं । भवजाचणी लया जाईल ।।७२।। सद्गुरुवचनें हीं सरस । परि पाद-अर्थपूर्ततेचे दोष । घडलिया श्रोतेजनीं या दीनास । क्षमा करावी ।।७३।। पुढील अध्यायीं निरूपण । गुरुकृपें समाधान । पावले इह पर कोण । कांहीं विशद होईल ।।७४।। कृपामृताचा सागर । सच्छिष्य जलचरें अपार । समस्त गणती करणार । ऐसा कवण ।।७५।।इति श्रीसद्गुरुलीला।श्रवणीं स्वानंदसोहळा।पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।७६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते सप्तमाध्यायांतर्गतः पंचमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**इति सप्तमोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय आठवा

## *समास पहिला*

**किती प्रार्थिती कामना पूर्ण व्हाया । किती भाविती देहव्याधी हराया ।।**
**कृपादृष्टिनें त्यांसि आनंद देती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।८।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जयजया सद्गुरु क्षीरसागरा । अपरंपारा परात्परा । भक्तजनमनोहरा । आंनदरूपा ।।१।। तुझिये उदरामाजीं । अनंत जलचरें असती राजी । अनंत भक्त झाले गाजी[1] । पयःपान करोनी ।।२।। कृपामृताचा भरला पूर । नाकीं तोंडीं गेलें नीर । सर्वांगी भरली सार । गुरुभक्ती ।।३।। तेणें गेले तळासी । जेथें क्षीरसागरनिवासी । लक्ष्मी चरणाची दासी । शेषशय्ये पहुडले ।।४।। दर्शनें आनंदित झाले । पुन्हां संसृतीस न आले । तुजमाजीं बुडोनि तरले । हें नवल गुरुराया ।।५।। सद्गुरुसागरा तुमचे पोटीं । अनंत रत्नें असती गोमटी । मोलें वसुंधरा थिटी । तीं भाग्यवंता लाभती ।।६।। भक्तिप्रवाल ठायींठायीं । वेल पसरले रीघ नाहीं । शांती मौक्तिकें शोभतीं पाहीं । अमोल आणि सतेज ।।७।। कीर्तीच्या उसळती लाटा । अनुहतध्वनी गर्जे मोठा । मायादरडीसी चपेटा । मारून झिजविती ।।८।। साक्षात्कार फेन भरला । तेणें जीवा चटका लागला । असंख्य समुदाय लोटला । तुमचे चरणीं ।।९।। भोळे भाविक सज्जन । धरिती देवा तुमचे चरण । भेटविले सीतारमण । क्षीराब्धिवासी ।।१०।। असो ऐसी गुरुमूर्ति । स्तवितां थकले वेद श्रुति । तेथें मानव अल्पमति । वदतां बोल न स्थिरावें ।।११।। शब्दब्रह्म हें फोल । व्योमीं भ्रम भासला चंचल । तेणें

१. शूर, यशस्वी.

नातुडे निश्चल । निश्चयें गुरुपद ।।१२।। शब्दलाघव हावभाव । हीं तों चंचल माव । अनुभवी घेई अनुभव । तो याहून निराळा ।।१३।। अज्ञानिया शब्द गहन । तेंचि तया अधिष्ठान । तेथेंचि त्याचें समाधान । अकुंचितपणे ।।१४।। परि तेचि देवें अंगीकारले । तयाकारणें तैसेचि झाले । पत्रें पुष्पें फलें आणि जलें । तोषले परमात्मा ।।१५।। तैसी उपमा श्लाघ्य नोहे । परि आवडी अंतरीं उठताहे । तेणें बोलणें घडलें हें । मानूनि घ्यावें ।।१६।। दीन दासांची माउली । अज्ञान अर्भकांची साऊली । भक्तकाजार्थ पावली । कलियुगीं मर्त्यलोकीं ।।१७।। तेथें अनंत शरण आले । कृपाप्रसादा लाधले । निजहित साधोनि पावले । समाधान ।।१८।। तीच येईल पुढती कथा। त्याचा तोचि बोलविता । अगाध सिंधु तरोनि जातां । शक्ति कैंची आम्हांसी ।।१९।। श्रींनीं देशोदेशीं प्रवास केला। तेथें तेथें समुदाय वाढला । दर्शनें वेध लाविला । परांतरासी ।।२०।। साधु आले ऐसें वदती । बहुत लोक दर्शना जाती। दर्शंने आनंदित होती । तपाचेनि तेजें ।।२१।। नास्तिक खट बाष्कळ । आर्त जिज्ञासू निर्मळ। प्रापंचिक कामनेनें विकळ । झाले जे कां ।।२२।। अथवा त्रिविधतापें जे पोळले । किंवा ज्ञानाचे भुकेले । परमार्थ हेत धरूनि आले । ऐसे बहुत ।।२३।। कित्येक उगाच पाहूं येती । कोणी परोत्कर्षें झोंबती । कितीएक कर्मठ निंदिती । नामधारकां ।।२४।। ऐशा जाती अनेक । कित्येक केवळ भाविक । पाहों येती सहेतुक । गुरुराज योगी ।।२५।। शुद्धाशुद्ध भावना । धरोन येती लोक नाना । नाना जीवांच्या कल्पना । किती म्हणोनी सांगाव्या ।।२६।। दृष्टादृष्ट होतां पाहीं । ऊर्मी मावळती सर्वही । भक्तिपाझर फुटे हृदयीं । नम्र होती गुरुचरणीं ।।२७।। जीवाचा जीवलग शिव । तो निर्विकल्प घेई धांव । निर्विकल्प गुरुराव । स्वतेजें नमवीतसे ।।२८।। जनीं जनार्दन ओळखिला । द्वैता ठाव कोठें उरला । आपआपणा भेटता झाला । सहजीं सहज आनंद ।।२९।। अज्ञानी विकल्पी निवाले । अहंकार

राउत आडले । जेणें जग निर्माण केले । मिथ्या माया जगडंबर ।।३०।। तेणें घेतली झुंजणी । झुंजता गेला पळोनी। वायु जैसा गगनीं । विरोन जाय ।।३१।। असो संगतीं आले ते तरले । दर्शनें आनंदित झाले । ज्ञान शांति साक्षात्कार भले । पाहोनि झाले चकित ।।३२।। भूतीं दया आणि सत्ता । राजयोग आणि नम्रता । नीति भक्ति विरक्तता । दाक्षिण्यहि सर्वत्र।।३३।। रामनामाचा गजर । उपासना निरंतर। स्वधर्मकर्मीं आदर । लीनता पाहोन लीन होती ।।३४।। जो साक्षात् हनुमंतअंश । तया वर्णिता कोण पुरुष । बाह्य लक्षणें कांहीं विशेष । अल्पबुद्धीनें कथियेलीं ।।३५।। जे जे कोणी शरण आले । ते ते सन्मार्गीं लागले । इहपर सौख्य पावले । भावनेसारिखे ।।३६।। चौदा सिद्ध झाले असती। ऐसें सद्गुरु बोलती । आणीक होतील त्यां मिती । कोण करील ।।३७।। गुरुवचनी विश्वास धरिला। तो तो तरोनिया गेला । विकल्प आळस ज्यानें केला । तो राहिला ऐलीकडे ।।३८।। या भव्य भरतखंडांत । अनंत झाले पदांकित । त्यांचा न लागे अंत । कांहीं प्रसिद्ध कथन करूं ।।३९।। सकळां करूं नमस्कार । जे सद्गुरूंचे किंकर । तुमच्या कथा वर्णावया थोर । मति द्यावी दासासी ।।४०।। समर्थ आणि कल्याण । तैसे श्रीगुरु आणि आनंदसागर जाण । यांची कथा विस्तारून । निरोपिजेल आतां ।।४१।। मोगलाईमध्यें अंबड तालुका । तेथें पिंपळगांवीं निका । कुळकर्णी अंताजीपंत देखा । गांवकामगार सुशील ।।४२।। तयासी झाला एक सुत । गोविंदनामें संबोधित । बुद्धि देखोन चकित होत । लहान थोर ।।४३।। कांहीं काळ लोटल्यावरी। अंतोबा गेले इंदुरीं । कांहीं धरोन चाकरी । प्रपंचभार चालविती ।।४४।। गोविंदा थोर झाला । तंव शाळेसी घातला । तेथें भजन करूं लागला । आणि पोरां शिकवीत ।।४५।। म्हणोनि शाळे येवों न देती । इतरां बिघडवील म्हणती । यासी सरासरी लिहिण्याप्रती । येऊं लागले ।।४६।। शिवालयीं जावोन बैसावें । आदरें रामनाम घ्यावें ।

दासबोध विवरीत असावें । सर्वकाळ येकांतीं ।।४७।। ऐसें क्रमितां समयासी । पंत झाले वैकुंठवासी । दशवर्षें गोंविंदासी । माय अत्यंत दुखावली ।।४८।। कांहीं येईना शेतसारा । भाऊबंदें केला पोबारा । क्षत देखून चोंच मारा । म्हणती काक जैसे ।।४९।। गृहीं अत्यंत गरिबी आली । पुंजी सर्व संपोन गेली। गोविंदें लिखाई धरिली। निर्वाहाकारणें ।।५०।। अर्ज चिठ्ठी लिहून द्यावी । कांहीं मजुरी मिळवावी । खर्चापुरती गृहीं द्यावी । उरलीया धर्म करी ।।५१।। अंध पंगु भिकारी । यांची येत करुणा भारी । तयांलागीं साह्य करी । द्रव्यद्वारां ।।५२।। ऐसा गेला कांहीं काळ । फावल्या वेळीं जपे नाममाळ । दासबोध सर्वकाळ । वाची आणि मनन करी ।।५३।। अभ्यासें गोडी लागली । अंतरीं उदासीनता आली । गुरुभेटीची आर्त लागली । उद्यमीं जाहलें दुर्लक्ष ।।५४।। सिद्ध साधु बैरागी । आलिया भेटती वेगीं । प्रश्न करिती तयांलागीं । अध्यात्मविषयीं ।।५५।। जेणें दासबोध विवरिला । तेणें बिकट प्रश्न केला । प्रत्युत्तरें भांबावला । दिसे साधु ।।५६।। आणिक लक्षणें पाहती । भक्ति उपासना नीति । कांहींच नसतां उपहासिती । पोटभरु म्हणोनि ।।५७।। जन भुलवायाकारणें । देहाची विटंबना करणें । यापेक्षा उदरीं कांटे भरणें । फार बरें ।।५८।। ऐसे बहुत उपहासिती । अंतरीं गुरुभेटीची आर्ति। कोणी भेटेल ज्ञानज्योति। जागोजागीं पाहातसे ।।५९।। गुरुप्राप्तीलागून । नित्य प्रार्थिती हनुमान । सेवा करिती अतिगहन । सद्गुरु भेटावा तुम्हांऐसा ।।६०।। जैसे दिवस गेले । तैसें अंतर तळमळलें । वैराग्य शरीरीं खवळलें । धंदा सर्व सोडिला ।।६१।। एकदां माय गांवीं जातां । चीजवस्तु वांटिली समस्तां । भिक्षाहारें उदरपूर्तता । करूं लागले ।।६२।। माय अत्यंत शोक करी । पुत्रा आठवली मधुकरी । प्रारब्धगति विचित्र सारी । देवा कैसी केली तुवां ।।६३।। गोविंदें लोकलाज सांडिली । एकांतवसति आरंभिली । चित्ताची मलिनता गेली । देखतदेखतां ।।६४।। क्षेत्र नांगरून

तयार केलें । वैराग्यजळें तुडुंब भरलें । कृषीवल ते शोधीत आले । ज्ञानबीज पेराया ।।६५।। एकदां दासबोध वाचीत असतां । महाराज देखिले अवचितां । दृष्टादृष्टीं एकतानता । होवोनि गेली ।।६६।। देहाची स्मृति उडाली। चिदानंदीं वृत्ति रमली । तंव इकडे गुरुमाउली । निघोन गेली ।।६७।। एक प्रहरें सावध होती । तंव न दिसे गुरुमूर्ति । गल्लोगल्लीं शोधित फिरती । आनंदकंद गुरुलागीं ।।६८।। कोणी सांगा समाचार । कोठें गेले गुरुवर । नयनीं चालला अश्रुपूर । पुसों लागले सर्वांसी ।।६९।। भव्य रूप दिव्य कांती । पायीं खडावा असती । कफनी फरगुल घालिती । मस्तकीं टोपी शोभतसे ।।७०।। कंठीं वैजयंतीमाळा । केशर कस्तुरी त्रिपुंड्र भाळा । भोंवतीं भक्तांचा मेळा । राम राम गर्जतसे ।।७१।। कोणी सांगती ते समयीं । दिवाण काटापूर गृहीं । कोणी साधु असती पाहीं । शीघ्र जावोन भेटावें ।।७२।। धांवत गेले तेथूनी । देखिली नयनीं गुरुजननी । देह लोटिला चरणीं । कोण वानी तें सुख ।।७३।। उठवोन देती आलिंगन । आनंदसागर ऐसें म्हणोन । पोटीं धरिती कुरवाळोन । अनुतापा निववितो ।।७४।। तैंपासोन नाम आनंदसागर । वदों लागलें नारीनर । गोविंदबुवा गुरुवर । ऐसेंहि कोणी म्हणती ।।७५।। प्रश्नोत्तरें दिवसरात । होते तेथें आनंदांत । परि त्यांची माय होय चिंताग्रस्त । वेड लाविलें बाळासी ।।७६।। येवोन निंदों लागली । 'पुत्राच्या जन्माची माती केली । मर्कटाहातीं कोलती दिली । आजिं तुम्हीं' ।।७७।। सद्गुरु म्हणती 'अहा माय । तुमचें भाग्य पावलें उदय । जन्ममरणादि चुकवील घाय । बेचाळीस कुळांचा ।।७८।। ऐसा पुत्र लाधला । आणि म्हणतां वेडा झाला । तुम्ही माझे अनुरोधें चाला । तुमचे मनोरथ पुरतील ।।७९।। रामसेवा करितां सतत । सर्व पुरतील मनोरथ । तुम्ही असावें निश्चिंत । भाग्यें लाधला सुपुत्र' ।।८०।। बोध करितां भ्रम गेला । उभयतां अनुग्रह दिला । नेम घालोन दिधला । भवसिंधुतारक ।।८१।। आनंदसागर करिती सेवा ।

सेविती स्वानंदाचा मेवा । तो प्रकार श्रवण करावा । भाविक जन हो ।।८२।। गुरुसेवेहून सार । न मानिती दुजें थोर । गुरुआज्ञेवरी विकल्प विचार । अणुभरी धरिती ना ।।८३।। स्नान करितां अर्धवस्त्र भिजलें । आणि समर्थें बोलाविलें । त्वरित तैसेचि निघाले । ऐसी भक्ती ।।८४।। भोजनीं हातीं धरिला घांस । हांक येतां त्या समयांस । तैसाचि ठेवोनि तयास । धांवत जाती ।।८५।। सद्गुरु अंतर पाहती । जपानुष्ठाना बैसविती । एक दोन दिनराती। अन्नोदकाविण ।।८६।। तरी न मानिती खेद । वाटे तो महदानंद । आज्ञा झाली हाचि प्रसाद । विशेष मानिती ।।८७।। असो सेवेचा ऐसा प्रकार । नित्य झिजविती शरीर । जाळिले दुरितांचे डोंगर । गुरुकृपा संपादुनी ।।८८।। उन्मनी अवस्था जै आली । पिशाचवत् वृत्ती झाली । श्रीगुरूंनीं शांतविली । कृपादृष्टी करोनी ।।८९।। ज्ञानोर्मीसी शमविता । गुरुवांचोन नसे त्राता । पाठीं पोटीं संरक्षिता । एकलाचि गुरुराणा ।।९०।। तैशाचि अष्ट महासिद्धि । साधकां घालिती उपाधी । शुद्ध भावें दयानिधी । गुरुनाथ तारितसे ।।९१।। उभयतां निरोप देती । नर्मदातीरीं बढवाईप्रती । जावोन राहावें शीघ्रगती । जप दासबोध चालवावा ।।९२।। दहा समास दिधले काढोनी । तैसाचि जप नेमोनी । नित्य असावें उपासनीं । ऐंशी हजार दिनसंख्या ।।९३।। तंव विरहें दुःखी झाले । परि निरुपायें निघाले । बढवाईचे रानीं राहिले । खोपट करोनी ।।९४।। ग्रामीं भिक्षा मागोनि । निर्वाह करिती आनंदानें । जप दासबोधवाचनीं । क्रमिती काळ ।।९५।। दासबोध विवरीत असतां । पक्षी बैसती सभोंवता । दाणे टाकिल्याही न खांता । श्रवणीं होती तल्लीन ।।९६।। एक माळी नामें हनुमान । श्रवणा बैसे येवोन । रामनाम अनुदिन । घेतसे भक्तीनें ।।९७।। तयासी आधीं झाले ज्ञान । रामरूप पाहे भुवन । सर्पासी करी वंदन । राम राम म्हणोनी ।।९८।। ऐसा काळ चालिला । आनंदीआनंद वाढला । दिवस आला आणि गेला । हे न कळे

तिघांसीही ।।९९।। पुत्राची सिद्धदशा पाहतां । माय वंदितसे सुता । अनुचित गोष्टी हे तत्त्वतां । वदती आनंदसागर ।।१००।। तेही करिती नमस्कार । माय धरी त्यांचा कर । तूं विश्ववंद्य सिद्ध साचार । मी अज्ञानी मज न नमावें ।।१०१।। उभयतांमध्यें वाद पडला । सद्गुरूंनी तो मिटविला । उभयतांनी एकमेंकाला । नमन कधीं करूं नये ।।१०२।। उपासना बहु वाढली । सिद्धदशा येऊं लागली । तंव इकडे गुरुमाउली । शिष्यभेटीसि निघाली ।।१०३।। गुरु येती म्हणोन । माळियास झालें ज्ञान । उभयतां सामोरे जाऊन । वंदिती गरुपदा ।।१०४।। संतुष्ट झाले गुरुवर । ठेविला मस्तकीं वरद कर। दवडिले अज्ञान विकार । निजपद तयां दीधलें ।।१०५।। तयां मुखी हनुमंतासी । देवविलें अनुग्रहासी । हा भक्त योगी ज्ञानराशी । बहुतांसी तारील ।।१०६।। उभयतांसी अधिकार दिला । मंत्रानुग्रह करावयाला । वाढवावें श्रीउपासनेला । रामसेवा करीत जावी ।।१०७।। रामपुरी अयोध्येप्रती । हनुमान मठ स्थापिती । उपासना नाम वाढविती । बहुत प्रकारें ।।१०८।। आनंदसागरांप्रती । मांदारमुळींचा मारुती । देवोनि पारंनरे अंबड प्रांतीं । तयांलागी पाठविलें ।।१०९।। तेरा कोटी जप केला । अंबड जालना मठ स्थापिला । वाढविती उपासनेला । राममंदिरें दोहींकडे ।।११०।। एकदां गोपाळकाल्यासी । श्रीकृष्ण आले गोपवेषीं । दर्शन देवोनि भक्तासि । पुन्हां अदृश्य जाहले ।।१११।। श्रीगुरु वदती विवाहासी । करीं आतां सत्वरेंसी । आनंदसागर वदती मजसी । नलगे प्रपंचबंधन ।।११२।। मातेसी पुसती विचार । तीही न दे रुकार । गोसावी केला माझा पुत्र । दूषण दिधलें इंदुरीं ।।११३।। विनोदें मागील स्मरण देतां । माय विनवी 'श्रीगुरुनाथा। अज्ञानें भुरळ होती चित्ता । तव कृपें निवाली' ।।११४।। असो आग्रहें लग्न केलें । सावधासी बंधन कसलें । पुत्रकन्यांनी शोभविलें । सच्छिष्य गृहस्थाश्रमी ।।११५।। शिष्यशाखा वाढविली । नामगुढी उभारिली । बहुतांची यातना सोडविली ।

अनुग्रहप्रसाद देवोनी ।।११६।। कसा[1] उतरल्यावांचोन । अनुग्रह न देती जाण । म्हणती विघ्नें येतील दारुण । मम अनुग्रह घेतलिया ।।११७।। आंनदपुरीं वसविलें स्थान । नित्य पूजाअर्चा भजन । आल्या अतिथा अन्नदान । शरणागता रक्षिती ।।११८।। असो सद्गुरुप्रसाद । सेवितां झाला आनंद । पुढती कथा परिसा विशद । ब्रह्मानंद सिद्धांची ।।११९।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते अष्टमाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास दुसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। दुजे शिष्यवर ब्रह्मानंद । दृढ धरिले गुरुपद । सिद्ध होवोनि प्रसिद्ध । जगदुद्धार बहु केला ।।१।। कर्नाटकीं विजापूर प्रांत । बदामीसन्निध जालिहाळ ग्रामांत । विप्रकुटुंब नांदत । स्वधर्मकर्मी दक्ष सदा ।।२।। भारद्वाजगोत्री परम । गाडगुळी ऐसें उपनाम। बाळंभट्ट द्विजोत्तम । भार्या सती जिऊबाई ।।३।। रेणुका उपास्यदैवत । तिचे कृपें चार सुत । त्यांमाजी अनंतभट्ट विख्यात । जाहले श्रीब्रह्मानंद ।।४।। बालपणी हूड भारी । मुलें जमवोनि भजन करी । व्रतबंध झालियाउपरी । शास्त्र शिकों घातलें ।।५।। मुळगुंद येथील विद्वान । गुरुशास्त्री नामें ब्राह्मण । तयांजवळीं राहोन । विद्या बहुत पठण केली ।।६।। काव्य तर्क वेदांत । वेदपठणही बहुत । शिकोन झाले पंडित । जगन्मान्य ।।७।। निरोप आला गृहासी । मायबापें झालीं हर्षी । करूं म्हणती विवाहासी । सुशील कन्या पाहोनि ।।८।। तंव अनंतें देहभोग । हस्तीं दाविला कुष्ठरोग।

१. कसाला, कसोटीला.

त्यानिमित्तें विवाहयोग । टाळिला साधनी विक्षेप ।।९।। मातापितयांसी विनविलें । देहभोग भोगणें घडलें । उपशमन पाहिजे केलें । ईशसेवा करूनी ।।१०।। या निमित्तें आज्ञा घेतली । स्वारी तेथून निघाली । सोर्टूर[१] सन्निध पावली । व्यंकटेशासमीप ।।११।। भोंवतीं डोंगर उंच गाढे । माजीं व्यंकटवाडी खेडें । काळनेमें पडले उघडें । ओस आणि निर्मनुष्य ।।१२।। सन्निध ओहोळ आणि कुंड । झाडी गर्द आणि प्रचंड । श्वापदें नांदती उदंड । भयानक स्थळ ।।१३।। कर्नाटकी व्यंकटेश । दैवत मान्य विशेष । तैसें तेथें एक ओस । मंदिर पूर्वींचें ।।१४।। स्वयंभू व्यंकटेशमूर्ति । नसे कांहीं अवयवाकृति । तेथें जावोन राहती । निर्मनुष्य वनामाजीं ।।१५।। भक्तीस एकाग्रता एकांतस्थलीं । वृत्ति साधनीं स्थिर केली । सेवा निष्ठेनें चालविली । व्यंकटेशप्रभूची ।।१६।। उषःकालीं स्नान करोनि । अनुष्ठान करिती, मग माध्यान्हीं । सोर्टुरीं भिक्षा आणोनि । पुष्करणीकुंडीं बुडविती ।।१७।। व्यंकटेशा नैवेद्य दावोन । एक वेळ करिती भोजन । पुनरपि श्रीआराधन । अहोरात्र चालविती ।।१८।। दिवसांही कोणी संचार न करिती । तेथें केली नित्यवसती । वैराग्य उपजलें चित्तीं । देहसार्थक करावें ।।१९।। विनवीत श्रीव्यंकटेशा । 'भवभयहारका परेशा । पुरवावी येवढी आशा । देह सार्थकीं लावावा ।।२०।। बहुत शास्त्रें पठण केलीं । परि समाधानता नाहीं आली । समाधानाची साउली । व्यंकटरमणा दावावी' ।।२१।। करुणा भाकिती वेळोवेळीं । नऊ मास सेवा केली । जगन्माय संतोषली । स्वप्नीं येवोनि सांगत ।।२२।। 'आता अनुष्ठान पुरें करावें । त्वरित उत्तरेसी जावें । सद्गुरुचरणीं लीन व्हावें । खाणाखुणा सांगितल्या ।।२३।। अनंत जन्मांची सुकृतें। फळा येतील तेथें । कामना व्याधी समस्तें ।

१. सोर्टूर हें गांव धारवाड जिल्ह्यांतील गदग तालुक्यांत आहे.

हरतील सकल गुरुराव' ।।२४।। स्वारी तेथून निघाली । उत्तरेप्रति चालिली । वाराणसीं वसति केली। कांहीं कालपर्यंत ।।२५।। कृष्णानंद स्वामींपाशीं । पुन्हां केलें पठणासी । गीता उपनिषद्भाष्यासी । शारीरभाष्य वेदांत ।।२६।। विद्वत्ता झाली गहन । तरी नोहे समाधान । मनीं ध्यानीं सद्गुरुचरण । कोठें भेटतील मजलागीं ।।२७।। काशी प्रयाग नारायण । अयोध्या मथुरा वृंदावन । सकल तीर्थे फिरून । गुरुमाय शोधिती ।।२८।। फिरत आले इंदुरासी । तेथें देखिले गुरूंसी । दृष्टांती लक्षणें जैसीं । तैशीं तेथें पाहिलीं ।।२९।। तेंचि रूप तेंचि ध्यान । परि न दिसे ज्ञानचिन्ह । पोरांसवें खेळत जाण । अज्ञानासारिखे ।।३०।। नाहीं गीता भाष्य उपनिषद् । पूर्वपक्ष उत्तरपक्ष वाद । परमार्थाचा संवाद । तोहि दिसेना ।।३१।। प्राकृत भाषा बोलती । नाहीं संस्कृत व्युत्पत्ति । मग येथें ज्ञानप्राप्ति । मजसी काय होईल ।।३२।। वाराणसी देखिले साधु । तेथें होत वादविवादु । वेदांतचर्चा अनुवादु । पूर्वपक्ष आणि सिद्धांत ।।३३।। येथें कांहींच दिसेना । ऐसा विकल्प झाला मना । परि वेध लागला तो सुटेना । दर्शनें आनंद होतसे ।।३४।। लीला दाविती गुरुराव । येथें शब्दज्ञानवैभव । गुंतली वृत्ति अनुभव- । सुखासी नाहीं देखिलें ।।३५।। नित्य दर्शनासी येती । सद्गुरु बळेंचि वागती । बालकांसवें करिती । हास्यविनोद ।।३६।। ऐसा काळ बहुत गेला । दर्शनाचा हव्यास लागला । परि मनी विकल्प आला । ज्ञानचिन्ह दिसेना ।।३७।। शरण जावें वा न जावें । ऐसे चित्तीं पडले गोवे । उगाच पहात बसावें । सद्गुरुलीला ।।३८।। भोळे भाविक दर्शना येती । चरणीं लोटांगण घालिती । सद्गुरु समाधान करिती। ज्याचे त्यापरी ।।३९।। देहव्याधि दूर करिती । भूतपिशाचें शरण येतीं । रामनाम प्रस्थापिती। सकळां ठायीं ।।४०।। पराव्याचें जाणोनि अंतर । नेमकेंचि देती प्रत्युत्तर । नित्य घडती चमत्कार । पाहतां विस्मय वाटतसे ।।४१।। संगतीसुखा लोलुप झाले । अहंता विकल्प मावळले । अनुतापें

पोळोनि निघाले । पदीं शरण रिघाया ।।४२।। पाहोन चित्तशुद्धी झाली । गुरुमाय पान्हावली । ब्रह्मानंदी मग्न केली । वृत्ति अनंतभट्टाची ।।४३।। नाम ठेविले ब्रह्मानंद । दिधला अनुग्रहप्रसाद । सकलांसि झाला आनंद । अनंतशास्त्री शरण आले ।।४४।। अंगावरोन हात फिरविती । देहव्याधित्रस्त वदती । ब्रह्मानंद तैं विनविती । देहातीत सुख असावें ।।४५।। प्रारब्ध भोगोनि सारावें । कर्मबंधनापासोन सुटावें । तरीच परमार्थ फावे । बंधरहित ।।४६।। सद्गुरु पुढें आज्ञापिती । जावें नर्मदातीराप्रति । ओंकारेश्वर उमापती- । स्थान जेथें ।।४७।। निर्मनुष्य अरण्यांत । शिवालय जीर्ण बहुत । तेथें जावोनि सतत । नामस्मरण करावें ।।४८।। ऐशी आज्ञा होतां पाहीं । शीघ्र पावले त्या ठायीं । जेथें मनुषयवसति नाहीं । हिंस्त्र श्वापदें हिंडती ।।४९।। साधोनिया एकांतवास । जप केला सहा मास । मग प्रगट झाले गुरु परेश । शिवलिंगामधोनी ।।५०।। पोटीं धरोनि कुरवाळिलें । अनुष्ठान समाप्त करविलें । सवेंचि तेथें गुप्त झाले । गोंदावलीस यावें म्हणोनि ।।५१।। गोंदावलीं येऊनि दर्शन घेती । अति आदरें सेवा करिती । कांहीं दिवसांउपरांतीं । आज्ञा करिती गुरुराव ।।५२।। 'सर्व अधिकार दिधले तुम्हांसी । आतां जावें कर्नाटकासी । वाढवावें समर्थपंथासी । राममंदिर स्थापावें ।।५३।। वृक्ष न वाढे वृक्षाखालीं' । ऐसें वदती ते काळीं । 'जावोनि नामपोई घालीं । हीच सेवा आमुची' ।।५४।। गुरुनिरोपें निघाले । ते कपोतेश्वरीं आले। एक तप अनुष्ठान केलें । तेरा कोटी जपाचें ।।५५।। बेलधडीस आले तेथोनी । मनीं चिंतिती समर्थवाणी । मंदिर बांधावें म्हणोनी । आज्ञा मज झाली असे ।।५६।। ऐसी चिंता लागली । तंव समर्थस्वारी आली । चरणी लोटांगण घाली । ब्रह्मानंद शिष्यराणा ।।५७।। महाराज वदती 'काय चिंता । रामकृपें सर्व सिद्धता । राम भक्ता साह्यकर्ता। यदर्थीं शंका नसावी' ।।५८।। बोधें चित्त शांतविती । मग आले गोंदावलीप्रती । इकडे वर्तली चमत्कृती । श्रोतेजनीं परिसावीं ।।५९।। मंदिर

कैसे बांधावें । कैसें द्रव्य मेळवावें । गुरुआज्ञें सादर व्हावें । इच्छिती ऐसें ।।६०।। गांवोगांवीं जावोन। बहुत द्रव्य मेळवून । मंदिर बांधिलें शोभायमान । बेलधडी-क्षेत्रासी ।।६१।। रामस्थापना करायासी । आणिलें श्रीसमर्थांसी। तृप्त केले बहुवसीं । अन्नदानें विप्रगण ।।६२।। कांहीं दिवसांउपरांतीं । उन्मनी अवस्था धरिती । उडाली मुळीं देहस्मृति । बंधन बहुतजन्मींचें ।।६३।। कोठेंही पडोनि रहावें । कोणासवें न बोलावें । अत्यानंदें डुलत रहावें । अन्नवस्त्रा चाड नाहीं ।।६४।। ऐसी ही उन्मनी अवस्था। वेडगळ वाटे समस्तां । परि जोडल्या अनंत सुकृतां । जीवा समाधान देतसे ।।६५।। असो ऐसे ब्रह्मानंद। सेवोनि श्रीगुरुप्रसाद । उन्मन होवोन निजानंद । भोगिती सिद्धसोहळा ।।६६।। पुन्हां लोककार्य करिती । लोकांसारिखे वावरती । बीज भाजल्याउपरांतीं । रुजणेंचें भय नाहीं ।।६७।। तेथून पुढें नरगुंदासी । करविलें रामजपासी । तेराकोटी पुरश्चरणासी । विप्रांमुखें ।।६८।। सांगतेची केली सिद्धता । परि जलाची नसे पूर्तता । अधिकारी वदती भक्तां । उत्सव तेथे न करावा ।।६९।। ब्रह्मानंद वदती धीर धरा । रामकृपें सुटतील धारा । तंव अकस्मात् मेघ भरारा । येवोनि जल वर्षती ।।७०।। जलस्थानें भरोन गेलीं। भक्तमंडळी आनंदली । देव दासांचा वाली । उणें दिसता धांवतसे ।।७१।। जावोनि स्वयें गोंदावलीसी । विनविती श्रीगुरूंसी । आलिया जप सांगतेसी । आनंदीआनंद वाढेल ।।७२।। जैसा देव भक्तप्राण । तैसे गुरु शिष्याधीन । नरगुंदा लाधलें निधान । जगदुद्धारक महाराज ।।७३।। होम हवन अन्नदान । पुराण भजन निरूपण । भूतां पूजोनि भगवान । संतुष्ट केले ब्रह्मानंदें ।।७४।। असो ऐसे ब्रह्मानंद । स्वयें पावले सद्गुरुपद । बहुतांसी अनुग्रहप्रसाद । देवोन सुमार्गा लाविलें ।।७५।। पुढें बिदरहळ्ळीसी । गोपाळकृष्णमंदिरासी । केलें जीर्णोद्धारासी । अन्नदान अगणित ।।७६।। तेरा कोटी जपसांगता । होम-हवनादि पूर्तता । आणवोनि सद्गुरुनाथा। याचक बहु तोषविले

।।७७।। आजन्म ब्रह्मचर्यें राहिले । व्यंकटापूर ठाणें केलें । चिरेबंदी मंदिर बांधिलें । भव्य आणि सुंदर ।।७८।। श्रीराम आणि हनुमान । तैसे महाराज आणि ब्रह्मानंद जाण । गुरुभक्त मानिती तयांलागून । सद्गुरुसारिखे ।।७९।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते अष्टमाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास तिसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। आनंदसागर ब्रह्मानंद । यांनीं जाणिलें ब्रह्मचैतन्यपद । आणिक शिष्य झाले प्रसिद्ध । तेही पुढती सांगिजेल ।।१।। कुर्तकोटी इनामदार । धनवान आणि चतुर । लिंगनगौडा नामें द्विजवर । सरस्वती प्रसन्न तयांसी ।।२।। पाश्चात्य विद्या संपादोनि । संस्कृतीं अग्रगण्यता मिळवूनि । विद्याभूषण पदवी जयांनीं । स्वतेजें संपादिली ।।३।। आणिकही बहु मान । देशीं विदेशीं मेळवून । नित्य करिती विद्यादान। विद्यार्थियांसी ।।४।। सार्वजनिक हितासाठीं । नित्य करिती आटाआटी । अकस्मात झाली भेटी । ब्रह्मानंदगुरूंची ।।५।। पाठक आणि अनुभवी । यांची भेट झाली बरवी । अनुभवसुखाची चवी । वेगळीच आहे ।।६।। भक्ति उपासना आणि ज्ञान । पाहोन झालें समाधान । नम्र होवोनि तत्क्षण । अनुग्रहप्रसाद घेतला ।।७।। तदुपरि ब्रह्मानंद यांनीं । विद्या वैराग्य पाहोनि । घातले श्रीसमर्थचरणीं । अनुग्रहप्रसाद देवविला ।।८।। सद्गुरु वदती तयांलागून । करावें श्रीभागवतकथन । व्युत्पत्ति पाहतां संतोषोन । ‘महाभागवत’ नाम देती ।।९।। महाभागवतांचें वैराग्य । पाहतां वाटे धन्य भाग्य । भवनदी दुस्तर दुर्लंघ्य । सहज हे उल्लंघिती ।।१०।। सद्गुरुसेवा

करिती बहुत। रामनाम सदा जपत । निरूपणें चित्त शांतवित । सकल जनांचें ।।११।। लोकसेवेची हौस भारी। धर्मसुधारणा व्हावी बरी । म्हणोन हिंडती नगरोनगरीं । निःस्वार्थ निरालस्यें ।।१२।। कुर्तकोटीचें शिवमंदिर । तेथेंचि स्थापिले रघुवीर । अनुग्रहाचा अधिकार । सद्गुरूंनीं दिधला असे ।।१३।। शिष्यशाखा असे थोडी । समाजहिताची बहु गोडी । पाश्चात्य पौर्वात्य द्विधा जोडी । उकलोनि दाविती ।।१४।। स्वधर्मीं सदा रत व्हावें । देशोन्नतीसी झटावें । बोध करिती मनोभावें । ठायीं ठायीं ।।१५।। असो श्रीमहाभागवत । पुढें झाले विख्यात । सद्गुरुचरणीं झाले रत । आणिक शिष्य ।।१६।। कऱ्हाडक्षेत्रीं शांताश्रम । संन्यासी कर्मठ परम । त्यांचे श्रीगुरूंवरी प्रेम । अतिशयेंसी ।।१७।। कांहीं काल वाराणशीसी । होते श्रीगुरूंचे संगतीसी । गुरुबंधु उभयतांसी । मानिती एकमेक ।।१८।। समर्थशिष्य विश्वनाथ । नामें होता भाग्यवंत । तयासी समर्थ आज्ञापित । कऱ्हाडक्षेत्रीं जावया ।।१९।। शांताश्रम यतीपाशीं । जावें तुवां वेगेंसी । सेवा करावी अहर्निशीं । ती आम्हां पावेल ।।२०।। म्हणती प्रसाद घ्यावा । साधनीं देह झिजवावा । मम कृपें परलोक साधावा । वदती ऐसें ।।२१।। यज्ञेश्वर वैदिक विद्वान। श्रीगुरूंसी गेले शरण । अनुग्रह मंत्र घेऊन । सेवा केली एकनिष्ठ ।।२२।। नामपुरश्चरणें केलीं। वेदविद्या गुरूंसी अर्पिली । चित्तासी समाधानता आली । साधनबळें ।।२३।। सद्गुरु बहु संतोषले । 'विश्वनाथ' नाम ठेविलें । सर्व अधिकार तयां दिधले । वाढवा म्हणती भक्तिपंथ ।।२४।। मठ केला आटपाडीस । स्थापिलें राममंदिरास । शिष्यशाखा बहुवस । रामनाम गर्जतसे ।।२५।। गुरुदक्षिणा विद्येप्रत । दिधली कवण निमित्त । तरी परिसावें उदर भरित । होते भिक्षुकी करोनी ।।२६।। वेदविक्रय वंचकवृत्ति । येणें न घडे भगवद्भक्ती । यास्तव श्रीसद्गुरुप्रति । अर्पण करोनि सोडिली ।।२७।। कृष्णा नामें कुच्चीकर । यांचे शिष्य होते चतुर । श्रद्धायुक्त नामगजर ।

करणेंविषयीं प्रसिद्ध ।।२८।। कुरवली श्रीसिद्धस्थान । तेथील दामोदरबुवा म्हणोन । गोसावी हरिदास धरिती चरण। सद्गुरुमहाराजांचे ।।२९।। अति कठिण सेवा करिती । नीच कामें अंगीकारिती । गुरुचरणीं अतिप्रीती । प्रपंचआस्था टाकिली ।।३०।। पडेल तें काम करावें । जैसें मिळेल तैसें खावें । सदा संतोषी असावें । नाम घ्यावें आदरें ।।३१।। दोन तपें संगतीसी । राहिले गुरुसेवेसी । सद्गुरु होवोनि संतोषी । दीक्षा दिधली तयांप्रति ।।३२।। अनुग्रहाचा अधिकार । देते झाले गुरुवर । गोमेवाडीचें मंदिर । सेवा तेथें सांगितली ।।३३।। कांहीं कालपर्यंत । होते तेथें सेवा करित । पुढें कुरवली जन्मग्रामांत । आज्ञें मंदिर स्थापिलें ।।३४।। कुरवलीसी मठ केला । शिष्यसमुदाय वाढविला । दीनजनांसी दाविला । बोधूनिया सुपंथ ।।३५।। भजन अत्यंत प्रेमळ । उच्चस्वर आणि रसाळ । परिसतां वाटे मायाजाळ । सोडूनि भजनीं लागावें ।।३६।। असो ऐसे दामूबुवा । सन्मार्गीं लाविती जीवां। गुरुप्रसाद वानावा । किती म्हणोनी ।।३७।। विष्णुबुवा कुंभोजकर । नामें देशस्थ द्विजवर । श्रीगुरूंचें किंकर । झाले कैसे अवधारा ।।३८।। सहज गेले दर्शनासी । देखिले श्रीगुरुचरणांसी । समाधान झालें मानसी । पाहोन ज्ञान उपासना ।।३९।। भूत भविष्य वर्तमान । जाणोनिही प्राकृतासमान । प्रपंच परमार्थ चालवून । समाधानी गुरुमूर्ति ।।४०।। अनुग्रह घ्यावा ऐसी चित्तीं । उदित होय स्वयंस्फूर्ति । तेव्हां करिती विनंती । दीना हातीं धरावें ।।४१।। समर्थ वदती तयांसी । 'विसरला मागील गुरूसी । तैसेंच कराला आम्हांसी । तरी कैसें करावें ।।४२।। गुरु म्हणजे नव्हे मेवा । लागे देह अर्पावा । तरीच त्या देवाधिदेवा । होईल भेटी ।।४३।। एक गुरु असतां पाहीं। दुजा वरणें श्लाघ्य नाहीं । गुरुक्षोभ घडतां पाहीं । ठाव कोठेंहि न मिळे' ।।४४।। श्रीगुरूंनीं बोध केला । तेव्हां मनी आठव झाला । शिवमंत्र असे दिधला । पूर्वीं एका गुरूंनीं ।।४५।। आणिक सांगितली खूण । तुजसी

होईल विस्मरण । भेटतां सच्चिदानंदघन । बोध करितील पुनरपि ।।४६।। तयांसि सद्गुरु मानावें । चित्त तेथेंचि अर्पावें। जिणें सार्थक करोन घ्यावें । सद्गुरुसेवा करोनी ।।४७।। सर्व वृत्तांत निवेदिला । श्रीगुरूंनीं अनुग्रह केला। तोचि मंत्र उपदेशिला । शिवउपासना लाविली ।।४८।। शिव आणि रघुपति । भेद न मानीं कल्पांतीं । आसनीं असतां एकांतीं । शिवमंत्र जपावा ।।४९।। येरवीं स्मरावा श्रीराम । जो शिवाचा आराम । भक्तकाजकल्पद्रुम । अखंड वदनीं असावा ।।५०।। असो अनुग्रह घेवोन । बहुत केले साधन । आणि करिती तीर्थाटन । चौधाम सप्तपुऱ्या ।।५१।। द्वादश ज्यौतिर्लिंगें केलीं । बहुत वेळा यात्रा झाली । पुन्हां तीर्थांची माउली । सद्गुरुभेटी पावले ।।५२।। स्थिति पाहोन आज्ञा देती । सर्व अधिकार तुम्हांप्रति । वाढवावी श्रीरामभक्ति । नौका जी भवनदीची ।।५३।। गुरुआज्ञा घेवोन । पावले वऱ्हाडीं सेंदुरजन । मठ केला ब्रह्मचैतन्य । शिष्यसमुदाय वाढविला ।।५४।। मारुतिराव पिटके म्हणोनि । गृहस्थाश्रमी साधक ज्ञानी । दीक्षानुग्रह द्यावया लागोनि । अधिकारी जाहले ।।५५।। अंतर्ज्ञानी निःसंदेही । अंगीं अहंता मुळींच नाहीं । शिष्यशाखा असे पाहीं । परि संख्या थोडीसी ।।५६।। तम्मणशास्त्री नवलगुंद । यांहीवरी झाला प्रसाद । दीक्षा देवोनि 'सच्चिदानंद' । नामाभिधान ठेविलें ।।५७।। यांचा मठ हुबळीसी । वाढविती रामभक्तीसी । शिष्यशाखाही अल्पशी । केली गुरुप्रसादें ।।५८।। यावंगलीं शिवदीक्षित। कर्नाटकीं झाले संत । गुरुआज्ञा मानोनि नेमस्त । उपासना चालविती ।।५९।। यांचे येथें दत्तस्थापना । स्वयें करी सद्गुरुराणा । तेथेंच श्रीजानकीरमणा । प्रतिष्ठा केली आदरें ।।६०।। उप्पनबेट्टीगिरीकर । कृष्णशास्त्री झाले किंकर । साधनीं झिजविती शरीर । शुद्धभाव गुरुचरणीं ।।६१।। गुरु शिष्य महासागर । तयांचा न लागे पार । अल्प प्रगट वदलें थोर ।

श्रोतीं रोष न धरावा ।।६२।। ऐसे हे संतजन । ज्यांचे अंतरीं सीतारमण । तयांसी करोनि नमन । पुढील कथा विस्तारूं ।।६३।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते अष्टमाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास चवथा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः । नमो अयोध्यावासिया । वसिष्ठशिष्या रघुराया । पित्राज्ञापालका वेदवंद्या । कौसल्यानंदना नमो तुज ।।१।। गुहकप्रिया श्रीरामा । योगीजनचित्तविरामा । वनवासिया निवृत्तकामा। सीतावल्लभा नमो तुज ।।२।। श्रीगुरु आपले गुण अपार । वर्णितां भागले थोर थोर । अवधान द्यावें सत्वर । पुढील कथेसी ।।३।। शंकरशास्त्री म्हासुर्णेकर । काव्यव्युत्पन्न भाविक थोर । श्रीगुरूंचे जाहले किंकर । कवि आणि साधक ।।४।। दीक्षा अनुग्रह करावया । सद्गुरु अधिकार देती तयां । म्हासुर्णे गांवीं रामराया- । पाशीं मठ तयांचा ।।५।। शिष्यशाखा असे थोडी । कवित्वाची बहु गोडी । पुराणसेवेची आवडी । सद्गुरूंचे गुण गाती ।।६।। कागवाडक्षेत्रीं रामदासी । लागले श्रीगुरुपदासी । साडेतीन कोटि जपासी । केलें असे भक्तीनें । श्रीगुरूंनीं दिधली दीक्षा । प्रपंच परमार्थ उभय पक्षां । चालवोनि करिती रक्षा । अनंत दुरितांची ।।८।। जन्मभूमीचा उद्धार। केला बांधोनि मंदिर। अनुग्रहा अधिकार । श्रीगुरूंनीं दिला असे ।।९।। शिष्यशाखा असे थोडी । अध्यात्मज्ञानाची गोडी । अन्नदानाची परवडी[1] । चालविती बहु ।।१०।। सद्गुरूंसी अति भक्ति ।

१. समृद्धि.

वरचेवरी दर्शना जाती । प्रपंचीं नसे आसक्ति । रामसेवेची आवडी ।।११।। आणिक शिष्य हरिदास । हरिभाऊ वदती जयांस । प्रपंचीं सदा उदास । गुरुसेवा अतिप्रिय ।।१२।। जेव्हां सद्‌गुरुभेटी झाली । तेव्हां पराधीनता सोडिली । सदा ध्याती गुरुमाउली । अनन्यभक्तीनें ।।१३।। सांगली क्षेत्र वसतिस्थान । करिती कीर्तन प्रेमळ भजन । नसे तालसूरबंधन । कारण एक उपासना ।।१४।। कार्यकारण कुटुंब गेह । सद्‌गुरुकार्यीं झिजविती देह। न जाणती अन्य उपाय । रामनाम गुरुसेवा ।।१५।। पुत्र कलत्र बंधु भगिनी । वाहिलीं समग्र सद्‌गुरुचरणीं । सकलहीं गुरुसेवा करोनी । आनंदें काल क्रमिताती ।।१६।। यांची भगिनी बहिणाबाई । गुरुचरणीं ठेवितां डोई । सेवा करितां आळस नाहीं । तिज मायबाप महाराज ।।१७।। असो कुटुंबीं सकळ लोक । हरिदास नामाचें सार्थक। करोनि भोगिती सुख । दुर्मिळ गुरुसेवेचें ।।१८।। रामभट्टात्मज बाळंभट्ट जोशी । कुरोलीचे रहिवासी । व्यसनी होते अतिशयेंसी। गुरुजवळी सहज आले ।।१९।। गांजा अफू आणि चरस । सेविती रात्रंदिवस । विनविती श्रीसमर्थांस । ‘गोष्टी आमुची परिसावी ।।२०।। जरी पुरवाल आमुचें व्यसन । तरी करूं नामस्मरण । आज्ञा मानूं प्राणासमान । असत्य न बोलूं कदापि’ ।।२१।। सद्‌गुरु वदती ‘उत्तम, । अगत्य चालवूं नेम । ऐसे आवडती आम्हां परम । स्पष्टवक्ते’ ।।२२।। नित्यनेम जप नेमून दिला । ऐसा कांहीं काळ गेला । कृपेनें निर्व्यसनी केला । व्यसनासक्त तो द्विज ।।२३।। साधकस्थिति प्राप्त झाली । चित्तासी शुद्धता आली। सद्‌गुरूंनीं दीक्षा दिधली । पावन केले बाळंभट्ट ।।२४।। शास्त्रीबुवा सातारकर । वेदांतव्युत्पन्न चतुर। महाराजांचे भक्त थोर । होवोनि गेले ।।२५।। ब्रह्मचारी चिमणगांवकर । वैराग्यशील साधक थोर । दीक्षानुग्रहाचा अधिकार । श्रीकृपेनें लाधला ।।२६।। हनुमानगढीस राहून । तुळसीकृत रामायण । नित्य करिती पारायण । योगाभ्यासी ज्ञानी तसे ।।२७।। बलवंतराव घाणेकर । सात्त्विक भाविक

साधक थोर । श्रींचे झाले किंकर । तनमनधनानें ।।२८।। बापूसाहेब न्यायाधीश । साठये उपनाम जयांस । श्रीगुरूंचे प्रसादास । अधिकारी जाहाले ।।२९।। भाऊसाहेब केतकर । नेमणुकीचे कामगार । गुरुचरणीं टाकिला भार । सकलही प्रपंचाचा ।।३०।। शालिग्राम पंतोजी विद्वान । गिजरेशास्त्री कर्मठ जाण । काशीकर गुरुजी वेदसंपन्न । गुरुचरणीं नत होती ।।३१।। आप्पासाहेब भडगांवकर । आप्पासाहेब कागवाडकर । भैय्यासाहेब हर्देकर । धनसंपन्न शिष्य झाले ।।३२।। भैय्यासाहेब इंदुरवासी । अखंड जपती रामनामासी । गाडगुळी भीमराव गदगनिवासी । सदा ध्याती गुरुपद ।।३३।। सांगली क्षेत्रींचे फडणवीस । बळवंतराव वदती जयांस । ब्रह्मानंद देती अधिकारास । आपुले गुरुसंस्थेचे ।।३४।। तोफखाने जाहले महंत । जयांसी सीताराम वदत । गृहीं बांधोनि मंदिराप्रत । रामसेवेसी सादर ।।३५।। फडके काकासाहेब वदती । सद्गुरु बहु प्रेम करिती । वारंवार संरक्षिती। अर्थबोध देवोनी ।।३६।। गोदूबाई नामें भक्त । परम भाविक सत्त्वस्थ । विनोदें ‘अंबेहळद’ वदत । सद्गुरु तियेप्रती ।।३७।। चार वर्षांची असतां । आसनें करविती दावून सत्ता । किती वानूं अभिनवता । गुरुकृपेची ।।३८।। मुलाचे व्रतबंधनाचे वेळीं । यावी श्रीगुरुमाउली । ऐसी आशा बहु धरिली । परि महाराज अति दूर ।।३९।। भक्तकाजकल्पद्रुप । सद्गुरुमाय विश्राम । संकटकालीं होती उगम । भक्तांसी सदा सन्निध ।।४०।। व्रतबंधन होवोनि गेलें । विप्र भोजनासी जमले । परि तूप वेळेसी न आलें। म्हणून अडले भोजन ।।४१।। अंबेहळद चिंताग्रस्त । श्रीगुरूंसी प्रार्थित । तंव ते प्रत्यक्ष प्रकटोन वदत । ‘असेल तेवढें तूप आणा’ ।।४२।। पावशेर तूप सकळांसी । वाढिते झाले तपोराशी । आनंद झाला सकळांसी । चमत्कृति देखोनी ।।४३।। एकदां मंदिरीं ऐसें झालें । नाथभागवत निरूपण चालिलें। श्रोतेजन तटस्थ जाहले । गुरुवाक्यें परिसतां ।।४४।। तंव अंबेहळदीचा सुत । दत्तू क्रीडे

आनंदांत । सद्गुरु वदती तयाप्रत । दंगा येथें न करावा ।।४५।। परि मूल हूड भारी। उगा न राहे क्षणभरी । मग श्रींनीं मस्तकावरी । वरदहस्त ठेविला ।।४६।। मुलाची लागली समाधि । स्वस्वरूपीं शांत आनंदी । एक दिवस गेला मधीं । माय विनवी गुरूंसी ।।४७।। बालका लागली असेल भूक । बैसोनि अंग दुखेल निःशंक । कृपा करोनि घालावी भीक । पुत्र स्मृतीसी आणावा ।।४८।। सद्गुरु वदती हास्यवदन । निजरंगीं रंगलें मन । रक्षणकर्ता भगवान । समाधिसमयीं ।।४९।। असो पुनरपि मस्तकावरी । हस्त ठेवितांचि सत्वरी । बाळ येवोनि देहावरी । गुरुचरण वंदितसे ।।५०।। ऐसे भक्त बहुत झाले । बहुतां साक्षात्कार घडले । सकलांनी साधन केलें । यथाशक्ति ।।५१।। हर्देकरीण दुर्गाबाई । काशीबाई गंगूताई । 'पटाईत मावशी' भक्त पाहीं । कवि आणि साधक ।।५२।। गिरवीकर नरसोपंत । दासबोध वाचिती भक्तियुक्त । नाग येवोनि श्रवण करित । डोलतसे आनंदें ।।५३।। जेव्हां मनीं विकल्प आला । तेव्हां येईनासा झाला । गुरु वदती तयांला । गुरुवाक्य प्रमाण माना ।।५४।। मुक्ताबाई शिष्या भली । सद्गुरुसेवेसी लागली । सकल इंद्रियें झिजविलीं । गुरुगृहीं राहोनी ।।५५।। पाहतां तंव रोडकी दिसे । परि गुरुसेवे उणी नसे । पाकशाळेमाजीं भासे । प्रत्यक्ष अन्नपूर्णा ।।५६।। नामयाची जनाबाई । तैसी गुरूंची मुक्ताबाई । सेवेवांचूनि काज नाहीं । वदनीं घेत हरिनाम ।।५७।। मुखीं नाम हातीं काम । हाचि एक नित्यनेम । सद्गुरुचरणीं पावली विश्राम । धन्य भाग्य तियेचें ।।५८।। अम्मा नामें मद्रासी । राहिली गुरुसेवेसी । द्वादश वर्षें व्रतासी । धरिलें मौन गुरुआज्ञे ।।५९।। गृहासक्ति सांडोनी । दुर्लंघ्य वासना जिणोनी । आदरें सेवा करोनी । नाम घेत भक्तीनें ।।६०।। वस्त्रें भूषणें कुशलता । गुंफोनि देत भगवंता । गृहाची सोडिली आस्था । स्त्रीजात असोनी ।।६१।। गोविंदराव अळतेकर । गुरुसेवे झिजविती शरीर । मौनव्रत साचार । गुरुआज्ञेनें धरियेलें ।।६२।। असो

ऐसा बोधवृक्ष । शाखा पसरल्या अनेक । जाणते एक गुरुनायक । दुजा समर्थ दिसेना ।।६३।। कित्येकांच्या पुरविती कामना । साह्य करिती क्षणक्षणा । भक्तियुक्त उपासना । लावोनि देती आनंद ।।६४।। कित्येक येती आणि जाती । व्याधिग्रस्त मुक्त होती । तयांची न करवे गणती । मशका दुर्लंघ्य मेरू जैसा ।।६५।। सकळांसी लाविती साधन । मुख्य एक नामस्मरण । क्वचित् औषधीही कथन । करोनि करिती निर्दुःख ।।६६।। अंगाऱ्याची महती फार । लावितांचि जाती विकार । जवळीं ठेवितां निशाचर- । पीडा न होय निश्चयें ।।६७।। ताईत चिठी दोरा देती । निरोगी करूनि शांतविती। मुख्य नाम वनस्पति । पेरित हृदयकाननीं ।।६८।। देहादिक विविधताप। वासनाजन्य द्वंद्वताप । सकलां रामनामजप । दिव्यौषधि गुरुघरची ।।६९।। सिद्ध साधक मुमुक्षु । गुरुगृहीं अनंत भिक्षु । जाणता समर्थ ज्ञानचक्षु । स्वल्प संकेत दाविला ।।७०।। सकलांसी माझा नमस्कार । वारंवार जोडून कर। हेंचि गुरूंचें नांदतें घर । ध्यानें अंतरीं कोंदलें ।।७१।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।७२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते अष्टमाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति अष्टमोध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय नववा

## *समास पहिला*

**जयें गोधना संकटीं रक्षियेलें । किती जीव अन्नोदकें तृप्त केले ।।**
**बहू मंदिरें स्थापिलीं धन्य कीर्ति । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।९।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जय जय सद्गुरु तरुवरा । संतप्त पांथिकां आसरा । कल्पतरूहूनि साजिरा । निर्विकल्प ।।१।। कल्पतरू काय देतो । कल्पिली वस्तु पुरवितो । कल्पनातीत जीव होतो । गुरुछायेसी ।।२।। संसारपथ महाघोर । त्रिविधतापें पोळे शरीर । भेटतां मार्गीं गुरुवर । कृपाविस्तार साउली ।।३।। तरीच शीण अवघा जाये । ना तरी किरणें घेतील धांवे । याकारणें संत तुझिये । आश्रयें सुख भोगिती ।।४।। शांति सुगंध सुमनांचा । मेवा भ्रमर संतांचा । ताप निवाला जन्मांतरींचा । तेथेंच गुंग जाहले ।।५।। बोधसुमनें जमविलीं । आत्मारामासी वाहिलीं । फलाशेची वाट मोडिली । संतजनांनीं ।।६।। वृक्षविस्तार बहु मोठा । माजीं अनंत जीवांच्या पेठा । छायेसी न पडे तोटा । आकार कोणा न गणवे ।।७।। कीर्तिमोहोर विस्तारला । चैतन्यफळांनीं लिगडला । पक्षीसमुदाय लोटला । स्वानंदरस चाखाया ।।८।। सेवूनिया स्वानंदरस । पूज्य झाले जगतास । अनुहत ध्वनि श्रवणास । अति आल्हाद देतसे ।।९।। वासनेच्या पर्जन्यधारा । त्यांपासोनि तूंचि आसरा । सकलां करिसी निवारा । कृपासागरा गुरुमूर्ते ।।१०।। जे जे तव आश्रया आले । ते तेथेंचि स्थिर झाले । पुन्हां परतोन नाहीं गेले । त्रिविधताप सोसाया ।।११।। ऐशी तुझ्या छायेची गोडी । सुख वाढतें घडोघडी।

संसारदु:खा वरपडीं । जाहलीं कितीयेक ।।१२।। अहंकारें उन्मत्त झाले । ते त्वदाश्रयासी मुकले । अहंकाररहित नम्र झाले । ते पावले निजरूपा ।।१३।। निबिड संसारकानन[१] । अज्ञान अंधकार पसरला गहन । षड्रिपु श्वापदें हिंस्र दारुण । जीव नेती कुंभीपाकीं ।।१४।। ज्ञानसूर्य मावळला । विद्युन्मायेचा गलबला । शब्दज्ञान खद्योत भला। एकाचें एक दावितो ।।१५।। अनीति कांटेरी कुंपणें। अणुप्रवेशें करिती सदनें । यमकिंकरादि पिशुनें । भिवविती जीवासी ।।१६।। दारिद्र्यसर्प डसों येती। लोकेषणा[२] वृश्चिक फिरती । कामेषणा गिळूं म्हणती । अजगर थोर काननींचे ।।१७।। ऐसा प्राणी बहु भ्रमला । आशा-तृष्णा-गर्तीं पडला । तंव अकस्मात भेटला । पूर्वसंचित सोबती ।।१८।। तेणें हातीं धरोनि नेला । जेथें ज्ञानतरु सद्गुरु भला । संतसमुदाय असे भरला । कृपाछायेसी ।।१९।। कोठें सूर्याऐसी दीप्ती । नांदे तेथें तो रघुपती । विवेक शूर सेनापती । श्वापदें दूर पळवीतसे ।।२०।। आनंद भरोन आनंदरूप । प्राणी होत निस्ताप । द्वैतभावना संकल्प । विरोन जाती मुळींहूनी ।।२१।। ऐसा तूं सद्गुरुवरा । संसारकाननींचा आसरा । नि:स्वार्थदाता दुसरा । दिसेना त्रिखंड शोधिल्या ।।२२।। अखंड अगाध अविनाशी । नामरूप भेद न ज्यासी । भक्तांकारणें तूं साकारशी । निरुपाधि निराकारा ।।२३।। दयेचा निधि असे भरला । अनंत जीव शांतविला । धर्म आदरें संरक्षिला । अधर्मप्रवर्तकयुगीं[३] ।।२४।। कैसें युगाचें महिमान । अधर्मकर्मीं प्रेम गहन । दुर्जन तेचि भाग्यवान । दिसों लागले ।।२५।। देहममता बहु लागली । तेणें सुखसाधनें जमविलीं । धर्महानि होऊं लागली । हें ध्यानीं येईना ।।२६।। धर्मबीजरक्षणकर्ते । विप्र वागूं लागले भलते । यजनादिक कर्में निरुतें । राहिलीं पूर्वापार ।।२७।। राहिलें केवळ वाग्जाळ । अर्थभाग्याची[४] पडली भुरळ । तेणें मति जाहली चंचल। आत्मानुभव दूर

१ संसाररूपी अरण्य. २ लोकांत भलेपणाची हांव. ३ कलियुगांत. ४ श्रीमंतीची.

राहिला ।।२८।। येणेंचि रीती सर्व वर्ण । अनेक मतें भिन्नभिन्न । उपहासती अन्योन्यालागून। सत्य कांहींच उमगेना ।।२९।। धर्में मर्यादा कथियेली । कर्में सर्व आंखून दिलीं । तीं सोडितां सत्ता बुडाली। उभय लोकींची ।।३०।। दैवी शक्ति समूळ गेली । मानवी सत्ता राहिली । धर्मभेदें दुही माजली । तेणें आली विकळता ।।३१।। धर्म जीवाचें जीवन । धर्म राष्ट्राचें भूषण । अभ्युदयासी कारण । धर्मचि एक ।।३२।। धर्मविन्मुख जे झाले । इहपर सुखासी मुकले । आचार सर्वही भासले । निरर्थक सकळांसी ।।३३।। शरीरीं रोग अति गहन । आणि पथ्य दिधलें सोडून । मग औषध वाटे गुणहीन । रोगिया जैसें ।।३४।। शब्दज्ञानी शहाणे ठरले । भाविक मूर्खांमाजीं गणले । अनुभव नेत्र जातां आंधळे । होवोन भांडती परस्परें ।।३५।। धर्मदुही बहु जाहली। तेणें समाजा फुटी पडली । आपली आपणा वैरी झाली। दुजीयाची काय कथा ।।३६।। स्वात्मसुख स्वप्नवत् । होवोनि झाले विषयासक्त । विषयीं द्वैताची मात । सहजचि आली ।।३७।। विषयीं वाढे अनाचार । विषयीं वाढे मत्सर । विषय व्यसनाचें माहेर । विषय तनु जीर्ण करिती ।।३८।। विषय साधनीं विक्षेप । विषय म्हणजे महापाप । विषय वाढविती संताप । विषय विषया वाढविती ।।३९।। धर्महीन झाले सकळ । गेलें ऐक्यतेचें बळ । पराधीनतेनें विकळ । होऊं लागले ।।४०।। भगवदाज्ञें कलि आला । तैसा धर्म क्षीण झाला । बोल नाहीं इतरांला । ऐसें पूर्वींच कथियेलें ।।४१।। प्रारब्धें रोग झाला । परि प्रयत्नें पाहिजे हटविला । कांहीं काळ तरी सुखाचा गेला । म्हणजे बरें ।।४२।। यास्तव साधू अवतरती । वेळोवेळीं धर्म रक्षिती । कलि प्रबल झाला जगतीं । परि कांहींसा उपाय ।।४३।। कलीनें बुद्धि भारली । कलीनें क्षिति व्यापिली । प्रथमचरणीं गति झाली । प्रत्यक्ष पहा ।।४४।। वर्णाश्रमधर्म राहिला । मतामतांचा गलबला । मूर्तिपूजेसी कंटाळला । प्राणी दिसे ।।४५।। काम्यकर्में कांहीं राहिलीं । नैष्कर्म्यता समूळ गेली । धर्ममर्यादा

शिथिल झाली । रूढी पडल्या अनेक ।।४६।। देश सुपीक साजिरा । तेणें आळसा झाला थारा । धनिकसुत दिसे बरा । परि बहुधा गुणहीन ।।४७।। आळसें आला करंटपणा । धूर्त मारिती टोमणा । अन्नवस्त्रा बापुडवाणा । होवोनि गेला ।।४८।। करूं नये तेंचि करिती । भ्रष्टाकार माजविती । कोठेंही मिळेना शांति । मति भ्रष्ट जाहली ।।४९।। उदरपूर्तीकारणें । लागे नीचसेवा करणें । योग्यायोग्य कोण जाणे । धनसंग्रह मुख्य काज ।।५०।। सत्य विश्वास उडाला । असत्य अविश्वास भरला । कामिकांचा सुकाळ झाला । आपपर नेणती ।।५१।। एवढेंच मानिती भाग्य । तेंचि पुरुषार्थाचें अंग । कुलकलंक निःसंग । नारीनर किती झाले ।।५२।। अधर्में धरणी पिकेना । पिकतां खाऊं देईना । निःशक्तासी रोग नाना । नवे नवे उद्भवती ।।५३।। प्रथमचरणीं ऐसी स्थिती । अंतीं होईल कोण गती । पशुसम मानव होती । प्रज्ञाबल-तेजहीन ।।५४।। पुराणें सांगती बहुत । पुनरावृत्ति नको येथ । कार्यकारण ऐसें कथित। श्रोतीं रोष न धरावा ।।५५।। अधर्मा आणिक कारण । धनसंचय मुख्य ध्येय जाण । त्यालागीं वेंचिती प्राण । आणि घेती इतरांचे ।।५६।। पोटचें मांस विकून खाती । वयसीमाही न पाहती । त्यांच्या जिण्या पडो माती । वृद्धां विवाहीं देती बालिका ।।५७।। तेणें घडती अनाचार। कुलक्षय झाले फार । भेसळ जाती अनिवार । होवोनि गेल्या ।।५८।। उद्भव तैसा अंकुर । तैसी बुद्धी आणि विचार। पाखांड माजलें फार । धार्मिकासी निंदिती ।।५९।। धर्म झाला दुबळा । रूढीनें विसंग पावला । परकीयांनीं लाग साधिला । छिद्रें शोधूं लागले ।।६०।। दीन दारीद्र्यें पीडिले । अथवा धनाशे जे भुलले। मायिक वैभवासी भाळले । तयां तयां भ्रष्टविती ।।६१।। विहित आचार कळेना । रूढींत तत्त्व मिळेना। कळतें तेंहि वळेना । विषयासक्तीचेनि योगें ।।६२।। देह विषय-व्यसनाधीन । तेणें अत्यंत जाहला क्षीण । पद्मपत्रींचें जीवन । तैसें आयुष्य जाहलें ।।६३।। लहान शिकविती थोरास ।

मिथ्या म्हणती वेदश्रुतीस । स्त्रिया ठेविती पतीस । सत्तेखालीं आपुल्या ।।६४।। सूकरी बहुत प्रसवली । दुबळी संतती वाढली । अल्पकाळीं मुखीं पडली । महाथोर मृत्यूच्या ।।६५।। रोगें आयुष्य क्षीण झालें । जोडपें विजोडता पावलें । पुनरावृत्ति करूं लागले । पशु जैसे ।।६६।। आणिकही बहुत प्रकार । लिहितां ग्रंथीं ये विकार । खेचरी सृष्टी अनिवार । होवोनि गेली ।।६७।। स्त्रीपुरुष दोघेजण । राहती पक्ष्यांसमान । आप्तइष्ट बंधुजन । पर्वां न करिती कोणाची ।।६८।। पशुपक्ष्यांचा उपजत धर्म । तोही न मानिती हे अधम । प्रज्ञा मानवा विश्राम । ती मलिन झाली हें कळेना ।।६९।। आहारविहार सात्त्विक । जावोन रजतमात्मक । राहतां बुद्धीही निःशंक । राजस तामस वाढली ।।७०।। रजप्रधान बुद्धि जाहली । सुखाची अति हांव सुटली । यांत्रिक कला निघों लागली । अधिकाधिक ।।७१।। प्रवृत्तिज्ञान भेदयुक्त । भेद भेदा वाढवित । अष्टधेचा कर्दम बहुत । दुरत्यय मानवा ।।७२।। जितुकें शोधोनि काढावें । तितुकें गूढचि स्वभावें । अनंतजन्म शिणावें । तरी ज्ञान पुरेना ।।७३।। आदिमाया विश्वजननी। चौऱ्यांशी लक्ष जीवयोनी । अनंत ब्रह्मांडें जिचेनि । सत्तामात्रें चालती ।।७४।। पंचमहाभूतांचा मेळा । वासनाकर्दमा निराळा । प्रकृतिपुरुषांचा सोहळा । रामचि जाणे ।।७५।। असो राजस ज्ञान फोंफावलें । तमोमिश्रित भ्रष्ट झाले। चित्तशुद्धीसी मुकले । धन्य कलियुगाची ।।७६।। येथें जे स्मरले राम । तेचि पावले विश्राम । सर्वां घटीं आत्माराम । आदिअंतीं निर्मळ ।।७७।। रामभक्त सद्गुरुराय । सद्धर्मा करिती साह्य । पुढील समासीं तेंचि ध्येय । श्रोतेजनीं परिसावें ।।७८।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते नवमाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास दुसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। अधर्म वाढला गहन । अति बळावले दुर्जन । साधुसंतांचें छळण। मांडिलें बहुत ।।१।। कुलस्त्रिया भ्रष्टविती । सद्धर्मासी निंदिती । धेनू कसाया अर्पिती । हायहाय दुर्दिन ।।२।। कित्येक कन्याविक्रय करिती । बहु परधर्म स्वीकारिती । स्वधर्मी आचार सांडिती । राहिले आडनांवाचे ।।३।। कांहीं केवळ श्रद्धावान । आदरें करिती स्वधर्माचरण । परि मार्गदर्शक त्यांलागुन । अनुभवज्ञानी मिळेना ।।४।। बाह्यस्थिति विपरीत । तेणें चित्त होय विस्खलित। श्रद्धा डळमळोनि साधनीं येत । अनिवार विक्षेप ।।५।। बोलके पंडित ते किती । धर्मज्ञानी ह्मणविती। परि आचार आणि नीति । विपरीत दिसे ।।६।। असो ऐशा समयाला । सद्गुरुमहाराज अवतरला । बहुतांसी आश्रयो झाला । तेंचि पुढती कथन करूं ।।७।। हिंसाधर्मी वाढले जन । नित्य करिती पशुहनन । बळेंच विरुद्धाचरण । करावया सुख वाटे ।।८।। हृदयस्थ जनार्दन । हें शास्त्राचें वचन। जीवशिवांचा योग जाण । अतिनिकट ।।९।। जीवमात्र जगदीश्वर । ऐसा शास्त्रांचा विचार । देहममत्व अनिवार । लागे मायासंयोगें ।।१०।। देहासी करितां दंडण । जीवासी दुःख होत दारुण । पाहावें प्रत्यक्ष प्रमाण । आपुलेपाशीं ।।११।। यास्तव अहिंसा मुख्य सार । दुखवूं नये कोणाचें अंतर । जीव तितुके परमेश्वर । मानीत जावे ।।१२।। हाचि असे मुख्य नेम । त्यांतहि भेद असती सूक्ष्म । सत्त्वप्रधान निरुपद्रवी परम । ऐसे जीव तरी दुखवूं नये ।।१३।। श्रीहरीचीं पूजास्थानें । गाई ब्राह्मण वन्हि जीवनें। अतिथि प्रतिमास्थानें । वृक्षादि अनेक ।।१४।। यांतीलही मुख्य गाय । आम्हां भारतीयांची माय । तिचा करोनि विक्रय । घात करिती आपुला ।।१५।। माय देती कसाबाहातीं । त्यांच्या जिण्या पडो माती । तिच्या उपकारातें नेणती । अज्ञानांध जन झाले ।।१६।। वेद शास्त्रें वर्णिती कीर्ती । तेहतीस

कोटी देव वसती । रोमरंध्रीं ऋषि राहती । ऐसी धेनू पवित्र ।।१७।। ब्रह्मा विष्णु महेश। पाठीं पोटीं मुखास । चंद्र सूर्य नेत्रांस । राहोनिया शोभविती ।।१८।। अष्टदिक्पाळ भैरव । आदित्यादि ग्रह सर्व। तेहतीस कोटी राहती देव। उदरामाजीं जियेच्या ।।१९।। मूत्रस्थानीं गंगा राहे । पय प्रत्यक्ष अमृत पाहे। पुच्छीं नाग शोभताहे । धन्य जियेचें दर्शन ।।२०।। जियेचें जिणें परोपकारी । जी सदा निर्विकारी। पुत्रपौत्रांसह चाकरी । मानवाची करितसे ।।२१।। तेचि मानव निष्ठुरपणें । कृत्य करिती लाजिरवाणें। वत्सापरी पय सेवणें । परि उपकार फेडिती गळफांसें ।।२२।। पुत्र क्षेत्र[१] सोज्ज्वळ[१] करी[१]। धान्यराशी पडती घरीं । दुष्ट तयांसी संहारी । वाहवा रे युगधर्म ।।२३।। जियेचें मलमूत्र आणि पय । अगणित उपकार हेंचि ध्येय । शरीरस्वास्थ्याची सोय । निर्मिली देवें ।।२४।। पयःपान जे करिती । आयुष्यबळ आणि मति । वाढोनिया मनोगति । स्थिर होय ।।२५।। अपस्मारादि भ्रमरोग । रक्तदोषीं अनंत भोग। जीर्णज्वर पांडुरोग । क्षयादि नाश पावती ।।२६।। हृदयसंबंधीं विकार। मूत्रकृच्छ पित्त विखार । दाहोन्माद-श्रमपरिहार । अमृत मर्त्यलोकींचें ।।२७।। तैसेचि बहुरोगांसी । पथ्यकर वदती भिषगृषि[२] । बालतरुणवृद्धांसी। अनायासे पचतसे ।।२८।। सर्वांसी दे समाधान । रुचिकर मधुर असे जाण । देवा प्रिय सत्त्वप्रधान । गोदुग्ध जाणावें ।।२९।। मायदूध दोषी झालें । तरी गोदुग्ध पाजिती भले । दुजी माय नेणोनि भ्रमले। आश्चर्य वाटे ।।३०।। तैसाचि गोमूत्रप्रताप। दर्शनें हरतें पाप । प्राशनें निरसे बहु ताप। व्याधिजन्य विकार ।।३१।। सेवितां वाढते बुद्धि । औषधांमाजीं महौषधि । कफ आणि वात व्याधी । पासोनि करी निर्मुक्त ।।३२।। कुष्ठ गुल्म आणि उदर । पांडु[३] अर्श[४] कंडूविकार । नेत्ररोग सांथीचे ज्वर । पाठवी दूरदेशीं ।।३३।। क्षार रक्तशुद्धि करित । नाना जंतू

**१ धेनुपुत्र (बैल) शेताची नांगरट करितात. २ वैद्य. ३ पांडुरोग. ४ मूळव्याध.**

निवारित । अरुचि घालवूनि आल्हाद देत । मानवासी गोमूत्र ।।३४।। गोमय[1] तेंही प्रसिद्ध । देव महानुभाव सिद्ध । सर्वांसी प्रिय असे शुद्ध । महिमा किती वर्णावा ।।३५।। हवा शुद्ध करावयासी । दुजी वस्तु नसे ऐसी । मत्कुणादि कृमींसी । होऊंच नेदी ।।३६।। पय प्रधान पित्तनाशी । मूत्र कफातें निरसी । गोमय वातशुद्धीसी । करतें मानवहितार्थ ।।३७।। ऐसी ही मायधेनु । साक्षात् हीच कामधेनु । उपकृतीवांचूनि आनु । कार्य नसे जियेचें ।।३८।। जे जे इचा घात करिती । ते आपुलाचि घात योजिती । ऐसें इतिहास सांगती । दृष्टी फिरवा माघारीं ।।३९।। परि या कलीची राहाटी । पुराणेंच म्हणती खोटीं । तेथें काय सांगाव्या गोष्टी । दृष्टांतरूपें ।।४०।। परि प्रत्यक्ष उपयोग होतो । हा तरी प्रत्यय येतो । म्हणोनि सकळांसी विनवितों । उपेक्षा न करा धेनूची ।।४१।। असो इतुकें सांगावया काज । गोपालक महाराज । गोरक्षण धर्मबीज । असे एक ।।४२।। प्रसिद्ध क्षेत्र म्हसवडासी । हाट भरे प्रतिसप्ताहासी । धेनु नेती गळफांसी । दुष्ट कसाब कितिएक ।।४३।। सद्गुरु तेथें जावोनी । सांगती तें मोल देवोनी । असंख्य धेनू आणिती सदनीं । वारंवार ।।४४।। भव्य गोशाळा बांधोन । आदरें करिती संरक्षण । अभ्यंकर कारकून । नेमिले तयावरी ।।४५।। वरचेवरी किती येती । गोप्रदानें किती जाती । पाहतां वाटे ही शक्ती । मानवी नव्हे ।।४६।। सुकाळीं नेती पाळावयासी । दुष्काळीं सोडिती गुरुपाशीं । वेंचिती किती धनराशी । देव जाणे ।।४७।। गंगी नामें गाय लंगडी । कदाही गुरूची पाठ न सोडी । दर्शनाची अति गोडी । पशूसही वाटतसे ।।४८।। गोशाळेंत सद्गुरुस्वारी । जाऊनि बैसे वरचेवरी । झाडलोट करिती साजिरी । स्वहस्तें आनंदें ।।४९।। गोसेवा करावयासी । लाविले महारोगीयांसी । मुक्त झाले बहुतांशीं । गोसेवासुकृतें ।।५०।। गाईची सेवा करितां । संतुष्ट

१ शेण.

होती समस्त देवता । ग्रहपीडा न बाधे सर्वथा । मनकामना सफल होय ।।५१।। धेनुमाय जयाचे गृहीं । पयःपान करिती पाहीं । गोमयें सारविती मही । सडे घालिती साजिरे ।।५२।। क्वचित् गोमूत्र सेविती । धेनुसन्निध वास करिती । तयांची प्रगल्भ होय मति । निरोगी राहती सर्वकाळ ।।५३।। सत्त्वगुण नांदे तेथें । संतति बळवान होते । भाग्य नाहीं शांतीपरतें । भोगिती तें अनायासें ।।५४।। वांझ स्त्री गाईची सेवा करी । तरी पुत्र खेळतील तिचे घरीं । गोप्रदानें यमपुरी । वैतरणी ने पैलपार ।।५५।। द्विमुख गाईसी प्रदक्षिणा । घालितां त्रिभुवनासी जाणा । प्रदक्षिणेचें फल तयांना । मिळेल निश्चयें ।।५६।। सवत्स धेनु दान करितां । पृथ्वीदानफल ये हाता । दान घे त्यासी समर्थता । असावी मात्र ।।५७।। गाईसी घालितां चारा । सुख होईल समस्त पितरां । आशीर्वाद देती तया नरा । पुत्रधनसमृद्धि ।।५८।। वासुदेव स्वयें सेवा करित । तेथें मानवाची काय मात । दत्त गोरक्ष समर्थ । ऋषि सिद्ध महामुनी ।।५९।। असो गोसेवा ऐसी । सद्गुरु करिती आदरेंसी । करविती, बोधिती सकलांसी । गोशुश्रूषा करावी ।।६०।। एकदां ऐसा प्रकार घडला । खाटिक आले गोंदावलीला । संगें घेवोनि धेनूंला । वधायासी चालिले ।।६१।। मार्गें गोंदावलीस येतां । वार्ता कळली सद्गुरुनाथा । पाचारूनि तयां समस्तां । वदती 'गाई न न्याव्या ।।६२।। यांचें मोल आम्ही देतों । आदरें सर्व संरक्षितों । तुम्हांसीही ऐसें कथितों । मायवध न करावा ।।६३।। चिंताग्रस्त झाल्या दिसती । पुढील भविष्य आणोनि चित्तीं । दीनवदनें करुणा भाकिती । हाय हाय युगधर्म ।।६४।। अश्रु ढाळिती नयनांतुनी । गोड न लागे अन्नपाणी । दिसूं लागली यमजाचणी । प्राणांतसमयाची ।।६५।। जीव प्रिय सकलांसी । कल्पना करा तुम्हीं मानसीं । भेटी झालिया व्याघ्रासी । काय अवस्था होईल' ।।६६।। कसाई वदती निष्ठुर । 'अज्ञानी पशु हे साचार । कोठला यां ज्ञानविचार । असेल तरी दावावें ।।६७।। निर्बंधन करूनि चारा ।

घालितों, तुम्ही हांका मारा । जरी असेल ज्ञानझरा । तरी धांवोन येतील ।।६८।। धांवोन येतां समस्त । सोडून देऊं नेमस्त । ना तरी शीघ्र वधाप्रत । नेऊं सत्य जाणावें' ।।६९।। सद्गुरु तया रुकार देती । दुष्ट कसाई तैसें करिती । दूर राहोन पाचारिती । नामें घेवोन गुरुराव ।।७०।। 'गंगे यमुने गोदावरी । तुंगे कृष्णे या सत्वरीं । कपिले वारणे आणि मधुरी । दासासमीप धांवा गे' ।।७१।। ऐसें वदतां ते अवसरीं । धांवोन आलीं तीं सारीं । कोणी शेंपूट उभारी । कोणी फोडी हंबरडें ।।७२।। चरण चाटोन क्षालन करिती । कोणी मुखाकडे पाहती । कांहीं उगाच हुंगिती । सद्गुरुराजयांसी ।।७३।। भोंवती धेनूंचा समुदाव । मध्यें शोभे सद्गुरुराव । वाटे दुजा वासुदेव । वृंदावनीं उभा असे ।।७४।। असो ऐसी घडतां स्थिति । अनुताप पावले दुर्मति । ढळढळां अश्रु ढाळिती । आम्ही अतिपातकी ह्मणोनी ।।७५।। सद्गुरु केवळ दयामूर्ती । सकळांसी भोजन घालिती । 'पुनरपि ऐसी नीचवृत्ती । तुह्मीं सर्वथा न करावी' ।।७६।। असो मोल देवोनि तयांसी । पाठविलें स्वसदनासी । ऐशी आस्था श्रीगुरूंसी । धेनूविषयीं अतिशय ।।७७।। कृष्णराव गांवकामगार । धनगरी भिकवडीकर । श्रीगुरुपासोन चार । धेनू नेती पाळावया ।।७८।। परि बहु अनास्था केली । जनावरें मरों घातलीं । दृष्टांत होय ते काळीं । गाई माघारीं पोंचवाव्या ।।७९।। वदती चालण्या शक्ति नाहीं । तरी रामतीर्थ लवलाहीं । देवोन पोंचवी पाहीं। अनास्था त्वां बहु केली ।।८०।। गायी येतां गळां पडती । भारी भोगिल्या विपत्ती । येक गाय रामापुढती । मरतां गंगा घातली ।।८१।। करविती सकलां नामगजर । गुरुक्षेत्र वाटे काशीपुर । अंतकाळीं गुरुवर । प्राणियां देती सद्गति ।।८२।। वामनराव पेंढारकर । मोरगिरी मंदिरींचे भक्त थोर । त्यांचे पुत्राचा समाचार । श्रोतेजनीं परिसावा ।।८३।। बहुतां दिवशीं सुत झाला । परि देहव्याधीनें पीडिला । गुरुदर्शना आणिला । गोंदावलेग्रामीं ।।८४।। काळवेळ जवळी आली । ती श्रींनीं जाणितली ।

गंगा घातली मुखकमलीं । तुळशी कर्णरंध्रांत ।।८५।। पित्याहस्तें गोप्रदान । स्वसंकल्पें देववोन । अज्ञान अर्भका उपदेशोन । वैकुंठासी धाडिती ।।८६।। रामापुढती ठेवोन । ह्मणती करा सर्वही भजन । दशदानें देववोन । बाळ नेलें मोक्षासी ।।८७।। ब्रह्मानंद स्वहस्तेंसी । दहन करिती बालकासी । कर्पूर तुळशी चंदनासी । इंधनीं त्या घालोन ।।८८।। मायबाप असोन जवळी । अश्रु न ढाळिती ते वेळीं । महदाश्चर्य मानिती सकळी । धन्य गुरूंचें बोधामृत ।।८९।। लग्नसोहळा मृतसोहळा । गुरुगृहीं एकचि लीला । मायोद्भवविकाराला । पुसे कोण ।।९०।। एकदां ऐसें झालें । मंदिरापुढती गाढव पडलें । प्राणांतव्याधीनें ग्रासिलें । दैवें आलें संतद्वारीं ।।९१।। यमपाशीं जीव ओढे । लोभें देहींच तडफडे । शिष्यें कथितां पवाडे । दयासागर ते ठायीं ।।९२।। गंगा घालोन मुखांत । अंगावरोन फिरविती हात। पवित्र नामगजरांत । सद्गति देती तयासी ।।९३।। येणें प्रकारें बहुतांसी । अंतीं नेती सद्गतीसी । ग्रंथविस्तारभयासी । धरोन संकेत दाविला ।।९४।। सकळां भूतीं दया समान । परि आदरें गोशुश्रूषण। करिती काल जाणोन । श्रोते पुढतीं अवधारा ।।९५।। दुजें देवपूजास्थान । गरीब सत्पात्र ब्राह्मण । अतिथी मानवीं अन्नदान । करिती पुढें परिसावें ।।९६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते नवमाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास तिसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। अन्न म्हणजे ब्रह्म पूर्ण । जीवन तो नारायण । अन्नभोक्ता भगवान । जठरानलरूपी ।।१।। अन्न जीवा रक्षण करतें । अन्न जीवा शांतवितें । दान नाहीं

यापरतें । त्रिभुवनीं आणिक ।।२।। जीवन जीवासी जीववितें । जीवन जीवरूप निरुतें । जीवन वदतांच आल्हाद देतें । प्राणिमात्रांसी ।।३।। क्षुधातृषेचें दुःख भारी । झोंबतें प्राण्या दोप्रहरीं । या दुःखाची सरी। दुज्या कशासही नसे ।।४।। अन्नदाता पितयासमान । अन्नदाता धार्मिक गहन । अन्नदाता श्रेष्ठ पूर्ण । दातयांमाजीं ।।५।। अन्नदानें प्रायश्चित्त घडे । अन्नदानें दोष उडे । अन्नदानें सुकृत जोडे । व्याधी हरती अन्नदानें ।।६।। अन्नदानें देवतांसी । अन्नदानें पितरांसी । अन्नदानें भूतांसी । आनंद होय ।।७।। बहुत करितां द्रव्यदान । अथवा अमोल वस्तुदान । तरी तृप्ति अन्नदानासमान । आणिक कोठें आढळेना ।।८।। सकळ जीवां अन्नदान । करणें हें उचित जाण । सामर्थ्य नसतां त्यांतही प्रधान । कथिती तें परिसावें ।।९।। संन्यासी अतिथि ब्रह्मचारी । भुकेनें पीडित नीच जरी । विप्र विद्यार्थी सदाचारी । साधक सिद्ध संतजन ।।१०।। अडचणींत गवसला जो देख । पोटार्थी देशसेवक । पांथिक अज्ञान अर्भक । व्यंग दीन परोपकारी ।।११।। आणिक जीं देवतामुखें । अग्नि जीवन धेन्वादिकें । त्यांसी अन्न अर्पितां निकें । अगणित सुकृत हातीं ये ।।१२।। जे वेदविद्या पठण करिती । जे अध्यात्मज्ञानें रंगोनि जाती । ज्यांसी बाणली वैराग्यस्थिति । तयां अन्न देतां भलें ।।१३।। पशुपक्ष्यादिकांसी। अन्न द्यावें विवेकेंसीं । भुकेजल्या व्याघ्रासी । मांस कधीं अर्पूं नये ।।१४।। विप्र असावा स्वधर्माचरणी। ब्रह्मचारी वेदपठणी । अहिंसायुक्त अन्न सदनीं । असेल तें अर्पावें ।।१५।। हिंसा म्हणजे परपीडा । चोरी लबाडी घात, हे सोडा । युक्त अन्न देतां जोडा । सुकृतासी दुजा नाहीं ।।१६।। अनंत सुकृतांच्या राशी। तरी घडे अन्नदानासी । तृप्ति नाहीं यासरसी । आणिक कोठें ।।१७।। सद्गुरु आम्हांसी वदती । विप्रोच्छिष्टें जे काढिती । तयांचीं उच्छिष्टें श्रीपती । स्वहस्तें काढितसे ।।१८।। सद्गुरुगृहीं सर्वकाळ। अन्नाचा होत सुकाळ । किती शमविती जठरानल । त्याची

गणती असेना ।।१९।। मुमुक्षु साधक सिद्ध । थोर थोर येती प्रसिद्ध । वैदिक शास्त्री आणि वैद्य । विद्वज्जन कितियेक ।।२०।। बहुत येती अन्नार्थी । स्त्रियां लेकुरां नसे मिती । चिंताग्रस्त तृप्त होती । धनिक आणि सदिच्छ ।।२१।। नित्य असे मुक्तद्वार । उपवासी न रहावा नर । येविषयीं खबरदार । असती सतत ।।२२।। गांवोगांवींचे येती नर । कोणी भिडस्त आळशी विसर । राहती, म्हणोन वरचेवर। निमंत्रणें पाठविती ।।२३।। इतुक्याही देतां सूचना । क्वचित् कोणी राहतां जाणा । सर्वज्ञ ते सांगती खुणा । अमुक गृहस्था बोलवावें ।।२४।। धनिक विद्वान आणि दीन । सकळांसी एकचि अन्न। स्वहस्तें प्रसाद देऊन । जेवूं घालिती अतिप्रीतीं ।।२५।। गुरुवारीं समाराधना । नित्य होत उपासना। विप्रकुटुंबें गांवचीं जाणा । सकल जेवूं घालिती ।।२६।। गांवभोजनें तीं किती । वरचेवरी अनेक होती। अठरापगड याती मिळती । तृप्त होती गुरुगृहीं ।।२७।। गोंदवले गांव अति लहान । तेथें बाजार सुरू करोन । गुरुप्रिय गुरुवार जाणोन । नेमून दिला ।।२८।। कित्येक बाजारदिवशीं । पाचारती बाळा पाटलासी । वदती आज श्रीरामासी । नैवेद्य असे ।।२९।। मनुष्य न सोडावा बाजारी । जेवूं घाला पोटभरी । तदनंतर गांवचीं सारीं । रामप्रसाद सेवावा ।।३०।। कोणी शिधासाहित्य देती । काहिली चुलाणीं ठेवती । पुरुष इतर पाक करिती । स्त्रिया भाजिती पुरणपोळ्या ।।३१।। चुलींच्या करिती हारी। वाटे यात्रा ही साजिरी । सत्ताधीश गुरूचे घरीं । गांवोगांवची भरलीसे ।।३२।। असो बाजारी जेवोन जाती । मग गांवचीं सकल याती । स्वहस्तें श्रीगुरु वाढिती । आग्रहातें करकरोनी ।।३३।। तो सोहळा अपूर्व । जेथें नांदे गुरुराव । प्रसादा येती वाटे देव । मनुष्यवेष घेवोनी ।।३४।। आणि उत्साहीं विशेष । यात्रा भरे गोंदवलेस । ते समयीं अन्नदानास । गणती कोण करील ।।३५।। नित्य उत्साह गुरुगृहीं । त्यांतही विशेषत्वें पाहीं । परिसा श्रोते सर्वही । एकचित्तें गुरुमहिमा ।।३६।।

चैत्र शुद्ध नवमीसी । यात्रा भरे दहा दिवसीं । आषाढ शुद्ध पौर्णिमेसी । नामसप्ताह गुरुघरचा ।।३७।। गुरुपूजेचा तो दिवस । धांवोन येती सकल शिष्य । सोहळा तो विशेष । आनंद न समाये अंतरीं ।।३८।। माघमासीं दासनवमी । उत्साह होत गुरुधामीं । झोळी कुबडी जे नेमी । दीक्षाधारी करिती भिक्षा ।।३९।। एकनाथ नामदेव तुकाराम । पुण्यतिथीचा सोहळा परम । जयंत्या सण नित्यनेम । महाप्रसाद होतसे ।।४०।। जपानुष्ठानसांगता किती । उपनयनें विवाह होती । बारशादि संस्कार चालती । नित्य पोळी गुरुगृहीं ।।४१।। भोजनाआधीं ''जय जय श्रीराम'' । या घोषाचा असे नेम । मध्यें श्लोक आर्याही सुगम । प्रेमानंदें गर्जती ।।४२।। नामस्मरणीं भोजन करतां । कित्येकांच्या हरल्या व्यथा । प्रसादरुचि न ये वर्णितां । भाविकांसी अति प्रिय ।।४३।। व्याधिपीडित जनांसी । रामतीर्थ औषधी खाशी । प्रसाद देती पथ्यासी । रोगमुक्त व्हावया ।।४४।। सद्‌गुरूंचें चरणतीर्थ । सेवितां समाधान होत । नित्य घेती गुरुभक्त । अत्यानंदें ।।४५।। प्रसादें रोग जाती । प्रसादें चित्तशुद्धी होती। प्रसादें वाढे भगवद्भक्ती । महिमा किती वर्णावा ।।४६।। प्रसादें अन्नपूर्णा प्रसन्न । कदापिही न पडे न्यून। तोही प्रकार सांगेन । विशद करोनी ।।४७।। प्रातःकाळीं पाक करिती । सामुग्री घेती उपस्थित जनांपुरती । दोप्रहरीं भक्त येती । क्वचित्काळीं अनेक ।।४८।। शेंदीडशें लोक येती । त्यांतचि देखा तृप्त करिती । ऐसें गुरु कौतुक दाविती । महदाश्चर्य कलियुगीं ।।४९।। ब्रह्मानंदांसी दर्शन। द्यावया कर्नाटकीं जाण । गेले, तेथें एक शेर अन्न । शतकांसी पुरविलें ।।५०।। तैसीच उपाहाराची स्थिती । अल्प परि सकळां वाढिती । ऐसे प्रकार नित्य घडती । अन्नपूर्णा वास करी ।।५१।। इंदुरीं असतां गुरुवर । दुष्काळ पडला असे थोर । तेव्हां श्रींचें द्रवलें अंतर । जेवूं घालिती गरिबांसी ।।५२।। किती लोक आले धाले । किती अन्न खर्च झालें । हिशेब कोणा न कळे ।

गुरुगृहींचा ।।५३।। हिशेब केवळ भाजीचा । राखिला कोणी समयाचा । जाहला बहुत शतकांचा । आश्चर्य वाटे सकळांसी ।।५४।। गोंदावलीस असतां किती । वारकरी जेवूं घालिती । शिबिका दिंड्या मार्गावरती । येतां आदरें जेवविले ।।५५।। भोजनाचा ऐसा प्रकार । क्वचित् केवळ मीठभाकर । क्वचित् पक्वान्नें मधुर । ऊर्मी एक राहीना ।।५६।। कर्णासारखी दानशूरता । क्वचित् दाविती हीनता । भिकाऱ्यापाशीं भीक मागतां । लाभ काय होईल ।।५७।। क्वचित् भिक्षा मागती । क्वचित् ग्रामभोजनें करिती । अंत कोणा लागों न देती । ऊर्मी एक तगेना ।।५८।। क्वचित् कफनी भरजरीची । क्वचित् कौपीन चिंधीची । खूण जाणा गुरुघरची । ''आहे आहे, नाहीं नाहीं'' ।।५९।। उदकपूर्ति तैशाच रीती । ज्ञानवापीतीराप्रति । घाट बांधोन कुंडे करिती । शीत स्वच्छ झऱ्यांचीं ।।६०।। खालती वरती पाणी कमी । परि येथेंच वाहतसे नामी । ईशकृपा सद्गुरुधामीं । साच साच ।।६१।। असो अन्नोदकाचा सुकाळ । नित्य करिती गुरुदयाळ । जपतां तयांची नाममाळ । तृष्णाताप निवेल ।।६२।। व्याधिग्रस्तां वैद्य मिळाला । भूतखेतां मांत्रिक झाला । दरिद्रियांसी धनिक भेटला । गुरुराजयोगी ।।६३।। अन्नार्थियांसी अन्नदाता । वेदांतियांसी सर्वज्ञता । धेनूंसी होय प्राणदाता । योगियां योग शिकवितसे ।।६४।। नास्तिकां साधनीं लावित । साधकां सिद्ध करित । भाविकांसी दावोनि देत । निजरूप ।।६५।। भाविक नास्तिक हठयोगी । यांसी लावितसे सन्मार्गीं । ऐसी माय भेटली जगीं । तो येक धन्य पुरुष ।।६६।। असो साधकां साधन करावयासी । मंदिरें बांधविती कैसीं । हेचि कथा पुढील समासीं । श्रोते हो द्यावें अवधान ।।६७।।

**श्रीसद्गुरुलीलामृते नवमाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## समास चवथा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। ब्रह्मचैतन्य सद्गुरुराणा । सकलां सांगे उपासना । मुख्य स्मरणभक्ति जाणा । दुजी आत्मनिवेदन ।।१।। आणिक ज्या उरल्या भक्ती । त्यांकारणें मंदिरांप्रति । पाहिजे हें जाणोन चित्तीं । करविती अनेक ।।२।। भक्तीचे नवविध प्रकार । श्रवण कीर्तन नामगजर । सेवा अर्चन नमस्कार । दास्य सख्य निवेदन ।।३।। घडतां नवविधा भक्ती । सहज मिळे जीवा शांति । नवविध भक्ती सहज घडती । मंदिरांमाजीं ।।४।। मंदिरीं पुराणश्रवण घडे । मंदिरीं कीर्ति डोळ्यांपुढें । स्मरण तें मागें पुढें । सहजचि राही ।।५।। मंदिर बांधाया काज । सद्बोध हेंचि एक बीज। बोधकर्ता गुरुराज । दृष्टीसमोर उभा ठाके ।।६।। मंदिर असावें मलरहित । मंदिर असावें शोभिवंत । येणें ध्यासें सेवा घडत । वंदन पहा प्रत्यक्ष ।।७।। दर्शन घेतां मंदिरांत । तूं देव मी भक्त। ऐसा दास्यभाव उमटत । आपोआप ।।८।। आमुचा देव आमुचा धर्म । आमुची याती आमुचा नेम । आमुचे म्हणतांच सख्य परम । अंतरीं वसे ।।९।। मंदिरीं वसे देवमूर्ति । कैसें स्वरूप कैसी व्याप्ति । कैसेनि घडे भगवद्भक्ति । अनन्य जिज्ञासा होतसे ।।१०।। जिज्ञासु करी श्रवण मनन । तेणें निजध्यास चाले गहन । निजध्यासें आत्मनिवेदन । नववी भक्ति घडतसे ।।११।। असो ऐशा नऊही भक्ती । मंदिरीं साधका सहज घडती । याकारणें गुरुमूर्ति । मंदिरें स्थापिती अनेक ।।१२।। मंदिर खरी धर्मशाळा । मंदिर उपासका जिव्हाळा । मंदिर आनंदाचा मळा । शिणल्या भागल्या जीवासी ।।१३।। मंदिरीं अन्नदान घडतें । मंदिरीं मैत्री दुणावते । संत महंत भेट होते । सहज श्रीमंदिरीं ।।१४।। देशज्ञान कालज्ञान । नाना तीर्थक्षेत्रांचें ज्ञान । येणेंचि रीती समाधान । बहुप्रकारें ।।१५।। मंदिर बांधितां ससाहित्य । उभय कुळें उद्धरत । स्वयें करून करवित । उपासना बहुतांकरवीं ।।१६।। ऐसीं मंदिरें

सद्गुरु बांधिती । परिसा जीं उभविली शिष्या हातीं । हर्दा येथें बांधविती । रावसाहेब यांचेकरवीं ।।१७।। महादेवभट्ट इंदुरवासी । पूजा करिती अहर्निशीं । शेती पूजासाहित्यासी । दिधली असे ।।१८।। बेलधडीस ब्रह्मानंद । स्थापिती रामप्रासाद । बिदरहळ्ळी व्यंकटापुरीं प्रसिद्ध । मंदिरें बांधिलीं तयांनीं ।।१९।। आनंदसागरें जालनामठीं । स्थापिले श्रीराम जगजेठी । यात्रा महोत्साव दाटी । श्रीरामनवमीसी ।।२०।। अंबड येथें दुसरें मंदिर । स्थापना करिती आनंदसागर । महोत्सव यात्रा गजर । रामसंप्रदाय वाढविला ।।२१।। प्रसिद्ध मंदिर पंढरपुरीं । जी श्रीविठ्ठलाची नगरी । तेथें स्थापिले कोदंडधारी । पाहतां हारपे तहानभूक ।।२२।। आप्पासाहेब भडगांवकर । मालक धनिक द्विजवर । मंदिर लहान परि सुंदर । नीळकंठबुवा पुजारी ।।२३।। महाभागवतांचे येथें । शिवालय पूर्वीचें होतें । मागें स्थापिलें रामातें । हरिहरसंगम शोभतसे ।।२४।। सिद्धक्षेत्र कुरवली स्थान । तेथें मंदिर बांधिलें विस्तीर्ण । दामोदरबुवा शिष्य जाण । सुप्रसिद्ध तयांनीं ।।२५।। भाऊसाहेब जवळगीकर । यांजकरवीं श्रीमंदिर । बांधविलें शहरीं सोलापुर । उपासना करावया ।।२६।। तैसेंच मंदिर गिरवीसी । येसूकाकांचे हस्तेंसी । पूजा करिती पिलंभट्ट जोशी । श्रीगुरुआज्ञेनें ।।२७।। नानासाहेब धनिक वदत । विष्णुकाका साधकसंत । यांजकरवीं मांडवें येथें । राममंदिर करविलें ।।२८।। सावळाराम देशपांडे । दंडधारी नोकर गाढे । श्रीमान् भरले द्रव्यघडे । बोधें अनुताप पावले ।।२९।। तयांकरवीं श्रीराममंदिर । गोमेवाडी येथें सुंदर । बांधवोनि केला परिहार । दुष्कृतांचा सत्कर्में ।।३०।। विष्णुअण्णा कात्रे पंत । नोकरी सोडून झाले विरक्त । माधुकरी निर्वाह करूनि सतत । भजन करूं लागले ।।३१।। दत्तउपासना तयांनीं । घेतली सद्गुरूंपासोनी । दत्तमंदिर आटपाडीं बांधोनी । सेवा करिती गुरुआज्ञें ।।३२।। तेथेंचि राममंदिर । स्थापिती बुवा यज्ञेश्वर । जे गुरूंचे भक्त थोर । सिद्धपुरुष ।।३३।। धनिक साधक

गुणराशी । विष्णुपंत म्हासुर्ण्यासी । स्थापिती सीतावल्लभासी । गुरुआज्ञा घेउनी ।।३४।। विद्वान् शंकरशास्त्री यांसी । श्रींनीं नेमिलें पूजेसी । सेवा करिती अहर्निशीं । भक्त साधक प्रसिद्ध ।।३५।। वामनबुवा पेंढारकर- नामें श्रीगुरुकिंकर । मोरगिरी येथें मंदिर । रघुनाथाचें बांधिती ।।३६।। करावया पूजोपचार । जगन्नाथ इंदूरकर । मदतीस देती गुरुवर । रामसंस्था चालवाया ।।३७।। भक्त वासुनाना देव । कृष्णातटीं कऱ्हाड गांव । तेथें पूजिती रामराव । गुरुबोध सेवोनिया ।।३८।। मंदिरीं महंत बापू चिवटे । सेवा करिती एकनिष्ठें । अतिथीच्या ठायीं ममत्व मोठें । आदरें करिती अन्नदान ।।३९।। गणूबुवा रामदासी । कागवाडीं करिती मंदिरासी । तेथें मारुतीस्थापनेसी । महाराज करिती आनंदें ।।४०।। गोविंदशास्त्री पुराणिक । दत्तोपासक भाविक । सातारीं दत्तमंदिर देख । बांधिती गुरुआज्ञेनें ।।४१।। चिदंबर नाईक करी । हे राममंदिर हुबळी शहरीं । बांधोन करिती चाकरी । सद्गतीकारणें ।।४२।। पुणें प्रांती उक्साण । तेथें विठ्ठलमंदिर जाण । तैसेंचि नरगुंदीं जीर्णोद्धरण । विठ्ठलमंदिराचें करविलें ।।४३।। खातवळीं श्रीविठ्ठलमंदिर । तैसेंचि विखळें येथें सुंदर । मांजरड्यास रघुवीर । स्थापिती गुरुआज्ञें ।।४४।। संत दप्तरदार विठ्ठलपंत । रसाळ कवित्व जगविख्यात । रामोपासक कऱ्हाडक्षेत्रस्थ । होउनिया गेले ।।४५।। त्यांच्या मूर्ती होत्या जरी । पाटण ग्रामीं स्थापविती घरीं । बाळकृष्ण महाजन सेवाधिकारी । उपासक श्रीगुरूंचे ।।४६।। तैसेंच कोंकणप्रांतांत । खेरडी नामक ग्रामांत । शेंबेकर वासुदेवाप्रत । आज्ञा जाहली श्रीगुरूंची ।।४७।। उत्तम करोनि मंदिर । तेथें स्थापिले रघुवीर । सेवा करिती मनोहर । पूर्वपातकें नाशाया ।।४८।। सातपुड्यांत राममंदिर । निर्मिलें कैसें परिसा सुंदर । एकदां एकले गुरुवर । नर्मदातटीं चालिले ।।४९।। निबिड घोर कानन । भिल्लांची वस्ती तेथें गहन । पाहतां श्रीगुरुनिधान । धांवोन आले दुष्ट ते ।।५०।। सतेज दिसे भाग्यवंत । वदती भला

हा श्रीमंत । जवळी जावोन पहात । तंव दिसे गोसावी ।।५१।। श्रीगुरु कफनी काढोन । देती अंगावर फेंकून । वदती न व्हा उदासीन । ऊर्णावस्त्र[१] मोलाचें ।।५२।। क्षण एक घडतांच सत्संगति । तयांसी झाली उपरति । सिद्धपुरुष हा निश्चितीं । म्हणोनि चरणीं लागले ।।५३।। आश्रम पुनीत करावा । कांहीं फलाहार घ्यावा । आम्हांसी प्रसाद द्यावा । म्हणोनियां विनविती ।।५४।। तंव वदले श्रीगुरु । 'तुम्ही पातकी वाटमारू । तेथें आम्ही प्रसाद करूं । तरी दोष आम्हांसी' ।।५५।। परि आग्रह धरिला त्यांनीं। गोठणीं जाती घेवोनी । फळें देती आणोनी । अत्याग्रह मांडिला ।।५६।। समर्थ वदती तयांसी । 'फळे नको तुमचीं आम्हांसी । बहुत दिसती गाईम्हशी । पयःपान कांहीं करूं' ।।५७।। भिल्ल वदती 'दोहनवेळ[२] । होवोन गेली जी दयाळ । रानटी जनावरें ओढाळ । या समयीं दूध न देती' ।।५८।। समर्थ वदती भिल्लांसी । 'ही लठ्ठ दांडगी महिषी । दोहन करूं इजसी । पात्र आणा सत्वरीं' ।।५९।। 'छे, ही अति बुजरट । मारकी आहे बहु खट । तुम्ही न धरा हिची वाट । व्यंग करील देहासी' ।।६०।। समर्थ वदती 'तुम्हांस कांहीं । याची चिंता करणें नाहीं' । ऐसें बोलत लवलाहीं । महिषीसी कुरवाळिलें ।।६१।। तेव्हां ती स्थिर राहिली । समर्थें तिजसी दोहिली । द्विगुणित पात्रें क्षीरें भरलीं । आश्चर्य वाटलें भिल्लांसी ।।६२।। वारंवार वंदन करिती । आणि करिती विनंति । 'पावन करा आम्हांप्रति । दुष्टकर्मी आम्ही असों' ।।६३।। समर्थ वदती 'जरी तुम्ही । द्रव्य वेंचाल सत्कर्मीं । तरी रामभक्ति शिकवूं आम्हीं। पावन व्हाल सर्वही' ।।६४।। भिल्ल वदती 'सर्वस्व दिलें' । तेव्हां मंदिर बांधविलें । उपासने शिकविलें । अनुग्रह दिला तयांसी ।।६५।। असो ऐसे रानटी लोक । भजनीं लावी श्रीसद्गुरुनायक। येणेंपरी मंदिरें अनेक । स्थापिते झाले गुरुराव ।।६६।। ठायीं ठायीं उपासना । ठायीं

१. लोकरीचें कापड. २. धार काढण्याची वेळ.

ठायीं अन्नदाना । तैसीच रामनामस्मरणा । सीमा नाहीं ।।६७।। समस्त मंदिरवासी जनां । आज्ञा करी गुरुराणा । जेणेंकरून यमयातना । सुटतील बहुतांच्या ।।६८।। 'मंदिरवासी संतजन । ऐका एक हितवचन । अखंड करा नामस्मरण । आणि करवा बहुतांकरवीं ।।६९।। अतिथि विन्मुख न दवडावा । तया रामचि मानावा । अन्नोदकें तृप्त करावा । यथाशक्ति ।।७०।। अतिथीचा आदर करणें । हेंचि ब्रीद राखणें । शक्ति नसतां मागणें । निःस्पृह भिक्षा ।।७१।। कोणा घालों नये संकट । नम्रत्वें असावें धीट। रामचरणीं भाव निकट । ठेवितां उणें पडों नेदी ।।७२।। भूतीं असावी नम्रता । परनारी तितुकी माता। रामनामावांचून वृथा । श्वास जावों देवों नये ।।७३।। उषःकालीं देह शुद्ध । करोनि आळवा गोविंद । सडे रांगोळ्या भूमि शुद्ध । मंदिर सोज्ज्वळ असावें ।।७४।। तदनंतर कांकडआरती । भावें ओंवाळा रघुपती । समस्तांसी द्या जागृती । भूपाळिया दीर्घस्वरें ।।७५।। गणेश शारदा सद्गुरु । रामकृष्ण हरिहरु । तीर्थें परम योगेश्वरु । करुणस्वरें आळवावे ।।७६।। सुगंधी सुमनें आणोनी । हार गुंफा निर्मळ मनीं । तुळसीदळें आदिकरूनि । शक्य तितुकें मेळवावें ।।७७।। स्नानसंध्या आन्हिक कर्म । करावे आपुले आश्रमधर्म । वेदप्रणीत मार्ग दुर्गम । शक्य तितुके साधावे ।।७८।। तीर्थोदक पंचामृत। न्हाऊं घाला भगवंत । वस्त्रें उपवस्त्रें समस्त । सर्वेश्वर पूजावा ।।७९।। धूप दीप नीरांजन । नैवेद्य दाखवा षड्रसान्न । तांबूल दक्षिणा देवोन । धूपारती करावी ।।८०।। करावें दासबोधपठण । नित्यनेम समास दोन । मनोबोध श्लोक गहन । दीर्घस्वरें म्हणावे ।।८१।। इच्छित संख्या नामजप । करावा यथासंकल्प। सर्वकाल अजपाजप । करणेंचा अभ्यास असावा ।।८२।। रामहृदय नित्यपाठ । सहस्रनामाचा घडघडाट । पूजासमयीं वेदपाठ । मंत्रोच्चार करावा ।।८३।। पवमान आणि पुरुष सूक्त । पठणें संतोषे रघुनाथ । रुद्राभिषेकें वायुसुत । भक्तिभावें पूजावा' ।।८४।। उपासनेचे बहु प्रकार ।

लिहितां होय विस्तार । 'साधितां प्रपंचव्यवहार । अध्यात्मविवरण करावें ।।८५।। मंदिर म्हणजे सद्धर्मशाळा। बहुत जीवां लावा चाळा । दावोन उपासनासोहळा । दुर्बुद्ध सुबुद्ध करावे ।।८६।। सायंकाळीं करावें भजन । टाळ-वीणा मृदुंगवादन । लहानथोर मिळवोन । रामभजनीं लावावे ।।८७।। अष्टकें सवाया धांवे । धूप दीप नैवेद्य बरवे । आरती मंत्रपुष्प अर्पावें । रामरायासी ।।८८।। कापूरआरती शेजारती । नित्य करावी रघुपती । तैसाचि नमावा मारुती । मंदिरवासी जनांनीं' ।।८९।। असो ऐसीं मंदिरें बहुत । बांधविती श्रीगुरुनाथ । उपासना वाढविती बहुत । वर्णितां वाणी खुंटली ।।९०।। असो मानसपूजा बहुतांशीं । प्रिय असे श्रीगुरूंसी । प्रत्यक्षपूजेहूनि मानसपूजेसीं । चित्त होय एकाग्र ।।९१।। बहुतांसी साक्षात्कार होती । कांहीं चुकतां खूण देती । पुष्पें घालिता परिमळ सुटती । ज्या-त्यापरी प्रत्यक्ष ।।९२।। प्रत्यक्ष भेटी झाली । त्याहीपेक्षां मानसपूजेंत भली । मानसपूजा न घडतां गुरुमाउली। अंतरसाक्षीची खूण देतसे ।।९३।। हा बहुतांसी अनुभव । मानसपूजा शुद्ध भाव । नामस्मरणीं गुरुदेव । पावतसे तत्काळ ।।९४।। पुढील अध्यायीं निरूपण । सद्गुरु करिती कथन । भक्तिमार्गीं अज्ञजन । कैसे कैसे लाविले ।।९५।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासींयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।९६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते नवमाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति नवमोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय दहावा

## समास पहिला

**बहू अज्ञ जीवांप्रती उद्धरीलें । तसें नास्तिकां सत्पथा लावियेलें ।।**
**समस्तां मुखें नाम हें बोलवीती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।१०।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। श्रीसद्गुरु चिन्मयदाता । दोन्ही कर जोडोनि आतां । चरणकमलीं ठेवितों माथा । त्रिविधतापें गांजलों ।।१।। अज्ञान उद्वेग पीडी भारी । शांति झाली पाठमोरी । म्हणोन हिंडें दारोदारीं । श्रमलों देवा अतिशय ।।२।। अज्ञानदुःख असे विशद । माजीं अनंत पोटभेद । करितां तयाचा अनुवाद । लाजिरवाणें मज वाटे ।।३।। परि गेलिया वैद्याकडे । न ठेवावें मागेंपुढें । तरीच शीघ्र गुण जोडे । भिडेनें व्याधि शमेना ।।४।। भीड सांडोन तुमचे द्वारीं । आलों दीन भिकारी । परिसा जी आपत्ती सारी । दीनानाथ गुरुमूर्ते ।।५।। देहबुद्धि दृढ जाळें । प्रपंच आमिषाचे गोळे । टाकोनि धीवरें दुर्धर काळें । ओढूं आरंभिलें ।।६।। वासना तस्कर महाथोर । द्वैतसहाय्यें करी बेजार । विवेकीं वृत्ति क्षणभर । नसतां लाग साधिती ।।७।। आशेनें कल्पनातरंग । अनंत उठती, वृत्तिभंग । होतां दुरावे श्रीरंग । आर्त तेंही पुरेना ।।८।। अहंकार पदोपदीं । आडवोन पाडी उपाधी । न कळत कार्य साधी । गुपित पाश टाकितसे ।।९।। ऐशिया पाशसमुदायीं । जीव अत्यंत कष्टी होई । क्षणभरी उसंत नाहीं । जगदृष्टीपुढें ।।१०।। कनक मिळतां मिळेना । मिळतां ओढ शमेना । ध्यानीं मनीं तेंचि जाणा । चित्तभंग करितसे ।।११।। दारा पुत्र मायापाश । मोहें करिता

आपुला दास । जगत्पिता जगन्निवास । पारखा झाला ।।१२।। मोठेपणा सकामकर्म । नीतिव्यवहार कुलधर्म । देहव्याधी कष्टी परम । करिती किती आवरावें ।।१३।। कामक्रोधाचे तडाखे । अधर्माचीं पेरिती विखें[१] । ऐसे अज्ञानाचे वाखे[२] । दुःख देती अनिवार ।।१४।। जीव झाला परम कष्टी । समाधानाची पडली तुटी । कोण निवारील संकटीं । शोधूं लागलों ।।१५।। वेदशास्त्रीं वर्णिली कीर्ति । आत्मारामीं अखंड शांति । परि त्या रामाची वसति । मनबुद्धीसी अगोचर ।।१६।। जें कल्पनेसी गवसेना । कैसें जावें तया स्थाना । काय भाकावी करुणा । तयापुढें ।।१७।। जो मागे तया न देई । निरिच्छाची पाठ घेई । दातेपणाची नवलाई । ऐसी असे ।।१८।। सगुण निर्गुण द्वैतभाव । संदेहीं गुंतला जीव । तरी कवणापाशीं कींव । भाकावी हें उमगेना ।।१९।। मागण्याची सोय नाहीं । आशा तरी धरणें घेई । परमार्थी हांसती पाहीं । वेडा अज्ञानी म्हणोनि ।।२०।। भूक कांही शमेना । अन्न तेंही मिळेना। मागतां बोलती दैन्यवाणा । काय म्हणोनि होतोसी ।।२१।। असो ऐशी जाहली स्थिती । दोन्हीकडे ही फजिती । तंव मार्ग दाविला संतीं । सद्गुरुपदाचा ।।२२।। म्हणोनि आलों धांवत । दाता एक सद्गुरुनाथ । दातृत्व असे कल्पनातीत । बहुतीं खुणा सांगितल्या ।।२३।। हें शांतीचें निजघर । वेदांताचें माहेर । वासनाक्षय सपरिवार । गुरुपदीं मुळींहून ।।२४।। सुख येई वसतीसी । ठाव नसे द्वैतासी । याचकांच्या आर्तिराशी । विरोन जाती ।।२५।। प्रपंच परमार्थ दोन्हीकडे । छत्र चालिलें रोकडें । सदा हें महाद्वार उघडें । धन्य देणगी गुरुकृपा ।।२६।। चरणीं घातलें दंडवत । आतां चिंता नको व्यर्थ । पदरीं घेतील समर्थ । बाळचिंता मायेसी ।।२७।। ऐसी ही गुरुमाउली । बहुतांलागीं

१. विष. २. संकट, पीडा.

पान्हावली । अष्टमाध्यायीं कथिली । आणिक पुढती अवधारा ।।२८।। त्रिविध प्रकृति बोलती । तैसे मानव अनंतजाती । अज्ञ नास्तिक वेदांती । हठनिग्रही कितियेक ।।२९।। कोणी व्याधिग्रस्त झाले । कोणा भूतें पछाडिलें । कोणी उन्मादें भरले । निंदा करिती गुरूची ।।३०।। नररूपें श्रीमारुती । अवतरली गुरुमूर्ति । त्याहीवरी सिद्धस्थिति । उच्चसाधनें मिळविली ।।३१।। ऐशियांची होतां भेटी । तापत्रयांच्या सुटती गांठी । समाधान पाठीपोटीं । रामभक्ति वाढविती ।।३२।। नित्य घडती चमत्कार । लिहितां ग्रंथ होय विस्तार । विवरण करूं थोडेफार । कथानुसंधानें ।।३३।। इंदुरीं असतां गुरुमाय । अनंत धरिती चरणसोय । चुकविती बहुत अपाय । गुरुसेवा करूनी ।।३४।। साधु ऐसी पसरली कीर्ति। कोणी एक अधिकारी मंदमति । अधिकारमदें उन्मत्तवृत्ति । आला श्रींसन्निध ।।३५।। उपहासित भाविकांसी । ढोंगी वदत समर्थांसी । सद्गुरु हांसती तयासी । अहंकारी म्हणोनी ।।३६।। तेव्हां तया क्रोध आला । अद्वातद्वा बडबडला । परम शांति देखोन झाला । मानसीं चकित ।।३७।। मग वदे समर्थांसी । 'तुम्ही साधु म्हणवितां आपणासी । जरी भविष्य सांगाल मजसी । तरीच हें सत्य मानूं' ।।३८।। महाराज वदती तयालागून । 'आम्ही गोसावी अज्ञान । रामनामावांचोन आन । भविष्य न ये आम्हांसी ।।३९।। परि तुमची पुरवील आर्त । गोदू ही भगवद्भक्त । परिसा स्थिर करोनि चित्त। अहंकार सांडोनी' ।।४०।। दहा वर्षांची बालिका । गुरुकृपें वदली देखा । जन समस्त पाहती कौतुका। गुरुमाहात्म्य अगाध ।।४१।। 'आजपासोन आठवे दिनीं । तुझीं बालकें मरतील दोन्ही । आणि पंधरा दिवसांनीं । कांता तुझी मरेल ।।४२।। जयाकारणें उन्मत्त झालासी । तो अधिकारही जाईल विलयासी । तदुपरि श्रीचरणासी । धरशील पश्चात्तापें' ।।४३।। सहज लीलें वदली गोष्ट । राव मनीं खोंचला धीट । वरिवरी हास्य करोनि विकट । निघोन गेला ।।४४।। तंव आठां दिवसांनीं ।

ओहळीं वाहोन दोन्ही । बालकें गेलीं मरोनी । स्त्री बुडाली विहिरींत ।।४५।। लांचेचा आळ आला । अधिकाऱ्यांचा रोष झाला । मग पश्चात्तापें पोळला । श्रीचरणीं मिठी घाली ।।४६।। 'तारीं तारीं गुरुराया । अहंकारें वाहवलों वायां । आतां मुख हें दडवाया । ठाव देईं तव पदीं ।।४७।। तूं दीनांची माउली । तूंचि शांतीची साउली । उपेक्षा न करीं वहिली । तरणोपाय सांगावा' ।।४८।। श्रीगुरु वदती तयासी । 'प्रारब्धभोग जीवासी । न चुके जाण निश्चयेंसी । दोष नाहीं तुम्हांकडे ।।४९।। होणार तें होवोनि गेलें । आतां स्मरा रामपाउलें । सांकडें निवारील सगळें । नोकरी स्थिर होईल' ।।५०।। गुरुवचनीं धरिला विश्वास । नाम घेई रात्रंदिवस । आळ जाऊन निःशेष । योग्यता वाढली ।।५१।। महाराजांची जाहली ख्याती । ही प्रत्यक्ष देवमूर्ती । अघटित करणी करिती । रामभक्त आगळे ।।५२।। तेथेंचि आणिक एक प्रकार । घडला तो करूं विस्तार । चित्त करूनिया स्थिर । श्रवण करावें ।।५३।। गुरुकथा बहु गोड । सेवितां दवडी विषयाचीं चाड । पूर्वसंचित असतां जाड । श्रवणीं पडे ।।५४।। गुरुकथा वर्णायासी । बुद्धि नसे आम्हांसी । वंदूनि तयांचे चरणांसी । बोलविती तें बोलतसें ।।५५।। गुरुभक्त झाले फार । नित्य करिती नामगजर । हातीं स्मरणी घेऊनि सार । जप करिती नामाचा ।।५६।। त्यांत विप्र होते बहुत । रामनाम जपती नित्य । कर्माभिमानी कांहीं पंडित । तयांसी हें नावडे ।।५७।। 'आम्ही वेदाधिकारी ब्राह्मण । सदा करावें वेदाध्ययन । शूद्रें करावें नामस्मरण । उचित नसे आपणांसी ।।५८।। आम्ही त्रिवर्णांसी पूज्य । आम्ही ज्ञानी उपजत सहज । भूलोकीं देव द्विज । वदती तें पहावें' ।।५९।। शिष्य वदती तयांलागून । 'ज्ञानी तुम्ही अतिगहन । ज्ञानचिन्हें करा कथन । शब्दज्ञान सांडोनी ।।६०।। कामक्रोध अहंकार । हे तों तुमचें माहेरघर । वैराग्य नसे तिळभर । अन्नार्थ वेदविक्रय करितां ।।६१।। वंचकवृत्ति धरोनी । वदतां आम्ही बहु ज्ञानी । ऐसीच वदली

वेदवाणी । सांगा कीं आम्हांसी ।।६२।। वेदपुरुष नारायण । तो जयासी प्रसन्न । तो पूज्य सकलांलागुन । हें सांगणें नलगे ।।६३।। वेद वंद्य आम्हांसी । परि पात्रता पाहिजे पठणासी । आहारविहारनियमांसी। अतिशुद्धता ।।६४।। तरीच मंत्रसामर्थ्य चाले । ज्ञान होईल शुद्ध भलें । परि सांप्रत युग आलें । कैसें पहा ।।६५।। शक्य तितुकें करावें । सुलभ नाम जपत जावें' । ऐसें कथिलें गुरुदेवें । 'नाम प्रिय देवासी ।।६६।। नामें घडे भगदव्भक्ति । नामें होय ज्ञानप्राप्ती । नामें जोडे सायुज्यमुक्ति । संतसज्जन सांगती ।।६७।। वेदारंभीं हरिनाम । कलींत साधन हेंचि परम । सुगम असोन दुर्गम । भगवत्पदीं नेतसे' ।।६८।। परि तें नायकतीच कोणी । उपहासिती तयांलागोनी । शास्त्री होते तोफखानीं । ते करिती बहु निंदा ।।६९।। एकदां राममंदिरांत । महाराज आले दर्शनार्थ । शास्त्रीयांस कळली मात । धांवोन आले ते ठायीं ।।७०।। 'तुम्हीं भ्रष्टविले ब्राह्मण । उपदेशितां नामस्मरण' । अहंकारें भरीं भरोन । ऐसीं दुरुत्तरें बोलती ।।७१।। समर्थ वदती 'नामप्रताप । कळेल तुम्हां आपेंआप । उगाच न करावा संताप । मज अज्ञानियावरी' ।।७२।। 'ऐसे पाहिले बहुत' । म्हणोनि गेले गृहांत । तंव गुरुमहिमेची मात । श्रोतेजनीं परिसावी ।।७३।। एक प्रहर राहतां निशीं । वेड लागलें शास्त्रीयांसी । घेवोन जळके काष्ठासी । गृहांतूनि निघाले ।।७४।। काष्ठांची करुनी टिपरी । मुखीं नाम उच्चारी । हिंडतसे गांवभरी । शुद्धि नाहीं ।।७५।। धरोनि खालीं बैसवितां । हात तोंड नये आवरितां । यासी काय करावें आतां । भूतें कीं झडपिलें ।।७६।। परि हे वदती राम राम । हा साधुनिंदेचा दोष परम । शोधीत आले आराम । ब्रह्मचैतन्य महाराज ।।७७।। चरणीं आणोन घातले । करुणा भाकों लागले । कृपासागर श्री द्रवले । मस्तकीं हस्त ठेविला ।।७८।। सहज लागली समाधि । हारपल्या आधिव्याधि । मग येवोनि शुद्धि ।

वंदन करी क्षणक्षणा ।।७९।। अनुग्रह दीक्षा दिली । निंदकावर कृपा केली । नामसत्ता दाविली । समस्तांसी ।।८०।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते दशमाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास दुसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जय जय श्रीरघुराया । अज्ञानें जिणें होय वांया । शरणागता दर्शन द्याया । विलंब कासया लाविला ।।१।। गोंदवल्यास असतां गुरुवर । भाऊसाहेब जवळगेकर । करोडगिरीचे नाक्यावर । होते श्रीमान् परि रोगग्रस्त ।।२।। पोटीं पुत्रसंतान नाहीं । म्हणोनि चिंता करिती पाहीं । भार्या सती गंगाबाई । समर्थचरणीं विश्वास ।।३।। उभयतां आले गोंदवल्यासी । सद्भावें पूजोनि गुरूंसी । कथन करिती मनोव्यथेसी । उपाय पुसती ते काळीं ।।४।। 'देहव्याधीनें गांजलों । संतान नाहीं म्हणोन भ्रमलों । संपत्ति असोन मुकलों । संसारसुखासी ।।५।। रात्रंदिन वाहें चिंता । तव पदीं ठेविला माथा । आतां तारिता आणि मारिता । तूंचि एक दीनबंधू' ।।६।। ऐसी करिती विनंती । सद्गुरु शुद्धभाव पाहती । 'कृपा करील रघुपती । चिंता कांहीं न करावी ।।७।। येथेंचि रहावें उभयंतांनीं । रामप्रसाद सेवोनी । सर्वकाळ वागवा स्मरणी । श्रीरामनामाची ।।८।। तोचि निवारील सर्व व्यथा । पुत्र होईल नको चिंता । रामचरणीं विश्वासतां । उणें नाहीं भक्तासी' ।।९।। उभयतां मनीं संतोषलें । गुरुवचनीं विश्वासले । सेवा करित राहिले । महाराजांची सद्भावें ।।१०।। प्रातःकालीं उठोन । मंदिरीं सडासंमार्जन । कांकडआरती करोन । पूजा करिती

आनंदें ।।११।। पंचारती ओवाळिती । चरणतीर्थ आदरें घेती । सदा मुखें नाम वदती । प्रसाद ही महौषधि ।।१२।। जो सदा राहे पथ्यावरी । तो मंदिरीं खातां बाजरी । रोग गेला देशांतरीं । गुरुकृपा अगाध ।।१३।। पांडुरता मावळली । शरीरकांती सतेज झाली । कांता गरोदर राहिली । सेवा करितां भक्तीनें ।।१४।। यथाकालें पुत्र झाला । परि उलटे पायाचा जन्मला । सद्गुरु वदती तयाला । 'दुरित शेष अद्यापि ।।१५।। आणखी करा नामजप' । नेमून दिलें नित्य माप । 'पाय सरळ होतील सरतां पाप। रामप्रसादेंकरोनि' ।।१६।। करितां करितां रामसेवा । मुलगा सरळ झाला तेव्हां । मग आनंद काय सांगावा । स्तुति करिती परोपरी ।।१७।। 'तूं देवांचाहि देव । आम्हां भेटलासी गुरुराव । निरसिले रोग चिंता सर्व । कृपें सद्गुरु तुमचेनि ।।१८।। नाहीं ज्ञान नाहीं भक्ति । नाहीं साधनसंपत्ति। अज्ञानियां धरोनि हातीं । सुमार्गासी लाविलें ।।१९।। निरोप देती उभयतांसी । 'विसरूं नका श्रीरामासी। इहलोकीं नांदाल सुखेंसी । अंतीं सद्गति पावाल' ।।२०।। गुरुआज्ञा घेवोन गेले । ऐसें बहुतांस तारिलें। पुढें श्रीगुरु जगदुद्धारा निघाले । यात्रामिष करोनि ।।२१।। आम्ही यात्रेसी जाणार । ऐसें वदतां गुरुवर । शिष्यसमुदाय निघाला फार । पुरुष स्त्रिया बालकें ।।२२।। समर्थगृहीं दास कुबेर । तेथें उणें काय पडणार । समुदाय निघाला अपार । रामनाम गर्जत ।।२३।। शके अठराशें सत्ताविशीं । सद्गुरु आले प्रयागासी । वर्षाऋतु श्रावणमासीं । समुदायासमवेत ।।२४।। तीर्थकृत्यें सकल करोन । करावया वेणीदान । नौकेमाजीं आरोहण । करिते झाले तें समयीं ।।२५।। मध्यभागीं नौका गेली । तों जलें तुडुंब भरली । आणि भोवऱ्यांत सांपडली । अकस्मात् जीर्णनौका ।।२६।। मग गलबला कोण पुसतां । जीव प्रिय सर्वा भूतां । हाहाःकार उडाला सर्वथा । उभय थडी लोक दाटले ।।२७।। पाणी अपरंपार भरलें। मानवी उपाय न चालें । पाहते बुडते घाबरले । काय दशा म्हणती हे ।।२८।।

श्रीगुरूंची अखंड शांति । सकल लोकां शांतविती । म्हणती 'तारील रघुपति । भजन करा स्वस्थचित्तें' ।।२९।। पवित्र्यावरी उभे ठेले । आणि भजन आरंभिले । सकलही करूं लागले । उसनें अवसान धरोनि ।।३०।। सुखासनीं गप्पा मारितां । बहुत दाविती समर्थता । प्रसंगें कसोटी लागतां । टिके ऐसा विरळा संत ।।३१।। भजनाचा करितां गजर । तत्क्षणीं नौका झाली स्थिर । लोक पाहती चमत्कार । धन्य साधु म्हणती हे ।।३२।। श्रीगुरु वदती नाविकांसी । 'दुजी नौका आणा वेगेंसी । चिंता न करावी मानसीं । समर्थ आमुचा पाठिराखा' ।।३३।। दुजी नाव येईपर्यंत । ही नाव भोंवरीं असोन स्थित । लोक पहात तटस्थ । उभय थडी ।।३४।। दुजी नाव येतां तेथ । एक पद ठेविता त्यांत । चला म्हणती समस्त । हळूं हळूं एक एक ।।३५।। समस्त माणसें आलीं । ऐसें त्रिवार पुसोनि गुरुमाउली । चरण उचलितांच गेली । फुटकी नौका वाहत ।।३६।। चरणीं लागतां अनंत तरलीं । मग नौका कशी बुडेल भली । करणी करोनि दाविली । प्रत्यक्ष सद्‌गुरुरायें ।।३७।। सकळांसी आनंद झाला । नामगजर बहु केला । गौरकायी[१] थवा लोटला । किल्ल्यावरूनि दर्शना ।।३८।। कडेस येतां गुरुमूर्ति । नारीनर आरत्या करिती । कोणी पुष्पमाळा घालिती । कोणी करिती दंडवत ।।३९।। निंदकां मनीं पस्ताव झाला । गौरकायी म्हणती साधु भला । देवसुत पुन्हां अवतरला । म्हणोन टाळीं देताती ।।४०।। तंव इकडे काय झालें । ग्रामाधिकारी क्षोभले । उपाध्यायासी धरोन नेलें । किल्ल्यावरी तयांनीं ।।४१।। 'जरी नौका फुटकी होती । तरी त्वां हांकारिलीं कैशा रीतीं । गुन्हा घडला तुझे हातीं । आतां शिक्षा भोगावी' ।।४२।। तया उपाध्यायाचा सुत । महाराजांसी प्रार्थित । 'धरोन नेला मम तात । निरसावें संकट हें ।।४३।। अजाणपणें घडला व्यापार । हें जाणतीं गुरुवर । कृपा करोनि दीनावर । तारी

१. किल्ल्यातील इंग्रज लोकांचा.

आम्हां गुरुराया' ।।४४।। अभय देऊनि तयासी । सोडविलें उपाध्यायासी । मिरवणूक काढिली खाशी । कुरवंड्या करिती सुवासिनी ।।४५।। दानधर्म केला बहुत । गोप्रदानें सालंकृत । शिष्य झाले अपरिमित । उत्तरदेशीं ।।४६।। पूर्वीं एकदां काशीस गेले । ते समयीं अभिनव घडलें । महामारीनें त्रासलें । जन सर्व ।।४७।। किती पडती कितीक मरती । कोणा न मिळे मूठमाती । महाराज चालिल्या मार्गावरती । एक भिकारीण मृत दिसे ।।४८।। तियेचें तान्हें मूल । रडोनि करी गोंधळ । स्तनपाना उतावेळ । परि दूध न येई ।।४९।। पाहोन त्या बालकाची स्थिति । दयार्द्र झाली गुरुमूर्ति । म्हणती 'काय झालें माउलीप्रति । हांका मारोनि पाहावें' ।।५०।। शिष्य सांगती ते काळीं । 'ही तों असे मृत झाली' । सद्गुरु वदती 'झीट आली । रामतीर्थ आणावें' ।।५१।। तीर्थ शिंपडोन अंगावरी । बोलले 'माउली सावध हो सत्वरीं । बालका घेवोन अंकावरी । स्तनपान दे वेगें' ।।५२।। ऐसें वदतां गुरुमाउली। निर्जीव तनु सजीव झाली । लोक पहातां पदर सांवरी । बालका घेत कडेवरी ।।५३।। विस्मय वाटे सकळांसी । धन्य साधु तेजोराशी । मानवी कृति नव्हे ऐसी । म्हणोनि चरणीं लोळती ।।५४।। घटीं मठीं चैतन्य भरलें । हें तों बाणोनिया गेलें । चैतन्यदृष्टीं पाहतां आलें । अचेतनासी चेतन ।।५५।। असो उपाधि होईल बहुत । म्हणोन निघाले त्वरित । उद्धरिती अनंत भक्त । रामनाम बोधोनि ।।५६।। साठये उपनामें न्यायाधीश । अधिकारी सात्त्विक विशेष । श्रीमान् परि भोगती त्रास । पोटशूलव्यथेचा ।।५७।। चैन नसे दिननिशीं । सदा पाळिती पथ्यासी । औषधी देशी विदेशी । घेतां गुण न वाटे ।।५८।। उपाय करोनि थकले । व्यथा अणुभरी न ढळे । तंव भाग्योदयें भेटले । ब्रह्मचैतन्य सद्गुरु ।।५९।। श्रींच्या आशीर्वचनीं । व्याधि हरली मुळींहूनि । जैसा उदय होतां दिनमणि । अंधकार लया जाय ।।६०।। येणेंपरी गोंदवल्यासी । असतां करणी केली कैसी । चिंतामणभट्ट द्विजासी ।

उदरव्यथा अतिशय ।।६१।। कर्नाटकीं वसति ज्याची । उदरव्यथा बहु जाची । वाटे आहुती प्राणांची । घेईल आतां निश्चयें ।।६२।। क्वचित्काळीं स्वल्प अन्न । क्वचित्काळीं पयःपान । दुःख भोगी रात्रंदिन । म्हणे प्राण जातां बरें ।।६३।। उपाय करितां करितां थकले । दिवसेंदिवस व्याधि प्रबळे । तंव अकस्मात् श्रवणीं पडलें । ब्रह्मचैतन्यचरित्र ।।६४।। महासाधु गोंदवलेकर । केवळ ईश्वरी अवतार । करावया जगदुद्धार । मर्त्यलोकीं अवतरले ।।६५।। व्याधिग्रस्त बहुत येती । गुरुप्रसादें मुक्त होती । तुम्हीं जावें शीघ्रगति । व्याधि हरण करतील ।।६६।। परिसोनिया ऐसी वाणी । वाटे अमृत पडलें श्रवणीं । सत्वर निघाला तेथोनि । गुरुभुवना पावला ।।६७।। कोणी समाराधना होती केली । भोजनपात्रें सिद्ध झालीं । तंव भट्टजींची स्वारी आली । दर्शन घ्यावया श्रीगुरूंचे ।।६८।। समर्थ वदती विप्रांसी । 'बैसा सत्वर भोजनासी' । विप्र वदे विनयेंसी । 'अन्न वैरी आमुचें ।।६९।। अन्नाविणें प्राण जातीं । अन्न खातां तीच गति । आठां दिवसां उपरांतीं । स्वल्प आहार सेवितों ।।७०।। ते दिनीं अहोरात्र । शूल उदरीं सर्वत्र । ओखटें माझें प्रारब्धसूत्र । दयासिंधो गुरुराया' ।।७१।। श्रीगुरु वदती ते समयीं । 'रामप्रसादा दोष नाहीं । भीति सांडोन लवलाहीं । सेवन करा मिष्टान्नें' ।।७२।। भीत भीत पात्रावरी । बैसला द्विज ते अवसरीं । म्हणें 'साधुसन्निध मरतां बरी । गति तरी मिळेल' ।।७३।। बहुतां दिसांचा भुकेला । अत्याग्रहें तृप्त केला । तधींपासोन शूल गेला । धन्य कृपा श्रीगुरूंची ।।७४।। मोरगिरीचे भक्तजन । श्रीसन्निध येवोन । विनविती प्रेमेंकरोन । रामस्थापने चलावें ।।७५।। बहुत दिवस विनवितां । कृपा उपजली गुरुनाथा । जावोन स्थापिलें रघुनाथा । आनंदोत्सव बहु झाला ।।७६।। भक्त नेती घरोघरीं । गुरुपूजा परोपरी । करोनि मस्तक चरणावरी । अघनाशना ठेविती ।।७७।। गुरूंची कीर्ति परिसोनी । समंधग्रस्त शिंपीण जनी । येतां मुक्त करिती झणीं । सद्गुरु दयाळ

।।७८।। ऐशा अनंत व्याधींस । गुरुकृपामृतरस । मिळतां होय विनाश । भाग्यवंता लाभतसे ।।७९।। साधकांसी बोधामृत । वेळोवेळां सद्गुरु देत । त्यांचीं नामें श्रोतें संत । परिसावीं एकचित्तें ।।८०।। अमृतघुटका मुख्य जाण । परमार्थ न होण्याचें कारण । निस्पृहसमास शिकवण । अभंगवचनें अनेक ।।८१।। आचारविचार स्त्रीधर्म । साधकां बाधक कलिधर्म । यांचेंहि कथिती वर्म । करुणासागर गुरुमूर्ति ।।८२।। मुख्य सार स्वधर्माचरण। जतन करोनि नामस्मरण । करावें अघनाशन । स्वस्वरूपा पावावया ।।८३।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते दशमाध्यांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास तिसरा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। मागें श्रीतुकाई अनुग्रह पावोनि । इंदुरीं आली गुरुजननीं । तेव्हां तपस्तेज पाहोनि । तेथें अनेक भक्त जाहले ।।१।। जिजाबाई नामें भक्त । कैसी झाली पदांकित। त्याचा इतिहास तुम्हीं संत । श्रोतेजनीं परिसावा ।।२।। जिजाबाईंचा पति । लागला गुरुभजनाप्रति । जिजा म्हणे भोंदू असती । कलियुगीं बहुतेक ।।३।। पाहोनि याची परीक्षा । उतरूं साधुत्वाचा नक्षा । मनीं धरूनि ऐसी आकांक्षा । वरिवरी सेवा करी ।।४।। एकदां भोजना बैसविलें । पति नाहींसे पाहिलें । सत्त्व पाहूं ये वेळे । साधुत्व कसा[१] लावोनि ।।५।। ऐसा मनीं विकल्प केला । मिरच्या कुटून लाडू वळला । पात्रीं आणोन घातला । दुरूनि पाहे कौतुक ।।६।। स्वस्थपणें भक्षण

१. कसाला, कसोटीला

केला । म्हणती ‘आणिक लाडू घाला’ । पुनरपिहि भक्षिला । हा हा हू हू होईना ।।७।। मनीं म्हणे ‘हा धूर्त । रानींवनीं असे भ्रमत । उपास घडतां असेल खात । भगवती[1] क्वचितकाळीं’ ।।८।। निखारे काढिले रखरखीत । पात्रीं आणोनि घालित । सद्गुरु सहजानंदांत । तेहि खाऊं लागले ।।९।। पाहोन झाली घाबरी । धांवोनिया चरण धरी । ‘अज्ञानी मी तारीं तारीं । कृपाळुवा गुरुराया ।।१०।। स्त्रीबुद्धि अविचार । घडला जी दयासागर । पतीसी कळतां समाचार । गति बरवी मज नाहीं ।।११।। ढोंगी बहु जगांत । मिरविती म्हणोनि संत । याकारणें अनुचित । कर्म घडलें स्वामिया ।।१२।। साधूसि घालोनि निखारे । केलें सुकृताचें मातेरें । यमदूत छळतील सारे । दुष्ट पातकी म्हणोनी ।।१३।। इहपर दुःखाच्या राशी । दिसों लागल्या अविनाशी । आतां मज गति कैसी । सांग सांग सर्वज्ञा ।।१४।। अज्ञानी मी चांडाळीण । उपजतांच जातें मरोन । तरी साधुद्वेषदोष गहन । टळला असता आजिंचा ।।१५।। आतां जी दयासागरा । दोषार्णवीं मज तारा । तुम्हांवांचोनि आसरा । दुजा नसे त्रिभुवनीं’ ।।१६।। स्फुंदस्फुंदोनिया रडे । दंडप्राय चरणीं पडे । दयासागर म्हणती ‘वेडे । वृथा शोक न करावा ।।१७।। अनुताप उपजला पोटी । तेव्हां दोष गेले पाठीं । अभय देतों मी शेवटीं । सत्वर शोक आवरीं’ ।।१८।। हस्तें धरोनि उठविलीं । मृदुवचनें शांत केली । तधींपासोन लीन झाली । एकनिष्ठ सेवा करी ।।१९।। जिजाबाईंचा पती । तैसी जिजा माउली सती । कन्या ताई सुमती । सेवा करिती श्रीगुरूंची ।।२०।। कांहीं काळ त्यांचेजवळ । वास्तव्य करिती गुरुदयाळ । सेवोनि बोधामृतकवळ । ज्ञान झालें तिघांसी ।।२१।। एकदां कुंभारयोगी कोणी । साधनीं अडले म्हणोनि । आशंका काढिती लिहोनी । प्रश्न पुसती बहुतांसी ।।२२।। बहुत साधु शोधिले । परि समाधान नच झालें । तंव कोणी वर्तमान

**१. तांबड्या मिर्च्यांची पूड**

कथिलें । ब्रह्मचैतन्य सद्गुरूंचें ।।२३।। तेव्हां आला धांवत । जिजाईचे गृहाप्रत । तंव मंचकीं देखिले समर्थ । चरण चुरित जिजा ताई ।।२४।। दुरून पाहतां म्हणे कांहीं । येथें साधुत्वाचें लक्षण नाहीं । स्त्रिया चरण चुरिती पाहीं । योगिया मुळीं विघातक ।।२५।। ऐसें मनीं आणोनि । निघता झाला तेथोनि । तंव श्रीसमर्थांनीं । ताईकडोन बोलाविला ।।२६।। 'अहो श्रेष्ठ योगिराज । आलां होतां कवण काज । प्रश्न काढा पाहूं' सहज । हास्यमुखें बोलती ।।२७।। मनींचा भाव जाणला । हें पाहोन योगी दचकला । कागद काढोन पुढें केला । चरण वंदी ते समयीं ।।२८।। ताईनें वाचिला कागद । अठरा प्रश्नांचा अनुवाद । म्हणे 'सद्गुरुप्रसाद । होतां प्रश्न सुटतील ।।२९।। आज्ञा होईल मजला जर । उत्तरें देईन सत्वर' । विनोदें वदती गुरुवर । 'पोरबुद्धी कायसी ।।३०।। योगी साधक असती भले । बहुत देश शोधित आले । महान् महान् जेथें थकले । तेथें तूं काय वदशील ।।३१।। परि इच्छा आहे तुजसी । तरी तूंच बोले वेगेंसी' । आज्ञा होतांच ताईसी । उत्तरें बोलूं लागली ।।३२।। एकामागोन एक प्रश्न । सोडवून करी समाधान । योगी आनंदित होवोन । चरण धरित ताईचे ।।३३।। श्रींचे चरणा नमोनि । म्हणें 'धन्य साधुशिरोमणी । मानवाची नव्हे करणी । सत्यस्वरूप दावावें ।।३४।। धन्य तुमचा प्रसाद । लहान बालिका बोले विशद । जो थोरथोरांसी अनुवाद । करितां समाधान होईना ।।३५।। साच नोहें मानवकरणी' । म्हणोनि लागला चरणीं । सत्यस्वरूप दावा झणीं । पायीं घट्ट मारी मिठी ।।३६।। हातीं धरून उठविला । हनुमंतस्वरूप तयाला । दावोन योगी धन्य केला । समर्थ सद्गुरूंनीं ।।३७।। योगी म्हणे 'माझे मनीं । विकल्प आला होता झणीं । संगती स्त्रिया पाहोनि । क्षमा करणें स्वामिया ।।३८।। अग्निकाष्ठें भक्षण करी । संगतीं राहोन निर्विकारी । ऐसा तूं ब्रह्मचारी । दर्शनें पुनीत जाहलों' ।।३९।। ऐशी स्तुति करी बहुत । वरचेवरी चरण धरित । अनुतापें जाहला तप्त ।

योगभ्रष्ट होता जो ।।४०।। विकल्पें योगभ्रष्ट केला । तया बोधें शांतविला । पुनरपि साधनें मुक्त झाला । धन्य धन्य गुरुकृपा ।।४१।। ते काळीं गुरुवर । एकांतप्रिय होते फार । क्वचित प्रसाद कोणावर । पूर्वभाग्यें होतसे ।।४२।। राजयोग जेव्हां धरिला । तेव्हां लोकीं प्रकट झाला । प्रसाद बहुतां लाधला। त्यांतील कांहीं अवधारा ।।४३।। सांगली येथें सरकारी । डांक खात्याचे अधिकारी । गृहस्थ होते सदाचारी । परि कट्टे शिवभक्त ।।४४।। विष्णुपंत नगरकर । नामें असती द्विजवर । करोनिया घरदार। गृहस्थाश्रमी राहती ।।४५।। विष्णुभक्तांची निंदा भारी । करिती नाना परोपरी । वैष्णव तितुके त्यांचे वैरी । कृष्णलीला निंदिती ।।४६।। नित्य करिती पार्थिवपूजन । सदा ध्याती उमारमण । शिवभक्ति करिती गहन । परि हरीसी निंदिती ।।४७।। महाथोर शिवभक्त । परि न्यूनभाव द्वैत । जाणोनिया सद्‌गुरुनाथ । कृपादृष्टीं पाहती ।।४८।। एकदां तया दृष्टांत झाला । स्वप्नीं पूजेसी बैसला । शिवालयीं शकंराला । पूजितसे प्रेमानें ।।४९।। तंव अकस्मात् लिंगामागोनी । प्रगट झाली गुरुजननी । गृहस्थ पाहे दचकोनी । म्हणे कोण सिद्धपुरुष ।।५०।। चहूंकडे फांकली प्रभा । दिव्यपुरुष सिद्ध उभा । कीं हा परमानंदाचा गाभा । रामदासी भासतसे ।।५१।। पायीं खडावा रत्नजडित । कंठीं तुळशीमाला शोभत । मुद्रा राम नामांकित । पाहतसे प्रेमानें ।।५२।। कफनी फरगुल घातला । भाळीं त्रिपुंड्र शोभला। मस्तकीं जरीकांठ जिला । मखमली टोपी शोभतसे ।।५३।। हातीं स्मरणी तुळशीची । झोळी नवविध भक्तीची । कुबडी श्रीसमर्थांची । 'रघुवीर समर्थ' गर्जती ।।५४।। विप्र उभा कर जोडोनि । समर्थ वदती तयालागोनी । 'तुम्ही शिवभक्त तपोज्ञानी । परि हरीसी निंदितां ।।५५।। हरिहरां भेद नाहीं । श्रुतिस्मृति कथिती पाहीं । आजपासोन प्रत्यहीं । शालिग्रामही पूजावा ।।५६।। विष्णूचें करितां पूजन । शिव होईल सुप्रसन्न । येविषयीं संशयी मन । पुनरपि ठेवूं नये' ।।५७।। 'हां

जी' म्हणोनि म्हणितलें । अंगीं रोमांच थरारले । नेत्रीं आनंदाश्रु भरले । मुखीं शब्द फुटेना ।।५८।। संत पूजावे आरते । देव सारावे परते । अभंगवाक्य तयातें । आठवलें ते काळीं ।।५९।। तेंचि साहित्य घेवोनि । पूजिले साधुशिरोमणी । 'पुनः भेट होईल' म्हणोनि । गुप्त झाले दयासिंधु ।।६०।। विप्र जागृतीस आला । सकळां दृष्टांत निवेदिला । शालिग्राम पूजूं लागला । तेव्हांपासोनि ।।६१।। परि अंतरीं सिद्धध्यान । लागले सदा अनुसंधान । पुनरपि देईन दर्शन । हें वाक्य चिंतीतसे ।।६२।। सिद्ध साधु येतां कोणी । दर्शना जाई धांवोनी । नाना क्षेत्रांसी पाहोनि । स्वप्नीचें ध्यान धुंडितसे ।।६३।। कांहीं केल्या आढळेना । तळमळ लागली मना । सकळां सांगोनी खाणाखुणा । पुसे ऐसा साधु पाहिला कीं ।।६४।। तंव कोणी तया कथिलें । पंढरीसी म्यां पाहिले । गोंदवलेकर महाराज भले । राममंदिरीं वास करिती ।।६५।। शीघ्र गाडींत बैसला । पंढरीक्षेत्रीं पावला । विठ्ठलचरणीं लोळला । सद्गुरु भेटवीं म्हणोनि ।।६६।। शोधिलें राममंदिर । देखिलें नयनीं गुरुवर । आनंदाचा भरला पूर । मज दीना वर्णवेना ।।६७।। तेंचि रूप पाहतां नयनीं । चरण न्हाणिले अश्रुंनीं । प्रेमें हस्तें कुरवाळोनि । बोलती झाली गुरुमाय ।।६८।। महाथोर शिवभक्त । शिवासी आवडते अत्यंत । कलियुगीं ऐसे संत। भेटती विरळा ।।६९।। 'शालिग्राम पूजिता की नाहीं । कां विसरलां स्वप्नसमयीं । शिव विष्णु एकचि पाहीं। त्रिकाल सत्य मानावें ।।७०।। जे शिवासी निंदिती । ते हरीसी नावडती । तैसे विष्णूसी निंदिती। तेही नावडती शिवा' ।।७१।। असो अनुग्रहप्रसाद देवोन । केलें तयाचें समाधान। शिव विष्णु हे अभिन्न। सांगती सकळांसी ।।७२।। जेथें राममंदिरें बांधिलीं । तेथें शिवालयें स्थापिलीं । सिद्धारूढांची भेटी झाली । ते समयीं तेंचि कथिती ।।७३।। कर्नाटकीं हुबळी शहरीं । सिद्धारूढ सिद्धस्वारी । एकदां समर्थांची फेरी । जाहली तया स्थानासी ।।७४।। समर्थशिष्य रामनाम । गर्जती

उच्चस्वरें परम । सिद्धशिष्य शिवनाम । गर्जती ते समयासी ।।७५।। दोघे उपदेशिती सकळांसी । भेद नसे हरिहरांसी । दोन्ही नेत्रीं एका वस्तूसी । पाहतां भिन्न दिसेना ।।७६।। असो ऐसी गुरुमाउली । बहुतांप्रति लाभली । महद्भाग्यें फळासी आलीं । ते ते पुनीत जाहले ।।७७।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते दशमाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास चवथा***



श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यहाराजाय नमः ।। शिवविष्णु अभेदस्थिति । सकलां सांगे गुरुमूर्ति । आतां परिसावी जी श्रोतीं । सुरस कथा ।।१।। एके समयी कुच्ची ग्रामासी । समर्थ शिष्यगृहासी । गेले पाहोन भक्तीसीं । महोत्साह चालिला ।।२।। यात्रा भरलीं विशेष । भक्त धांवती दर्शनास । प्रसाद होतसे बहुवस । अनुग्रह देती बहुतांसी ।।३।। आपत्तीनें पीडलें जन । काकुळती येती धांवोन । समर्थांसी निवेदन । करिती भावभक्तीनें ।।४।। ऐसा चालिला थाट । महान् साधू म्हणोनि बोभाट । नास्तिकांचें कर्णकपाट । फोडोनि आंत दुमदुमला ।।५।। तंव तेथें कृष्णाजीपंत । असती उपनामें भागवत । तयांसी कळली मात । भगवद्भक्त हे म्हणोनि ।।६।। मनीं म्हणती या युगात । एकहि नसे अनन्य भक्त । धूर्त भोंदू हे सत्य । भाविकांसी ठकविती ।।७।। तरी पाहूं यांची स्थिति । कैसें ज्ञान कैसी भक्ति । कैसी साधनसंपत्ति । कैसे जन वेधिती ते ।।८।। कौतुक पाहती दुरून । सकल करिती गुरुपूजन । नानापरी नैवेद्य देवोन । चरणतीर्थ आदरें घेती ।।९।। भाविक उच्छिष्ट सेविती । मायबहिणी न्हाऊं घालिती । नीरांजनें आरत्या करिती । साहेबमेळा सभोंवार ।।१०।। पीकपात्र धरिलें कोणी ।

छाया करिती छत्र धरूनि । कोणी खडावा घेऊनि । मस्तकीं धरिती भक्तिनें ।।११।। दर्शना येती बहुत जन । प्रपंचगाऱ्हाणीं करिती कथन । जपावांचोन परमार्थलक्षण । एकहि तया दिसेना ।।१२।। अंतरजाणती शहाणे । उगाच पाहती दैन्यवाणे । भाविक अंधभक्तीनें । उपासने लागती ।।१३।। शाब्दिक पाहती व्युत्पन्न । नास्तिकां साक्षात्कार जाण । दुबळे वैभव देखोन । भुलोनि नादीं लागती ।।१४।। परीक्षकांच्या ऐशा जाती । भागवत धूर्ततेनं पाहती । अंतर जाणण्या नसे शक्ति । सिद्धांनेंचि सिद्ध उमजावे ।।१५।। म्हणती येथें वैराग्यलक्षण । कांहींच न दिसे मजलागून । मंत्र तंत्र वशीकरण। कांहीं तरी असेल ।।१६।। म्हणोनि पुढें सरसावले । समर्थांसी बोलूं लागलें । 'धूर्तपणें जन भुलविले । वैभवइच्छा धरोन ।।१७।। गोड खाऊन देह मातला । दोन उंटां भार झाला । उगाच भोंदतां जनाला । साधू साधू म्हणोनि ।।१८।। काय आहे तुमचेपाशीं । दाखवावें सत्वर मजसी । नाहीं तरी या ढंगासी । सोडून द्यावे' ।।१९।। परीक्षावंत जाणोन । सद्गुरूंसीं समाधान । म्हणती हा विवेकी ब्राह्मण । यावरी कृपादृष्टी करावी ।।२०।। समर्थ वदती पंतांसी । 'दाविता काय द्याल मजसी' । पंत वदती 'चरणांसी । अर्पिन देह आपुल्या' ।।२१।। उभयतांचा संवाद झाला । परि संशय नाहीं गेला । दुजे दिनीं पाचारिला । शिष्याकरवीं तयासी ।।२२।। परि तयाचे कपाळ । उठलें होतें ते वेळ । सद्गुरु समर्थ दयाळ । वदती 'यावें तैसेंचि' ।।२३।। हो ना करीत उठोन आला । सद्गुरूंनीं हस्त फिरविला । मस्तकाचा शूळ गेला। तत्क्षणी लयासी ।।२४।। 'तुम्ही विवेकी परीक्षाकर्ते । आमुचे बहु आवडते' । महाराज वदती तयांते। 'राहिलें कीं ना मस्तक' ।।२५।। पंत म्हणती श्रीगुरूंसी । 'येणे नव्हे समाधानासी । मंत्र असेल तुम्हांपाशी । साधुसत्ता नव्हे ही' ।।२६।। समर्थ वदती तयांप्रति । 'साधुसत्ता कैसी असती । सांगा तुम्ही आम्हांप्रति । विवेकी ज्ञानी पंत हो' ।।२७।। ऐसा करितां

विनोद । बहुत जाहला संवाद । नाहीं झालें चित्त शुद्ध । विकल्प कांहीं जाईना ।।२८।। तंव समर्थें उग्र रूप धरिलें । इतरां सौम्यचि भासलें । परि पंत अति भ्याले । पळोन गेले ओहोळीं ।।२९।। समर्थ वदती शिष्यांसी । 'काय झालें भागवतांसी । धरोनि आणा मजपाशी । समजाविशी करोनी' ।।३०।। शिष्य निघाले त्वरित । 'अहो थांबा भागवत । हांक मारिती सद्गुरुनाथ । क्षण एक स्थिर रहावें' ।।३१।। भागवत म्हणती 'नमस्कार । प्रत्यक्ष मारुतिअवतार । मजला न होय धीर । समर्थांपुढें यावया' ।।३२।। भीत भीत पुढें आले । तेथें सौम्यरूप पाहिलें । शरीर चरणीं लोटिलें । अष्टभाव दाटोनी ।।३३।। 'आपण साक्षात् हनुमंत । अज्ञानें मी झालों भ्रांत । तारीं तारीं श्रीगुरुनाथ। देह सेवेसी अर्पिला' ।।३४।। अनुग्रहप्रसाद देवोनी । वदती 'रहा सुखें सदनीं । अखंड नाम स्मरतां मनीं । आमुची सेवा घडेल ।।३५।। रामनाम ज्यांचे चित्तीं । तेथें नित्य आमुचि वसति । वियोग न मानां कल्पांति । सत्य प्रत्यय येईल' ।।३६।। असो भागवतां मारुतिदर्शन । देऊनि केले समाधान । तैसेंचि श्रीरामदर्शन। बाळकोबांसी करविलें ।।३७।। श्रोते वदती ती कथा । कैसी केली सार्थकता । सविस्तर सांगोन चित्ता। तोषवा जी आमुच्या ।।३८।। गुरुकथामृतपान । करोनि तोषविलें मन । परि आणिकहि हे श्रवण । भुकेले असती ।।३९।। वक्ता बोले जी उत्तर । कृपा करील गुरुवर । क्षण रहावें स्थिर । गुरुपदचिंतनीं ।।४०।। बाळकोबा परिचारक नाम । सदाचारी सात्त्विकोत्तम । श्रीगुरूंचें भक्त परम । ज्वरव्याधीनें ग्रासिले ।।४१।। सप्तदिनपर्यंत । तयांसी नव्हते बोलवत । अंतसमय झाला प्राप्त । श्रीगुरुंनीं जाणिलें ।।४२।। जवळी जावोनि कुरवाळिती । सत्वर उठवोनि बैसविती । रामतीर्थ तयांप्रती । दिधलें श्रींनीं स्वहस्तें ।।४३।। तंव तो शुद्धीस आला । वंदन करी गुरुपदाला । दीनवाणी विनविता झाला । 'कृपा करा मजवरी ।।४४।। अंतसमय महाकठिण । जननदुःख तयाहून ।

फिरफिरोन भागला प्राण । तरी आतां उद्धरावें' ।।४५।। श्रीगुरूंनीं ते अवसरीं । हस्त ठेविला मस्तकावरी । ग्रंथिभेद होवोन उपरीं । रामदर्शन करविलें ।।४६।। रामनाम घेत मुखीं । शीघ्र गेला वैकुंठलोकीं । देह ठेविला गुरुपादुकीं । धन्य भाग्य तयाचें ।।४७।। ऐसी गुरुकृपा गहन । तैसेंचि नाममाहात्म्य पूर्ण । दावोन सकळांलागोन । ध्यास लाविला नामाचा ।।४८।। नीळकंठबुवा कर्नाटकी । जेव्हां चालिलें स्वर्गलोकीं । ओठ बोटें एकसारखीं । पूर्वाभ्यासें हालत होतीं ।।४९।। देहीं नसतां चेतना। तरी ही चालिली चालना । अभ्यासयोग ऐसा जाणा । त्याहीवरी गुरुकृपा ।।५०।। अखंड नाम स्मरावें । ऐसें कथिती सकलां ठावें । कोणीएकें पुसिलें कैसें व्हावें । निद्रेमाजी खंड पडे ।।५१।। सद्गुरु नेती तयासी । अखंड नामधारीयापाशीं । निद्रिस्त असते समयासी । म्हणती नाम ऐकावें ।।५२।। देहासि लाविता कान । सूक्ष्म होय नामस्फुरण । वदती दृढ आपण जाण । खंड कधीही पडेना ।।५३।। खंडेराव म्हैसाळकर । देसाई कोणी इनामदार । परि रक्तपितीचा आजार । अतिदुःख देतसे ।।५४।। तंव परिसिली कीर्ति । सद्गुरु ब्रह्मचैतन्यमूर्ति । गोंदवलें ग्रामीं वास करिती । निवारतील व्याधीसी ।।५५।। परिसतां कीर्ति ऐसी । दर्शना आले गोंदवल्यासी । विनंती करिती गुरुपाशीं । व्याधि पीडा अनिवार ।।५६।। तयांकरवीं नामजप । करोनि निरसिलें पाप । ऐसे बहुतांचे ताप । हरविले किती सांगू ।।५७।। आप्पासाहेब पटवर्धन । वीरवंशज शीलवान । कागवाड जगदंबाभुवन । राजे पूर्वील तेथीचे ।।५८।। कागवाडकर रामदासी । नेती तयां दर्शनासी । रामनगरी अयोध्येसी । होते जेव्हां समर्थ ।।५९।। अनुग्रहप्रसाद देवोन । सुखीं केले धनवान । कृपादृष्टीं पाहोन । स्वग्रामा पाठविले ।।६०।। पूर्वसंचित कुलशाप । गुप्त होता यतिताप । सत्त्व रुजतां तम पाप । प्रगट होऊं लागलें ।।६१।। देहस्मृति उडाली । निद्रा शांति समूळ गेली । माय चरणीं नेवोन घाली । श्रीगुरुदत्तांचे ।।६२।।

श्रीनृसिंहवाडी क्षेत्रीं । सेवा करिती दिनरात्रीं । दृष्टांत देती सुत-अत्रि । तुम्हां तारक गुरुमाय ।।६३।। मग गोंदवलेंसी आणिलें । श्रींचे चरणीं घातलें । तुमचें बालक तुम्हीं वहिलें । मारावें वा तारावें ।।६४।। समर्थ वदती ते समयीं । रामभक्तां भय नाहीं । नामजपा लावोन पाहीं । समंधरोष शांतविला ।।६५।। ब्रह्मद्वेष अति कठीण । त्यावरी यति साधक गहन । शांत होतां होतां जाण । वरचेवरी उद्भवे ।।६६।। पुनरपि सेविता चरण । वासना जाय विरोन । सत्संगतीं पापक्षालन । होवोनि झाले स्वत्त्वस्थ ।।६७।। आतां श्रीगुरु त्रिकालज्ञ । येविषयीं दृष्टांत जाण । सांगोनि हा अध्याय पूर्ण । करूं, बहु विस्तारला ।।६८।। मठीं त्रिगुणी लोक येती । कांहीं तस्करबुद्धि असती । दुर्लभ वस्तू छपविती । दुजयाची ठकवोनी ।।६९।। कागाळी जाय समर्थांपुढें । नेमके जाती चोरांकडे । वदती 'हे काय करतां वेडे । राजदंड पावाल ।।७०।। वस्तु द्यावी आम्हांपाशी । आम्ही न सांगूं कोणासी । यापुढे ऐसे दुर्गुणासी । सोडून द्यावें' ।।७१।। नेमकीचि सांगती खूण । आणि बोध करिती गहन । बहुतांचे दवडिती दुर्गुण। पुण्यक्षेत्रीं गुरु पाहीं ।।७२।। कामुकांची तीच गति । सद्गुरुतपस्तेजापुढतीं । बुद्धीस होय उपरति । संतसंगमाहात्म्य ।।७३।। सहस्रावधि स्त्री पुरुष । नांदती गुरुछायेस । रीघ नसे दुर्बुद्धिस। शिराया तपस्तेजें ।।७४।। नेमकाचि सांगती जप । नेमकें दर्शविती पाप । नेमकेचि कथिती संकल्प । या त्रिविध जगासी ।।७५।। परि कोणाचा अपमान । कधींही न करिती जाण । ज्याची त्यासी सांगोन खूण। सुमार्गासी लाविती ।।७६।। ऐशा असती बहु कथा । नित्य घडती कोण गणिता । परमार्थीं वळवाया चित्ता । फक्त दिशा दाविली ।।७७।। तपस्तेज अति गाढें । न पाहवे मुखाकडे । नास्तिकांचेंही मस्तक पडे । नम्र होवोनि गुरुपदीं ।।७८।। हठयोगी कर्मयोगी । वेदांतवादी विरागी । प्रयत्न-प्रारब्धवादी जगीं । नाना पंथ नाना ध्येयें ।।७९।। नित्य येती गुरूंपाशीं । निंदा स्तुती करावयासी ।

कांहीं आशंका पुसणेंसी । गुरुधामीं धांवती ।।८०।। नाना आशंका फेडोन । सकळांचे करिती समाधान । गुरुमाय सदा प्रसन्न । भाविका नास्तिकांसी ।।८१।। आत्माराम हृदयीं धरावा । आणि विश्वात्मा ओढोनी घ्यावा । येविषयीं हा दाखला पहावा । सद्गुरुलीलेमाझारीं ।।८२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते दशमाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास पांचवा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। ॐ नमो जी विश्वंभरा । विश्वचालका विश्वेश्वरा । भक्तालागीं अभयकारा । विराट्पुरुषा नमोऽस्तु ते ।।१।। एकदां श्रीगुरूंची स्वारी । भय्यासह[१] पादचारी । फिरत असतां नर्मदातीरीं । गिरिगव्हरीं प्रवेशले ।।२।। तृषा लागली म्हणोनी । गुहेमाजीं गेले झणीं । तेथें निर्मळ जल पाहोनी । प्राशन करूं लागले ।।३।। तेथें एक सतेज योगी। बैसले होते अंतर्भागीं । ते समाधी उतरोनि वेगीं । बाह्यप्रदेशीं पातले ।।४।। पुसती 'रामावतार झाला कीं नाहीं । दर्शना जाऊं लवलाहीं । ही इच्छा धरोनि पाहीं । समाधी लावोनि बैसलो' ।।५।। सद्गुरु वदती योगियासी । 'रामकृष्ण-अवतारांसी । होवोनि सांप्रत कलीसी । प्रारंभही झालासे' ।।६।। ऐसी परिसोन वाणी । कष्टी झाला वृद्ध मुनि । जाणोनि हें श्रीगुरूंनीं । मस्तकीं हस्त ठेविला ।।७।। ज्ञानोदयें चरण वंदोनी । प्राण सोडिते झाले मुनि । अग्निसंस्कार तयां करोनी । उभयतां झाले मार्गस्थ ।।८।। भय्यासाहेब करिती प्रश्न । 'हें काय आश्चर्य गहन' । सद्गुरु वदती हास्यवदन । 'योगिया

---

**इंदूरचे भय्यासाहेब मोडक यांचे बरोबर**

गति मिळाली ।।९।। बहुतां दिसांचा तापसी । लावोन बैसला समाधीसी । वंचना करित काळासी । सद्गतीकारणें ।।१०।। रामदर्शन करोनी । जावें मुक्त होवोनी । ऐसी इच्छा धरोनी । प्राणापान कोंडिले ।।११।। तो काल निघोन गेला । योगी तैसाचि राहिला । आजिं भाग्य उदयाला । येतां गेला वैकुंठी' ।।१२।। असो योगियां गति दिली । ऐसीं बहुत कार्यें केलीं । दयाळ सद्गुरुमाउली । भेटली आम्हां सभाग्यां ।।१३।। नीलकंठ दामोदर जोशी । जे कुरंदवाडचे रहिवासी । त्यांचे करविता विवाहासी । तो प्रकार परिसावा ।।१४।। विजापूरप्रांतींची कोणी । विप्रस्त्री कन्या घेवोनी । आली गोंदवलें श्रीभुवनीं । समर्थचरण वंदितसे ।।१५।। कन्या घालोन पदकमलीं । विनंती करी ते वेळीं । 'रोगें बहु ही ग्रासली । नायटे उठती सर्वांगीं ।।१६।। अमावास्ये मावळती । पौर्णिमे पुन्हा चिघळती । ऐसी बहुत दिवसांची स्थिति । गति बरवी दिसेना ।।१७।। म्हणोन घातली चरणांवरी । कृपा करा दीनावरी । तुम्ही दिनांचे कैवारी । ऐसी कीर्ति जगांत' ।।१८।। समर्थ वदती 'अहो माय । सांकडे निरसील रामराय । परि एक असे उपाय । मानेल तरी करावा ।।१९।। कन्या देतां गरिबासी । रोगमुक्त होय खाशी । घेवोन पतिअनुज्ञेसी । करा निश्चय सत्वर' ।।२०।। तत्काळचि पत्र लिहिलें । होकारार्थीं उत्तर आलें । रामसाक्षीं उदक सोडविलें । कन्या देऊं गरिबासी ।।२१।। सती वदे समर्थांसी । 'कोणा देऊं सांगा मजसी । विवाहमुहूर्त समयासी । कन्यादान करूं तया' ।।२२।। ते समयीं दर्शनाकरितां । नीळकंठ तेथें उभा होता । समर्थ वदतीं 'उदर भरतां । काय धंदा करोनी' ।।२३।। नीळकंठ वदे 'भिक्षेसी । नित्य फिरवितों झोळीसी' । समर्थ वदती सतीसी । 'यासी द्या हो कुमारिका' ।।२४।। 'आज्ञा प्रमाण' तिनें म्हटलें । एकमेकीं पत्ते पुसिले । बालिकेचं दुःख हरलें । कृपावचनें सद्गुरूंच्या ।।२५।। कांहीं दिवसांउपरी । पिता मनीं विचारी । 'कन्या सुस्वरूप गोजिरी । कैसी द्यावी भिक्षुका

।।२६।। आम्ही गृहस्थ धनवंत । जांवई आम्हां न शोभत' । भाक विसरला समस्त । कन्यामोहेंकरूनी ।।२७।। विकल्प होतां मनांत । पुनरपि नायटे उठले बहुत । मग शीघ्र कन्यादान करित । कुरुंदवाडी जावोनी ।।२८।। असो समर्थकृपेंकरोन। उभयतांचें झालें कल्याण । तैसेचि अनंत जन । गुरुकृपें आनंदले ।।२९।। भवानराव नामेंकरोन । भक्त भावसंपन्न । तयांस संकटी दर्शन । वाराणशीं जाहलें ।।३०।। हर्द्यासी असतां गुरुवर । काशीस निघाले सपरिवार । भवानराव भक्त थोर । संगें येऊं विनविती ।।३१।। समर्थ वदती तयांसी । 'तुम्ही रहावें मठासी । आम्ही आलियावरी काशीसी । स्वतंत्र तुम्हीं चलावे' ।।३२।। समर्थ काशीस जावोन येतां । भवानराव निघाले यात्रेकरितां । दरकूच जातां जातां । काशीक्षेत्रीं पावले ।।३३।। तेथें वदती भटासी । 'एकांतस्थळ आम्हांसी । जप करित रहावयासी । द्यावें तुम्ही उत्तम' ।।३४।। एक ओसाड[१] घर असे भलें । जें समंधपीडें दूषित झालें । तें नामधारकांसी दिधलें । काय होतें पाहती ।।३५।। समर्थशिष्या कोठेही । कळिकाळाचें भय नाहीं। पिशाच काय करील पाहीं । प्रकार घडला तो परिसावा ।।३६।। कांहीं काल तया स्थानीं । भवानराव होते जप करोनी । मध्यरात्रीं एके दिनीं । समंध तेथें प्रगटला ।।३७।। शुभ्रवस्त्र परिधान । मिठाईचा पुडा देवोन। बोलतसे हास्यवदन । जपून हा ठेवावा ।।३८।। भवानराव नामधारक । पाठीं समर्थ सहायक । न डगला अणु एक । पुडा ठेवोन घेतला ।।३९।। कांहीं वेळ गेल्यावरी । पुन्हां आली समंधफेरी । कृष्णवस्त्र परिधान करी । मिठाई मागों लागला ।।४०।। भवानराव वदले तयासी । 'शुभ्र प्रावरणें असती ज्यासी । तेणें दिधला मजपाशीं । तुजला नाहीं देणार' ।।४१।। उभयतांचा तंटा झाला। उन्मत्त समंध उरीं बैसला । भवानरावें धांवा केला। सद्गुरुमहाराजांचा ।।४२।। तंव तेथें अभिनव

१. दशपुत्रे यांचा वाडा

घडलें । लख्ख प्रकाशें अंबर भरलें । गुरुमहाराज प्रगटले । समंध गेला पळोनी ।।४३।। शिष्या अभय देवोनी । गुप्त झाली गुरुजननी । पुन्हां तेथें समंधानें । मुख नाहीं दाखविलें ।।४४।। सत्ताधारी गुरुमूर्ति । शिष्यसंकटी उभे असती । हर्द्यासी असोनि काशीप्रति । शिष्यसंकटी प्रगटले ।।४५।। पिशाचमोचन केलें फार । गणती कोण करणार । परि कांहींसा प्रकार । दृष्टांतासी वर्णन करूं ।।४६।। रघुनाथराव फडणवीस । जतसंस्थानीं करिती वास । परि समंधव्याधि भार्येस । तेणें दुःख भोगिती ।।४७।। उभयतां आले गोंदवलीं । समर्थसेवा बहु केली । बारा समंधां गति दिली । माणगंगाप्रवाहीं ।।४८।। फडणवीसही उदासीन । झाले होते अति गहन । तयांसी लावोन साधन । दुःख हरलें उभयतांचें ।।४९।। आटपाडीकर पिलाजीपंत । देशपांडेनामें विख्यात । तयांचेही भार्येप्रत । लागले सात समंध ।।५०।। तयांसीही दिधली गति । ऐसे प्रकार नित्य घडती । कांहीं कथिले तुम्हांप्रति । गुरुसत्ता कळावया ।।५१।। गोविंदराव केळकर । भार्या सरस्वती चतुर । परि समंध पीडी फार । मोरगिरीवासिया ।।५२।। येवोन लागती चरणासी । श्रीगुरु वदविती समंधासी । ब्रह्मचारी उच्चारी वेदासी । परि गायत्री अर्धचि म्हणे ।।५३।। 'साग्र गायत्री म्हणेन । तरी भस्मचि होईन' । ऐसें वदे तें दावोन । समर्थ बोधिती शिष्यांसी ।।५४।। गायत्रीचा महिमा कैसा । ज्ञानरूप तेजोमय ठसा । परि सांप्रत निरर्थक कसा । द्विजांलागीं भासतसे ।।५५।। असो पिशाचयोनींतूनि । शीघ्र तयासी काढोनी । गति दिधली समर्थांनीं । संतदर्शन दुर्लभ ।।५६।। पंचाक्षरी भुतें गाडिती । परि साधु तयां मुक्त करिती । वासनाशेषनिवृत्ति । संतदर्शनीं होतसे ।।५७।। गुरुसत्ता आहे किती । तैसी स्वरूपाची व्याप्ती । पहावी कांहीं दृष्टांतीं । कथन करू गुरुलीला ।।५८।। कृष्णराव तरडे म्हणोनी । कोणी भक्त श्रीसदनीं । एकदां जातां आडरानीं । भुजंग आला आडवा ।।५९।। राव बहु घाबरला । तंव सर्प

जवळींच आला । मग श्रींची शपथ तयाला । घालितां राहिला तेथेंचि ।।६0।। हलूं नको जागचा येथ । म्हणोनि घालिती तया शपथ । येवोनि गुरूंसी सांगत । सर्पा भ्यालों म्हणोनी ।।६१।। समर्थ वदती जा सत्वरीं । दुरूनि शपथ मोकळी करीं । जाईल बिचारा आपुले घरीं । बंधन कोणा नसावें ।।६२।। जावोन पाहती मंडळीं । सर्प स्थिर त्या स्थळीं । तरडे वदतां जा स्वस्थळीं । तेव्हांचि दूर पळाला ।।६३।। बाळकृष्णभट्ट नामें जोशी । पुत्राविणें बहुक्लेशी । चार केल्याही स्त्रियांसी । पुत्र नाहीं जाहला ।।६४।। चौथी स्त्री उपवर । होवोनि गेलें संवत्सर- । त्रयोदश, परि आशांकुर । लोभें नाहीं मावळला ।।६५।। करुणा भाकी श्रींचे चरणीं । निपुत्रिक अभागी म्हणोनी । श्रीगुरु वदती कोदंडपाणी । संकटसमयीं स्मरावा ।।६६।। औटकोट जप करितां । पुत्र प्रसवली द्विजकांता । आनंद न समाये चित्ता । वारंवार स्तवन करी ।।६७।। महाराज असतां सोलापुरीं । आला एक चितारी[1] । विनवी घ्यावी प्रतिमा बरी । इच्छा पुरवा समर्था ।।६८।। श्रीगुरु वदले तयासी । द्रव्य मेळवूं इच्छिसी । तरी आज या समयासी । न काढितां बरें ।।६९।। परि आग्रह साहेबीं धरला । बहुतां येईल दर्शनाला । सद्गुरूही विनोदें बोला । तुकविती मान ।।७0।। श्रींसी आसनीं बैसविलें । दोहींकडे साहेब भले । हस्त जोडोन उभे ठेले । यंत्रीं घेतली प्रतिछाया ।।७१।। तंव तेथें अघटित घडलें । साहेब मात्र व्यक्त दिसले । महाराज गुप्त झाले । अवघे करिति विस्मय ।।७२।। चितारी ओशाळला बहुत । पाहोन दयाळू समर्थ। दुजे दिनीं काढों देत । सुप्रसन्न वदनानें ।।७३।। बहुतीं प्रतिमा काढल्या । तितुक्या भिन्न आल्या । बहुरूपी सद्गुरु भला । लीला करोन दाखवी ।।७४।। मार्तंडबुवा नामें एक । औंध

१ फोटो काढणारा.

ग्रामीचा श्रीसेवक । हरिदास हास्यविनोदादिक । कीर्तन करी रसाळ ।।७५।। श्रीगुरुप्रसादेंकरोन । सुत झाला तयालागोन । तोही करी कीर्तन । अल्पवयीं गुरुकृपें ।।७६।। शंकरशास्त्री म्हासुर्णेकर । गुरुचरणीं भाव थोर । एकदां करिती विचार । स्तवन करावें श्रीगुरूंचें ।।७७।। परि कवित्वाची शक्ति । नाहीं म्हणून काकुलती । गुरुचरणांसी प्रार्थिती । कांहीं सेवा घडावी ।।७८।। ऐसें मनीं भाविलें । तें श्रींनीं ओळखिलें । शिष्यकोड पुरविलें । तो प्रकार परिसावा ।।७९।। रात्रौ तयांसी स्वप्नांत । एकाएकीं स्फूर्ति होत । सहा श्लोक रचोनि स्तवित । असतां आले जागृति ।।८०।। तंव श्लोक स्मरणीं खासे । लिहोन ठेविती जैसे तैसे । परि अष्टक करावें ऐसें । वाटतां आणिक दोन केले ।।८१।। प्रसंगें[१] दाविता गुरूंसी । खूण दिधली तयांसी । शेवटचे दों श्लोकांसी । फाडोनिया टाकिलें ।।८२।। प्रासादिक आणि पाठक । कवित्वा भेद आत्यंतिक । हाही दाविला विवेक । श्लोकार्थातें विवरितां ।।८३।। मोरगिरीनजिक कोकिसरें गांवीं । वार्ता घडली परिसावी। गर्भिणी अडली ती मुक्त व्हावी । बहुतीं केले उपाय ।।८४।। शुद्रस्त्री संकटी पडतां । हरी पाटलासी आली ममता । अंगारा लावोन नवस करितां । सुटका करिती श्रीगुरु ।।८५।। आनंदें मोरगिरीस येवोनी । प्रेमें नमिला कोदंडपाणी । मठपतींसी विनवोनी । नवस पूर्ण करितसे ।।८६।। पांडवसंख्या[२] मुद्रिकांस । त्वरित पाठविल्या गोंदवलेंस । आनंदे श्रीचरणास । वारंवार स्तवितसे ।।८७।। कोणा नवसें पुत्र होती । कोणाच्या व्याधी हरती । अनंत नवसांसी पावती । द्यावे किती दृष्टांत ।।८८।। सांगलीस एक भाविक सती । श्रीगुरुपदांकित होती । अवचित तिचे पुत्रावरती[३] । राजक्षोभ जाहला ।।८९।। धरोनि नेती अधिकारी ।

**१ गोंदवलेस आलेवेळीं. २ पांच रुपये. ३ बंडूशास्त्री पुराणिक.**

माय शोक करी भारी । दृढ विश्वास गुरुवरी । म्हणोन संकट घातलें ।।९०।। देव्हारींच्या गुरुपादुका । काढोन ठेवी जळीं देखा । निरपराधी सुताचीं सुटका । व्हावी ऐसें प्रार्थितसे ।।९१।। इकडे गोंदावलेंसीं श्रीचरण । सुजले न कळे कारण । अनेक उपाय करकरोन । पाहतां गुण येईना ।।९२।। समर्थ वदती शिष्यांसी । न करावे उपाय यासी । कांहीं कालें आपैंसी । सूज लया जाईल ।।९३।। इकडे खटला चालूं झाला । पुत्र निर्दोषी ठरला । तेव्हां काढोन पादुकाला । समाराधना करितसे ।।९४।। तंव सूज उतरोन गेली । भक्तजनीं पृच्छा केली । एकाएकीं आली गेली । रहस्य यांतील कथावें ।।९५।। सद्गुरु वदती ते काळीं । संकटें घालिती भक्तमंडळीं । पादुका ठेविल्या होत्या जळीं । तेणें ऐसें जाहले ।।९६।। तंव सांगलीहून वर्तमान । आलें हरिलें श्रींनी विघ्न । सकळीं आश्चर्य पावोन । गुरुचरणा वंदिती ।।९७।। असो ऐसी गुरुमाऊली । बहुतांचे उपयोगा आली । स्वयें तरोनि तारिली । जनसंख्या अनिवार ।।९८।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते दशमाध्यायांतर्गतः पंचमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## समास सहावा

श्रीसद्‌गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। नमो रावणमदहारी । देहबंधनमुक्तिकारी । बिभीषणसाह्यकारी । अघनाशना रघुपते ।।१।। नमो सीताशोकविनाशना । अखिलसाधुमनरंजना । भरतप्रिय वियोगहरणा । नृपाधीशा नमो तुज ।।२।। रामनाम साधनसार । इतर साधनें निःसार । कलियुगीं भव दुस्तर । तारक नौका रामनाम ।।३।। गुरु सर्वज्ञांचा राजा । मेळवी नामधारक फौजा । प्रत्यक्ष करोनि दाविती काजा । नामपुण्यप्रतापें ।।४।। ऐसा करीत उपदेश । नामीं लाविती नरांस । विप्रश्रेष्ठ विद्वज्जनांस । हें कांहीं मानेना ।।५।। म्हणती विप्र वेदाधिकारी । त्यासी पूज्य गायत्री । इतर वर्ण नामाधिकारी । विप्रांसी हें अनुचित ।।६।। गायत्रीमंत्र वेदसार । विप्रासी तारक आधार । श्रुतिस्मृतिपुराणांचा विचार । पूज्य एक गायत्री ।।७।। ऐसा असतां आधार । भुलविती बोधूनिया नर । रामनाम म्हणोनि सार । जपानुष्ठानें करविती ।।८।। ऐसियानें भ्रष्टता घडे । वेदश्रद्धा समूळ उडे । म्हणोनि लाविती वांकडें । सद्‌गुरूंसी ।।९।। महाराज वदती सर्वांसी । 'जमा सर्व एके दिवशीं । नामचि तारक विश्वासी । शंका फेडूं साधार' ।।१०।। ऐसें वदतां गुरुवर । सकळां मानला विचार । दिवस नेमून दरबार । भरला सुज्ञ द्विजांचा ।।११।। सद्‌गुरु वदती द्विजांसी । 'तुह्मी ज्ञानी गुणराशी । मी तों अज्ञ माणदेशी । सलगी करितों गुरुकृपें ।।१२।। विप्रांसी गायत्री प्रमाण । किंबहुना केवळ प्राण । याचि सिद्धीनें विप्रपण । वंद्य झालें मानवा ।।१३।। अखिल देवता ज्याचे अधीन । तयासी हीन म्हणेल कवण । जें वेदांचें मूळस्थान । शब्दब्रह्म बीजरूप ।।१४।। अघनाशक ज्ञानदाता । मंत्रराज नसे यापरता । परि साधकाअंगीं पात्रता । असतां बरें ।।१५।। वेदोक्त मंत्र प्रतापवंत । शुद्ध भूमिके सिद्धी देत । तयालागीं सतत । वैराग्य पाहिजे ।।१६।। यास्तव ऋषि महाज्ञानी । अलिप्त होते सर्वांपासोनी ।

नदी तडाग निर्जनवनीं । पर्णकुटिके राहती ।।१७।। समस्त राजे शरणागत । देवही थरथरां कांपत । परि वैराग्य कडकडित । एकभुक्त अजिनशय्या ।।१८।। आहारविहार सत्त्वस्थ । कार्याकारण देह रक्षित । मंत्रसिद्धी तयांप्रत । हस्त जोडून उभी असे ।।१९।। त्यांचेचि वंशज सगोत्र । तेचि परमपावन मंत्र । परि तेज शांति सिद्धि मात्र । कोणापाशीं दिसेना ।।२०।। तैसें बंधविमोचक ज्ञान । तयासी गेले मुकोन । कोरडा राहिला अभिमान । समाधान नाहीं ।।२१।। भूमिका शुद्ध प्रेरक शुद्ध । आहारविहार असतां शुद्ध । तरीच होय मंत्र साध्य । पहावें धर्मग्रंथीं ।।२२।। पर्जन्यसूक्तें वाहती धारा । आतां येईना शुष्क वारा । सूक्ष्म स्थिती अवधारा । कैसी आली ।।२३।। कृपा शाप सत्ता दोन्हीं । दर्भ शर कोण न मानी । यास्तव आहारविहारसरणी । शुद्ध पाहिजे शास्त्रोक्त ।।२४।। कलि होवोन सबळ । ब्राह्मण्यासी झाला काळ । तेणें मंत्रसिद्धीचें बळ । विफल होत चालिलें ।।२५।। विप्र झाले विषयासक्त । वैभवेच्छा वाढली बहुत । वेदपठण जीवितार्थ । कांहीं शेष राहिलें ।।२६।। सत्त्वगुण लया गेला । विप्र रजोगुणी बनला । त्याहीवरी तम आला । चित्तक्षोभ करीतसे ।।२७।। देहसुखा लोलुप झाले । तेणें शुद्ध ज्ञानासी मुकले । अशाश्वतें शाश्वत ग्रासिलें । कालानुरोधें ।।२८।। आहार विहार संगति । वर्णाश्रमातें बुडविती । ऐसी विपरीत कालगति । कर्म सांग घडेना ।।२९।। शक्य तितुकें करावें । परि त्यावरी न विसंबावें । चित्तशुद्धीस्तव घ्यावें । रामनाम निर्बंध ।।३०।। पुढील भविष्य जाणोनि । सुलभ नाम कथिलें ज्यांनीं । वेद पुराणें संतवाणी । स्वानुभवही तैसाचि ।।३१।। कृतयुगीं ध्यान करणें । त्रेतायुगीं हवन देणें । द्वापारीं देवतार्चनें । कलीं साधन कीर्तन ।।३२।। ऐसें बहुतीं पुराणीं । वदली श्रीव्यासवाणी। यास्तव श्रेष्ठ सर्वांहुनी । नाम साधन कलियुगीं ।।३३।। साडेतीन कोटी जप होतां । चित्ताची जाय मलिनता । तेरा कोटीनें सांगता । जन्ममृत्यूची' ।।३४।। विप्र वदती सद्गुरूंसी ।

‘वेदाज्ञा दावा आम्हांसी । आधुनिक संतवाक्यासी । न गणूं प्रमाण’ ।।३५।। सद्गुरु वदती तें समयीं । ‘उपनिषदें आणा लवलाहीं । अथर्वणवेदांतर्गत पाहीं । कलिसंतरणोपनिषत्’ ।।३६।। तत्काळ उपनिषदांसी । आणविलें त्या समयासी । शोधूनिया छंदांसी । अर्थ बोला वदती गुरु ।।३७।। विद्वज्जनीं विवरण केला । नाममहिमा जो वर्णिला । साडेतीन कोटी जपाला । करितां होय चित्तशुद्धी ।।३८।। कलियुगीं नामचि श्रेष्ठ । इतर साधन वृथा कष्ट । ऐसा आधार श्रीगुरु स्पष्ट । दावोनि देती द्विजांसी ।।३९।। ‘साधु वेदबाह्य वदती । ऐसी तुह्मां शंका होती । परि वेदगुह्य साधूच जाणती । इतरां गूढ कळेना ।।४०।। वेदां जें अगोचर । तेंचि साधु स्वयें सार । यास्तव शंका अणुभर । सिद्धवचनीं न धरावी ।।४१।। वेद तरी ईशस्तुति । नामही नव्हे नरकीर्ति । जेथें वेदांची उत्पत्ति । त्या आधीं हरिः ॐ ।।४२।। स्वधर्मकर्में नित्य करितां । चित्ताची जाय मलिनता । परि तीं सांग न घडतां । महादोष बोलिले ।।४३।। नाम घेतां दोष हरती । अवाक्षर होतांहि मुक्ति । लयकारण तयांप्रति । वाल्हा म्हणे ‘मरा मरा’ ।।४४।। नाम साधन अनादि । शांति पावले शिवादि । कलियुगीं तराया भवाब्धि । विशेषत्वें वर्णिलें ।।४५।। रामनाम आणि वेद । उभय साधनें जगद्वंद्य । परि आहारविहारादि बंध । वैदिककर्मा मुख्यत्वें ।।४६।। प्रस्तुत तें बंधन सुटलें । यास्तव सुलभ नाम प्रतिष्ठिलें । वेदां अंतर्बाह्य संचलें । नाहीं आणिलें पाहुणें ।।४७।। आणिक परिसा अभिप्राय चतुर । नामधारकें वेदीं अनादर । करितां त्यासी सुविचार । केव्हांही म्हणूं नये ।।४८।। वेदपुरुष नारायण । वेदवक्ता भगवान। वेद तोषवी जगज्जीवन । वेद मूळ जगतासी ।।४९।। वेद आणि नाम । भिन्न मानणें हाचि भ्रम । आदिपुरुषापासोन दोहींचा उगम । स्थळ वेळ एकचि’ ।।५०।। असो ऐसें समाधान । सकलांचें केलें पूर्ण । मग नामगजर करोन । सकल गुरूंसी वंदिती ।।५१।। समर्थांची ऐसी रीती । जरी नाम

उपदेशिती । तरी वैदिक कर्मे करविती । अत्यादरेंकरोनी ।।५२।। नित्य शनिवार गुरुवार । अभिषेक सर्व देवांवर । रुद्र पवमानसुक्तें प्रकार । ज्यासी प्रिय ते तयासी ।।५३।। दोनवार पुरश्चरण । गायत्रीचें करविती गहन । रुद्रस्वाहाकार वेदपठण । विप्रांकरवीं करविती ।।५४।। नित्य उपासनेभीतरीं । चतुर्वेदसेवा बरी । चाले श्रीगुरूंचें घरीं । श्रोते तुम्ही अवधारा ।।५५।। वाराणसीं पंढरीस । करविती वेदघोषास । दक्षिणा देवोन बहुवस । वेदज्ञ विप्रां पूजिती ।।५६।। गोंदवल्यासी वैदिक किती । सद्गुरू आदरें ठेविती । क्षेत्र देवोन कुलगुरुप्रति । सदा सन्निध ठेविलें ।।५७।। यजुर्वेदीं गुरुवर । परि चहूं वेदीं अत्यादर । एकदां एक प्रकार । घडला तो परिसावा ।।५८।। मंदिरीं मंत्रपुष्पसमयीं । यजुःशाखी करिती घाई । आदौ देवे म्हणतां पाहीं । ऋक्शाखी तापले ।।५९।। उभयतांचा चालला तंटा । यजुःशाखी अभिमान मोठा । स्वशाखीं सद्गुरुमठा । मान यजुर्वेदांसी ।।६०।। ऋग्वेदी वदती ‘ऐसें नव्हें । ऋग्वेद श्रेष्ठ स्वभावें । तयासी आधीं मानावें । शास्त्ररूढीं ऐसी असे’ ।।६१।। भांडत गेले गुरूंपाशीं । श्रीगुरु वदती तयांसी । ऋग्वेद थोर सर्वांसी । तोचि आधीं म्हणावा ।।६२।। ऐसे वदतां गुरुवर । यजुःशाखी झाले चूर । आपुला अभिमान धरितील कीर । ऐसी आशा जयांसी ।।६३।। असो ऐसे गुरुराव । वैदिककर्मे करिती सर्वं । परि नामसाधनीं दृढभाव । साधन सुलभ या कालीं ।।६४।। योगियां तेंचि कथिती । प्राणापाना कोंडितां निश्चितीं । न होय वासनानिवृत्ति । एकदेशी बंधन ।।६५।। गुरु सर्वज्ञ सकलगुणें । क्वचित्काळीं वेदवचनें । नेमकीं कथोन समाधानें । करिती वैदिकद्विजांची ।।६६।। कधीं वेद नाहीं पढले । परि वेदगुह्य साध्य झालें । तयांसी अज्ञेय नुरलें । अणुभरही त्रिकाळीं ।।६७।। नामें तुटती उपाधि । नामें सहजसमाधि । नामें होय अनादि- । स्वरूपाशीं तन्मयता ।।६८।। आणिकही ये समयीं । एक गुरुबोध ठेवा हृदयीं । शास्त्ररूढी लौकिक पाहीं । उपासनामदें न सोडावे

।।६९।। न दुखवितां परांतर । अगत्य करा कुलाचार । परि नामीं रंगलें जयाचें अंतर । त्यासी बंधन नसें हें ।।७०।। नामें होय ज्ञानोदय । नामें होय वासनाक्षय । नामें होय स्वयेंचि ध्येय । निर्विकार निजवस्तु ।।७१।। येणेंपरी नामसार । सकलां बोधिती गुरुवर । नामीं लावोन असंख्य नर । तारिले आणि तारिती ।।७२।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।७३।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते दशमाध्यायांतर्गतः षष्ठः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति दशमोऽध्यायः समासः ।।**

# अध्याय अकरावा

## *समास पहिला*

**तनू जीर्ण झाली बहू कार्य केलें । रघूनायकें शीघ्र पाचारियेलें ।।**
**तदा रामरूपीं समाधिस्थ होती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।११।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जय जय श्रीसद्गुरू माहेरा । करुणार्णवा अघहरा । मायबाप सोयरा । निश्चयात्मक तूं एक ।।१।। सूक्ष्म वासने जन्म झाला । तिनें अहंता पति वरिला। औट चाहूर वतनाला । भूल पडली पाहोनी ।।२।। द्वैत सासू आणि श्वशुर । मजवरी प्रेम तयांचें फार । लोभ मोह दोघे दीर । साहित्य पुरविती ।।३।। आशा ममता पतिभगिनी । काय सांगूं तयांची करणी। ब्रह्मांड संसार उभारोनी । प्रपंचीं गोविती मजलागीं ।।४।। मी मी म्हणावया शिकविलें । माझें म्हणोन वेड लाविलें । बळेंचि संसारीं अडकविलें । निःसंगासी ।।५।। अहंपतीचें प्रेम भारी । न विसंबे क्षणभरी । माहेरींची स्मृति सारी । बाळपणींची विसरली ।।६।। मी आणि माझा संसार । हेंचि एक भासलें सार । सासू सासरे आणि दीर । नणंदांचे प्रेम बहु ।।७।। ऐसा संसार थाटला । मद संपत्तीनें भरला । तत्क्षणीं फळा आला । क्रोध सुपुत्र ।।८।। दुर्वच शर्करा वांटिली । आपली प्रौढी मिरविली । दुरित गुढी उभारिली । आनंद थोर मानिला ।।९।। तंव आणीकही अपत्यें झालीं । भय शोक बालके वाढलीं । मानिले सुखाची समाप्ती केली । त्रिवर्ग सुतांनीं ।।१०।। वासना विषय सूक्ष्मतंतें । मजला आणिलें या पंथें । कष्ट करोनि मरतें । तरी सुखलेश नाहीं ।।११।। मोहें केला हव्यास । तो झाला

सासुरवास । जाच परि सुखास । इच्छितसें तयामध्यें ।।१२।। तंव संत मायबहिणी । भेटल्या संसारकाननीं । कथिली तयांसी कहाणी । सुख सत्य कीं मिथ्या ।।१३।। त्या सांगती संसार । दुःखराशींचे डोंगर । अंतीं घात करणार । अंधवापींत बुडवोनी ।।१४।। सुखासी केली खटपट । ती अवघीच पोंचट । पोंचट असोन बळकट । सुटणार नाहीं ।।१५।। तेलीयाचा फिरता बैल । म्हणें मार्ग कधीं सरेल । सत्य पाहतां घरींच हा खेळ । होत जातो ।।१६।। तैसाचि हा संसारपंथ । सारितां सरेना सत्य । अहंता अंधारीं काढितां व्यक्त । क्षणिक भासे ।।१७।। सत्य म्हणतां स्वप्नवत् । स्वप्न म्हणता भासे सत्य । गुरुमाय दुरोनि पाहत । कौतुक सारें ।।१८।। ऐसें तयांनीं कथिलें । तेव्हां बाळपण आठवलें । माहेरीं जावें म्हणितलें । परि पति हट्टी सोडीना ।।१९।। यास्तव करितसें विनवणी । माये स्वहस्ते धरोनी । घेऊन जांई स्वसदनीं । प्रेमपान्हा पाजवीं ।।२०।। संतसज्जन मुऱ्हाळी[१] । पाठवोन लाविली कळी । जाचतीं हीं अधिक सगळीं । धीर मजसी धरवेना ।।२१।। जीव द्यावा म्हणाल झणीं । तरी पति विलक्षणी । चौऱ्यांशी लक्ष योनी । कूपीं फिरता पाठीं असे ।।२२।। बहुत येवोन काकुलती । माये हीच विनंती । माहेर दाखवीं स्वहस्तीं । कृपादृष्टी करोनि ।।२३।। असो ऐसी गुरुमाऊली । आम्हीं आतां आठविली । कृपा करील ते काळीं । सौख्य भोगूं ।।२४।। बहुतांलागीं पावली । इहपर सौख्यद झाली । मज दीनासी भेटली । तेचि पुढतीं निरूपिजेल ।।२५।। कागवाडकर रामदासी । गणूबुवा वदती जयांसी । सदा ध्याती गुरुचरणांसी । रामभक्त महाभले ।।२६।। गृहीं बांधोनि मंदिर । मूर्ति स्थापिल्या सुंदर । सेवा करिती अत्यादर । गृहस्थाश्रमीं राहती ।।२७।। गुरुदर्शनीं अति प्रीति । वरचेवरी धांव घेती । प्रपंचीं उदास वागती । आवडी रामसेवेची ।।२८।। एकदां स्थिति ऐसी झाली ।

**१ पाठीराखा किंवा पाठराखीण = नवरीला सासरीं अथवा माहेरीं नेण्याकरतां आलेला इसम.**

हनुमानमूर्ति भंगली । चित्तवृत्ति दुश्चित झाली । आतां कैसें करावें ।।२९।। धांव घेतली गुरूंकडे । वदती झालें जें सांकडें । मारुति नसतां रामापुढें । व्यंग दिसे आम्हांसी ।।३०।। कृपा करोन दीनावरी । चरण लागावे मंदिरीं । मारुतीची स्थापना बरी । स्वहस्तें करावी ।।३१।। संतचरण लागतां सहज । सुफल होईल धरिलें काज । एवढें द्यावें प्रेमव्याज । कृपादृष्टी करोनी ।।३२।। वारंवार प्रार्थना करिती। सद्गुरु तयां अभय देती । येऊं तुमचे गृहाप्रती । सत्य सत्य जाणावें ।।३३।। ऐसे आश्वासन दिलें । दुःखित चित्ता शांतविले । परि आज उद्यां करितां गेले । बहुत दिवस ।।३४।। संत येणार माझें घरीं। सूक्ष्म अहंकार अंतरीं । उठला तो जाणिला चतुरीं । म्हणोनि विलंब लाविला ।।३५।। बहुत केली प्रार्थना । उपवास करिती नाना । श्रीगुरु वदती हठयोग जाणा । कदापि करूं नये ।।३६।। तुम्ही जावें आतां गृहासी । आम्ही येऊं अमुक दिवशीं । हर्षे भरोन रामदासी । स्वगृहीं परतले ।।३७।। नाना साहित्य जमा केलें । मंदिर सर्व शृंगारिलें । गुरुदर्शन घडेल वहिलें । आनंद नगरवासियां ।।३८।। पदें रचोनि मेळा केला । तो प्रसाद मजसी मिळाला । कीर्ति परिसोनि कवित्वाला । रचिलें जनप्रीतीस्तव ।।३९।। कलियुगीं साधु नसती । ऐसी मज भावना होती । अनुग्रह घ्या कोणी वदती । उगाच होकार देतसें ।।४०।। ठरली वेळ निघोन गेली । गुरूमूर्ति नाहीं आली । तैं उदासीनता आली । रामदासीबुवांसी ।।४१।। आमुचा नसे अधिकार । कां कृपा करील गुरुवर । ऐसा निराशेचा उद्भवोनि अंकुर । उपोषण सुरू केलें ।।४२।। सात दिवसपर्यंत । उपोषणें देह कष्टवित । जरी न येती समर्थ । तरी प्राण त्यजावा ।।४३।। ऐसा निश्चय करोनि । सात दिवस काढिले त्यांनीं । तरी श्रीगुरुजननीं । येण्याची वार्ता दिसेना ।।४४।। चित्त अत्यंत दुखावलें । जिणें निरर्थक भासलें । सोमल घेऊं आरंभिलें । औदासिन्य येवोनि ।।४५।। तंव पूर्वीच गोंदवलीसी । सद्गुरु कथिती दोघाजणांसी । शीघ्र जावें कागवाडासी ।

अंताजीपंत आणि व्यंकणभट ।।४६।। इकडे रामदासियांनीं विष कालविलें । तंव हे दोघे दारी उभे ठेले। सद्गुरु यावया निघाले । ऐसी अमृतवाणी कथियेली ।।४७।। आम्हां पाठवलें पुढती । समर्थ मागोन शीघ्र येती । सत्वर करावी आयती[1] । रामदासें विष दडविलें ।।४८।। अंतर्ज्ञानी गुरुराव । करणी करिती अभिनव । शरण्या देती अनुभव । परि निष्ठा पाहती ।।४९।। आगगाडीचे अड्ड्यावरी। पावली सद्गुरूंची स्वारी । निरोप येतांच सत्वरीं । सामोरे धांवती ।।५०।। रांगोळ्या सडे घातले । ताशे मर्फे[2] थडथडले । भजनीसमुदाय निघाले । टाळ वीणा घेवोनी ।।५१।। सुस्वर कंठें मेळे गाती । आणूं चला गुरूमूर्ति । हातीं टिपऱ्या वाजविती । शोभा दिसे अपूर्व ।।५२।। असो ऐसी आयती[1] झाली। वेळीं मंडळी समीप आली । लोळती श्रींचे चरणकमळीं । पोटीं आनंद न समाये ।।५३।। वाजतगाजत मिरवीत । रामनामें गर्जवीत । माय पावली ते पेठेंत । सुवासिनी आरत्या ओंवाळिती ।।५४।। तेच क्षणीं दृष्टादृष्ट । होतां फळलें अदृष्ट । अंतरीचें निघालें क्लिष्ट[3] । सर्वभावें नत झालों ।।५५।। कृपादृष्टीचा महिमा । वर्णूं न शके चतुर्मुख ब्रह्मा । शब्द खटाटोप रिकामा । अनुभवेंचि जाणावें ।।५६।। आनंदांतील शुद्ध कंद । तो हा सद्गुरुप्रसाद । समरसें होवोनि धुंद । मायामोहीं गवसेना ।।५७।। असो उत्साह चालिला थोर । समुदाय लोटला फार । रामनामध्वनीनें नगर । सर्वही दुमदुमलें ।।५८।। दोनशें माणसांचें अन्न । शतशः पात्रें उठलीं जाण । परि ते वेळीं आठवण । कोणासीच न झाली ।।५९।। जितुके लोक दर्शना येती । तितुकें प्रसादा सेविती । चक्रावळीनें पंक्ती उठती । वारंवार कित्येक ।।६०।। गणपतराव रामदासी । यांचे निमित्तें आम्हांसी । दर्शन घडलें चरणासी । धन्य धन्य गुरुपद ।।६१।। बाजारीं नारळ मिळेना । म्हणती पत्रावळी ना ना । यावरोनि

१ तयारी. २ एक प्रकारचा ढोल. ३ संशय.

पहाना । किती समुदाय लोटला ।।६२।। रोगग्रस्तां नाहीं मिती । भुतें त्रस्त किती जमती । साधुदर्शना भाविक येती । बैसाया ठाव मिळेना ।।६३।। इतुकियांचें करिती समाधान । सकळां देती भोजन । लहानथोर समसमान । मधुरभाषणें शांतविती ।।६४।। खेड्याचें शहर बनलें । जागोजागीं थवे बैसले । संतमाहात्म्य आगळें । अभाग्यासी उमजेना ।।६५।। शके अठराशें एकतीस । सौम्यनाम संवत्सरास । शुद्ध पक्ष आषाढ मास । दिनशुद्धि पाहिली ।।६६।। मघा पंचमी सुप्रभातीं । बुधवारी मिथुनावरती । स्वहस्तें स्थापिला मारुति । सद्गुरूंनीं कागवाडीं ।।६७।। दुसरें दिवशी गुरुवार । गुरुभक्तां शुभ फार । तेव्हां अनुग्रह केला मजवर । पतिता हातीं धरियेलें ।।६८।। अनंत सुकृतें फळां आलीं । चुकली माय भेटली । बोधामृत श्रवणीं घाली । धन्य सुदिन आयुष्यीं ।।६९।। निर्धना दाविलें धन । आंधळ्या दिधलें नयन । मृता करविलें अमृतपान । आनंद काय सांगावा ।।७०।। विश्वबंधुत्व मिळालें । समर्थ पाठिराखे झाले । धन्य भाग्य उदेलें । सेवक मी समर्थांचा ।।७१।। असो ऐसे कागवाडासी । ब्रह्मचैतन्य हनुमदंशी। सद्गुरु भेटले आम्हांसी । पुढील कथा अवधारा ।।७२।। चार दिवसपर्यंत । सोहळा झाला अद्भुत । श्रवण करा सावचित्त । श्रोते तुम्ही गुणभोक्ते ।।७३।। अवगुणांतें त्यजोनी । सद्गुणांतें शोधोनि । गुरुलीला ही म्हणोनि । अव्हेर न करावा ।।७४।। पुढील समासीं निरूपण । कागवाडीं श्रीज्ञानघन । बहुत चमत्कार दावोन । उपासना वाढविती ।।७५।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते एकादशाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## समास दुसरा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। ॐ नमो सद्गुरुराया । भीति दाविते मज माया । यास्तव धरिले पायां । दासउपेक्षा न करावी ।।१।। ज्ञान अज्ञान कळेना । वरी पाहतां न ये अनुमाना । कागवाड क्षेत्रामाजीं पहा ना । महारीण उद्धरिली ।।२।। ती कथा आहे कैसी । श्रोते करिती प्रश्नासी । तरी परिसा सविस्तरेंसी । कथन करूं ।।३।। संताबाई नामेकरून । होती तेथें महारीण । नित्य मंदिरीं येवोन । झाडलोट करितसे ।।४।। महाराज श्रीगोंदवलेकर । कधीं ना पाहिले साचार । परि पुसे वारंवार। कधीं येती म्हणोन ।।५।। बुवा पुसती तियेसी । समर्थ येतां काय करिसी । महारीण वदे तयांसी । मरणमुक्ति मागेन ।।६।। जंव ते दिवस जवळीं आलें । तंव स्वल्प धन मेळविलें। शेजारियापाशीं दिलें । उत्तरकार्य करा म्हणे ।।७।। थट्टेवारी चालिली गोष्ट । तंव आली समर्थभेट । महारीण पावली नीट । समर्थचरणा वंदन करी ।।८।। विनीवतसे कर जोडोन । 'आतां सोडवां भवांतून। संचित होतें तें दारुण । भोगून सारिलें आजवरी ।।९।। कांहीं शेष उरला असेल । तरी दर्शनें विलया जाईल । तीर्थप्रसाद शमवील । संतमाहात्म्य अगाध ।।१०।। तीर्थप्रसाद देवोनी । निरोप द्यावा मजलागोनी । आतां सोडवीं ही जाचणी । मलिन देहाची' ।।११।। सद्गुरू मनीं संतोषले। चरणतीर्थ तियेसी दिलें । प्रसाद देवोनि कथिले । 'शीघ्र जाईं स्वस्थाना' ।।१२।। वारंवार घेवोन दर्शन । वदें 'पतिता केलें पावन । दीनदयाळु कृपाघन। येतें, लोभ असूं द्यावा' ।।१३।। गृहीं जावोन सकळांसी । निरोप मागे अति हर्षीं । मग 'राम' म्हणोन देहासी । सोडती झाली ।।१४।। महार आले सांगत । 'महारीण झाली मृत' । सद्गुरु वदती 'पुण्यशील बहुत । सांग संस्कार करावा

।।१५।। पूर्वजन्मार्जित तिजसी ज्ञान । परि संचित राहिलें दारुण । इहजन्मीं भोगिलें सारून । आतां मुक्त जाहली' ।।१६।। तिनें द्रव्य ठेविलें होतें । वरी दिधलें समर्थें । अन्नदानें सकळांतें । तृप्त केलें ।।१७।। असो सांगावया कारण । साधीभोळी महारीण । परि तिजसी असेल ज्ञान । हें स्वप्नींही नसे कवणाच्या ।।१८।। ज्ञानस्थिति सांभाळणें । किती कठीण देव जाणें । आम्ही अर्धशब्दज्ञानें । घरोघरीं बडबडतों ।।१९।। अप्पासाहेब पाटील थोर । श्रीगुरूंसी करुनी नमस्कार । वदती 'गृहीं चलावें सत्वर । आटींव दूध करविलें' ।।२०।। शुद्धभाव पाहोनि । श्रीगुरु गेले त्यांचे सदनीं । क्षीर असे कळशी भरोनी । समुदाय तरी तीन शतक ।।२१।। स्वहस्तें पात्रें भरोनी । सकलां पाजी गुरुजननी । अभिनव केली करणी । प्रसाद राहिला दोन शेर ।।२२।। जेथें होते राममंदिर । तेथें जवळींच असे विहीर । परि पाणी असे बहु क्षार । मुखीं कांहीं घालवेना ।।२३।। समर्थ वदती बुवांसी । 'श्रीउत्साहसमयासी । घेत जा जल पाकासी । राम गोडी आणील' ।।२४।। तेच क्षणीं गोसावी एक । रामेश्वरीं निघाला देख । मार्गीं तया आकस्मिक । दृष्टांत होय शंभूचा ।।२५।। 'येथून जवळीं कागवाड नगरीं । सद्गुरू ब्रह्मचैतन्य स्वारी । गंगा तया घालीं सत्वरीं । म्हणजे आम्हां पावेल' ।।२६।। यास्तव गोसावी तेथें । आला गंगा घालावयातें । त्यांतील गंगा घेऊन हस्तें । विहिरीमाजीं सोडिली ।।२७।। क्षार पाणी गोड झालें । मंदिरीं उपयोगा आलें । प्रत्यक्ष परमात्मा अवतरले । म्हणती सर्व ।।२८।। आत्मारामपंत कुळकर्णी । श्रींसी नेती स्वसदनीं । सद्भावें पद पूजोनी । फराळासी घालिती ।।२९।। तें समयीं मेळ्यांतील पदें । मुलें म्हणती आनंदें । सद्गुरु पुसती विनोदें । 'कोणी रचिलीं मज सांगा' ।।३०।। मुलें म्हणती 'गोपाळराव । फडके असे उपनांव । तयांनीं रचिलीं सर्व । श्रीचरणीं वहावया' ।।३१।।

श्रींनी नारळ काढोनी । दिधला बहु मोदानें । नेऊन द्या तयालागोनी । महाप्रसाद कवित्वाचा ।।३२।। तोचि प्रसाद ये समयीं । अर्पिलासे समर्थपायीं । तन्निमित्तें सेवा सर्वही । महाप्रसाद संतांचा ।।३३।। आप्पासाहेब कागवाडकर । मामासाहेब इनामदार । दोघेही नेती गुरुवर । स्वगृहीं भोजना ।।३४।। श्रीगुरु करविती पायस । वांटिती अन्य यातींस । जैन आणि लिंगाइतांस । त्यांचें हस्तें वाढविती ।।३५।। आपुला धर्म सोडूं नये । दुजियाचा धरूं नये । बोधिती सद्गुरु स्वयें । ध्यानीं धरा भाविकहो ।।३६।। असो ऐसा उत्साह थोर । होतां आनंदलें नगर । दर्शना येती असंख्य नर । गांवोगांवीचें ।।३७।। मुरारजी भाटे गिरणीवाले । भाविक श्रीमान गृहस्थ भले । श्रीगुरूंचे दर्शना आले । आनंदले मानसीं ।।३८।। प्रसाद व्हावा गिरणीवरी । ऐसें विनविती परोपरी । गुरु वदती ते अवसरीं । अवश्य येऊं म्हणोनि ।।३९।। परि अठरापगड यातींसी । बोलवावें प्रसादासी । जैन आणि लिंगायतासी । निराळा पाक करावा ।।४०।। हो जी म्हणोनि अंगीकारीलें । स्थान सर्व श्रृंगारिले । बल्लव चतुर आणिले। षड्रसान्नें करावया ।।४१।। ग्रामवासी समस्त जन । केलें तयां निमंत्रण । सद्भावें श्रींसी पूजोन। वस्त्रें अर्पिली बहुमोल ।।४२।। प्रेमें केलें गांवभोजन । पाहतां श्रीगुरु झालें प्रसन्न । आशीर्वाद देती 'संतान । होईल तुजसी' म्हणोनी ।।४३।। संतान नाहीं म्हणोनी । चिंता करीत होता मनीं । श्रींनी हें जाणोनी । कृपा केली तयावरी ।।४४।। पुढती तया पुत्र झाला । आशीर्वाद फळा आला । ऐसा सद्गुरु पावला । बहुतांसी ।।४५।। कगुडराय पुरातन । स्थान भुयारीं असे गहन । श्रीगुरु तेथें जाऊन । शालिग्राममूर्ति पाहती ।।४६।। आणि अंतर्भुयारांत । योगमार्गे सद्गुरु जात । योगी बैसलें ध्यानस्थ । म्हणोनि सांगती सकळांसी ।।४७।। आंत कोणी जाऊं पाहती । तरी भुंगे डसों धांवती । शोधूं जातां सद्गुरु वदती । ग्रामास घडेल अपाय ।।४८।। असो ऐशी गुरुमाउली । कागवाड क्षेत्रीं बहु

रमली । रामउपासना वाढविली । अनुग्रह देवोनिया ।।४९।। तेथून निघतां सकल आडवे पडती । वियोगें दुःखाश्रु ढाळिती । चार दिवस गृहाप्रति । विसरले होते ।।५०।। बोधून सकळां शांतविती । येऊं म्हणती शीघ्र पुढती । नामधारकापाशीं वसति । अहर्निश असे आमुची ।।५१।। असो नामाच्या गजरांत । निघते झालें श्रीगुरुनाथ । भक्त उगारग्रामीं घेऊन जात । अत्याग्रह करोनी ।।५२।। तेथून पुढें मिरजेसी । जातें झाले ज्ञानराशी । अनंत भक्त दर्शनासी । आजूबाजूचे धांवती ।।५३।। श्रोतीं आशंका घेतली । हीच भेटी सविस्तर वर्णिली । सद्गुरु जाती अनेक स्थळीं । उत्तर दक्षिण भागांत ।।५४।। साच प्रश्न बरवा केला । साग्र वर्णावी सद्गुरुलीला । परि शक्ति कैंची मानवाला । सद्गुरुलीला अगाध ।।५५।। काशीपासोन रामेश्वरीं । बारा वेळ पादचारी । फिरती झाली श्रीगुरुस्वारी । मार्गीं गांव कित्येक ।।५६।। जे गांवचें नांव घ्यावें । वदती आम्हां असे ठावें । बाळपणीं गेलो होतों स्वभावें । खाणाखुणा सांगती ।।५७।। प्रत्येक ठायीं परोपकार । कांहीं घडती चमत्कार । लिहितां ग्रंथ वाढेल फार । अशक्य असे आम्हांसी ।।५८।। येविषयीं एक दृष्टांत । आठविला तो कथितों येथ । त्यावरोन जाईल किंत । अशक्य दुर्लंघ्य म्हणोनी ।।५९।। बालपणी फिरतां मही । हल्याळग्रामीं पाहीं । गेले परि ठावठिकाणा नाहीं । कोण कोठील म्हणोनी ।।६०।। तेथें एका विप्रसुतासी । ज्वर भरला प्राणनाशी । सद्गुरू अकस्मात् त्या समयासी । भिक्षामिषें गृहीं गेले ।।६१।। माउली दिसे सचिंत । नयनीं अश्रुं ढाळित । द्रवले श्रीगुरुनाथ । वृत्तांत सर्व परिसला ।।६२।। शीघ्र जावोन गृहांत । मुलाकरवीं उदक हातांत । स्वयें घेवोनि निश्चिंत । रहा म्हणती तयासी ।।६३।। पुढें वासुदेवभट्ट नामेंकरोनी । ओळखीचे गृहस्थ होते कोणी । कथिती तयांलागोनी । 'घेतला ज्वर भोंगणें असे

।।६४।। विप्रपुत्र जगावा । गोसावी जातां नाहीं पर्वा । तुम्ही समाचार घेत जावा । भोगून सारूं ज्वरासी' ।।६५।। ऐसें झालें संभाषण । कांहीं दिवस गेले निघोन । भट्ट पुन्हां करिती प्रश्न । 'ज्वर केव्हा भोगितां' ।।६६।। 'हो, हो, विसरलों आम्हीं । बरी आठवण दिली तुम्हीं । एक खोली रिकामी । करोन द्यावी आम्हांसी' ।।६७।। अकरा दिवसपर्यंत । होते तेथें निद्रिस्त । ज्वरधुमारे बाहेर येत । कवाड बंद केलें असे ।।६८ ।। द्वादशदिनीं बाहेर निघोनी । पथ्य घाला म्हणती झणीं । येतों स्नान करोनी । भोग भोगूनि सारिला ।।६९।। नको म्हणतांही शीघ्र निघाले । विहिरींत जावोन बुडाले । वासुदेवभट्ट वरी राहिले । वाट पहात समर्थांची ।।७०।। बहुत काळ निघोन गेला । गोसावी वर नाहीं आला । म्हणती बाळ बुडूनि मेला । आता कैसें करावें ।।७१।। बोलाविती ग्रामाधिकारी । तंव वरी बैसली स्वारी । आश्चर्य मानिती सारीं । चरणां वंदू लागले ।।७२।। बहुत लोक दर्शना येती । उपाधि नको साधकस्थितीं । म्हणोन शीघ्र निघोन जाती । ध्यास लागला सकळांसी ।।७३।। कांहीं दिवस गेलियावर । दामूबुवा कुरवलीकर । कीर्तनाचा करीत गजर । सहज गेले हल्ल्याळी ।।७४।। सद्गुरूंची वर्णिता किर्ति । वासुदेवभट्ट वंदोनि विनविती । दर्शना न्यावें आम्हांप्रति । अनुग्रहाची इच्छा असे ।।७५।। मार्गीं कथिली मागील कथा । ऐसा साधु नाहीं आतां । थकलो आम्हीं तया शोधितां । मंद भाग्य आमुचें ।।७६।। उभयतां गोंदावलीं आले । श्रींचे चरण वंदिले । तंव श्रीगुरूंनी आलिंगिलें । वासुदेवभट्ट म्हणोनी ।।७७।। इकडे कोणीकडे आलां । प्रपंच करोनी भागला । गृहवृत्तांत पुशिला । सर्व कुशल असती ना ।।७८।। पूर्वीं पाहिली सिद्धमूर्ति । तीच दिसे डोळ्यांपुढती । नयनीं आनंदाश्रु येतीं । चरण न्हाणिती श्रीगुरूंचे ।।७९।। असो ऐसे बालपणीं । बहुत फिरले जें अवनी । लिहितां न

पुरे लेखणी। श्रोती रोष न करावा ।।८०।। स्वल्प काळ राहिले घरीं । बहुतेक फिरती दिशा चारी । जगदुद्धारक अवतारी । सिद्धपुरुष ।।८१।। कागवाड येथील स्थिति । म्यां पाहिली प्रत्यक्षरीती । यास्तव कथिली तुम्हांप्रति। गुरुकथा रसाळ ।।८२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते एकादशाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास तिसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। या उपरी श्रीगुरुनाथ । गोंदावलें ग्रामींच राहत । श्वासविकार वाढला अत्यंत । शक्ति क्षीण जाहली ।।१।। परि असती ते विदेही । देहसंबंध तयां नाहीं । वस्त्रापरी ठेविती पाहीं । केव्हां दूर केव्हां जवळी ।।२।। याचें पहा प्रत्यंतर । श्वास उठतां अनिवार । सकळां वाटे भय फार । केव्हां काय होईल ।।३।। परि कोणी येतां परस्थ । श्वास जाय विलयाप्रत । शांतपणें समाचार पुसत । आश्चर्य वाटे सकळांसी ।।४।। चार दोन दिवसांवरी । न बैसतां घोड्यावरी । घोडा दंगा करी भारी । जवळीं कोणा येऊं न दे ।।५।। समर्थसेवा नाहीं घडली। म्हणजे घोडाही खिंकाळी । आम्हां मानवा भूल पडली । सेवासुख समजेना ।।६।। असो श्वाससमयासी। दमवोन आणिती वारूसी । कार्यसमयीं व्याधीसी । कोण पुसे ।।७।। जनांसी मात्र उपदेशिती । 'चंचल जाय विलयाप्रती । निश्चळ ओळखोन धरा चित्तीं। शाश्वत एक गुरुपद ।।८।। कोण वेळ कैसी स्थिति। येईल हें न कळे पुढतीं । यास्तव साधक हो शीघ्रगती । शंका निरसा प्रश्नोतरें ।।९।। कलि

वाढला दुर्धर । साधु न राहती देहें स्थिर । याकारणे श्रीरघुवीर । आपुलासा करावा' ।।१०।। वरचेवरी कथिती ऐसें । परि मायेनें लाविलें पिसें । आम्ही आळसी जैसे तैसे । माय मात्र कळवळे ।।११।। असो ऐसी देहस्थिति । परि अखंड रामभक्ति । बहुतांचा उद्धार करिती । रामनाम बोधोनी ।।१२।। भक्तकार्यार्थ सोलापुरीं । एकदां गेली श्रींची स्वारी । परतोन येतां माघारी । दृष्टांत होय विठूचा ।।१३।। 'बडवे पूजारी कळी[१] केली । माझी महापूजा राहिली । भक्त तुम्ही महाबळी । येवोन कलह तोडावा' ।।१४।। कुर्डूवाडीहून फिरले । शीघ्र पंढरीस आले । विठ्ठलचरण वंदिले । देव भक्त महासखे ।।१५।। तंव इकडे प्रकार घडला । तंटा सरकारांत गेला । त्यांनीं समर्थां लखोटा लिहिला । तोही पावला त्याच वेळीं ।।१६।। 'गृहकलह तोडावा तुम्हीं । आम्ही असों परधर्मी । साधुशिरोमणी ये कामीं। न्याय कराल तो सत्य' ।।१७।। श्रीहरीचा हुकूम झाला । सरकारचा लखोटा आला । मग आरंभिले कार्याला । तंट्याचें मूळ शोधिलें ।।१८।। देवांचीं वस्त्रें भूषणें । यांजसंबंधीं तंटाभांडणें । येकासी येक घेतलीं म्हणें । कलह थोर मातला ।।१९।। श्रीगुरूंनीं मोजदाद केली । उभयतांची समजूत घातली । महापूजा चालूं केली । सकळां आनंद वाटला ।।२०।। तेथें आणिक थोडे दिवस । राहिले ते समयास । क्षेत्रमहिमा सांगती विशेष । ऐसा नामगजर नाहीं अन्यत्र ।।२१।। पुंडलीकें उपकार केलें। वैकुंठींचें निधान आणिलें । विटेवरी उभे ठेले । भक्तकार्यार्थ रघुनाथ ।।२२।। उत्तरे क्षेत्र वाराणशी । दक्षिणे पंढरी अघनाशी । तीर्थें पुनीत व्हावयासी । सकल येती या ठायीं ।।२३।। पंढरीक्षेत्रीं राहोनी। बोधिती बहुत अज्ञानी । रामभक्तीसी लावोनी । उद्धरिले अज्ञ जन ।।२४।। पुन्हा

१ कलह, भांडण.

परतोन गोंदवलीसी । येते झाले ज्ञानराशी । आनंद नारीनरांसी । ग्रामस्थ जाती सामोरे ।।२५।। धन्य गोंदवलीचे जन । नित्य घडे गुरुदर्शन । नानाव्याधींचे निरसन । गुरुप्रसादें होतसे ।।२६।। कोणी अडचणींत गवसला । विनवी गुरुराजयाला । साह्य करिती तयाला । अर्थबोधेंकरोनी ।।२७।। व्यापार वाढला गहन । देशोदेशींचे विद्वज्जन । भेटती स्वयें येवोन । कुग्राम कोण म्हणे तया ।।२८।। श्रीराममंदिराप्रति । अन्नदाना नसे मिति । आणिक मजूर किती खाती । अठरा कारखाने ।।२९।। दरसाल नवीन इमारती । विहिरी किती खोदिती । अखंड चाले वाहती। समुदाय येत जातसे ।।३०।। असो गोंदवल्याचे लोकां । मायबाप सद्गुरु सखा । तैसाचि इतरां भाविकां । कल्पतरु गुरु माझा ।।३१।। श्रीमंत ज्ञानी बहु असती । परि परदुःखा नेणती । परदुःखा जे निवविती । तेचि होती जगीं वंद्य ।।३२।। आपुलें आपण खादलें । यांत काय हातां आलें । देवें जरी ऐसें केलें । तरी काय माती खाती ।।३३।। असो आमुची गुरुमाउली । बहुतां आश्रयो झाली । क्षेत्र केलें गोंदावली । भूवैकूंठ ।।२४।। स्वयें घालोन लंगोटी । बहुतांची राखिली पाठी । विश्वकुटुंबी होऊन शेवटीं । अलिप्तचि राहिले ।।३५।। घरची सर्वही शेती । वाहिली रामचरणाप्रति । खरेदी घेवोनि वरती । रामसेवेसी लाविली ।।३६।। श्रीराममंदिरें दोन । तैसींच शिवालयें जाण । दत्त शनि देवस्थान । संस्थान स्थापिलें ।।३७।। पंच नेमून तयावरी । व्यवस्था आंखोन दिली सारी । आल्यागेल्यासी भाकरी । अवश्य म्हणती घालावी ।।३८।। वरचेवरी सांगती । आम्ही जाऊं आपले पंथी । तुम्ही शीघ्र जोडा रामभक्ति । नातरी पश्चात् ताप पावाल ।।३९।। परि कोणा खरें न वाटे । मायापटल आलें मोठें । विनोदें वदती ऐसें वाटे । हास्यमुखावरोनी ।।४०।। असो शके अठराशें पसतीसांत । रामनवमी झाली प्राप्त । आज्ञापत्रें धाडोनि बहुत । शिष्यसमुदाय मेळविला ।।४१।। मार्गशीर्षीं नित्यनेमीं । दर्शना गेलों होतों आम्ही ।

'अगत्य यावें रामनवमीं' । आज्ञा ऐसी जाहली ।।४२।। 'पुढती वेळ कैसी येईल । नैमिषवनीं जाणें घडेल । भेटी होईल न होईल । नवमी येण्या विसरूं नये' ।।४३।। काय मायेचा जिव्हाळा । आतां आम्हां आठवला । ते समयीं विनोद भासला । मायामोहें ।।४४।। असो रामनवमीसी । गेलों आम्ही आज्ञा जैसी । तेंचि दर्शन आम्हांसी । अखेरचें जाहलें ।।४५।। श्रीरामनवरात्र । अखंड चाले नामसत्र । समुदाय भरला सर्वत्र । उतराया ठाव मिळेना ।।४६।। चहूं देशींचे लोक येती । भाषाभेद चालीरीती । ध्येय एक गुरुमूर्ति । गुरुबंधू एकवटले ।।४७। शास्त्री वैदिक आणि भट । साहेब पंत कवि भाट । भिषग्रत्नें कुणबी अफाट । नरनारी किती जमले ।।४८।। ताशे चौघडे वाजती । रामनामें भक्त गर्जती । भजनी दिंड्या अभंग गाती । उत्सव अपूर्व चालिला ।।४९।। हरिदास करिती कीर्तन । कोणी वाचिती पुराण । कोणी अध्यात्मविवेचन । करिती प्रेमसंवाद ।।५०।। सद्गुरुपूजा सकळ करिती । अपूप नैवेद्य दाविती । चरणतीर्थ आदरें घेती । अनन्यभक्तीनें ।।५१।। कोणी सुवासिक उटणें । लावोनि न्हाणिलें पंचामृतानें । कफनी टोपी ऊर्णावसनें । अर्पिती कोणी गुरूंसी ।।५२।। यथाशक्ति धनराशी । कोणी अर्पिती गुरूंसी । यात्रा भरली भरती जैशी । रत्नाकरा चंद्रोदयीं ।।५३।। रामजन्मसमयास । दोन्ही मंदिरीं दाटी विशेष । यास्तव सद्गुरु परेश । धर्मशाळेंत बैसलें ।।५४।। तेथेंच जन्मोत्सव करिती । भक्त तेथें सीतापति । तीन ठायीं पाळणे हलती । सद्गुरुगृहीं ।।५५।। परस्थांची मंदिरीं वसति । ही नेहमींचीच पद्धती । नवमीचे पारण्याप्रती । गांवभोजन घातलें ।।५६।। रात्रौ निघाली मिरवणूक । शिबिके बैसले रघुनायक । श्रींसी रथीं बैसवोनि देख । अत्यानंदें चालिले ।।५७।। सर्वान्तरीं उत्साह भरला । ऐसा महोत्साह जाहला । सद्गुरुराजा शोभला । अयोध्ये जैसा

श्रीराम ।।५८।। काही दिवसांउपरांतीं। अप्पाबुवा[१] श्रींसी वदती । 'आम्हीं जाऊं आतां पुढती । दादा आज्ञा असावी' ।।५९।। अप्पानें ऐसा देह त्यागिला । संत जाणती संतलीला । श्रीगुरु निघाले पंढरीला । समुदायासमवेत ।।६०।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते एकादशाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास चवथा***

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। श्रीराममंदिरांत । राहिले सद्गुरु समर्थ । दिवसेंदिवस क्षीण दिसत । सगुण देह ।।१।। परि सर्वही व्यापार । अखंड चालिले अनिवार । विदेही श्रीगुरुवर । देहबंधन तयां कैचें ।।२।। गुरुपौर्णिमा समीप आली । भक्तमंडळी येऊं लागली । इकडे आषाढी यात्रा भरली । पंढरीक्षेत्रांत ।।३।। गुरुपूजा करावयासी । बहुतेक येती ते समयासी । उत्साह चालिला अहर्निशीं । श्रीराममंदिरात ।।४।। अनंत संत श्रीगुरूंसी । भेटों येती आदरेंसी । महाप्रसाद प्रतिदिवशीं । संतांगृहीं होतसे ।।५।। सद्गुरूही समस्तांसी । मंदिरीं नेती भोजनासी। विठ्ठलकृपाछायेसी । संत भेटती आनंदें ।।६।। नाम-रूप-भक्तियोग । कोण साधनीं कैसा लाग । जीवशिव विवेक वैराग्य । नित्य संवाद चालती ।।७।। तुकारामबुवा वलव्हणकर । हे वदती रूप थोर । गुरु वदती नाम थोर । साधन आन तुळेना ।।८।। संवाद चालिला अतिशय । श्रवणीं संतसमुदाय । नामरूपीं श्रेष्ठ ध्येय । विवेचन चालिलें ।।९।। वेदशास्त्र संतवचनें । काढून दाविती प्रमाणें । नाम श्रेष्ठ सद्गुरूंनीं । सिद्ध



**१ या नांवाचा मराठा जातीचा एक नग्न योगी गोंदवल्यास होता, तो. श्रीमहाराजांना तो 'दादा' म्हणत असे.**

करोनि दाविलें ।।१०।। मायोद्भवीं अक्षर ब्रह्म । सूक्ष्म भूतांचा कर्दम । अष्टधें रूपाचा उगम । साकारला दिसे ।।११।। वेदांत सिद्धांत धादांत । दावोनि निरसिला किंत । परमात्मा नामरूपातीत । नामस्मरणीं आतुडे ।।१२।। सर्वांची समजूत घातली । बुवांची संमति घेतली । भक्तमांदी मिळाली । तो सोहळा अपूर्व ।।१३।। नामगर्जना करोनी । श्रींचे चरण वंदोनी । भक्त गेले स्वसदनीं । संतमहिमा वर्णित ।।१४।। बहुत शिष्य तेथें आले । ब्रह्मानंद साधु भले । भागवतांसी बोलाविलें । आणिक बहुतेक ।।१५।। तैसेंच बहुत शिष्यांप्रति । ज्या त्यापरी उपदेशिती । ब्रह्मानंद भेटी एकांतीं । घेते झाले ते समयीं ।।१६।। बहुत वेळ बोलणें झालें । एकांतीं जावों नये भलें । महाप्रस्थान निवेदिलें । ऐसें वाटे ।।१७।। जें न देखे रवि । तें पाहे सुज्ञ कवि । ऐसें सद्गुरु गोसावी । वदलें तें आठवलें ।।१८।। एकांतीं प्रयाणाचा । विचार कळला श्रीगुरूंचा । लेश न दाविती दुःखाचा । पूर्ण ज्ञानी ब्रह्मानंद ।।१९।। असो पंढरीवास केला । बहुत काळ सोहळा झाला । शिष्यांसमवेत खंडाळीला । गुरुमहाराज निघाले ।।२०।। वझे नामें मामलेदार । विनवणी करिती फार । याकारणें गुरुवर । खंडाळीवरूनि चालिले ।।२१।। तेथेंहि बहु उपदेशिती । सकळांसी आनंदविती । धन्य साधूची संगती। पुण्यें पुण्य दुणावें ।।२२।। वाकरीकर लक्ष्मणबुवा । यांची पुण्यतिथी तेव्हां । आली, यास्तव शिष्य गांवा । श्रींसी नेत वाकरीं ।।२३।। सिद्धांचें समाधिस्थान । तेथें कथिलें संतवर्णन । सकलां आनंद देवोन । रामनाम बोधिलें ।।२४।। जेथें जाती श्रीगुरुराव । तेथें आनंद महोत्साव । सकलां वाटे देवाधिदेव । अवतरले मृत्युलोकीं ।।२५।। नास्तिक दुरोनि निंदिती । परि दर्शन घडतां नम्र होती । ऐशी गुरूंची तेजदीप्ति । लखलखीत सोज्ज्वळ ।।२६।। गुप्त हेर परीक्षूं येती । तेचि चरणीं लीन होती । धन्य सज्जनसंगति । दुर्बुद्धी तेथें न रिघे ।।२७।। जरी बळें झटों आली । तरी मीलनें लीन झाली । गंगा

बुडवाया निघाली । सागरा जैशी ।।२८।। असो वाकरीहून निघाले । ते गोंदावलीस आले । नागरिकांसी आनंदविलें । वियोग बहुत दिवसांचा ।।२९।। तंव विनविती कुरवलीकर । दामोदरबुवा भक्त थोर । 'पहावया राममंदिर । कुरवलीसी चलावें ।।३०।। आपुली आज्ञा प्रमाण । मंदिर बांधिलें शोभायमान । तरी लागावे श्रीगुरुचरण । इच्छा एवढी पुरवावी' ।।३१।। भाव पाहोन रुकार दिला । सकलां वदती जाऊं चला । सिद्धस्थान पहावयाला । शंभुक्षेत्रीं ।।३२।। सकलांसमवेत निघाले । कुरवलीसमीप आले । नगरवासी सामोरे धांवले । सद्गुरूंसी आणावया ।।३३।। वेशीपासून मंदिरापर्यंत। सडे रांगोळ्या शोभत । ओवाळिती स्त्रिया समस्त । ठायीं ठायीं श्रीगुरूंसी ।।३४।। गुलाल बुक्का उधळिती । 'रघुवीर समर्थ' गर्जती । मिरवणूक आली मंदिराप्रति । समर्थ सद्गुरूंची ।।३५।। असो चार दिवसपर्यंत । उत्साह झाला अदभुत । दामोदरबुवा जागती सतत । न्यून नसावें सेवेसी ।।३६।। सकलां आनंद देवोनी । स्वारी निघाली स्वसदनीं । शिष्य समस्त बोलावूनी । आज्ञापिती ते वेळीं ।।३७।। आपआपले ग्रामासी । जावें ये समयासी । आम्हीं जाऊं गोंदावलीसी । पुढती यावें दर्शना ।।३८।। आधीं पंढरीहून धाडिले । उरलेसुरले येथें जमलें । येथूनही पाठविले । बहुत जन ।।३९।। नित्य जवळीं ज्यांची वसति । तयासी कार्यें सांगती । दूरदेशीं पाठविती । इच्छा श्रीसमर्थांची ।।४०।। असो कांहीं लोकां घेवोनी । शीघ्र आले गोंदवलेंभुवनीं । श्रीरामचरण वंदोनी । भेटती महारुद्रासी ।।४१।। नागोबाची जत्रा आली । म्हणोन स्वारी निघाली । धेनू सोडवून ते काळीं । 'अखेर सेवा ही' वदती ।।४२।। आणीक एक बैल तेथें । विकत घेतला गुरुनाथें । लोक विनविती तयातें । 'वृषभ तुम्हीं न घ्यावा ।।४३।। हा बहुत खोडगुणी । जेथें जाई तेथें हानि । यास्तव श्रीसमर्थांनी । याचा स्वीकार न करावा' ।।४४।। समर्थ वदती 'अति उत्तम । गरिबासी कष्टवी हा परम । आम्ही गोसावी निष्काम ।

हानि होतां दुःख नसे' ।।४५।। ऐसे म्हणोनि बैल घेतला । म्हणती आमचे उपयोगा आला । ज्ञानचक्षु सद्गुरु भला । करणी करील अघटित ।।४६।। दिवाणसाहेब नामें एक । म्हसवडीं होते सांप्रदायिक । तयांसी वदती सकौतुक । 'भेट हीच अखेरची' ।।४७।। असो म्हसवडाहून निघाले । शीघ्र गोंदावलीं आले । सकळांलागीं उपदेशिलें । 'रामनाम विसरूं नये ।।४८।। आमुची जागा खाली पडली । रामप्रभूची चिठी आली । आनंदे निरोप द्या सकळीं' । हास्यमुखें बोलती ।।४९।। सकळां वाटे हें सहज। विनोदें बोलती गुरुराज । अज्ञानी नेणती काज । समर्थ जाती स्वस्थानीं ।।५०।। तृणाच्या गंज्या घेतल्या । गार्यींस गोठणीं घातल्या । गुरुआश्रयें शोभल्या । गोकुळी जैशा ।।५१।। शके अठराशेंपस्तीस । मार्गशीर्ष कृष्णपक्ष । भानुवासरीं नवमीस । समर्थकार्यें परिसावीं ।।५२।। काळे नामें शाळाधिकारी । उतरले मारुतीमंदिरीं । समर्थांसी नेवोन घरीं । महानैवेद्य समर्पिला ।।५३।। भाऊसाहेब केतकर । होते पंक्तीस बरोबर । समर्थ वदती चिंतातुर । 'काय इच्छा सांगावी' ।।५४।। साहेब विनविती समर्थांसी। देह पडावा चरणापाशीं । येवढीच इच्छा आम्हांसी । आळी[१] समर्थे पुरवावी' ।।५५।। समर्थ वदती 'ऐसे कांहीं । होणेंचा योग नाहीं । जाणें आम्हा लवलाहीं । तुम्ही पुढती याल' ।।५६।। ऐसें वदोन मंदिरीं आले । खोलींत जावोनी बैसले । तंव बाहेर भांडू लागले । अंताजीपंत आणि काका ।।५७।। समर्थे दोघां बोलावूनि । 'कां झगडा रामसदनीं' । वदतां करिती विनवणी । 'आपण नसतां ऐसें होतें' ।।५८।। समर्थ वदती सकौतुक । 'आम्ही कोठें उदईक । असेल तें मानोनि सुख । रामप्रसाद सेवावा' ।।५९।। आऊताईस बोलाविती । म्हणती 'सांगा सकलांप्रति ।

१ तीव्र इच्छा.

भात गेला गांवाप्रती। भाजीभाकर सुखें खावी'।।६०।। असो सायंकाळसमयास। स्वारी आली गोशाळेस। बैसोन सुखासनास।म्हणती 'हें स्थान रम्य पवित्र।।६१।। येथें जागा सारवावी। रांगोळी सुंदर घालावी'। तैसें करवून भक्तांकरवी । वरी आपण बैसलें ।।६२।। भवानरावासी पाचारिलें । 'येथें गाईंचें गवत पडलें। उदईक येऊं तों वहिलें । तुम्ही रहा वसतीसी' ।।६३।। तैसेंचि गोशाळेचे कारकून। तयां खडावा देऊन । 'आम्ही येऊं तोंवरी जतन । करीत येथें बैसावें' ।।६४।। ऐसें वदोन सत्वर । मंदिरी आले गुरुवर । आप्पा नामें जरंडीकर । पाचारिलें तयासी ।।६५।। 'काय निमित्त उपोषण । केलें तुम्हीं दिवस तीन' । आप्पा वदे 'समर्थांलागोन । प्रकृतीस स्वास्थ्य असावें' ।।६६।। समर्थ वदती ते अवसरीं। 'माझी प्रकृती उदईक बरी । होईल, तूं चिंता न करीं' । आग्रहे भोजना बैसविती ।।६७।। असो रात्रीं भजन अति केलें । निर्वाण अभंग गाइले । भक्त उदासीन झाले । संशय वाटे सकळांसी ।।६८।। रात्रीं करोन प्रेमळ भजन । उपदेशिती सकळांलागोन । 'सतत करा नामस्मरण। गुरुवचनीं भाव धरा ।।६९।। नामपाठ ज्याचे वैखरी । नित्य आम्ही त्याचे अंतरीं । सदा साह्य श्रीहरी। विश्वास धरा निश्चयें' ।।७०।। ऐसा करोनि उपदेश । आळविले अयोध्याधीश । अश्रु आले नयनास। श्रीरामप्रभूच्या ।।७१।। तें देव-भक्तांचें प्रेम । कोण वर्णिल निरुपम । अवाप्तकामासी सकाम । व्हावया लाविती भक्त ।।७२।। बहुतांपरी सगुण भजन । करोनि केलें शयन । शिष्य समस्त उद्विग्न । गति बरवी दिसेना ।।७३।। पहांटे पांच घटीसी । करिती शौचमुखमार्जनासी । श्रीगुरु वदती अम्मासी । 'आजची सेवा अखेरची' ।।७४।। राममंदिरी जावोनीं । पुढती आसन घालोनी । सकलां वदती 'उच्च स्वरांनीं । भजन करावें' ।।७५।। भजन कराया लावोन । समाधि लाविली आपण । ब्रह्मांडभेद करोन। ज्योत मिळविली रामरूपीं ।।७६।। दुःखाचा कडेलोट झाला । येकमेकांचे पडती गळां। वंदन करिती

वेळोवेळां । श्रीगुरुचरणांसी ।।७७।। 'आम्हां अर्भकां टाकोन । कां बैसलांत रुसोन । कृपा करोन सोडा मौन । प्रेमसंभाषण करावें ।।७८।। आम्ही बालकें अज्ञान । तूं माय सदय सघन । आम्ही अनंत अपराधी दीन । कोठे जासी त्यजोनी ।।७९।। काय आमुचें दुर्भाग्य । गुरुचरणांचा वियोग । घडला, आतां तगमग । वारील कोण' ।।८०।। असो ऐसा बहुत शोक । करिते झाले सकळ लोक । प्रेम जिव्हाळा आत्यंतिक । गुरुमायेचा ।।८१।। आज ब्रह्मानंद असते जरी । तरी व्यवस्था करिते सारी । शिष्य तेचि अधिकारी । म्हणती सर्व ।।८२।। ते येईपर्यंत । देह ठेवावा तीन रात । ऐसें ठरोनि एकमत । तारा धाडिल्या चहुंकडे ।।८३।। परि त्यांचा पत्ता नाहीं । पूर्वींच ठरलें सर्वही । प्रत्युत्तर न ये कोठेंही । मग चिंता प्रवर्तली ।।८४।। ते दिवशीं ग्रामस्थांनीं । सकल कर्मे सांडोनी । सद्गुरुसन्निध उपोषणीं । राहिले अश्रु ढाळित ।।८५।। आणिक नित्य यात्रे येती । तयांसी अडथळे मार्गावरती । नाना प्रकारें होऊनी राहती । इच्छा श्रीसमर्थांची ।।८६।। परस्थ कोणी येत नाहीं । देह पल्लवीं ठेविला पाहीं । दृश्य दृश्यत्वें जाय विलयीं । यास्तव दहन करावें ।।८७।। एकादशीस ऐसा विचार । ठरला सर्वानुमतें साचार । तंव नवमीचा प्रकार । आठवला तेसमयीं ।।८८।। गोठणीं भवानराव यासी । कथिलें येईन वसतीसी । तैसेंचि देती पादुकांसी । पंतोजीजवळी ।।८९।। स्थान सारवोन स्वच्छ केलें । रांगोळ्या घालोन वरी बैसले । 'विश्रांती घ्यावया वहिलें । स्थान असे पवित्र' ।।९०।। ऐसें वदले तें आठवलें । म्हणोनि तेंचि दहनस्थान ठरविलें । विमान करोन श्रृंगारिलें । मूर्ति भीतरीं बैसविली ।।९१।। तेज फांकलें चहूं दिशीं । हनुमानरूपें भक्तांसी । दर्शन दिधलें ते समयासी । इतरां सतेज सचेतन ।।९२।। प्रचंड नामगजरांत । मिरवणूक आली गोठणाप्रत । पुनरपि स्थान शोभिवंत । केलें सडे घालोनी ।।९३।। गोमातेचें मूत्र । मुरोनि आधींच पवित्र । बहुत दिवस केलें क्षेत्र । सद्गुरुसमर्थांनीं

।।९४।। कर्पूर बिल्व आणि चंदन । तुळशीकाष्ठें केलें दहन । सगुणाकृति लया पावोन । जगदाकार जाहली ।।९५।। दृश्य दृश्यामाजीं दडलें । व्यापकत्वें जगतीं भरलें । निर्गुण आलें ना गेलें । अखंड भरलें गुरुरूप ।।९६।। भाविकांचे भावनेसाठीं सगुण साक्षात् देती भेटी । बहुतां दृष्टांतीं कथिती । 'आम्ही असों येथेंचि' ।।९७।। ज्ञानियां आले ना गेले । भाविकां अंतरीं भरले । अज्ञानियां दृश्य झाले । समाधिरूपें ।।९८।। असो गोंदवलीचें चैतन्य । अदृश्य जाहलें येथून । उत्तरचरित्र जें गहन । परिसा पुढील अध्यायीं ।।९९।। श्रींचा दासानुदास । कथितसे चरित्रास । निमित्तमात्र करूनि त्यास । त्याचा तोचि वदविता ।।१००।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।१०१।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते एकादशाध्यांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति एकादशोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय बारावा

## *समास पहिला*

**समाधी पहातां समाधान होतें । तनू कष्टवी त्यासि आनंद देते ।**
**मनीं भावितां कामना पूर्ण होती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।१२।।**

श्रीसद्‌गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जय जय सद्‌गुरु पूर्णब्रह्मा । विश्वचालका निष्कामा । विश्वात्मया चित्सुखधामा । निर्विकारा सद्वस्तु ।।१।। सजीव निर्जीव दोहीं ठायीं । अंतर्बाह्य व्यापून राहीं । अलिप्त अखंड भेद नाहीं । निराकारा निरुपमा ।।२।। प्रकृतिपुरुषांचा सोहळा । मायोद्भव ब्रह्मांडगोळा । अहंकार वासना जिव्हाळा । व्यापून वेगळा तूं येक ।।३।। आदि-मध्य-अंत-रहित । सर्वव्यापी सकळातीत । रंग-रूप-कल्पनातीत । सद्‌गुरुपद स्वयंप्रभ ।।४।। मनें शोधितां उन्मन झालें । बुद्धीचा निश्चय डळमळें । चित्त दृश्य चिंतूं लागलें । गुरुपद अदृश्य ।।५।। वेदशास्त्रें कशिली कंबर । उपनिषदें वदती आम्ही चतुर । शोधूं निघालीं परात्पर । ज्ञानमदेंकरोनी ।।६।। पूर्वपक्ष उत्तरपक्ष । करितां पडला शोष । अलक्षीं लावूं वदती लक्ष । परि सिद्धांत होईना ।।७।। शब्दजननी ओंकार । तेथेंचि ते जाहले स्थिर । एवं शब्दांचे विचार । शब्दब्रह्मीं मावळले ।।८।। वायूनें शोधितां आकाश । तो स्वयेंचि पावला नाश । तैसें शोधितां निःशब्दास । शब्द नाश पावले ।।९।। बर्फ बोले आपुली प्रौढी । सागरीं देवोनिया बुडी । आणीन मी रत्नें गाढीं । क्षण स्थिर रहावें ।।१०।। ऐसें वदोन

सागरीं गेला । तंव वरतीच तरंगोनि विराला । पुन्हां वार्ता सांगावयाला । आला नाहीं रत्नांची ।।११।। ऐशी स्वरूप-ओळखण । जवळीं असोन चुकले जन । ज्ञानाज्ञान द्वैतभान । गुंतले देवा ऐलीकडे ।।१२।। शाश्वतपद चित्तीं धरिलें । ज्यांचे द्वैतभान हरपलें । सद्‌गुरू भेटतांच जाहले । सद्‌गुरुरूप ।।१३।। निजस्वरूप ओळखण । तेंचि तुमचें कृपादान । सदा निकट सुप्रसन्न । परि पाहणें जड वाटे ।।१४।। पाहों जातां दूर नाहीं । विचार करितां दुजें नाहीं । मानीव पडळ[1] जीव कांहीं । मानिलें तें सोडीना ।।१५।। असत्याचा ऐसा स्वभाव । असत्य सामग्री हावभाव । असत्य काळ बोलणें वाव । असत्य असत्या जमवीतसे ।।१६।। जैसा नट नाट्यागारीं । असत्य क्रिया करी सारी । पुरुष असोनिया नारी । भासवोन मोही बहुतांसी ।।१७।। अमावास्यें चंद्रकिरण । चेतवी तयाचा मदन । रात्रीं प्रखर सूर्यकिरण । ताप देती तयासी ।।१८।। घराचें जाहलें रान । उजेडीं अंधार पडला दारुण। सभेसी तस्कर येवोन । चोरी करी येकांतीं ।।१९।। पाहणार मानिले पाषाण । म्हणे हें निर्मनुष्य कानन। कृत्रिम व्याघ्र येवोन । झडप घाली तयावरी ।।२०।। ऐसें असत्य कौतुक । जाणती सकळ प्रेक्षक । परि गोडी लागली अधिक । असत्य प्रिय असत्या ।।२१।। तैसें आम्हीं द्वैत मानिलें । अहंकारें वेगळें केलें । म्हणोनि अदृश्य जाहलें । तुमचें स्वरूप अज्ञानें ।।२२।। आतां हीच विनवणी । द्वैताची काढोन गवसणी । स्वस्वरूप दावीं झणीं । कृपाळुवा गुरुमूर्ते ।।२३।। कोसला कोंडी आपुला प्राण । स्वयेंचि कोश करोन। तैसें आम्हीं संसारबंधन । अनंतजन्मीं बांधिलें ।।२४।। सकळ व्यसनांमाजीं व्यसन । संसार हें महाव्यसन। सभाग्या दास करोन । दारोदार हिंडवितें ।।२५।। अन्य व्यसन सुटे एक जन्मीं । हें न सुटे जन्मोजन्मीं। इतरांची कांहीं काल ऊर्मी । याची ऊर्मी सुटेना ।।२६।। इतरां निंद्य

१ पटल, पडदा.

मानिती । यासी सभाग्यांमाजीं गणती। तेणें विशेष आसक्ती । चढते बंधन मानवा ।।२७।। ऐसें हें कोशबंधन । बांधिले सुखेच्छा धरून । परि शेवटीं कोंडोनि प्राण । इहपर नाश करील ।।२८।। पंचविषय देहासक्ति । ही संसारशब्दव्याप्ति । आणिक लक्षणें बहुत ग्रंथीं । बहुतां प्रकारें बोलिलीं ।।२९।। ऐसी संसारगवसणी । तीमाजीं कोंडले स्वतंत्र प्राणी । नरदेह छिद्रामधोनी । तुजला हांका मारितसे ।।३०।। धांवोन येईं सत्वरीं । अज्ञानग्रंथी मुक्त करीं । बाहेरी येवोन चरणांवरी । लोळेन सगुणसाक्षित्वें ।।३१।। भज्य भजक आणि भजन । हें सगुणींच लाभे धन । भक्तिसोहळा आनंदपूर्ण । अनंतजन्मीं भोगावा ।।३२।। परि व्हाया सगुणसेवा । मोकळी गा वासना गोवा । मग तो आनंदाचा मेवा । चाखितां रोगभय नाहीं ।।३३।। गुरुसेवा नाहीं घडली । बहुत शिष्यीं बहुत केली । आम्हां अल्पकाळींच मुकली । सगुणब्रह्म गुरुमूर्ति ।।३४।। अज्ञानियां अदृश्य झालें । भाविकां भावनेनें दिसलें । ज्ञानियां आलें ना गेलें । सद्गुरुपद शाश्वत ।।३५।। उपासकां उपासनेलागीं । समाधीरूप नटले योगी । अनंत कामना पुरविती वेगीं । साक्षात्कारें सेवका ।।३६।। ती कथा कैसी झाली । वदाल नाहीं परिसिली । तरी वंदोनि गुरुमाउली । गुरुप्रसाद कथन करूं ।।३७।। शके अठराशें पस्तीस । मार्गशीर्ष कृष्णपक्ष । नवम्योत्तर दशमीस । सतेज भानु मावळला ।।३८।। रविसोमसंधि वार । रविउदयापूर्वीं घडीभर । समाधिस्थ झाले गुरुवर । योगनिद्रा घेतली ।।३९।। ब्रह्मानंदांची वाट पाहिली । मग गोठणीं चिता सिद्ध केली । विमानीं मूर्ति बैसवली । पूजा आरत्या करोनी ।।४०।। रामनामगजर करिती । बुक्का सुमनें उधळिती । तुळशीमाळा कंठीं घालिती । नमन करिती वेळोवेळां ।।४१।। जेव्हां बलभीमरूप देखिलें ।। तेव्हां भक्त आनंदलें । शोक आल्हाद एके वेळे । नांदतसे गुरुक्षेत्रीं ।।४२।। एकादशी भौमवारीं । गोठणीं राहिली स्वारी । पंचभूतांची सामग्री । पंचभूतीं मेळविली ।।४३।।

केळीचे खुंट बांधिले । दहनस्थान सुशोभित केले । गोमयें सडे सिंचिले । रांगोळ्या गुलाल घालिती ।।४४।। आप्तसंबंधी श्रींचे । चुलतबंधु श्रीपती हस्तें त्यांचे । वेदोक्त अंत्यविधीचें । कार्य करविलें ।।४५।। चितेसी दिधला अग्न । तंव भवानराव नामेंकरून । भक्त होते भावसंपन्न । उडी घेऊं धांवती ।।४६।। बहुतीं तया आवरिला । दुःखाचा कडेलोट झाला । गोंदवल्याचा आत्मा गेला । सोडोनि आम्हां दीनांसी ।।४७।। चहूंदेशीं पसरली मात । धांवोन येती गुरुभक्त । अंतयोग किंनिमित्त । केला वदती गुरुरायें ।।४८।। अप्पासाहेब भडगांवकर । आले सोडून पंढरपूर । गुरुचरणीं भाव थोर । दुःखी अत्यंत जाहले ।।४९।। ते दिवसापासोनि । व्यवस्था सर्व केली त्यांनीं । यात्रा भरली गुरुभुवनीं । नामगजर अखंड ।।५०।। तिसरें दिवशी रक्षा भरणें । करिती सर्वही दुःखानें । आईसाहेब यांची कंकणें। निघालीं पूर्वींसारखीं ।।५१।। चतुर्दश दिनपर्यंत । अखंड नामगजर होत । अन्नसंतर्पण वेदोक्त । विधि सर्व सांग केला ।।५२।। समाधीचे तिसरे दिवशीं । कांहीं वैश्य तैलंगणदेशी । आले अनुग्रह घ्यावयासी । तों विपरित देखिलें ।।५३।। धाय मोकलोन रडों लागलें । 'संतसज्जनीं अव्हेरिलें' । आमुचें भाग्य नाहीं उदेलें । आतां आम्हां गति कैसी ।।५४।। आम्ही सत्य प्रारब्धहीन । माय गेली आम्हां त्यजून' । समजाविती समस्त जन । स्थिर रहा म्हणोनी ।।५५।। 'ब्रह्मानंद शीघ्र येतील । तुम्हां अनुग्रह करतील। गुरुरूप ज्ञाते सखोल । पूर्ण अधिकारी' ।।५६।। ऐसें तयांसी कथिलें । 'हो, जी' म्हणोनि राहिले । रात्रीं तेथें अभिनव घडलें । तें परिसा सज्जनहो ।।५७।। पहाटें सर्वांसी दृष्टांतीं । दर्शन देत गुरुमूर्ति । 'ब्रह्मानंद शीघ्र न येती । मीच देतों अनुग्रह' ।।५८।। संकल्प पूजा करवोन । अनुग्रह दिधला तयांलागोन । सर्वांचें आनंदलें मन । वारंवार वंदिती ।।५९।। तुमचा कार्यभाग झाला। जावें वदती स्वस्थानाला । तैसीच जपासाठीं माला । प्रत्यक्ष तेथें ठेविली ।।६०।। प्रातःकाळीं उठोन

वदती । 'आम्हीं देखिली गुरुमूर्ति' । एकमेकांसी तेंचि कथिती । 'मज अनुग्रह दिधला सद्‌गुरूंनी' ।।६१।। वृद्धा सांगे वृत्तांत । 'स्वप्नीं माळा मजप्रत । दिधली, ती पुढ्यांत । प्रत्यक्ष पाहोन आनंदती ।।६२।। ऐसा घडला चमत्कार । पाहों येती नारीनर । नमन करिती वारंवार । गुरुप्रसादमाळेसी ।।६३।। आणिक बहुतां दृष्टांत । जाहले 'मी येथें सत्य । मानूं नका मनीं किंत । भाव तैसा भेटेन ।।६४।। माझे आज्ञेनुसार चालतां । जवळचि असें मी सर्वथा । अज्ञानापरी शोक करितां । यास काय म्हणावें' ।।६५।। ऐसें बहुतां निरूपिलें । तेंचि आम्ही अनुभविलें । समाधी पाहतांच झालें । परम समाधान ।।६६।। संकटीं दृष्टांतें बोधिती । अपरोक्षपणें साह्य करिती । भाविकापाशीं नित्य वसति । सद्‌गुरुमहाराजांची ।।६७।। असो दहनाचे तिसरे दिवशी । काढोनी ठेविलें अस्थींसी । रक्षा माहुली संगमासी । न्यावया भरोनी ठेविली ।।६८।। इकडे लोकव्यवहारकारण । नित्य देती पिंडदान । मुक्तासी कैंचें बंधन । आधींच त्रैलोक्य जिंकिलें ।।६९।। परि समर्थांची शिकवण ऐसी । सिद्ध असोन साधनासी । आदरें करिती जिवानिशी । वदती व्यवहार न सांडावा ।।७०।। तोचि क्रम करिती येथ । क्रिया करिती वेदोक्त । दशमदिनीं भागवत । आले संत गुरुक्षेत्रीं ।।७१।। ज्ञानदाता पित्यासमान । बहुतीं मानूनियां जाण । ते दिनीं करिती मुंडण । मायबाप गुरुराव ।।७२।। ऐसा चतुर्दश दिनपर्यंत । उच्छाह केला अपूर्व बहुत। पादुका स्थापोन तेथ । उपासना चालविती ।।७३।। गोप्रदानें धनदानें । अन्नदानें, वस्त्रदानें । करिती विप्रांची पूजनें । गुरूरूप मानोनी ।।७४।। कोणी तेथें लोळण घेती । विभूति अंगीं लाविती । पूजाअर्चा समग्र करिती । कोणी घालिती प्रदक्षिणा ।।७५।। येणेंपरी गुरुमाऊली । समाधिरूप दृश्य नटली । अखंडत्वें असे भरली । अंतर्बाह्य व्यापक ।।७६।। आतां मागील व्यवस्था । पुढील समासीं येईल कथा । श्रोतीं स्थिर करोनी चित्ता । अमृतपान करावें ।।७७।।

**इति श्रीसद्‌गुरुलीलामृते द्वादशाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु।।**

## *समास दुसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। इकडे ब्रह्मानंदांनीं । गुरुआज्ञा आणोनी ध्यानीं । न येती गुरुसदनीं । तेथेंचि उच्छाह मांडिला ।।१।। व्यंकटापूर मंदिरांत । नामसप्ताह उभारित । दातृत्वासी नाहीं मित । याचक बहु तोषविले ।।२।। ते सिद्ध ज्ञानी विरक्त । परमप्रतापी गुरुपुत्र । वियोग न शिवे तेथ । अनन्य भक्त सच्छिष्य ।।३। गोप्रदानें धनदानें । नाना अन्नसंतर्पणें । नाना उपदेशवचनें । अनंत जीव शांतविती ।।४।। इकडे गोंदावल्याची स्थिति । परिसा चालली कैशा रीति । राम-दत्त-मंदिराप्रति । सेवा कैसी चालली ।।५।। समर्थें आधीं एक संवत्सर । यथाविधि नेमले मुखत्यार । जमिनी वांटल्या सत्वर । राम दत्त शनीकडे ।।६।। कांहीं जमीन कुटुंबासी । ठेविली असे निर्वाहासी । बाकी सर्व अधिकार पंचांसी । आपुलेपरी दिधले ।।७।। पंच परिसावे चतुर । ब्रह्मानंद भक्त थोर । आप्पासाहेब भडगांवकर । साठ्ये[१] आणि तात्याराव[२] ।।८।। थोरले राममंदिरांत । पुजारी गोपाळराव अद्वैत । धाकटे मंदिरीं मेहुण्याप्रत । रामसेवा सांगितली ।।९।। दत्त आणि श्रीशनीश्वर । येथील पूजाधिकार । बाळंभट्ट कुरवलीकर । यांसी दिधले गुरुरायें ।।१०।। नित्यनेम पूजाविधान । आल्या अतिथा अन्नदान । यथाशक्ति समर्पून । रामसंस्थान चालवावें ।।११।। ऐसी व्यवस्था गोंदावलीसी । पंचामार्फत केली खाशी । कोणी करील कुचराईसी । तरी दुजा नेमावा ।।१२।। जैसा देश तैसा वेश । म्हणोनि लेख विशेष । येरवीं त्रिकाळ सत्ताधीश । सद्गुरु अंतर्बाह्य ।।१३।। इकडे समाधिस्थानावरती । भवानराव व्यवस्था पाहती । जतन करोनि अस्थि । उपासना चालविली ।।१४।। अस्थि न्यावया

---

**१ श्री. बापुसाहेब साठ्ये. २ श्री. तात्याराव चपळगांवकर.**

प्रयागासी । मागों जातां तयांपासीं । न देती अहर्निशीं । प्राणापरी सांभाळिती ।।१५।। तंव ब्रह्मानंद यांनीं । पत्र दिधलें लिहोनी । 'हरिभाऊ हरिदास यांनीं । अस्थि न्याव्या प्रयागीं' ।।१६।। पत्र दावितां भवानरावांसी । निमूट देती अस्थींसी । घेऊन चालिले प्रयागासी । हरिभाऊ गुरुभक्त ।।१७।। पंतोजी येरळवाडीकर । हेही निघाले बरोबर । तंव पत्र देती जालनेकर । तोही प्रकार परिसावा ।।१८।। आनंदसागर महाभक्त । श्रींचे आधीं देह ठेवित । घेवोनि त्यांचे अस्थींप्रत । गंगास्नाना निघाले होते ।।१९।। मार्गीं हर्द्यासी महाराज- । दर्शना अनुज्ञें गेले सहज । तंव वदले सद्गुरुराज । 'अस्थि येथेंच ठेवाव्या ।।२०।। आम्ही जाऊं नंतरी । तेव्हां नेऊं गंगेउदरीं' । म्हणोनी कपाटाभीतरीं । स्वहस्तें अस्थि ठेविल्या ।।२१।। याउपरी समर्थ कांहीं । हर्द्यासी पुन्हां गेले नाहीं । योग दिसे ऐसाचि पाहीं । अस्थिसंगे अस्थि न्याव्या ।।२२।। समर्थ निघाले स्नानासी । मुक्काम जाहला हर्द्यासी । संगें घेवोनि सच्छिष्यासी । मार्ग क्रमिते झाले ।।२३।। जालना मठीचें पत्र आलें । तैसें हर्द्यासी उतरले । जेथें गुरुआज्ञें होते राहिले । भैय्यासाहेब इंदुरकर ।।२४।। मागें श्रीगुरु आज्ञापिती । 'आम्ही येऊं पुढती । तंववरी येथेंचि रहा निश्चितीं । रामसेवा करोनी' ।।२५।। अस्थिरूपें श्रीसमर्थ । आले ऐसा धरोनि हेत । तेही निघाले त्वरित । अस्थीसंगें इंदुरीं ।।२६।। विष्णुबुवा कुंभोजकर । हेही आले सत्वर । अस्थि घेऊन सपरिवार । त्रिवेणीसी चालिले ।।२७।। मसुरियादीन शिवमंगल । उपाध्यें श्रींचे तेथील। अस्थि घेऊन भक्तमंडळ । पावलें तया ठायीं ।।२८।। बाबूभट्ट काशीकर । पटाईत मावशी भाविक चतुर । आल्या ताई इंदुरकर । अस्थिविसर्जनाकारणें ।।२९।। आणिकहि भक्त बहुत येती । कांहीं केलीं उपपत्ती । नामगजरें दोन्हीं अस्थि । त्रिवेणीसंगमीं मेळविल्या ।।३०।। द्रव्यद्वारें गोप्रदानें । दिधलीं भक्त मंडळीनें । नानापरीनें स्तवनें । मुखीं गाती समर्थांचीं ।।३१।। असो हरिभक्त हरिदास

यांनीं । अस्थि विसर्जन करोनी । निघाले शीघ्र तेथोनी । गुरुभुवनीं यावया ।।३२।। इकडे माहुलीसंगमाप्रत । रक्षा पोंचवावी हा हेत । धरोनि निघाले भक्त । भडगांवकर आदिकरोनी ।।३३।। अण्णासाहेब घाणेकर। श्रीगुरूंचे भक्त थोर । बाबासाहेब दांडेकर । इत्यादि भक्त निघाले ।।३४।। माहुली पवित्र संगमस्थानीं । रक्षा दिधली सोडूनी । सवेंचि निघाले तेथूनी । सज्जनगडीं पावले ।।३५।। तेथील समर्थसमाधी । पहातां हरल्या मनोव्याधी । ऐसीचि श्रींची समाधी । बांधू ऐसें योजिती ।।३६।। दर्शन घेवोन परतले । मनीं चिंतिती पाउलें । बहुत उदासीन झालें । संतसंगतीवियोगें ।।३७।। प्रयाग माहुलीसी जन । आले कार्यें करून । मनीं ध्याती श्रीगुरुचरण । वियोगदुःख अनिवार ।।३८।। ब्रह्मानंद सच्छिष्य । आले रामनवमीस । उत्साह दहा दिवस । आनंदीआनंद बहु केला ।।३९।। बोध करूनि सकळांसी । वदती 'समर्थ नसती दूरदेशी । प्रगट गुप्त भेदासीं । दुजा भेद असेना ।।४०।। गुरुआज्ञा जे मानिती । वचनीं विश्वास ठेविती । साधनीं देह झिजविती । तयां पूर्वींसारखे ।।४१।। तयांसी घडे दर्शन । तयांसवें संभाषण । नाना संकटीं धांवोन । पाठींपोटीं रक्षिती ।।४२।। सद्गुरु त्रिकाळ शाश्वत । येविषयीं न धरावा किंत । भाव ठेवाल तैसा हेत । पुरेल जाणा निश्चयें ।।४३।। जेथें भाविक सच्छिष्य । तयें ठायीं अखंड वास । गोंदावलीं नित्य प्रत्यक्ष । समाधिठायीं वास करिती ।।४४।। याची पहावी प्रचीति । समाधि घेतल्यावरती । तैलंगणचे लोकांप्रति । अनुग्रहमाला दिधली असे ।।४५।। कित्येकांसी दृष्टांत झालें । कित्येकां प्रत्यक्ष भेटले । कित्येकांसी आज्ञापिलें । साधनमार्ग साधाया ।।४६।। समाधीची सेवा करितां । पुरविती भाविकांचे आर्ता । रामनाम मुखीं गाता । हृदयीं वास प्रत्यक्ष ।।४७।। वारंवार वदत होते । सगुण जाईल विलयातें । शाश्वत सद्गुरुपदातें । दृढ ध्यानीं धरावें ।।४८।। येथें आळस ज्यानें केला । तया वियोग भासला । आज्ञाधारकांसी भरला । अंतर्बाह्य

सद्गुरु ।।४९।। तुम्हीं श्रींचे सच्छिष्य । विवेकी ज्ञानी विशेष । तरी शोकें न व्हा उदास । अज्ञानियांसारिखे ।।५०।। गुरुचरणीं भाव धरा । अखंड नाम पीयूष झरा । सेवितां वियोग न स्मरा । क्षणार्धही माऊलीचा' ।।५१।। असो ऐसें बोधून सकळां । दुःखभार दूर केला । मग पुढील कार्याला । आंखोन देती ।।५२।। अप्पासाहेब भडगांवकर । दुजे दामले भाविक चतुर । यांसी नेमून मुखत्यार । समाधिसेवा चालविली ।।५३।। सज्जनगडीं जैशा रीती । भूगर्भी श्रींची वसति । वरती ठाण रघुपती । ध्यान शोभे साजिरें ।।५४।। तैसेंचि गोठणीं सुंदर । दहनस्थानीं काढिलें विवर । पाया भरोनि सत्वर । चिरेबंदी बांधिलें ।।५५।। दूरदेशीचें पाषाण । आणिले शुभ्र शोभायमान । मृदुत्वें दुजे दर्पण । चित्रविचित्र रंगाचे ।।५६।। मुंबापुरीहून सिंहासन । घाणेकर देती करवोन । श्रीभागवत कुर्तकोटीहून । पादुका आणविती ।।५७।। पूर्वींच श्रींचे आज्ञेवरूनी । करविल्या होत्या भागवत यांनीं । सुशोभित नागभूषणीं। चित्त वेधिती सकलांचे ।।५८।। असो श्रीब्रह्मानंद । साहित्य जमविती शुद्ध । कारागीर आणवोनि प्रसिद्ध । समाधिस्थान शोभविलें ।।५९।। शके अठराशें छत्तिसांत । मार्गशीर्ष कृष्णपक्षांत । प्रतिपदीं शुभमुहूर्त । वेदोक्त पादुका स्थापिल्या ।।६०।। विद्वान् सत्त्वस्थ ब्राह्मण । आणविले देशोदेशींहून । वेदोक्त विधिविधान । आणिक प्रचंड नामगजर ।।६१।। जे स्वानंदसुखाचे भोक्ते । ब्रह्मानंद स्थापिती स्वहस्तें । अनंत भावना एकचित्तें । गुरुरूपें दृढ झाल्या ।।६२।। गोमयें स्थान शुद्ध केलें । वरी श्री शोभविले । ब्रह्मानंदी प्रकट केले । वेदोक्त भक्तिमार्गानें ।।६३।। अनंत जीवांच्या यातना । हरती घडलिया दर्शना । समाधी पाहातां समाधाना । वरितें मन ।।६४।। प्रत्यक्ष नांदे गुरुराव । किती वर्णूं मी वैभव । समक्ष पहावा अनुभव । विकल्परहित भावनेनें ।।६५।। असो प्रतिपदेपासोनि । उच्छाह पुण्यतिथीदिनीं । दशमी दिधला नेमोनी । ब्रह्मानंदसाधुवरें ।।६६।। नामस्मरण अन्नदान । पुराण

कीर्तन आणि भजन । पादुका शिबिकारोहण । मिरवणूक रामभेटीं ।।६७।। दहा दिवसपर्यंत । उच्छाह नामगजरांत । चहूं देशींचे येती भक्त । गुरुपदीं नत व्हाया ।।६८।। 'श्रीसमर्थ संस्थान गोंदवलें' । हें संस्थेचें नाम ठेविलें । सुज्ञ पंच नेमियेले । ब्रह्मानंद सिद्धांनीं ।।६९।। दामले आणि भडगांवकर । श्रींचा प्रसाद तयांवर । अंतरीं राहोनि गुरुवर । कार्यभाग चालविती ।।७०।। लोकसंग्रही कार्यकर्ते । अति लीन गुरुपदातें । साधनीं दक्ष जे निरुते। गुरुभक्त पुढारी ।।७१।। समाधी प्रथम संवत्सरी । श्रीब्रह्मानंद यांची स्वारी । स्वयें करोन चाकरी । मार्ग आंखोन ठेविला ।।७२।। तैसाचि चालिला परिपाठ । नाम भेदी स्वर्गकपाट । अन्नसंतर्पण अफाट । देव प्रसाद वांच्छिती ।।७३।। देशोदेशींचे गुरुभक्त । साधक सिद्ध पंडित । वैदिक भाविक सत्त्वस्थ । किती येती गणवेना ।।७४।। पुराणिक आणि हरिदास । गायक करिती स्तुतीस । नवसीकही बहुवस । नवस फेडिती नानापरी ।।७५।। कोणी लोटांगणें घालिती । कोणी शर्करा वांटिती । वाऱ्या तरी किती करीती । गुरुवार आणि पौर्णिमा ।।७६।। कोणी प्रदक्षिणा घालिती । कोणी गुरुद्वारीं झाडिती । सेवा ऐसी नानारीती । किती प्रकार सांगावा ।।७७।। कामना पुरती अनेक । देहव्याधी कितीयेक । मुक्त करिती गुरुनायक । सेवा करितां भक्तीनें ।।७८।। असो प्रपंच आणि परमार्थ । समाधी पुरविते आर्त । साक्षात् सद्गुरु समर्थ । तेथें वास करिताती ।।७९।। ऐसें तीर्थ श्रीक्षेत्र । विख्यात होईल सर्वत्र । बहुत साधितील अर्थ । प्रपंचीं आणि परमार्थीं ।।८०।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते द्वादशाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## समास तिसरा

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। समाधी क्षेत्र स्थापिलें । पाकगृह भव्य केले । धान्याचें कोठार भरलें । अन्नछत्र गुरुगृहीं ।।१।। सज्जनगडीं उच्छाहपद्धति । तैसीच येथेंहि ठेविती । दुर्लभ सेवा अंगीकारिती । सच्छिष्य बहुतांपरी ।।२।। श्रींची मूर्ती उचलणें । हें जालना मठानें करणें । भालदार चोपदार ललकारणें । आटपाडी आणि पंढरी ।।३।। येथील मंदिरवासी यांनीं । सेवा घेतली नेमोनी । अबदागिऱ्या श्रींचे स्थानीं । धरिती तेही परिसावे ।।४।। मोरगिरी आणि सोलापूर । येथील मठपती साचार । सूर्यपानें सद्गुरुवर । धरिती बहुप्रीतीनें ।।५।। विटेंकर भंडारे । गोंदवलेंवासी दुसरे । नित्य वारिती चामरें । महोत्साहीं गुरुगृहीं ।।६।। बेलधडी आणि गिरवीकर । मंदिरवासी भक्त थोर । मोर्चलें वारिती साचार । विंझणेकरी परिसावे ।।७।। म्हासुर्णे आणि कुरवलीकर । मंदिरवासी भक्त थोर । विंझणे वारिती प्रेमें फार । श्रीचरणीं प्रीतीनें ।।८।। नामधारक भक्त प्रजा । छत्रपति गुरुमहाराजा । यांचे सोहाळ्यांतील समाजा । कऱ्हाड मठपति छत्र धरी ।।९।। रुमालवाले दोघेजण । बाळकूबुवा कलेढोण । गोविंदबुवा कुरवलीकर जाण । प्रेमळ भक्त श्रींचे ।।१०।। धनुष्यबाण चौघे धरिती । कागवाड पाटण खेर्डी वदती । तैसीच सांगली मंदिराप्रती । सेवा दिधली नेमोनी ।।११।। दिवट्या पाजळिल्या कोणी । तेंही परिसावें सज्जनीं । हरदा आणि शेंदुरजणी । मांडवें आणि दहिवडी ।।१२।। नित्य पूजाअर्चन । भीमराव मोडक कुशल पूर्ण । चित्रविचित्र शृंगारून । मन वेधिती सकळांचें ।।१३।। म्हासुर्णेकर शास्त्रीबुवा गुणी । पुराण वाचिती श्रीसदनीं । कीर्तनसेवेलागोनी । बहुत येती गुणीजन ।।१४।। परि सांगलीकर हरिदास । लळित नेमलें सेवेस । सांगलीकर फडणवीस । आरती धरिती भक्तीनें ।।१५।। शालिग्राम गुरुजी विद्वान् । सेवा करिती तबक व्यंजन । देशपांडे आटपाडीकर जाण ।

घोडा धरिती श्रींपुढे ।।१६।। माळी भक्त दहिवडीचे । वाहन झाले श्रींचे । पालखी धरोन साचे । गुरुसेवा साधिती ।।१७।। शिवणीकर नापित येवोन । दर्पण दावित श्रींलागोन । गरुडटके[१] धरिती जाण। हुबळीचे मठपती ।।१८।। रांगोळ्या घालिती केतकर । चित्रविचित्र मनोहर । गंध उपाध्याय चतुर । सकळांसी लाविती ।।१९।। बारसवडे गोंदवलीचें । काज करित उच्छिष्टाचें । गोमयमळा घेवोन वेंचे । उच्छिष्टें तेही परिसावे ।।२०।। दत्तोपंत इंदोरकर । लेखक भाविक सात्त्विक थोर । गोरक्षणीं साह्यकार । श्रीचरणीं देह लाविती ।।२१।। दाढे उपनामक अंताजीपंत । कीर्तनसमयीं बुका लावित। आरती श्रींसी ओवाळीत । खिरापत वांटिती ।।२२।। अत्तरगुलाब तांबूलोपचार । पुष्पमालादि सोपस्कार । श्रींचे दरबारी पुणेंकर । सेवा घेती नेमोनी ।।२३।। ऐसे हे गुरुभक्तजन । मिळवतील दुर्लभ स्थान । तयांसी सद्भावें नमन । करूं सेवा एवढीच ।।२४।। पुढेंही येतील आणिक । सेवितील गुरुसेवासुख । परमार्थी प्रापंचिक । त्यांची गणती कोण करी ।।२५।। असो समर्थांची गोशाळा । वांटिली होती पाळावयाला । परि अवर्षणें दिधला झोला । आणूनि सोडिती गुरुचरणीं ।।२६।। पुनरपि गोरक्षणसंस्था । स्थापन झाली जी तत्त्वतां । आलीं अनाथांचे नाथा- । पाशीं मूक जनावरें ।।२७।। अश्वपालक विश्वनाथ । नारायण कर्नाटकी भक्त । इंदूरकर दत्तोपंत । गोरक्षणीं बहु झटती ।।२८।। बसाप्पा तेलंगणदेशी । नामस्मरणें अघ नाशी । देह झिजवी समाधीपाशीं । मौनव्रत धरोनी ।।२९।। ऐसे अनेक सेवा करिती । कांहीं केली उपपत्ती । आतां परिसावी श्रोतीं । समाधिलीला ।।३०।। समाधिस्थान विवरीं झालें । वरती मंदिर बांधले । गोठणीं गोपाल शोभले । कैसे तेंही अवधारा ।।३१।। समर्थ जातां गोशाळेसी । विनोदें वदती सर्वांसी । येथें गोपालमंदिरासी । करितां बहु शोभेल

१ गरुडटका - गरुडाचे चित्र काढलेला ध्वज, निशाण, पताका.

।।३२।। ऐसें वदले बहुत वेळां । तें आठवलें जी सकळां । गोशाळे घनसांवळा । श्रीसंन्निध असावा ।।३३।। ब्रह्मानंद सिद्ध यांनीं । तेंचि कथिलें येवोनि । तेव्हां समाधिशिरस्थानीं । गोपालमंदिर बांधलें ।।३४।। कामें वाढलीं बहुवस । तेणें गोपालस्थापना लांबली विशेष । शके अठराशें बेचाळीस । वैशाखीं मुहूर्त शोधिला ।।३५।। श्रीमत् भागवत[१] यांनीं । मूर्ति दिधली आणवोनी । पाहतां प्रेम ये भरोनी । गोंडस तेजस हास्यमुख ।।३६।। तें मुरलीधराचें ध्यान । पाहतां वेधितसे मन । यास्तव सुवासिनी येवोन । दृष्ट काढिती वेळोवेळां ।।३७।। सात दिवस नामगजर । केला उत्साह बहु थोर । भक्त येती अपार । गोपालमूर्ति पहावया ।।३८।। वैशाख शुद्ध त्रयोदशी । मूर्ति स्थापिली विधींसी । साठये उपनाम जयांसी । गुरुभक्त यांचेकरवीं ।।३९।। सप्त ठायींचीं जीवनें । घालिती कृष्णा मंगलस्नानें । वेदघोषें नामस्मरणें । मुरलीधरा बैसविलें ।।४०।। हुबळीकर मल्लाप्पा यांहीं । खर्च केला ते समयीं । नित्य पूजा उच्छाहीं । नेमणूक करून दिधली ।।४१।। असो ऐसे देव भक्त । एकेस्थळीं शोभा पावत । अनन्याचे अनंत हेत । पुरवावया राहिले ।।४२।। सद्गुरुवास निरंतर । ऐसा रोकडा साक्षात्कार । भाविकांस पैलपार । भावबळें पावविती ।।४३।। नाना नवसांतें पावतीं । संकटीं दृष्टांतीं बोधिती । सेवा करितां पुरविती । कामना बहुपरींच्या ।।४४।। अंतरसाक्ष अंतरीं कळें । बाह्य दृश्य तें आढळे । वर्णिता होईल आगळे । ग्रंथसंख्याप्रमाण ।।४५।। परि एखादा दृष्टांत । देऊन पुरवूं मनोरथ । समाधीमाहात्म्य अत्यद्भुत । कोण वर्णूं शकेल ।।४६।। अप्पासाहेब कागवाडकर । स्मृतिहीन झाले फार । ब्रह्मसंमंधें जर्जर । केले पूर्वीसारिखे ।।४७।। पुत्रकलत्रा पीडीतसे । गृहकर्त्यासी लाविलें पिसें ।

---

**१ डॉ. कुर्तकोटी; श्रीमहाराज यांना ‘महाभागवत’ म्हणत. हे पुढें करवीरपीठाचे शंकराचार्य झाले.**

तमोबुद्धि गृहीं वसे । उपाय सुचों देईना ।।४८।। ऐसे गेले कांहीं दिवस । चिंता उपजली सर्वांस । मग समाधीसमीप सेवेस । धाडिले मायबंधूंनीं ।।४९।। सेवा करिता बहुवस । श्रीमंत आले स्मृतीस । वारंवार नमिती पदास । ब्रह्मचैतन्यगुरूंच्या ।।५०।। पूर्वीं जैसे साह्य होती । त्याहून अधिक शीघ्रगति । समाधीसेवेसी पावती । आश्चर्य नारीनरांसी ।।५१।। देहव्याधिमुक्त करिती । निपुत्रिकां पुत्र होती । मुमुक्षुजनां संरक्षिती । पाठींपोटीं राहोनी ।।५२।। शंकरशास्त्री म्हासुर्णेकर । यांचे स्नुषेंसी निशाचर । पीडीतसे वारंवार । घालिती समर्थचरणांवरी ।।५३।। सेवा करितां अतिगहन । पीडा निवारिली दारुण । ऐसें समाधिमहिमान । श्रोतेजनीं परिसावें ।।५४।। श्रीचरणीं जे अनन्य । तयांसी प्रत्यक्ष दर्शन । देवोनि करिती समाधान । ब्रह्मचैतन्य सद्गुरु ।।५५।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृतें द्वादशाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## ***समास चवथा***

श्रीसदगुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। श्री समाधिस्थ झाल्यावरी । मागें वर्तलें कैशापरी । तें आतां श्रोतीं चतुरीं । स्थिरचित्तें परिसावे ।।१।। आनंदसागर अनन्य भक्त । जालनामंदिरीं होते वसत । उपासना वाढविली बहुत । कीर्ति पसरली चहूं देशीं ।।२।। अंबड येथें मंदिर । बांधोनि स्थापिले रघुवीर। अन्नदान नामगजर । सिद्धपणें वाढविले ।।३।। समर्थ असतां सगुणदेहीं । आनंदसागर झाले विदेही । परिसतां आनंद होई । सिद्धकरणी अघटित ।।४।। माघ शुद्ध पौर्णिमेसी । निघाली स्वारी भिक्षेसी । दासनवमीउत्सवासी । सामग्री पाहिजे ।।५।। मातेसी केला नमस्कार । जो बहुतां दिवशीं

होतां स्थिर[१] । पाहोनी आश्चर्य नारीनर । मनीं मानूं लागले ।।६।। विदेशप्रयाणा निमित्त । करोनि आज्ञा घेतली त्वरित । माउली खोचलीं मनांत । पुढील भविष्यार्थ जाणोनि ।।७।। आज्ञा घेवोनि निघाले। एके ग्रामीं वसतीस आले । तेचि दिनीं ग्रस्त केलें । राहूनें चंद्रासी ।।८।। भजन निर्याणअभंग । करुणारसीं होती दंग । चतुर श्रोतया तगमग । होवों लागली अतिशय ।।९।। वासुदेव नामें सुतारासी । पाचारिलें एकांतासी । वदले आम्हीं जाऊं वैकुंठासी । तुज इच्छा असेल तें माग ।।१०।। तों तो करूं लागला शोक । हास्य करी गुरुनायक । 'अरे हें शोकाचें कौतुक । पुढें आहे ।।११।। सगुणीं सगुण लोपलें । निर्गुण जैसें तैसें भरलें । यांत विपरीत काय झालें । वांया शोक न करावा' ।।१२।। ऐसें करितां सांत्वन । हस्त जोडोनि बोले दीन । 'इच्छा होईल तैं दर्शन । येचि स्वरूपीं मज द्यावें' ।।१३।। 'बरें' म्हणोनि तयासी । आले पुनरपि भजनासी । प्रेमें अश्रु नयनांसी । आणिले समस्त जनांच्या ।।१४।। वारंवार पुसों लागले। 'ग्रहण सुटलें वा न सुटलें' । 'सुटलें' म्हणतांच संपविलें । निरूपण ते समयीं ।।१५।। नामगजर सुरू केला । देह श्रीचरणी ठेविला । आत्मा रामरुपीं मिळाला । ठायींचे ठायीं ।।१६।। शोक करिती नारीनर । मग केला अग्निसंस्कार । समाधि बांधावी हा विचार । शिष्यांअंतरीं प्रगटला ।।१७।। तंव आज्ञा झाली दृष्टांतासी । 'करितां रामसेवेसी । आम्हां पावेल निश्चयेंसी । समाधि वेगळी करूं नये' ।।१८।। आनंदसागर वैराग्यशील । समाधि उपाधि केवळ । त्यजोनि राहिले निश्चळ । रामरूप होवोनी ।।१९।। असो जननी भार्या दोन सुत । दोन कन्या तयांप्रत । पांडुरंगबुवा जामात । समर्थें शोधोनि काढिला ।।२०।। रामजीबुवा शिष्य भलें । पांडुरंग दुजे

**१ आनंदसागर अधिकारी पुरुष आहेत हें जाणून त्यांच्या मातुःश्री त्यांना नित्य नमस्कार करीत; पण या समयीं मात्र त्यांनींच मातुःश्रींस नमस्कार केला.**

वहिले ।दोन्हीं संस्थान चालविलें । श्रींचे आज्ञेवरोनी ।।२१।। वडील सुत नामस्मरणीं । देह ठेविता झाला धरणीं । धाकटा पुरुषोत्तम म्हणोनी । अज्ञान बालक मठपती ।।२२।। श्रींचे दुजे शिष्य ब्रह्मानंद । ज्यांनी जाणिलें गुरुपद । तयांची कथा प्रसिद्ध । अल्पशी कथन करूं ।।२३।। श्रींची समाधि स्थापिली । उत्सवपूजा आंखोन दिली । उपासना अत्यंत वाढविली । कर्नाटकप्रांतीं ।।२४।। परि स्वयें राहिले अलिप्त । कृष्णातीरी समाधिस्थ । जाहले तो प्रकार संत- । सज्जनीं थोडा परिसावा ।।२५।। शके अठराशेंचाळीस । भाद्रपद कृष्णमास । फिरत आले कागवाडास । रामभेटीनिमित्त ।।२६।। विश्रांती घेऊं चार दिवस । म्हणोनि सांगती सर्वांस । मुंडलाप्पा नामें शिष्यास । कर्नाटकीं धाडिले ।।२७।। एकही शिष्य ते वेळीं । नसे ठेविला जवळीं । गुरुभक्तांचें मेळीं । काळ क्रमित राहिले ।।२८।। सांगलीहूनि हरिदास । आले तेथें दर्शनास । बरें म्हणोन तयांस । ठेवोन घेती आनंदें ।।२९।। आम्हां पोचवावे आणि जावें । ऐसें वदती स्वभावें । परि सूक्ष्म अर्थाचे गोंवे । उमजतीना कवणासी ।।३०।। वद्य चतुर्दशी गुरुवार । प्रातःकाळी उठोनि सत्वर । रामदासी कागवाडकर । आणि हरिभाऊंस पाचारिलें ।।३१।। सहज विनोदें बोलती । 'क्वचित् झाल्या देहगति । अग्नि न द्या तयाप्रति । कृष्णागर्भी सोडावा ।।३२।। स्नान करोनि मोकळें । व्हावें दुःखावेगळें' । संतमाहात्म्य न कळे । कोणाएकासी ।।३३।। अप्पासाहेब कागवाडकर । गुरुभक्त इनामदार । नवबाग नामें सुपीक थोर । कृष्णातीरीं मळा असे ।।३४।। तेथें गेले स्नानासी । बाळेश्वर क्षेत्रासी । स्नान करोनि वस्तीसी । राहिलें तेथें गुरुवारीं ।।३५।। गुरुसेवा उपोषण । करिती शेवटचा म्हणोन । हरिभाऊ संगतीं जाण । एकले एक ।।३६।। अनंत शिष्य अनंत शरण । सकळां दूर करोन । राहिले करीत नामस्मरण। नवबागीं कदंबछाये ।।३७।। सायंकाळीं केलें भजन । आळविलें दयाघन । गुरुपादुका वंदोन । स्तवन

करिती बहुपरी ।।३८।। त्यांतचि निरूपण केलें । हरिदास श्रोते भले । देहबंधनानें भुलले । मानोनि जीवदशा ।।३९।। ही देहरूप उपाधि । मानीव चाळविते बुद्धि । सत्याची दवडोन शुद्धि । जीवात्म्यासी गुंतवी ।।४०।। चार देह चार अवस्था । ज्ञानी राहें यांपरता । तयासी लिंगदेह सोडितां । गुंती नाहीं तिळभरी ।।४१।। ऐसें करोनि निरूपण । पुनरपि करोनि भजन । धूप दीप आरती करोन । सांग केली गुरुसेवा ।।४२।। एक प्रहर राहतां निशी । नाम श्वासधारेसरसीं । स्थिर करोनी वृत्तीसी । एकलयें चालविली ।।४३।। तेज फांकलें चहूंकडे । दृष्टीसी दृष्टी न भिडे । स्थूलापासोन मुरडे । चैतन्य श्रीरामरूपीं ।।४४।। प्रातःकाळसमयासी । रामचरणतीर्थासी । घेवोनि आले रामदासी । ब्रह्मानंदा द्यावया ।।४५।। आनंदे मुख पसरोनि । तीर्थ घेतलें तयांनीं । श्रीरामप्रभूंचें चरणीं । वंदन केलें हस्तद्वयें ।।४६।। अमावस्या शुक्रवार । रवि येतां एक प्रहर । कृपादृष्टि सर्वांवर । हास्यमुखें टाकिती ।।४७।। इकडे चालिला नामगजर । ब्रह्मानंद झाले स्थिर । पाहतां पाहतां व्यापार । दृश्य तें स्थिर झालें ।।४८।। मग नामगजरें कलेवर । नेलें सन्निध बाळेश्वर । पूजा आरत्या करोनि सत्वर । जलसमाधि दीधली ।।४९।। सकळांसी जाहलें दुःख । अनिवार करिती शोक । दुजे आमचे गुरुनायक । तिहीं त्यजिलें आम्हांसी ।।५०।। असों नवबागीं बांधिती समाधी । दर्शना येते भक्तमांदी । श्रीमंते पूजाअर्चनविधी । व्हावया भूमि दिधली असे ।।५१।। तिकडे व्यंकटापूर देवस्थानीं । समाधी पूर्वींच बांधोनी । तेथेंच पादुका स्थापोनी । भक्त करिती उत्सव ।।५२।। श्रीपादभट्ट व जोगळेकर जाण । साधक शिष्य अनन्य । तयांसी कथिलें संस्थान । चालवावें श्रीसेवे ।।५३।। बेलधडी आणि बिदरहळ्ळी । येथील देवस्थानें भलीं । पूर्वींच व्यवस्था केली । जेथील तेथें ।।५४।। गोंदावलीं कळली मात ।

सकलही झाले दुःखित । आईसाहेब वदती तेथ । तेंही श्रोतीं परसावें ।।५५।। समर्थ गेलियानंतर । ब्रह्मानंदें केलें स्थिर । वदती असतां मी तुमचा कुमर । शोक कासया करावा ।।५६।। वारंवार उपदेशुनी । बोधें चित्त शांतवुनी । गुरुभक्तां गुरुजननी । वाटे दुजी अवतरली ।।५७।। तोही झाला समाधिस्थ । आतां काय करणें जीवित । म्हणोनी अन्न वर्जित । गुरुभार्या गोंदावलीं ।।५८।। पयःपान कचित् करिती । मनीं पतिचरण ध्याती । एक मासाउपरांतीं । देह धरणीं ठेविला ।।५९।। अश्विन कृष्ण दर्शतिथी । आईसाहेब आम्हां सोडिती । दहन करून समाधी करिती । श्रींचे वामभागाप्रति ।।६०।। प्रतिवर्षीं उत्सवास । करिताति अमावास्येस । स्नान पूजा नैवेद्यास । नित्य चाले उपासना ।।६१।। बत्ताशा श्रींचे वाहन। परम भक्त जो अनन्य । तेणेंही त्यजिला प्राण । श्रींचे चरणांसमोर ।।६२।। तयाची बांधिली समाधी । श्रींचे पुढें भक्तमांदी । दर्शन घडे श्रींचे आधीं । गुरुसेवा परम भाग्य ।।६३।। असो ऐसा इतिहास । समाधीचा कथिला निःशेष । श्रवण करितां वैराग्यास । वरील मन निश्चयें ।।६४।। उपजेल तितुकें मरेल । घडेल तितुकें बिघडेल । परि सत्कीर्ति श्रवणीं पडेल । अनंतकाल पर्यंत ।।६५।। सत्कर्म अथवा दुष्कर्म । उभयतांचा एकचि धर्म । भोग भोगवील परम । सुखदुःख निश्चयें ।।६६।। यास्तव संतचरित्र । विवरोन व्हावें स्वतंत्र । कर्मबंधनाचें सूत्र । बंधनापासोन सुटावें ।।६७।। नरदेह रत्नपेटी । भोगें न करावी करंटी । सद्धर्मीं लावोन शेवटीं । अलिप्त असावें ।।६८।। असो महाभागवत कुर्तकोटी । जगद्गुरु झाले करवीरमठीं । एकी करोन शेवटीं । स्वयें राहिले अलिप्त ।।६९।। भय्यासाहेब इंदूरकर । श्रीचरणीं ठेवाया शरीर । आले सांडोन इंदूर । गुरुभक्त बहु ज्ञानी ।।७०।। सकलां सांगती मात । गुरुक्षेत्रीं महिमा अनंत । तेथें ठेवितां देहाप्रत । पुनरपि जन्म त्या नाहीं ।।७१।। कोणी माझे अस्थींसीं । न न्याव्या प्रयागासी । अर्पितों श्रीचरणासी । परमपावन

क्षेत्र हें ।।७२।। ऐसें बोलतां चालतां । देह ठेविला तत्त्वता । गुरुभक्तीनें गुंता । सोडविला बहुजन्मींचा ।।७३।। असो ऐसी भक्तमंडळी । समाधीं समाधान पावली । उपासना कैसी चालली । तीही श्रोतीं परिसावी ।।७४।। सद्गुरु समर्थांचे शिष्य । तैसेचि जे शिष्यानुशिष्य । बहु मंडळी लक्षानुलक्ष । दुरित नाशिती कलियुगीं ।।७५।। जागोजागीं नामसप्ताह । पुण्यतिथी आदि महोत्साह । अखंड चालिला प्रवाह । हृदयीं ध्याती कितीएक ।।७६।। श्रवणीं संगतीं किती तरती । त्यांची नाहीं नाहीं मिती । घरोघरीं पादुका स्थापिती । पूजाअर्चा करावया ।।७७।। वऱ्हाडीं ग्राम सेंदुरजन । तेथें मठ ब्रह्मचैतन्य। दक्षिणे करवीरक्षेत्रीं जाण । ब्रह्मचैतन्य मंदिर स्थापिलें ।।७८।। ऐसी उपासना चालली । दिगंत कीर्ति पैसावली । तेंहि लिहितां लेखणी भागली । गुरुलीला अगम्य ।।७९।। आतां ही सद्गुरुलीला । त्रयोदशीं जाय विश्रांतीला । हृदयीं ध्याऊं पदाला । म्हणजे प्रसाद होईल ।।८०।। गुरुलीलाबोधरसा । जरी उमटे हृदयीं ठसा । तरी चुकेल हा वळसा । जन्ममृत्यूचा ।।८१।। इति श्रीसद्गुरुलीला । श्रवणीं स्वानंदसोहळा। पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।८२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते द्वादशाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति द्वादशोऽध्यायः समाप्तः ।।**

# अध्याय तेरावा

## *समास पहिला*

**मुखें बोलवी सद्गुरु बुद्धिदाता । अहंभार हा वागवी कोण माथां ।।**
**जडो भावना रामदासीं सदा ती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ति ।।१३।।**

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। जयजयाजी मंगलमूर्ति । जय जय माय सरस्वती । आत्माराम सर्वांभूती । नमन करूं साष्टांगें ।।१।। नमो सद्गुरु परेशा । विराटरूपा विश्वेशा । मायबापा प्रकृतिपुरुषा । संतसज्जनां नमन असो ।।२।। धन्य सद्गुरुप्रसाद । केला न वचे अनुवाद । त्रिलोकीं दुर्मिळ मकरंद । गुरुपूत भृंग सेविती ।।३।। पाहोन ही प्रसादगोडी । हरिहरादिक झालीं वेडीं । घेतां जन्म बहुत कोडी । गुरुप्रसाद दुर्लभ ।।४।। एक्या गुरुप्रसादाकारणें । योग याग पुरश्चरणें । देहादि ममत्व सोडणें । दृढविश्वास गुरुवचनीं ।।५।। प्रसाद जयावरी झाला । तो कृतकृत्य होवोनि गेला । जीवशिव भेद मावळला । ठायींचे ठायीं ।।६।। गुरुप्रसाद परमामृत । सदा वांच्छी अमरनाथ । दुर्लभ दुर्मिळ अनंत- । सुकृतेंही जोडेना ।।७।। पुण्यपापक्षय झाला । जीवात्म्याचा गोवा तुटला । तरीच सद्गुरुपदाला । पडेल मिठी ।।८।। जडले ते तन्मय झाले । स्वस्वरूपानंदीं रमले । त्यांचें स्मरणें अनेक तरले । धन्य धन्य गुरुकृपा ।।९।। गुरुकृपा होय जयासी । काव्य व्युत्पत्ति नको त्यासी । ज्ञान होय सर्वांशीं । समाधान पूर्णत्वें ।।१०।। निःसंदेह जें विज्ञान । तेंचि गुरूचें कृपादान । वेदशास्त्रां जेथें मौन। तेंचि स्वयें गुरुभक्त ।।११।। अंध पंगु बहिरा मुका । परि सद्गुरूसी सलोखा । तया न गणावा

फिका । साधु शिरोमणि ।।१२।। नरदेह सार्थक करावें । ऐसें घेतलें ज्याचे जीवें । तेणें हेंचि एक साधावें । अढळ लक्ष गुरुचरणीं ।।१३।। चित्तशुद्धि मनोजय । फलत्याग वासनाक्षय । शून्यावस्थेवरी विजय । गुरुपूतें मिळविला ।।१४।। श्रवण मनन अभ्यास समाधि । कुंडलिनी जे अमृत शोधी । ब्रह्मांड भेदून निरुपाधि । करी क्षणीं गुरुकृपा ।।१५।। स्थूल सूक्ष्म कारण । महाकारण विराट् गहन । हिरण्यगर्भ अव्याकृति जाण । मूल प्रकृति कोश हे ।।१६।। ऐसें हें भ्रमबंधन । तत्काल जाय तुटोन। स्वस्वरूपानुसंधान । अखंड ऐक्य संचलें ।।१७।। रंकाचा होतो राव । जीवाचा होतो शिव । क्षणामाजीं हें अभिनव । सद्गुरुस्वरूप देखिलिया ।।१८।। सद्गुरुवीण जिणें पाहीं । सर्वथा श्लाघ्य होणें नाहीं। देव भक्ता ऐक्य कांहीं । प्रसादेविण होईना ।।१९।। सद्गुरुपदीं अनन्य । सर्वभावें जावें शरण । व्हावें दीनाहून दीन । तैं होय गुरुकृपा ।।२०।। सद्गुरुपद शाश्वत । तेथें ठेवितां अखंड चित्त । देहादि ममता समस्त । गुरुचरणीं अर्पाव्या ।।२१।। सद्गुरुकृपेलागून । ब्रह्मांड मानावें हीन । जाणीव नेणीव विसरून। गुरुवचनीं विश्वास धरावा ।।२२।। तरीच होय गुरुकृपा । तरीच चुकती या खेपा । तरीच प्रकाश ज्ञानदीपा । अलक्षीं लक्ष विरेल ।।२३।। ऐसा सद्गुरुप्रसाद । आनंदाचा निजकंद । परा-उन्मनीहून शुद्ध । विद्ध करी वासना ।।२४।। नरदेहीं दक्षता गहन । तयामाजीं सन्मार्ग गहन । सन्मार्गीं अध्यात्म गहन । त्याहीवरि गुरुकृपा ।। २५।। भाविकां सदा सुफलित । इहपर पुरवी मनोरथ । गुरुकृपेवीण स्वार्थ । आन नेणे ।।२६।। सिद्ध साधक महानुभाव । जाणती हा अभिप्राव । ना तरी कलीचा स्वभाव । वाग्जल्प विकल्प धरावा ।।२७।। सज्जनांसी युगधर्म । न पीडी संगतकर्म। युगनियंता श्रीराम । सर्वकाळ रक्षितसे ।।२८।। येणेंपरी कलियुगांत । अनेक होऊन गेले संत ।

जगदुद्धार हाचि हेत । धरोनियां अवतरले ।।२९।। तैसें ब्रह्मचैतन्य सद्‍गुरु । आम्हा अनाथांचे तारूं । तयांचा प्रसादविस्तारु । लीलाग्रंथीं वर्णिला ।।३०।। निमित्तमात्र लेखक । स्फूर्तिरूप गुरुनायक । ऐसा हा प्रसाद देख । अंत्यानंदें सेवावा ।।३१।। स्थूलावरी राजसत्ता । स्थूलसूक्ष्मीं गुरुसत्ता । अखंड सूत्रें चालविता । एकला एक अलिप्त ।।३२।। तयांचा दासासी प्रसाद । सद्‍गुरुलीला ही विशद । श्रवणमननें शुद्ध बोध । घेऊन सन्मार्गें चालावें ।।३३।। संतचरित्र परम गोड । श्रवणें तृप्त वासनेची ओढ । करोनि देईल श्रद्धा जाड । साधकांसी सुनिश्चयें ।।३४।। नास्तिकांचें बंड मोठें। साधका ने आडवाटे । नरदेहा येवोन करंटे । केले कीतीएक ।।३५।। तेणें पहावी सद्‍गुरुलीला । द्वादशाध्यायमंत्रमाळा । कीं हा द्वादशादित्यमेळा । अज्ञानतिमिर घालवी ।।३६।। त्रयोदशी ज्ञानरवि । शीघ्रचि होईल गोसावी । श्रवण-मननक्रिया बरवी । शुद्धांतःकरणे केलिया ।।३७।। कवण अध्यायापासूनि । कवण बोध घ्यावा मनीं। वंदन करोनि श्रीचरणीं । विशद करूं गुरुकृपें ।।३८।। प्रथमाध्यायीं मंगलाचरण । गणेश-शारदा-स्तवन। मग सद्‍गुरुवंदन । साष्टांगभावें ।।३९।। गण नामें इंद्रियें समस्त । तयांचा स्वामी गणनाथ । इंद्रियनिग्रह मूळ हेत । परमार्थ साधी निर्विघ्न ।।४०।। शारदा सुविद्या सद्‍बुद्धि । असलिया परमार्थ साधी । अविद्या वैभवोपाधि । लावून फशीं पाडील ।।४१।। इंद्रियनिग्रह करोनि । सद्विद्यें शुद्धि साधोनि । शरण रिघतां गुरुचरणीं । समाधान पूर्णत्वें ।।४२।। आधीं विद्या नाहीं पढला । आणि राजयापाशीं गेला । देईं म्हणे फडणविशीला । तरी तें निरर्थक ।।४३।। आधीं विद्या शिकावी । तरी राजा स्वयें बोलावी । तैसें शम दम सुविद्या बरवी । असतां सद्‍गुरु भेटती ।।४४।। क्षेत्र सोज्ज्वळ तयार झालें । मेघजळ मातीस आलें । तरी धांवून येती कृषीवलें । ज्ञानबीज रुजवाया ।।४५।। नाशिवंत

सांडोन समस्त। शाश्वत ध्यावे सद्गुरुनाथ । येथींचा जो गर्भितार्थ । विवरविवरों उकलावा ।।४६।। गुरुगम्य मायानिरास । गुरुगम्य ज्ञानकळस । गुरुगम्य पूर्ण भक्तिरस । समाधान गुरुकृपा ।।४७।। येथें आशंकेची उरी । पतिता कोण उद्धरी । गुरुभक्ति कैशापरी । करावी तेणें ।।४८।। सद्गुरुपद शाश्वत । तेथें जावया कोण समर्थ । अंतर्बाह्य विषयें लिप्त । बहुतां जन्मांपासोनि ।।४९।। तयासि होतां संतभेटी । बुद्धि वळेल उफराटी । शमदमादि हातोटी । सुबुद्धि होय मानवा ।।५०।। याकारणें गुरुमूर्ति । सगुणरूपें अवतरती । दुष्प्राप्य वस्तु आयती । अभाग्याचे घरीं रिघे ।।५१।। धरितां तयाची कास । हळूंहळूं साधनास । लावोन मनोवृत्तीस । करिती शुद्ध ।।५२।। मन बुद्धि विषयें लिप्त । तैशाच कामना उठत । त्यांहून अन्य वाटे व्यर्थ । गोडी नुपजे निष्कामीं ।।५३।। स्त्रिया पुत्र आणि धन । जगीं मान्यता सन्मान । देह-गेह-संरक्षण । इच्छिती हेंचि आवडी ।।५४।। तयांच्या पुरवोनि कामना । हळूंहळूं निष्काम भजना । लावोन करिती समाधाना । सद्गुरु संत समर्थ ।।५५।। जैसीं लेकुरें हट्ट घेती। बाहुलीस जेवूं घालिती । माय करोन तैशा रीती । अर्भकामुखीं ग्रास घाली ।।५६।। ऐसें मानत मानत साधनासी । लावोन चित्तशुद्धीसी । झालिया सद्गुरुकृपेसी । पात्र होय ।।५७।। नूतन वधू गृहीं जातां । ठेवा न ये तिचे हातां । सुनीतीनें सेवा करितां । धनीण तेचि असे ।।५८।। तैसे सद्गुरु आणि अज्ञान । भेटलिया होय समाधान । जरी साधनीं देह झिजवोन । गुरुवचनीं विश्वास धरील ।।५९।। ऐसें सद्गुरुवंदन । तैसेचि संत सज्जन । परमार्थमार्गींची शिकवण । प्रत्यक्ष क्रियेनें दाविती ।।६०।। जैसा चाणाक्ष शेजारी । दक्षतेनें व्यवहार करी । संगतीं शिकती नानापरी । पाहोनिया आपेंआप ।।६१।। ऐसे संत सज्जन । तयांचे धरितां चरण । वासना मागें वळोन । रामापायीं जडतसे ।।६२।।

इतुका साधावया स्वार्थ । देह पाहिजे परम पुनीत । मायबापें कारणीभूत । शुद्ध बीज रक्षाया ।।६३।। मातेपरी ममता नाहीं । परि जारिणी घात करिते पाहीं । विपरीत बुद्धि सकलही । विपरीत क्रिया केलिया ।।६४।। कुलवेली राहील शुद्ध । तरी बुद्धि करील भेद । मायोद्भव संसारखेद । बहुत जन्मजन्मींचा ।।६५।। कुलाचार सांडूं नये । उपकारिया विसरूं नये । लीनता धरोनि उपायें । अधर्ममात्र त्यागावे ।।६६।। आतां वंदूं श्रोतेजन । जे संतकथाभोक्ते गहन । श्रवणीं सुबुद्धि धरोन । शुद्धमानसें बैसले ।।६७।। कोणा मिसें कार्य होणें । बुद्धि वक्तयासी देणें । पहा धृतराष्ट्राकारणें । ज्ञानचक्षू संजया ।।६८।। श्रोता मिळालिया सावध । वक्त्या सुचे बुद्धिवाद । श्रोता सुप्त[1] आणि सुंद[2] । असतां उल्हास होईना ।।६९।। श्रोता असावा अर्थभोक्ता । श्रोता असावा शंकाघेता । निर्मत्सरी निरभिमानता । प्रेमळ आणि भाविक ।।७०।। ऐसें हें श्रोतृवंदन । पुढें देशकालवर्णन । उत्पत्तिस्थितीसि कारण । मूळमाया नाथिली ।।७१।। भूत भूतांतें प्रसवे । आपणहि नांदे त्यांसवें । भूतें भूतांसींच खावें । तेथील तेथें विलीन ।।७२।। मूळमाया प्रकृतिपुरुष । पुरुषबिंब परमांश । बिंबध्यानें मायानिरास । करावा बिंबासहित ।।७३।। जेथें जें निर्माण होतें । तेथेंचि तें लीन होतें । मातीस माती मिळते । ऐसें वदती सर्वत्र ।।७४।। तैसें या मायेचे पोटीं । सत्त्वस्नेहें ज्ञानदिवटी । उजळितां जाळील ही मठी । मूल बापास मारील ।।७५।। व्हावया सात्त्विक ज्ञान । देशकालादि साधन । सात्त्विकज्ञानें समाधान । साच आहे ।।७६।। राक्षसी मानवी आणि दैवी । त्रिविध माया जाणावी । फशीं पाडिते गोसावी । थोरथोर ।।७७।। त्यांत एकचि ज्ञानबिंदु । समूळ आटवील भवसिंधु । भक्ति-उपासना-संबंधु । घडलिया सतत ।।७८।। असो माया कैसी मोहविते । ज्ञान कैसें जागवितें । हें पहावें जी निरुतें । अवतारमालावर्णनीं

१ झोंपाळू. २ दुश्चित.

।।७९।। एकाची तों ऊर्ध्वगति । एकाची असे अधोगति । हें जाणोनियां श्रोतीं । उचित तेंचि घेत जावें ।।८०।। जरी पाहिजे उत्तम गुण । तरी संतचरित्र हें दर्पण । दाविलें पुढती पाहोन । अवगुण धुवोनि काढावे ।।८१।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते त्रयोदशाध्यायांतर्गतः प्रथमः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास दुसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। द्वितीयाध्यायीं ऐशी कथा । देशकालादि अनुकूल असतां । प्रयत्नें मानव ईशसत्ता । निःसंशय मिळवितसे ।।१।। कुल शील असतां भलें । तरीच ऐशी सत्ता चाले । वनीं जन्मती जंबूकपिलें । गज कैसे विदारित ।।२।। याकारणें कुल शील । राखावें अति निर्मल । विषयलालसेनें केवळ । घात न करावा पुढिलांचा ।।३।। चतुरें पाया घातला । मध्यें आपणां भाग आला । तरी न ठेवावा ढिला । पुढिलांसी घातक ।।४।। लक्ष्मीचा दुअंगी टोला । नीतीनें पाहिजे सोसिला । येतां मदें धुंद केला । जातां तृष्णा मोह पाडी ।।५।। प्रारब्धयोगें द्रव्य येतां । बहुत चाले त्याची सत्ता । तेणें जननिंदा दोषवार्ता । विसरोनि जोडी अधर्म ।।६।। अथवा दैवें दारिद्र्य आलें । आणि वैराग्य नाहीं बाणलें । विषयतृष्णें व्याकुळ केलें । धर्माधर्म पाहवेना ।।७।। असो संपत्ति अथवा विपत्ति । दोन्हीं ठायी चित्तवृत्ति । शांत ठेवोनि नीति । राखितां बरें ।।८।। परमार्थ साधावा मुख्यत्वें । प्रपंचहि करावा दक्षत्वें । लिंगोपंत-रावजींचीं तत्त्वें । सूक्ष्मपणें विवरावीं ।।९।। सूर्योदय होईल पुढतीं । परि आधीं प्रभा पैसावती । तैसे दृष्टांत डोहळे होती । शुभाआधीं शुभशकुन ।।१०।। धर्मस्थापनेचे

नर । केवळ कारणिक अवतार । परि वेश तैसा आचार । अंगीकारिती अत्यादरें ।।११।। असो मानववेशांत । अवतार घेती सद्गुरुनाथ । सुकृतें फळा आलीं समस्त । गीता रावजी धन्य केले ।।१२।। सुपुत्र पित्याचा उद्धार । मोकळें करी स्वर्गद्वार । परि स्वर्गाहून जें पर । तेथें स्वयेंचि कष्टावें लागे ।।१३।। मायोद्भव लोभ अहंता । नसताचि घालिती गोता । तेणें जीव सुखदुःख भोक्ता । होतो ऐसें जाणावें ।।१४।। बाळलीला तृतीयाध्यायीं । पहा कैसी नवलाई । सत्यज्ञाना नाश नाहीं । अनंत जन्म घेतलिया ।।१५।। प्रवृत्तिज्ञान नाशिवंत । जेथील तेथें लया जात । याकारणें निवृत्तिज्ञान सत् । आत्महिता धरावें ।।१६।। नरदेहीं वसति थोडी । न भरे ब्रह्मयाची घडी । याकारणें शाश्वतजोडी । अतियत्नें साधावी ।।१७।। साखर शोधित मुंग्या जाती । तैसी बालपणींच वाढली महंती । आणिक एक धरा चित्तीं । मंत्रदीक्षा ।।१८।। आत्महित साधायासी । आचार कथिती देव ऋषि । अदूरदृष्टी निरर्थक त्यासी । मानोनि अव्हेर न करावा ।।१९।। वेदबीज मंत्रबीज । ज्ञानबीज धर्मबीज । वेल मुळीं वासनाबीज । शुद्ध भूमिके रुजलिया ।।२०।। उपदेशक असावा ज्ञाता । अपरोक्षानुभवी पुरता । तरी घडे सार्थकता । उपासनाबळें ।।२१।। यांतील एकही असतां उणें । वैराग्य कदापि न बाणे । मां समाधान कोण जाणे । कैसें आहे ।।२२।। आचार शुद्ध विचार शुद्ध । भूमिका शुद्ध संगति शुद्ध । तरीच हें होईल साध्य । वेदगुह्य ।।२३।। परि कालधर्म उफराटा । ब्रह्मकर्मा दिधला फांटा । यास्तव ज्ञानियांच्या वाटा । शोधूं निघाले ।।२४।। अनुताप उपजला पोटीं । वैराग्य बाणलें उठाउठीं । परि मायबापांसाठीं । गृहस्थाश्रम आदरिला ।।२५।। मायबाप अधिदैवत । हेंहि दाविलें नेमस्त । आणि आपुलाहि स्वार्थ । साधावया कष्टले ।।२६।। एक असतां एक नाहीं । ऐसें असतें बहुतां ठायीं । परि

ज्ञानी सर्वत्र विदेही । जळीं राहोन कोरडा ।।२७।। तृतीयाध्यायाचे अंतीं । घराबाहेर निघाला गणपती । मायामोहाची गुंती । अल्पवयीं सोडविली ।।२८।। चतुर्थाध्यायींचा प्रसंग । दाविले विवेक वैराग्य । कैसा अनुताप तगमग । भरतखंड शोधिलें ।।२९।। सद्गुरु शिष्यातें परीक्षी । सच्छिष्य सद्गुरु लक्षी। अलिप्तपणें गरुडपक्षी । साध्य जैसा शोधितसे ।।३०।। उपमर्द कोणाचा न केला । वाद कोणासी न घातला । सूक्ष्मदृष्टीं जगताला । शोधूं लागले ।।३१।। काम क्रोध दंभ अहंता । लोभ तृष्णा दुस्तर ममता। त्यजोनि विवेकवैराग्यें मलिनता । चित्ताची घालविली ।।३२।। साधोनिया चित्तशुद्धि । लीन होतां गुरुपदी । प्रसाद व्हावया अवधि । पळभरी नाहीं ।।३३।। असो नामस्मरण तीर्थाटण । संतदर्शनें उपोषण । ऐसें करीत साधन । समाधान शोधिलें ।।३४।। पंचमाध्यायप्रसंगीं । तुकाराम महायोगी। तेथें लीन सर्वांगीं । होवोनी केलें सार्थक ।।३५।। सरिता सागरीं मिळाली । द्वैतभावना अवघी गेली । परि वळण लावावया केली । गुरुसेवा बहुविध ।।३६।। निर्गुणीं व्हावें अनन्य । सगुणीं सगुणत्वें भजन। हेंहि दाविलें वळण । स्वयें सेवा करोनी ।।३७।। ज्ञानें होती परमहंस । परि सगुणीं उदास । ऐसियानें जगतास । काय बोध होईल ।।३८।। ऐसे बहुत साधु झाले । आपआपणापुरते तरले। परि ही नौका अखंड चाले । बहुतांसी तारक ।।३९।। असो कठिण सेवा केली । गुरुमाय आनंदविली । कसासी वृत्ती न डगली । लेशमात्र अहर्निशीं ।।४०।। सुखासनीं सुग्रासभोजनीं । वेदान्त वदोनि म्हणती ज्ञानी । परि मायाकसोटी घर्षणीं । उतरणें कठिण आहे ।।४१।। भ्याड बहु वल्गना करी । प्रसंग आल्या अंग चोरी। ऐसियानें माया आसुरी । मरणार नाहीं ।।४२।। जगदुद्धार करावयासी । आज्ञापिती ज्ञानराशी । पोई घातली तृषितांसी । शांतवाया निःस्वार्थें ।।४३।। अज्ञ सुज्ञ

भेद इतुका । अज्ञ परार्थीं न वेंची रुका । ज्ञानियांचा प्रपंच देखा । केवळ परहिताकारणें ।।४४।। सहावियांत तीच कथा । प्रपंचीं दाविली विदेहता । नाना जीवां आश्रयदाता । इहपर सौख्य दाविलें ।।४५।। निःस्वार्थें प्रपंच केला । घराचा देव्हारा बनविला । पाकगृहाची धर्मशाळा । केली समस्तांकारणें ।।४६।। हजार येती हजार जाती । खाती पिती सुखी होती । मूढ ज्ञानी एका पंक्ती । बैसविले निरहंकारें ।।४७।। तारक नामस्मरणासी । लाविले लहानथोरांसी । नाना प्रपंचव्याधींसी । दिधल्या दूर झुगारुनी ।।४८।। संसारचक्रीं जें भ्रमले । आपत्तीनें कष्टी झाले । बहुत पीडतां कुरवाळिले । गुरुमाउलीनें ।।४९।। अन्नदान सौख्यदान । त्याहीवरी ज्ञानदान । तेंहि परिसा सज्जन । सप्तमाध्यायीं ।।५०।। काळ वेळा कठिण आली । सदसद्विवेक बुद्धि गेली । महामायेनें भुलविली । नानाप्रकारें ।।५१।। इच्छामात्रें सकळ घडी । निमिषार्धें करी विघडी । नाथिली परि कोडी । अनंत अगाध ।।५२।। माया महान वटवृक्ष । शाखापल्लव गणितां लक्ष । बीजरूपें अनंत वृक्ष । शोधितां पुढतीं धांवतसे ।।५३।। याची गणना होणें नाहीं । पाहिलें तेंहि शाश्वत नाहीं । अष्टधेचा कर्दम पाहीं । अनंत चमत्कृति मोहक ।।५४।। मोहें भुलविलें जनांस । परमार्थी पाडिले ओस । शुद्ध ज्ञान लयास । जाऊं लागलें ।।५५।। माया सोडितां सुटेना । धरितां हातीं लागेना । इहपर कांहींच साधेना । मानवासी ।।५६।। शुद्धज्ञानें मायानिरास । इहपर साधेल स्वहितास । ज्ञानरूप सद्गुरु परेश । पाहोन चरणीं लागावें ।।५७।। यास्तव सद्गुरुओळख । कथिली परीक्षा निष्कलंक । काळवेळ पाहोनि देख । व्यवहारसाधन कथियेलें ।।५८।। स्वल्प परि अर्थें जाड । कथन केले गुह्य गोड । अनुभवज्ञान नव्हे वाड । शब्दावडंबर निरर्थक ।।५९।। शब्दज्ञानी घरोघरीं । अनुभवीं क्वचित् गिरिगव्हरीं । उथळ जळा खळखळ भारी । डोह शांत गंभीर ।।६०।। सप्तमाध्याय करोनि पठण । ठेवितां तैसे आचरण ।

दुस्तरकाळीं भवतरण । होईल जाणा निश्चयें ।।६१।। क्रिया करोनि दाविली । तीच जनां उपदेशिली । रसाळ मधुर फळें आलीं । तीं कथिलीं अष्टमीं ।।६२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते त्रयोदशाध्यायांतर्गतः द्वितीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

## *समास तिसरा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। सद्गुरुपदीं लागतां । अनन्यभावें सेवा करितां । भवसिंधु होईल तरता । सच्छिष्य जाणावा ।।१।। शिष्य सद्गुरु होईल । भेद मुळींचा विरेल । मानव करणी करील । तरी होय जगदात्मा ।।२।। कलीं परमार्थ गहन । म्हणोन न व्हा उदासीन । प्रयत्नें प्राप्त निधान । दुर्लभ तेंचि साधावें ।।३।। कोणी म्हणती संचित नाहीं । संचित पूर्वठेवा पाहीं । कष्टें सांठविला जिहीं । तयांसींच तो लाभतसे ।।४।। एवं प्रयत्न हेंचि सार । सत्संग तयासि आधार । येणेंचि तरले नर । तरती, पुढें तरतील ।।५।। लहानथोर कथिले भक्त । जे जे गुरुपदांकित । एक वसति दों वसति जात । कोणी पावले मुक्कामीं ।।६।। मार्ग चालूं असतां कांहीं । इच्छित ठाव दुर्लभ नाहीं। अडचणी गुंता पडतां पाहीं । गुरुमाय हात देतसे ।।७।। मार्गीं देहादि वसति ठाव । उणेंअधिक भोगी जीव । साधनीं असावा उत्साह । उणें-अधिक मानूं नये ।।८।। गुरुभक्तांच्या जाती दोन । सकाम निष्काम करिती भजन । यास्तव थोर आणि सान । कथन केले अवधारा ।।९।। परि श्रींची हातवटी। सकामिया नैष्कर्म्य पोटीं । बोधोन नेती उफराटीं । भाविकांसी निजपंथें ।।१०।। जन्म हेंचि पातक गहन । तैशा वासनाही सघन । परि हंसदृष्टि जाण । क्षीर तितुकें सेविलें ।।११।। आणिक एक

जाणणें । लक्षांमाजीं एक जाणे । क्वचिता हातीं येईल केणें[1] । सद्वस्तु कष्टसाध्य ।।१२।। तैसे समर्थांचे सेवक । असती जरी न्यूनाधिक । तरी वंद्यचि निःशंक । राजमुद्रे मोल चढे ।।१३।। असो ऐसें अष्टमाध्यायीं । ठेवी प्रस्तुत पुण्याई । तेचि जडले गुरुपायीं । नमन करूं साष्टांगें ।।१४।। नवमाध्यायीं गोरक्षण । तैसेंचि कथिलें अन्नदान । राममंदिरें स्थापून । सत्कर्मपोयी घातल्या ।।१५।। गोमाहात्म्य वर्णिलें न वचे । इहपरहित मानवांचें । सद्धर्म आणि सुभिक्षेचें । साधन हें सभाग्य ।।१६।। अन्नदान अतिथिपूजा । परमसंतोष गरुडध्वजा । आदरेंकरोनि गुरुराजा । समस्तांसी बोधितसे ।।१७।। अन्नपूर्णा पाकशाळे । सदा दावी निजसोहळे । शतसहस्र येतांही निराळे । उणें पडों नेदीच ।।१८।। कुबेर राहे श्रींचे घरीं । आले अतिथि आदरी । जेथें प्रत्यक्ष श्रीहरी । उणें काय त्या ठायां ।।१९।। ऋणमुक्त केले किती । मुंजी-विवाहां नसे मिती । धेनु बहुमोलें घेती । हिशेब कोणा कळेना ।।२०।। जितुक्या येती सुवासिनी । खण देती तयांलागोनि । बालकां अंगीटोपी करोनी । प्रेमभरें बोळविती ।।२१।। ब्रह्मचारी संन्यासी । बैरागी तडीतापसी । वस्त्रें देती तयांसी । ज्याचे त्यापरी ।।२२।। तेथें नांदे गणपति । जो विद्यावंतांचा अधिपति । अनेकांच्या शंका फेडिती । साधार स्वानुभवें ।।२३।। भूतभविष्य जाणोनि । प्रत्युत्तर दे गुरुजननी । उणें अधिक चापपाणी । होवोंच नेदी ।।२४।। इतुक्या असोनिया कळा । वेष अत्यंत साधासरळा । अखंडशांतीचा जिव्हाळा । उर्मिरहित ।।२५।। बहुत येती निंदक । नीचोत्तरें बोलती अनेक । शांत राहोन गुरुनायक । समाधान करिती तयांचें ।।२६।। कांहीं धूर्त परीक्षूं येती । स्थिति पाहोन चकित होती । प्रेमभावें शरण रिघती । धन्य साधु म्हणोनी ।।२७।। सामर्थ्य असोन लीनता । सर्वां भूतीं दयार्द्रता । अहंकार सारोनि परता । सानपणा अंगीकारिती ।।२८।। म्हणती

१ वस्तु.

'आम्ही माणदेशी शेतकरी । रामदासी केवळ भिकारी । कुटुंबवत्सल संसारी । मुमुक्षुजन ।।२९।। लोकीं उठविलें बंड । साधुत्वाचें घेती कुभांड । येरवीं सर्व थोतांड । तुम्ही आम्ही सारखे' ।।३०।। मूर्तिमंत ज्ञानघन । आदि-मध्यान्त अविच्छिन्न । परि पांघरोन अज्ञान । पोरांसवें खेळती ।।३१।। कुणबटासी कुणबट गोष्टी । करिती जुनाट मराठी । ज्ञानियासी ज्ञानभेटी । भाविकांसी भाविक ।।३२।। योगाभ्यासियासी योग । षट्चक्रभेद अष्टांग । धमनित्रय भ्रमरमार्ग । दावोनी देती वायूचा ।।३३।। सर्वज्ञासी काय उणें । जे जे येतील शहाणे । तितुकियांचीं समाधानें । करिती बहु आदरें ।।३४।। असो ऐसीं बहुत चित्तें । शांतवोनि लाविलीं भक्तीतें । दुस्तर कलीमाजीं निरुते । उपकार केले अगणित ।।३५।। दशम एकादशांत । हेंचि ध्यावें जी सतत । आणिक अवतार समाप्त । जाणा येथें वर्णिला ।।३६।। बहुत जनां लाविला लळा । प्रेमतंतूचा जिव्हाळा । गुरुचि देव राउळा । मानोनि गळां पडतील ।।३७।। ज्ञानचक्षु क्वचितांसी । ते जाणती गुरुपदासी । एरवीं सर्व सगुणासी भजती भावभक्तीनें ।।३८।। माय बाप सुत जाया । याहून श्रीचरणीं माया । देहत्यागीं शोकत्रस्त होतील बाया । नर आणि बालकें ।।३९।। यास्तव दूर धाडिले । येत्यांसि अडथळे घातले । सगुणरूप लोपविलें । निर्गुणीं झाले विलीन ।।४०।। काशीपासोन रामेश्वर । बहुत करविला नामगजर । असंख्य तारिले नर । ख्याती झाली चहूंदेशीं ।।४१।। आणिक एक कार्य केलें । देशांसि जें दौर्बल्य आलें । पारतंत्र्यें विकळ केलें । पिळपिळोनी काढिलें ।।४२।। यासी सबळ कारण । पाप भरलें अतिगहन । दुःखमूळ दुरित जाण । श्रुतिस्मृति बोलती ।।४३।। हरिस्मरणें दुःखें जाती । हरिस्मरणें पापें जळती । याकारणें नामजपाप्रति । लाविले लक्षानुलक्ष ।।४४।। शुद्ध भूमिका निर्मळ बीज । असलिया सुफळें येती सहज । तेंहि पुढें दिसेल काज । यथाकाळीं यथाक्रमें ।।४५।। दशरथें तप केलें । तेव्हां रामचरण लाभले । भाग्यवान

पुरुष झाले । शुद्धभूमिकेपासोनी ।।४६।। असो पुढील कार्य जें होणें । तें एक श्रीगुरु जाणे । लखोटा लिहूनिया जेणें । ठेविला स्वहस्तींचा ।।४७।। पक्कें मोर्तब करोनि । वरि लिहिलें श्रींनीं । मजवांचोनिया कोणी । फोडूं नये लखोटा ।।४८।। दुरितनाश कार्यकारण । तप करविलें नामस्मरण । इहपरहित करोन । समाधिस्थ जाहले ।।४९।। द्वादशाध्यायीं समाधीवर्णन । कथिलें परिसा जी सज्जन । जेणेयोगें समाधान । वैराग्ययुक्त होतसे ।।५०।। ब्रह्मचैतन्य परात्पर । अखंड अक्षय चराचर । संचलें रितें अणुभर । स्थान पाहतां गवसेना ।।५१।। त्यांतहि विशेष स्थानें । परिसा जी सद्गुरुवचनें । गुरुवचनीं विश्वास धरणें । निजकर्तव्य शिष्याचें ।।५२।। अखंड वास भक्तहृदयीं । जेणें चित्त अर्पिले गुरुपायीं। नामजप जेथें पाहीं । तेथें वास श्रीगुरूंचा ।।५३।। जेथें नामोत्साह चालती । आदरें प्रसाद अर्पिती । तेथें वास गुरुमूर्ती । न्यून पडों देईना ।।५४।। संकटकालीं भक्तीनें । बाहती श्रींसी करुणावचनें । तया स्थळीं धांवोनी जाणें । श्रीगुरु मायबाप ।।५५।। सच्छिष्य जेथ स्थापना करी । अनंत भावना एकसरी। जडल्या तेथें भक्तकैवारी । वसती नित्य निर्लिप्त ।।५६।। जेथें श्रींच्या पादुका । भक्त पूजिती भावें देखा। तेथें वास गुरुनायका । साच साच जाणावा ।।५७।। मायबापांची करितां सेवा। तेथें गुरूंसी विसांवा । आणिक प्रकार परिसावा । गुरुभक्तांचे संगमीं ।।५८।। सद्गुरुलीला जेथें वर्णिती । लिहिती वाचिती पूजा करिती। भक्तिभावें सेवा करिती । साह्य तयांसी सर्वदा ।।५९।। गोदावलींचीं मुख्य स्थानें। परिसा जी निर्मल मनें । 'शेजगृहीं असे माझें नित्य राहणें' । ऐसें वदले आम्हा श्रीगुरु ।।६०।। समाधि साक्षात् गुरुरूप । प्रगट गुप्त भेद अल्प । अनेकांचा हरती ताप। साक्षात्कार घडोघडी ।।६१।। अनेकांच्या कामना पुरती । कित्येकांसी ज्ञानप्राप्ति । अनेकां साधनें सुचविती । यथाक्रम यथान्याय ।।६२।। दर्शनें सकलां होय समाधान । जेवीं प्रत्यक्ष दर्शन ।

येविषयीं स्वानुभव जाण। कथन करूं तुम्हांसी ।।६३।। श्रींनी केला देहत्याग । वियोगें जाहला उद्वेग । समाधिदर्शनें अभंग । गुरुमाय भेटली ।।६४।। वरी जीं जीं कथिलीं स्थानें । अनुभवियां खूण बाणे । कांहीं दृष्टांत इतरांकारणें । कथन करूं अवधारा ।।६५।। समाधीचे तिसरे दिवशीं । अनुग्रह दिधला द्रविडांसी । दृष्टांतहि बहुतांसी । होती बहुविधप्रकारें ।।६६।। वाराणसीं विप्रबाळ । बुडतां आठवी गुरु दयाळ । हात देवोनि तीराजवळ । आणोनि जीव वांचविला ।।६७।। जालनेकरांचे जामात । पांडुरंगबुवा परम भक्त । बदरीनारायण तीर्थाप्रत । जाऊन मागें परतलें ।।६८।। तेव्हा हृषीकेशाचें दर्शन । पुढें चट्टी सत्यनारायण । तेथें घोर कानन । व्याघ्र मार्गीं आड आला ।।६९।। गुरगुर करी वांकुल्या दावी । अत्यंत भय वाटलें जीवीं । तेव्हां आठविले गोसावी । ब्रह्मचैतन्य सद्गुरु ।।७०।। शरणागता अभयदाते । साक्षात् प्रगट झाले तेथें । वदती 'व्याघ्र काय करील तूंतें । शिरीं असतां रामराय' ।।७१।। असो व्याघ्र निघोनि गेला । ऐसा भक्तसंकटीं सद्गुरू धांवला । स्थिरचर व्यापून राहिला । जगदात्मारूपें ।।७२।। आणिकहि बहुतांसी । साक्षात्कार बहुवसी । झाले परि ग्रंथासी । विस्तार होईल ।।७३।। जैसा भाव तैसा देव । हाचि मुख्य अभिप्राव । अंतर्बाह्य गुरुराव । येत ना जातसे ।।७४।। घटीं आकाश पाहिलें। तें गोलाकार भासलें । तैसें सद्गुरु नटले । भावनेसारिखे ।।७५।। द्वादशाध्याय मुक्तामाला । त्रयोदश मेरु आगळा । गुरुकृपामृत जिव्हाळा । अखंड आकंठ पान करूं ।।७६।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते त्रयोदशाध्यायांतर्गतः तृतीयः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु।।**

## *समास चवथा*

श्रीसद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजाय नमः ।। नमो पुरुषा गणपति । शारदा सुविद्या प्रकृति । नमो स्वयंसिद्ध ज्योति । चैतन्यब्रह्म ।।१।। नमो सकळ श्रोतेजन । धन्य तुमचें कृपादान । वारंवार प्रोत्साहन । देऊन ग्रंथ वदविला ।।२।। ग्रंथ लिहिण्याची स्फूर्ति । उपजली कोणे रीती । कोणेपरीनें समाप्ति । जाहली ती परिसावी ।।३।। घेतां श्रींनीं समाधि । तीन संवत्सरें गेली अवधि। परि श्रीचरित्रासंबंधीं । कोणी कांहींच बोलेना ।।४।। श्रींचे शिष्य ज्ञानी । एकाहूनि एक द्विगुणी । प्राचीन अर्वाचीन दोन्ही । शास्त्रांमाजीं प्रवीण ।।५।। कांहीं अपरोक्षज्ञानी सिद्ध । जयांवरी सद्गुरुप्रसाद । अधिकारी मठपति प्रसिद्ध । संप्रदाय वाढविते ।।६।। परि कारण तें वेगळें । कांहींनीं लिहों आरंभिलें । तयां श्रीगुरु वदले । 'लिहूं नये कोणीहि ।।७।। ग्रंथ लिहिणार वेगळा असे । तो लिहील अनायासें । उचित काळीं पहा खासें । तुम्ही स्थिर रहावें' ।।८।। ऐसी झाली मागें भाक । तेणें स्थिर सकल लोक। नातरी एकाहून एक अधिक । ज्ञानी चतुर गुरुभक्त ।।९।। आणिक एक मुख्य कारण । आत्मश्लाघा निष्कारण । श्रवणीं न पडावी म्हणोन । आज्ञा न देती कवणासी ।।१०।। तो काल निघोनि गेला । परि भाव तैसाचि उरला । आज्ञा नसे कवणाला । प्रसाद कोणा कळेना ।।११।। कोणी प्रयत्न करूं जातां । तया निवारिती सर्वथा । तुम्हांसि नसे पात्रता । पुण्यपुरुष पाहिजे ।।१२।। माहिती कोणा न देती । प्रसंग आल्याहि छपविती । स्फूर्तिदाते गुरुमूर्ति । दोष नसे कवणाचा ।।१३।। असो इतुक्याहि प्रसंगांत। आम्हां स्फूर्ति अवचित । झाली परि वदाया मात । वाव कोठें दिसेना ।।१४।। विद्या नाहीं दीक्षा नाहीं । सहवास सेवा बहुत नाहीं । वैभव मान्यता कांहींच नाहीं । स्फूर्ति मात्र दुणावली ।।१५।। श्रीसमाधीनंतर । ब्रह्मानंद भक्त थोर । गुरुरूप मानिती साचार । सकलहि गुरुभक्त ।।१६।। तयांसि

कैसें पुसावें । सूर्यापूढती जैसे काजवे । स्वयें कैसें प्रकाशावें । श्लाघ्य नोहे ।।१७।। यास्तव चरित्रदिग्दर्शन । ''नमस्कारत्रयोदशी''[१] म्हणोन । श्लोक रचिले हेतु धरोन । चरित्रलेखनाचा ।।१८।। ते हरिदास यांचेकरवीं । दावोनी आज्ञा घेतली बरवी । तेणें प्रफुल्लता आली नवी । स्फूर्तीसि सिद्धवाक्यें ।।१९।। याउपरी औदासिन्य । माहितीअभावीं आलें गहन । गुरुभक्त न उघडिती वदन । तेंहि एकें दूर केलें ।।२०।। कागवाडकर रामदासी । पत्र देती हरिदासांसी । उभयतां मिळोन मजसी । साह्य केलें मनोभावें ।।२१।। कांहीं ग्रंथ पाहिल्यावरी । प्रासादिक वदलीं सारीं । मग माहिती उपरि[२] । कांहीं देवों लागले ।।२२।। गोखले उपनामी भले । लेखनसाह्य त्यांनी केले । बहुतीं प्रोत्साहन दिलें । वरी छाया गुरुकृपा ।।२३।। शके अठराशें चाळीस । पुण्यतिथी मार्गशीर्ष । ग्रंथारंभ गोंदावलीस । श्रीसन्निध जाहला ।।२४।। बुधग्रामीं[३] साग्र लिहिला । श्रीकृपें पूर्ण झाला । अठराशें त्रेचाळिसाला । अर्पण केला गुरुचरणीं ।।२५।। श्रीकृपेचीं उत्तरें । वेडींवांकुडीं लिहिली बरें । सेवन करा क्षीरनीरें । हंसदृष्टि ठेवोनि ।।२६।। बहुत मतें एकवटोनी । कांहीं स्वानुभव घेवोनी । कथा लिहिल्या ग्रंथसदनीं । सत्य आणि निवडक ।।२७।। सद्गुरुलीला अनंत अपार । काव्य काय उतरील पार । कांहीं सत्य आणि साधार । असती त्या घेतल्या ।।२८।। क्वचित् शब्दभेद झाला । तरी बाध न ये तत्त्वाला । तत्त्वदृष्टि घेऊन चाला । श्रोतेजन भाविकहो ।।२९।। घुगरदरे सोलापूरकर । श्रींचे आप्त आणि चतुर । यांनींहि चरित्र मधुर । गद्य लिहिले श्रींचे ।।३०।। धीट पाठ प्रासादिक । करिती गद्यपद्यात्मक । श्रींचे दरबारीं अनेक । सेवा करिती यथाशक्ति ।।३१।। आरती सवाई अष्टक । पद अभंग आणि श्लोक ।

**१ प्रस्तुत ग्रंथामधील प्रत्येक अध्यायाचे प्रारंभींचा श्लोक मिळून ही 'नमस्कारत्रयोदशी' होते. २ यानंतर, अधिक. ३ सांगलीजवळ बुधगांव येथें.**

भूपाळ्या गद्येंहि अनेक । भक्त स्तविती श्रीगुरु ।।३२।। कोकिळकंठ प्रेमळ वाणी । रूप लावण्य इंद्रियें देखणीं । कवित्वशक्ति चातुर्यखाणी । देणें भगवंताचें ।।३३।। कांहीं असतीं उपजत ज्ञानी। एकपाठी असती कोणी । सरळ नासिका गौरवर्णी । देणें हें भगवंताचें ।।३४।। राजयासी पुत्र झाला । आणि पांगुळाच निपजला । ही ईश्वरकरणी, तयाला । मानव बापुडें काय करी ।।३५।। हिरण्यकश्यपूसि प्रह्लाद । हा ईश्वरी प्रसाद । सुररिपुच्या गृहीं शुद्ध । देवभक्त निपजला ।।३६।। तैसें साधन ना भजन । नाहीं केले शास्त्राध्ययन । परि गुरुकृपा गहन । देणे भगवंताचें ।।३७।। कर्ता तो वेगळाचि असे । देहबुद्धि लावी पिसें । अहंकार माथां बैसे । अधोगतीसी न्यावया ।।३८।। भाग्यें कामधेनु आली । तेणें संपत्ति दुणावली । कृपणत्वें खादाड दिसली । मग मांडिला विक्रय ।।३९।। धेनु धन सकल गेलें । दैन्यवाणें उगाचि शिणलें । यास्तव देहबुद्धिवेगळें । साधकें असावें ।।४०।। तैसी ही प्रसादवाणी । लिहविता सद्गुरु धनी । गुरुबंधू आयतनीं । कथा कथिते ।।४१।। लेखक द्विज चित्पावन । ऋग्वेद शाखा आश्वलायन । अत्रिगोत्र फडके म्हणून । उपनामें संबोधिती ।।४२।। वासस्थान तासगांव । विष्णु यशोदा जनकदेव । गोपाल ऐसें वदती सर्व । तुम्ही श्रोते जाणावें ।।४३।। रामदासीबुवा ऐसें । सद्गुरुमाय संबोधीतसे । ग्रंथीं निर्देश तोचि असे । श्रोतीं आक्षेप न धरावा ।।४४।। वामनबुवा मठ मोरगिरी । सद्गुरुसेवा मानोन बरी । शुद्ध लिपि लिहोनि सत्वरीं । बहुपरी साह्य केलें ।।४५।। ग्रंथ नव्हे हा प्राचीन । ना ही सरणी अर्वाचीन । कोणा दिसे अधिकन्यून । तरी क्षमा असावी ।।४६।। ग्रंथ नव्हे सुलभ गद्य । ग्रंथ नव्हे गूढ पद्य । वेडेवांकुडे दोन शब्द । गुरुचरणीं अर्पिले ।।४७।। शृंगार-हास्य-शोकादिक । रस जे रजतमात्मक । साधका होती बाधक । ते येथें वर्जिले ।।४८।। भक्तिरस

सत्त्वप्रधान । सद्गुरूचा महिमा गहन । उपदेशवचनें प्रमाण । घेतली संतउच्छिष्टें ।।४९।। वेदांत सिद्धांत धादांत । नीतिव्यवहार परमार्थ । गुरुभक्तांचा अनुभव येथ । सत्य शोधोनि वर्णिला ।।५०।। गुरुलीला ही साधार । परि कांहीं सोडिला प्रकार । जेणें दुखवेल परांतर । ऐसें दृष्टांत त्यागिले ।।५१।। कांहीं भाग लिहिला होता । परि दृष्टांत होय अवचितां । निंदकाचें कृत्य वर्णिता । लाभ काय तुम्हांसी ।।५२।। असो प्रत्यक्ष असतां श्रीगुरुवर । निंदकां करिती उपकार । तैसाच ग्रंथगर्भीं प्रकार । गुरुआज्ञेनें जाहला ।।५३।। गुरु दयेची माउली । गुरु शांतीची साउली । गुरु आनंदा घरकुली । गुरु माय सर्वांची ।।५४।। षड्गुणैश्वर्यसंपन्न । सद्गुरु माझें निधान । भक्तांसि सदा प्रसन्न । स्वानंदरस वर्षतसे ।।५५।। असो माहात्म्य श्रीगुरूंचें । शब्दातीत अगम्य वाचे । म्यां शब्दस्वरूप दिधलें काचें । म्हणून क्षमा भाकितों ।।५६।। सद्गुरुचि एक बुद्धिदाता । कर्ता वक्ता आणि श्रोता । सूक्ष्म देहअहंता । समरस होवो श्रीचरणीं ।।५७।। जें जें कांहीं घडे कर्म । तें तें अर्पावें हा धर्म । तैसी अहंताहि दुर्गम । श्रीसेवे लाविली ।।५८।। समर्थ सद्गुरूंची कीर्ति । साधकां मार्गदर्शी ज्योति । जे कोणी भावें गाती । प्रसाद होय तयांवरी ।।५९।। सद्गुरुलीला करितां श्रवण । अखंड होय समाधान । नाना शंकांचें निरसन । होय येथें ।।६०।। प्रपंच साधोन परमार्थ । कैसा साधावा निजस्वार्थ । हेंहि सद्गुरु समर्थ । बोधिती या ठायीं ।।६१।। सद्गुरूंच्या प्रतिमा अनेक । त्यांहूनि विशेष हे रूपक । येथें साक्षात् गुरुनायक । वास करिती अक्षरीं ।।६२।। वेद तोचि विश्वंभर । तैसी लीला गुरुवर । येथें रोकडा साक्षात्कार । भाविकांसि होईल ।।६३।। रामायण हरिवंश । पूजितां प्रसन्न जगदीश । तेवीं श्रीसद्गुरुलीलामृतास । पूजितां गुरुमाय तोषेल ।।६४।। या ग्रंथाची करितां सेवा । सद्गुरु देईल विसांवा । तापत्रयांतून जीवा । सोडवील धरा विश्वास ।।६५।। सद्भावें ग्रंथ श्रवण करितां । जाईल समंध भूतव्यथा । चेडेचेटुका

वार्ता । न चलें येथें ।।६६।। देह प्रारब्धाधीन । हें पूर्वींच गेलें नेमोन । उपाय करितां अधिकन्यून । समर्थकृपें होतसे ।।६७।। निपुत्रिकां पुत्रप्राप्ति । दरिद्रियां धनप्राप्ति । रोगग्रस्तां रोगमुक्ति । सद्गुरुमाय देईल ।।६८।। बद्धासि होय अनुताप । मुमुक्षूसि साधन स्वल्प । साधकासि ज्ञानदीप । गुरुमाय दावील ।।६९।। असतां दृढश्रद्धा विमल भाव । सदा जवळींच गुरुराव । मग त्रिविधताप मायोद्भव । दूर जाती पळोनि ।।७०।। सद्भावें सेवा करितां । वाहील सद्गुरु त्याची चिंता । भवसिंधुवरोनि तारिता । युक्तिप्रयुक्ति होईल ।।७१।। सेवेचे बहुविध प्रकार । मुख्य श्रवण मनन आचार । सप्ताह पूजा नमस्कार । प्रदक्षिणा हीं उपांगें ।।७२।। जैशी असेल कालगति । जैसी ज्याची शक्ति मति । तैसी भजावी गुरुमूर्ति । परमपावन गुरुलीला ।।७३।। सद्गुरु माय दयावंत । भोळा भाव सिद्धीस नेत । यास्तव न धरितां किंत । यथाशक्ति आळवावी ।।७४।। यावरी श्रोते प्रश्न करिती । सप्ताह करावा कवणें रीती । कैसी होय फलप्राप्ति । कथन करावें ।।७५।। वक्ता वदे बरवें पुसिलें । वंदन करोनि गुरुपाउलें । कथितों अवधान द्या भले । श्रोते तुम्ही भाविक ।।७६।। अंतःशुचि बाह्यशुचि । स्थानशुचि द्रव्यशुचि । श्रोतृसमुदायशुचि । शक्य तितुकें साधावें ।।७७।। निष्काम पाठ मुख्य धर्म । सकाम हा गौणधर्म । दोहीं ठायीं हरती श्रम । सद्गुरु दयावंत ।।७८।। स्नानसंध्या करोनि । भक्तिभावें पूजोनि । सोज्ज्वळ दीप ठेवूनि । पाठारंभ करावा ।।७९।। प्रत्येक ओवी वाचल्यावरी । 'श्रीराम' म्हणा सत्वरीं । ऐसी प्रतिओवीसि वैखरी । श्रीरामीं लावावी ।।८०।। येणें सद्गुरु तोष पावे । येणें फल दुणावें । सेतु बांधिला जैसा देवें । तैसा परमार्थ साधेल ।।८१।। ही गुरुघरची सरणी । श्रोते नीट धरा ध्यानीं । प्रतिदिनीं दोन अध्याय वाचोनि । नैवेद्य आरती करावी ।।८२।। सात्त्विक आहार मृदु वचन । ब्रह्मचर्य नामस्मरण । इतुकें होतां तात्काळ विघ्न । गुरुकृपें निरसेल ।।८३।। तीन दिनीं अध्याय सहा । चवथें

दिनीं सातवा पहा । मननयुक्त वाचावा हा । पान करा बोधामृत ।।८४।। पुढें तीन दिनपर्यंत । प्रतिदिनीं दोहींप्रत । वाचोन सप्ताह समाप्त । सांगता करावी ।।८५।। सांगता मुख्य लक्षण । नामस्मरण अन्नदान । सात्त्विक द्रव्य मेळवून । यथाशक्ति करावें ।।८६।। आषाढ शुद्ध पौर्णिमेसी । अवश्य करा सप्ताहासी । गुरुपूजा ते दिवशीं । उत्सव प्रिय गुरुभक्तां ।।८७।। कली प्रबल झाला मोठा । श्रद्धेसि मारिला चपेटा । परि प्राचीन सुलभ वाटा । साधकें न सोडाव्या ।।८८।। वरी दिसते मोहक । अंतरीं अति भयानक । साधकें नसावें वंचक । लोकेषणें कदापि ।।८९।। परांतर दुखविणें हेंचि दुरित । दया सदाचार हेंचि सुकृत । रामनाम साधन सारभूत । वैराग्य परम वैभव ।।९०।। शेवटीं एक विनवणी । लय लागो नामस्मरणीं । श्रीजगदीश नमोनी । घेऊं गुरुचरणीं विसावा ।।९१।। इति श्रीसद्गुरुलीला। श्रवणीं स्वानंदसोहळा । पुरविती रामदासीयांचा लळा । कृपाकटाक्षें ।।९२।।

**इति श्रीसद्गुरुलीलामृते त्रयोदशाध्यायांतर्गतः चतुर्थः समासः ।। श्रीसद्गुरुचरणार्पणमस्तु ।।**

**।। इति त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ।।**

**।। श्रीसद्गुरुलीलामृत ग्रंथ समाप्त ।।**

# आरती श्रीसद्गुरूंची

(श्रीब्रह्मानंदमहाराजकृत)

आरती बेळगुवे[१] सद्गुरु श्रीब्रह्मचैतन्या ।
परब्रह्मा परात्परा सनकादिकमान्या ।। आरति बेळगुवे ।।
नित्यशुद्धा निजानंदा निरुपमवैभवा ।
निरंजना निष्प्रपंचा निजजनभवदावा[२] ।
निरीह[३] निर्मळ मुनिगणनुतपदि[४] कायो[५] राघवा ।। आरति बेळगुवे ।।१।।
वाराणसी क्षेत्रदि प्रेतव बदकिसिदातने[६] ।
इद्दल्लिद्दू दूरिन भक्तगे दर्शन कोट्टवने[७] ।
ओंदु पाविन अन्नव साविर मंदिगुणिसिदवने[८] ।। आरति बेळगुवे ।।२।।
सुंदरानना[९] कुंदरदना[१०] इंदीवरनयना[११] ।
मंदस्मित हृन्मंदिरस्थापितइंदिरारमणा[१२] ।
गंधवाहप्रिय[१३] पाहि[१४] पाहि ब्रह्मानंदना ।। आरति बेळगुवे ।।३।।

---

१ ओवाळूं. २ आपल्या भक्तांच्या संसारास जाळून टाकणारा अग्नि. ३ निरिच्छ. ४ मुनिगणांच्या तपांचें. ५ रक्षण करणारा. ६ वाराणशी क्षेत्रीं प्रेत उठविलेंस. ७ असलेल्या ठिकाणापासून दूरच्या भक्ताला दर्शन दिलेंस. ८ एक पावशेर भातांत हजार लोकांना जेवूं घातलेंस. ९ सुंदरमुख. १० कुंदकळ्यांप्रमाणें दांत असलेला. ११ कमलनयन. १२ लक्ष्मीपति (श्रीराम) याला हृदयांत ज्यानें स्थापिलें आहे असा. १३ वायुप्रिय, वायुपुत्र, मारुतिस्वरूप (श्रीमहाराज). १४ रक्षण कर.